# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०७/२०२०** **दिनांक ११.०५.२०२०**

**स्थळ- मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दिनांक ११/०५/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१५४/२०२०, दि.०२.०५.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार सदरहु सभा सोमवार दिनांक ११/०५/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर येथे सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
२. मा.श्री.अरुण डोंगरे (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
३. मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक. (Video Calling व्दारे)
४. मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेला विषय वाचुन कायम करणे.**
**करोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत... माहे मार्च २०२० व एप्रिल २०२० चे मासिक वेतन आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका -

(अ) कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत सर्व स्तरांवरुन कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे. सदर साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी संस्थान व्यवस्थापन व प्रशासनाच्या स्तरावर मा. तदर्थ समितीच्या दिनांक १७ मार्च, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीचे मान्यतेने व निर्देशानुसार, संस्थानचे प्रशासकीय स्तरावर विविध आदेशान्वये / परिपत्रकान्वये उचित उपाययोजना करणेत आलेल्या आहेत.

या उपाययोजनेंतर्गत दिनांक १७ मार्च, २०२० पासून व त्यानंतर दिनांक २३ मार्च, २०२० / दिनांक २४ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कायम/संस्थान कायम कंत्राटी / कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी / बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी / मानधनावर कार्यरत असणारे कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार व कामाचे निकडीनुसार पूर्णतः तर काही विभागात अंशतः बंद करणेत आलेल्या आहेत.

(ब) माहे फेब्रुवारी,२०२० अखेर व सध्या संस्थान आस्थापनेवर खालीलप्रमाणे विविध प्रकारचे कर्मचारी विविध विभागात कार्यरत आहेत –

०१. कायम कर्मचारी तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी
०२. संस्थान कंत्राटी कर्मचारी
०३. कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी
०४. बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी (उक्त पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदारामार्फत कार्यरत विशेषतः निवासस्थाने, प्रसादालय, रुग्णालये आदि विभाग )
०५. निश्चित मानधनावर / निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कार्यरत कर्मचारी (विशेषतः रुग्णालये विभाग)

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी दिनांक २२ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात / राज्यात **LOCKDOWN** लागू केलेला आहे. त्यामुळे संस्थान स्तरावर ही वर नमुद केलेप्रमाणे दिनांक २३ मार्च, २०२० पासून टप्प्या-टप्प्याने अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्वच विभागातील कर्मचा-यांची कार्यालयातील/कार्यस्थळावरील उपस्थितीवर निर्बंध आणणेत आलेले आहेत. तथापि

आता, उपरोक्त सर्व कर्मचा-यांचे माहे मार्च, २०२० चे वेतन माहे एप्रिल, २०२० मध्ये आदा करावे लागणार आहे. याबाबत विवेचन असे की,

**(क-१)** वित्त विभाग, भारत सरकार यांचेकडील दिनांक २३ मार्च, २०२० रोजीचे कार्यालयीन परिपत्रकात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. .. 2. Due to these measures, there is a likelihood of a number of contractual, casual and outsourced staff such as house-keeping staff etc. being required to stay at home, which under normal circumstances would result in deduction in their pay / wages. In order to avoid any undue hardships under the prevailing extraordinary circumstances, it has been decided that where every any such contractual, causal and outsourced staff of Ministries / Departments and other organizations of Government of India, is required to stay at home in view of lockdown order regarding COVID-19 prevention, as announced by various States / UT Governments, they shall be treated as "on duty" during such period of absence and necessary pay / wages would be paid accordingly."

**(क-२)** मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. कामगार उपआयुक्त, मुंबई शहर यांना अग्रेषित केलेल्या दिनांक २० मार्च, २०२० रोजीचे पत्रात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

" .. .. In the backdrop of such challenging situation, all the Employers of Public / Private Establishments may be advised to extend their coordination by not terminating their employees, particularly casual or contractual workers from job or reduce their wages. If any worker takes leave, he should be deemed to be on duty without any consequential deduction in wages for their period. Further, if the place of employment is to be made non-operational due to COVID-19, the employees of such unit will be deemed to be on duty.

The termination of employee from the job or reduction in wages in this scenario would further deepen the crises and will not only weaken the financial condition of the employee but also hamper their moral to combat their fight with this epidemic. In view of this you are therefore directed to issue necessary Advisory to the Employers / Owners of all the establishments in your jurisdiction."

**(क-३)** मा. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीचे शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे -

" .. .. सर्व खाजगी आस्थापना, कारखाने, कंपन्या, दुकाने (अत्यावश्यक सेवा आस्थापना वगळून) इत्यादी आस्थापनांचे सर्व कामगार (कंत्राटी, बाह्यस्त्रोताव्दारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले कर्मचारी व कामगार, तात्पुरत्या कालावधीसाठीचे कर्मचारी व कामगार, रोजंदारीवरील कामगार) ज्यांना कोरोना वायरस Covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे घरी/स्थानबध्द राहावे लागत आहे, अशा सर्व कामगार/ कर्मचारी हे कर्तव्यावर असल्याचे समजण्यात यावे व त्यांना संपूर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात यावेत.

हे आदेश महाराष्ट्रातील सर्व निमशासकीय, औद्योगिक, वाणिज्यिक, व्यापारी व दुकाने आस्थापनांना लागू राहतील. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी याबाबतची दक्षता सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावी. "

(क-४) मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीचे शासन आदेश/ परिपत्रकान्वये माहे मार्च, २०२० चे माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान करणेत येणार वेतन दोन टप्प्यात आदा करणेत यावे, म्हणून कळविणेत आलेले आहे.

उपरोक्त आदेश सर्व सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांना देखील लागू राहतील, असे नमूद करणेत आलेले आहे. परंतु याबाबत विवेचन असे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही स्वयं अर्थसहाय्यित विश्वस्तव्यवस्था असून, केंद्र अथवा राज्य शासनाकडून सदर विश्वस्तव्यवस्थेस कर्मचा-यांचे वेतनासाठी/कर्मचा-यांना द्यावयाचे आर्थिक लाभासाठी कुठल्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य/अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनाबाबत कुठलीही आर्थिक अडचण नाही.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद अ, ब व क मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, संस्थान आस्थापनेवरील सर्व प्रकारचे अधिकारी / कर्मचारी यांना माहे मार्च, २०२० चे मासिक वेतन माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान / आदा करणेसाठी, विषयांकित कामकाजासाठी दिनांक १७ मार्च, २०२० रोजीचे आदेशानुसार, स्थापित करणेत आलेल्या प्रशासकीय उपसमितीने दिनांक ०१ एप्रिल, २०२० रोजीचे टिपणीन्वये प्रस्तावित केलेनुसार व मान्यता दिलेनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे –

**०१.** दिनांक २२ मार्च, २०२० रोजी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांनी संपूर्ण देशात संचारबंदी (जनता कर्फ्यू) लागू केलेली होती. त्यामुळे अत्यावश्यक विभागांच्या सेवा वगळतां इतर सर्व कर्मचा-यांना सुट्टी देणेत आलेली होती. तसेच दिनांक २२ मार्च, २०२०रोजी मध्यरात्रीनंतर मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात संचारबंदी लागू केली. दिनांक २२ मार्च, २०२० पासून राज्यात / शहरात / गावांमध्ये संचारबंदी लागू केल्यामुळे संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कर्मचा-यांना दिनांक २४ मार्च, २०२० रोजीचे आदेशाने कामावर येण्यास प्रतिबंध करणेत आलेला होता तसेच काही विभागात टप्प्या-टप्प्याने / चक्रीय पध्दतीने कमीत कमी कर्मचारी कामावर बोलविणेत यावेत म्हणून आदेशित करणेत आलेले होते. त्यामुळे दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी कामावर / कर्तव्यावर हजर आहेत, असे गृहित धरुन त्यांना वेतन आदा करावे लागणार आहे.

**०२.** दिनांक २१ मार्च, २०२० रोजी व त्यापूर्वी कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी विनावेतन रजेवर / कामावर गैरहजर/विनावेतन खाडयावर असतील, त्यांचे वेतनविहित पध्दतीने नियमानुसार, त्याप्रमाणात कपात करावे लागणार आहे.

**०३.** तथापि, ज्या कायम कर्मचा-यांनी दिनांक २१ मार्च, २०२० रोजी व त्यापूर्वी अर्जित / किरकोळ / वैद्यकीय रजा मिळणेबाबत विहीत पध्दतीने संबंधित विभागप्रमुखांकडे अर्ज सादर केले असतील, तर त्यांचे अर्ज मंजूर करणेत येऊन, त्याच्या नोंदी रजा नोंदवहीत घेणेत येतील.

**०४.** दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च,२०२० चे अखेर जे कर्मचारी आळीपाळीने / चक्रीय पध्दतीने/टप्प्या-टप्प्याने कर्तव्यावर हजर असतील, त्यांच्या स्वाक्ष-या हजेरी नोंदवहीत घेणेत याव्यात. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र. २९१६ / २०२०, दिनांक २४ मार्च, २०२० नुसार, आवश्यकतेनुसार कमीत कमी कर्मचारी कार्यालयात किंवा कार्यस्थळावर हजर ठेवणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे, त्यामुळे या संस्थान आदेशानुसार जे कर्मचारी कर्तव्यावर हजर नसतील, त्यांचे नांवापुढे **"Covid-19-P"** या इंग्रजी अक्षरात मानवी हजेरी नोंदविणेत यावीआणि त्यानुसार माहे मार्च, २०२० चे हजेरीपुस्तकावर याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय संबंधित विभागप्रमुखांचे स्वाक्षरीनिशी नोंदविणेबाबत आदेशित करता येईल -

" .. ..अभिप्रायदेणेत येतो की,माहे मार्च, २०२० मध्ये दिनांक २२ मार्च, २०२० नंतर वरील कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांचे पुढे "Covid-19-P" असे नोंदविणेत आलेले आहेत, ते त्या-त्या दिवशी कामावर / कर्तव्यावर हजर होते, असे गृहित धरुन, माहे मार्च, २०२० या महिन्याचा खाडेतक्ता कामगार विभागास / सामान्य प्रशासन विभाग (पगारबील कक्ष) यांना कळविणेत आलेला आहे तसेच त्यानुसार माहे मार्च, २०२० चे वेतन आदा करणेत आलेले आहे."

०५. सामान्य प्रशासन विभाग (रजा) / कामगार विभाग यांनी उपरोक्त अभिप्रायानुसार विहित पध्दतीने सर्व संबंधित विभागाचे खाडेतक्ते तपासून त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेबाबत आदेशित करता येईल -

" .. ..अभिप्राय देणेत येतो की, संबंधित विभागप्रमुख यांनी हजेरी पुस्तकावर नोंदविलेल्या अभिप्रायानुसारमाहे मार्च, २०२० या महिन्याचा खाडेतक्ता कामगार विभागास/सामान्य प्रशासन विभाग (पगारबील कक्ष) यांना कळविणेत आलेला आहे."

**०६.** संस्थान आस्थापनेवरील सर्व विभागांनी तसेच कामगार विभाग आणि कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांनी त्यांचेमार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांची हजेरी तपासतांना, दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक २१ मार्च, २०२० या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी पूर्णपणे गैरहजर असतील, त्यांची दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर या कालावधीतही सलग गैरहजेरी दर्शवून त्यांना माहे मार्च, २०२० चे वेतन आदा/प्रदान करु नये. माहे मार्च, २०२० मध्ये पूर्ण गैरहजर असणा-या अशा कंत्राटी कर्मचा-यांची नांवाची स्वतंत्ररित्या नोंदी संबंधित विभागाने ठेवणेबाबत तसेच बिलांसोबत जोडणेकामी आदेशित करता येईल.

**०७.** सर्व विभागप्रमुखांनी तसेच कामगार विभागाने कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांची बिले अदायगीसाठी सादर करतांना वर अ.नं. ०४ व अ. नं. ०५ मध्ये नमूद केलेला

अभिप्राय बिलांवर सुस्पष्ट नोंदवून, सदरची बिले विहित पध्दतीने मा.वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत आदेशित करता येईल.

**०८.** ज्या विभागांकडे उक्ते पध्दतीने दिलेल्या कामांसाठी बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी/निश्चित मानधनावर/निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कर्मचारी कार्यरत आहेत, त्या विभागांनी उपरोक्त अ.नं.०४ व ०५ मध्ये नमुद केलेल्या अभिप्रायांशी सुसंगत व सुस्पष्ट अभिप्राय देऊन, अशी वेतनबिले अदायगीसाठी स्वतंत्ररित्या कार्यालयीन टिपणीसह मा.वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेस्तव सादर करणेबाबत आदेशित करता येईल.

०९. माहे एप्रिल,२०२० चे वेतनाबाबत (माहे मे, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाबाबत), उपरोक्त परिस्थितीत काही बदल झाल्यास, त्याप्रमाणे परिस्थितीनुरुप अलाहिदा आदेश पारित करणेत येईल.

(इ) मा. तदर्थ समितीचे दिनांक १७ मार्च, २०२० रोजीचे निर्णयानुसार तसेच उपरोक्त परिच्छेदांतील सविस्तर विवेचनानुसार, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या साथरोगाचा प्रादुर्भाव रोखणेकामी करणेतआलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेंतर्गत, संस्थान आस्थापनेवर परिच्छेद ब मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यरत असणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२० व एप्रिल, २०२० चे वेतन अदायगीसाठी परिच्छेद ड मध्ये अ.नं.०१ ते ०९ मध्ये नमुद केलेल्या प्रस्तावित कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव चक्रीय पध्दतीने मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.२३५** **आजचे सभेच्या अजेंडयावरील विषय नं.०१, ०२, ४३ व ६३ या विषयांवरील एकत्रित निर्णय सदर इतिवृत्ताचे शेवटी परिशिष्ट “अ” म्हणून जोडलेला आहे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०२** **संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती आदेश देणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांस अनुसरुन, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर (मा. तदर्थ समितीचे सदस्य) यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक पीए/०३/२०२०, दिनांक ०६ जानेवारी, २०२० अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

“ .. .. With reference to the subject noted above, my attention was invited to the news published in daily newspaper “ Loksatta” dt. 04.01.2020. As per said news, 588 contractual employees, working in Shri Saibaba Sansthan Trust have been issued with regular appointment letters absorbing them in the employment of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.

It is seen from order dt. 09.10.2019 passed in PIL No. 120 of 2019 between Uttamrao Rambhaji Shelke Vs The State of Maharashtra & ors., regularization of 2500 contractual employees is also one of the grounds agitated.

In the above background, it is clear as to why the ad-hoc Committee was bypassed before issuing such appointment orders.

I hope that all important facts would be brought to the notice of the Committee in this regard. ”

उपरोक्त मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर ( मा. तदर्थ समिती सदस्य) यांचे प्राप्त पत्रास अनुसरुन विवेचनात्मक तपशील खालीलप्रमाणे सादर करीत आहोत -

विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर करणेबाबतचे दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे+अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेली आहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

(०१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

(अ-२) त्यानंतर, मा. शासनाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार, संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेच्या प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक (एक पद) व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता परफ्यूजनिस्ट (०१ पद) नव्याने समाविष्ट करणेस मान्यता दिली.

(अ-३) त्यानंतर मा. शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ चे पत्रानुसार, संस्थानकडील विविध पत्रव्यवहारास अनुसरुन असे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सर्व विभागातील कामकाजाचा आढावा घेऊन वाढीव पदे मंजूर करण्याचा सुधारित व एकत्रित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(अ-४) याच कालावधीत, श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी कडील विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व त्यामुळे तुकडयांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन १० वाढीव सहाय्यक शिक्षक पदांना मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन, मा. शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार, सहायक शिक्षक संवर्गातील १० पदे निर्माण करणेस मान्यता दिलेलीआहे.

(अ-५) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां,सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-६) दरम्यानचे कालावधीत तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये, संस्थान प्रशासनाकडील दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला. सदरहू मूळ प्रस्तावावर मा. शासनाकडून विचारणा करणेत आलेल्या बाबींवर वेळोवेळी अलाहिदा पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

(अ-७) तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०८ डिसेंबर,२०११ रोजी सादर करणेत आलेल्या (परिच्छेद अ-६ मध्ये नमूद केलेप्रमाणे) कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेच्या प्रस्तावाबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे शासकीय निवासस्थानात झालेल्या संस्थान कामकाजासंबंधित आढावा बैठकीचे इतिवृत्त मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र दिनांक ०१ मार्च, २०१८ (प्रत्यक्ष प्राप्त दिनांक ०९ मार्च, २०१८ ) इकडील कार्यालयास प्राप्त झालेले होते.

उपरोक्त दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे आढावा बैठकीचे इतिवृत्तातील विषय क्रमांक ०४ श्री साईबाबा संस्थानच्या कुशल व अकुशल ९१३ कर्मचा-यांना नियमित करणेबाबत यावर खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे -

(०१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आकृतीबंधातील कंत्राटी पदांना स्थायी पदे म्हणून मान्यता देणेत यावी.

(०२) सदर पदांवरील पदभरती प्रक्रिया राबविण्यात यावी.

(०३) पदभरती प्रक्रीयेमध्ये श्री साईबाबा संस्थानमधील कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागील सेवा कालावधीस प्राधान्य देण्यात यावे व त्यासाठी २५ गुण ग्रेस स्वरुपात देण्यात यावेत.

(अ-८) याच अनुषंगाने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून दिनांक १२ सप्टेंबर,२०१८ रोजीचे पत्राने असे कळविणेत आले होते की,

".. .. (दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे मा. मुख्यमंत्री यांच्या आढावा बैठकीतील निर्णय क्र.०४) सदर निर्णयानुसार संस्थानच्या आकृतीबंधात सुधारणा करणे आवश्यक आहे. यास्तव या अनुषंगाने संस्थानमार्फत व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. "

(अ-९) उपरोक्त तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवासस्थानी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे बैठकीतील निर्णयानुसार, कंत्राटी पदे स्थायी पदांमध्ये रुपांतरीत झालेनंतर त्यावरील नेमणुकांसाठी पदभरती प्रक्रीया कशी राबवावी याबाबत स्पष्ट निर्देश देणेत आलेले नाहीत. तसेच पदभरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी कर्मचा-यांना कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागिल सेवा कालावधीसाठी २५ गुण ग्रेस देणेत यावेत असे कळविले आहे, याबाबतही स्पष्टता नाही. तसेच सेवेतील आरक्षणाबाबत ही स्पष्टता नाही. सध्या संस्थानमध्ये कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांपैकी बहुतांशी कर्मचारी हे ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत, त्यामुळे पदभरती करतांना वयोमर्यादेचे निकषात त्यांचा समावेश होणे शक्य नाही, त्यामुळे त्यांना वयोमर्यादेत सूट द्यावी किंवा कसे तसेच सेवेतील आरक्षण याबाबत मा. शासन स्तरावरुन मार्गदर्शन मिळणेकामी संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०१ डिसेंबर,२०१८ अन्वये विनंती पत्र देणेत आलेले होते.

(अ-१०) त्यानंतर मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ (प्राप्त दिनांक १५ जानेवारी, २०१९) अन्वये खालीलप्रमाणे कळविले होते -

१. शासनाच्या दिनांक १२ सप्टेंबरच्या (या टिपणीतील संदर्भ क्रमांक ०८) पत्रान्वये कळविल्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सन २००९ मधील मंजूर आकृतीबंधात १९१८ पदे जी कायम स्वरुपी कंत्राटी दाखविण्यात आली आहेत त्या पदांपैकी किती पदांना स्थायी पदे म्हणून रुपांतरीत करणे आवश्यक आहे,

२. यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना किती वित्तीय भार येणार आहे,

३. उपरोक्त मुद्यांच्यासह व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

(अ-११) संस्थानमध्ये कर्मचारी कंत्राटारामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करत असलेले माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे व सन २००१ ते २००५ अखेर पर्यन्त ढोबळमानाने ९१६ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणुका देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांची माहिती खालील प्रमाणे आहे-

तक्ता अ

| अ. नं. | तपशील | माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर संख्या | दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर संख्या | दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूणसंख्या (३+४=५) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | तांत्रिक कुशल कर्मचारी | ०५२ | ०१६ | ०६८ |
| ०२ | कुशल कर्मचारी | ०३९ | ०१७ | ०५६ |
| ०३ | अकुशल कर्मचारी | ३५६ | ११२ | ४६८ |
| ०४ | कुशल सुरक्षा कर्मचारी | ००४ | ००१ | ००५ |
| ०५ | अकुशल सुरक्षा कर्मचारी | १८४ | ०६१ | २४५ |
| | एकुण (१) | ६३५ | २०७ | ८४२ |

उपरोक्त तक्ता अ व मूळ दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी सादर केलेल्या प्रस्तावातील कर्मचा-यांच्या संख्येत खाली नमूद केलेल्या कारणांमुळे काही कंत्राटी कर्मचारी कमी झालेने फरक पडलेला आहे-

तक्ता ब

| अ. नं. | तपशील | माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर कमी झालेली संख्या | दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर कमी झालेली संख्या | दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूण कमी झालेली संख्या (३+४=५) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | काम सोडून गेलेले | ४२ | १२ | ५४ |
| ०२ | मयत झालेले | १० | ०१ | ११ |
| ०३ | वयोमर्यादा ओलांडल्याने | ०७ | ०१ | ०८ |
| ०४ | अभिलेख सापडत नसलेले | ०४ | ०१ | ०५ |
| ०५ | कमी केलेले | ०३ | ०४ | ०७ |
| | एकुण (२) | ६६ | १९ | ८५ |
| | एकुण (तक्ता क्र.०१+०२) | ७०१ | २२६ | ९२७ |

थोडक्यात, मूळ प्रस्तावात नमूद केलेले ९१६ कर्मचारी अधिक नजरचुकीने राहून गेलेले माहे डिसेंबर, २००५ पूर्वीचे ११ कर्मचारी असे मिळून एकूण ९२७ कंत्राटी कर्मचारी आहेत/होते.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेल्या विवेचनास आणि विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, या प्रस्तावाबाबत करणेत आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे सविस्तर नमूद केली आहे.

विषयाची सद्यःस्थिती -

(ब-१) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या सविस्तर विवेचनास तसेच संदर्भाकिंत पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, दिनांक १७ सप्टेंबर,२०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

(ब-२) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि.०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. ”

**(ब-३)** उपरोक्त विवेचनानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत-

तक्ता क्रमांक ०१

| अ.नं. | तपशील | संख्या | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| (अ) | दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांची संख्या | ६३५ | -- |
| ०१ | यादीत एक नांव दोन वेळेस आलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्री. रविंद्र भडांगे यांचे नांव यादीतील अ.नं.५० आणि अ.नं. ५४ वर ही आलेले आहे, त्यापैकी यादीतील अ. नं. ५० नुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला आहे. |
| ०२ | यादीतील ६० वर्षे वयोमान पूर्ण केलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्रीमती पंचफुला राठोड (यादीतील अ.नं.०२) वयोमान ६० वर्षे पूर्ण झाल्याने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला नाही. |
| ०३ | यादीतील मयत झालेले कंत्राटी कर्मचारी | ००२ | श्री. दिवेकर (यादीतील अ.नं.६०) व श्री. कसबे (यादीतील अ.नं.५६४) हे मयत असल्या कारणाने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत. |
| ०४ | यादीतील दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतरचे कंत्राटी कर्मचारी | ००८ | सदरचे कंत्राटी कर्मचारी हे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर हजर झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देणेत आलेले नाहीत. (यादीतील अ.नं. ५७२, ५७४, ५७६, ५७७, ६३२, ६३३, ६३४ व ६३५ ) |
| ०५ | यादीतील सतत गैरहजर असणारे कर्मचारी | ००७ | कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत अलाहिदा कार्यवाही सुरु आहे. या २५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी तसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांची नांवे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीत आहेत, परंतु सध्या कामावर हजर नाहीत अशा कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत (यादीतील अ.नं. ८९, १७२, २४०, ४९१, ५०४, ६०० व ६११) |
| ०६ | यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४)या कालावधीत कामावर नसणारे कर्मचारी | ०१५ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारे परंतु माहे डिसेंबर, २००० पुर्वी कामावर हजर असणारे कर्मचारी. (यादीतील अ.नं.३, ४, ९, २७, ४८, ८२, ८४, १०५, ११४, ११६, १२२, १२९, १४९व १६९) |
| (ब) | एकूण (अ.नं.०१ ते ०६) | ०३४ | -- |
| (क) | पारित करणेत आलेले आदेश ((अ) –(ब)) | ६०१ | दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील ६०१ पात्र कर्मचा-यांना आदेश पारित करणेत आले. |
| (ड) | यादीत समाविष्ट आहेत परंतु नियुक्ती आदेश स्वीकारले नाही असे कर्मचारी | ००३ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्यायादीनुसार हजर दिवस व कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले होते परंतु काही कारणास्तव नियुक्ती आदेश स्वीकारले |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नाहीत असे कर्मचारी (यादीतील अ.नं.७६, ९० व ५३३ ) |
| (इ) | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले एकूण कंत्राटी कर्मचारी<br>एकूण (क-ड) | ५९८ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर कामावर असलेले) या कालावधीतील हजर दिवस आणि कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले असून, सदर कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. |

(ब-४) उपरोक्त परिच्छेद ब-३ मधील, तक्ता क्रमांक ०१(इ) मध्ये नमुद केलेप्रमाणे, कंत्राटी कर्मचा-यांना पारित करणेत आलेल्या नियुक्ती आदेशातील कर्मचा-यांचा विभागाप्रमाणे व प्रकारानुसार (कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी) यानुसार थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

तक्ता क्रमांक ०२

| अ. नं. | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले कंत्राटी कर्मचारी | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| ०१ | ५९८ | ०८७ | ५११ | ५९८ | ५६३ | ०३५ | ५९८ |

तक्ता क्रमांक ०३

| अ.नं. | विभागाचे नांव | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| 1 | 2 | 3 | 4 | (3+4)=5 | 6 | 7 | (6+7)=8 |
| ०१ | सामान्य प्रशासन विभाग | ०१ | ०६ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| ०२ | जनसंपर्क विभाग | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| ०३ | लेखाशाखा | १० | ०२ | १२ | १२ | ०० | १२ |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०२ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | ०४ |
| ०५ | मंदिर विभाग | ०१ | २५ | २६ | २६ | ०० | २६ |
| ०६ | प्रकाशने विभाग | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ०७ | आरोग्य विभाग | ०२ | ९० | ९२ | ८५ | ०७ | ९२ |
| ०८ | संरक्षण विभाग | ०२ | १४३ | १४५ | १३५ | १० | १४५ |
| ०९ | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| १० | बांधकाम विभाग | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| ११ | पाणीपुरवठा विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| १२ | बगीचा विभाग | ०० | ०३ | ०३ | ०२ | ०१ | ०३ |
| १३ | विद्युत विभाग | १४ | ०२ | १६ | १६ | ०० | १६ |
| १४ | मेकॅनिकल विभाग | ०३ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १५ | ध्वनिक्षेपण विभाग | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| १६ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १७ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | ०० | १४ | १४ | १४ | ०० | १४ |
| १८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | ०१ | १० | ११ | ११ | ०० | ११ |
| १९ | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | ०२ | ०१ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| २० | श्री साई आश्रम विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| २१ | श्री साई धर्मशाळा | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०० | ०२ |
| २२ | श्री साई प्रसादालय | ०२ | ७७ | ७९ | ७६ | ०३ | ७९ |
| २३ | कॅन्टिन विभाग | ०२ | ३६ | ३८ | ३८ | ०० | ३८ |
| २४ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०१ | ०७ | ०८ | ०८ | ०० | ०८ |
| २५ | भांडार विभाग | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | वाहन विभाग | १३ | ०३ | १६ | १६ | ०० | १६ |
| २८ | मुंबई कार्यालय | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २९ | श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल | ०४ | ०३ | ०७ | ०२ | ०५ | ०७ |
| ३० | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ३१ | श्री साईनाथ रुग्णालय | ०६ | २३ | २९ | २४ | ०५ | २९ |
| ३२ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४ | ३७ | ४१ | ३८ | ०३ | ४१ |
| | एकूण | ८७ | ५११ | ५९८ | ५६३ | ३५ | ५९८ |

(ब-५) उपरोक्त परिच्छेद ब-३ मधील तक्ता क्रमांक ०१/ अ. नं.०४मध्ये नमूद यादीतील जे कर्मचारी दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कामावर हजर झालेले आहेत, अशा ०८ कंत्राटी कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत. या सर्व ०८ कंत्राटी कर्मचा-यांना कागदपत्रे पडताळणीची संधी देणेत येत असून, त्यांना कामगार विभागासह, या कर्मचा-यांनी ज्या-ज्या विभागात काम केलेले आहे अशा विभागातील उपलब्ध कागदपत्रे पडताळणीकामी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

या ०८ कंत्राटी कर्मचा-यापैकी, जे कंत्राटी कर्मचारी हे सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४) या कालावधीत हजर असतील व ज्यांची कागदपत्रांची पडताळणी पूर्ण होईल त्यांना विहित प्रशासकीय पध्दतीने / मान्यतेने नियुक्ती आदेश पारित करणेत येतील.

(ब-६) उपरोक्त परिच्छेद ब-३ मधील तक्ता क्रमांक ०१/ अ.नं.०५ मध्ये जे कर्मचारी सतत गैरहजर आहेत अशा ०७ कंत्राटी कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत.

या ०७ कंत्राटी कर्मचा-यापैकी काही कंत्राटी कर्मचा-यांचा समावेश हा कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांमध्ये आहे. याबाबत कामगार विभागामार्फत प्रशासकीय स्तरावरुन अलाहिदाकार्यवाही सुरु असून, त्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे (मा.तदर्थ समितीचे) सभेपुढे विचारार्थ तथा निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे (मा. तदर्थ समितीचे) सकारात्मक निर्णयानंतरच,या ०७ कंत्राटी कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी पात्र होतील आणि जे सन २००१ ते सन २००४ (दि.२२/८/२००४ अखेर) कामावर हजर असतील, त्यांचे कागदपत्रांची यथोचीत पडताळणी करुन त्यांना विहित प्रशासकीय पध्दतीने/मान्यतेने नियुक्ती आदेश पारित करणेत येतील.

(ब-७) उपरोक्त परिच्छेद ब-३ मधील तक्ता क्रमांक ०१/ अ.नं.०६ मध्ये कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४अखेर) या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारेअसे १५ कंत्राटी कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश कागदपत्रांची पडताळणी व पूर्तता पूर्ण होईपावेतो प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत.

या सर्व १५ कंत्राटी कर्मचा-यांना कागदपत्रे पडताळणीची संधी देणेत येत असून, त्यांना कामगार विभागासह, या कर्मचा-यांनी ज्या-ज्या विभागात काम केलेले आहे अशा विभागातील उपलब्ध कागदपत्रे पडताळणीकामी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

या १५ कंत्राटी कर्मचा-यापैकी, जे कंत्राटी कर्मचारी हे सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४) या कालावधीत हजर असतील व ज्यांची कागदपत्रांची पडताळणी पूर्ण होईल त्यांना विहित प्रशासकीय पध्दतीने / मान्यतेने नियुक्ती आदेश पारित करणेत येतील.

तसेच या कंत्राटी कर्मचा-यापैकी जे कर्मचारी सन २००१ पूर्वी म्हणजेच माहे डिसेंबर, २००० पूर्वी कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असतील, त्यांचेबाबतीत विषयांकित मूळ प्रस्तावास अनुसरुन सकारात्मक विचार होणेकामी तसेच मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे आदेशात दुरुस्ती होणेकामी मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल.

(ब-८) याव्यतिरिक्त, दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीत समावेश नसलेले परंतु सन २००१ ते सन २००४ याकालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर असणारे अनेक कंत्राटी कर्मचारी नियुक्ती आदेश मिळणेकामी प्रशासनाकडे विनंती अर्ज करीत आहेत. प्रशासनाकडे प्राप्त झालेले संबंधित कंत्राटी कर्मचा-यांचे अर्ज कामगार विभागाकडे पडताळणीकामी पाठविणेत येत आहेत. या

संबंधित कारणास्तव प्राप्त होणारे सर्व कंत्राटी कर्मचा-यांचे अर्ज एकत्रित करुन, ते पात्र असल्यास त्याबाबतचा स्वतंत्र सविस्तर प्रस्ताव कामगार विभागामार्फत अलाहिदा सादर करणेत येत आहे.

(क) विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - २००४ मधील कलम – १३ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी या शीर्षाखाली उपकलम ०४ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

" .. .. ४. समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (मुख्य कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु, ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यन्त, केली जाणार नाही."

तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - २००४ मधील कलम – १६ मधील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखाली खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

" .. .. नियत दिवसाच्या लगतपूर्वी, जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल, आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही. "

उपरोक्त कलम १३ व कलम १६ मधील तरतुदीचा विचार करतां, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५(२३) अन्वये, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत माहे डिसेंबर, २००० पूर्वी व त्यानंतर माहे जानेवारी,२००१ ते माहे डिसेंबर,२००५ पर्यन्त कार्यरत असणारे एकूण ९१६ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावास मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयान्वये, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय होणारे वेतनावर तसेच दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर नियुक्ती देणेस मान्यता दिली.

मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, उपरोक्त परिच्छेद ब मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४) अखेर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कुशल / अकुशल म्हणून कार्यरत असलेल्या एकूण ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ६०१ कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत, त्यापैकी सेवेत रुजू होणेस इच्छुक असलेल्या ५९८कर्मचा-यांना कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिन्याचे कालावधीसाठी विहित अटी-शर्तीनुसार संस्थान सेवेत सामावून घेणेत आलेले आहे.

सोबत, ६३५ कंत्राटी कर्मचारी यांची सविस्तर यादी परिशिष्ट अ म्हणून तसेच नियुक्ती आदेश प्रलंबित असलेले ३४ कर्मचा-यांची सविस्तर माहिती परिशिष्ट ०१ ते परिशिष्ट ०७ म्हणून अवलोकनार्थ सादर केली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने करणेत आलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ / निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३६** **आजचे सभेच्या अजेंडयावरील विषय नं.०१ ,०२, ४३ व ६३ या विषयांवरील एकत्रित निर्णय क्र.२३५ सदर इतिवृत्ताचे शेवटी परिशिष्ट "अ" म्हणून जोडलेला आहे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०३** **मे.लेजर व्हिजन लि.हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

संस्थानचे मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017."

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

"‥ मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील **Payment Schedule** नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली

बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तींची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी."असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.१९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. सदर नोटीसबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी असा निर्णय झालेला आहे. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रानुसार लेजन व्हिजन यांचेबरोबर झालेल्या करारनाम्यातील क्लॉज ३१ नुसार आर्बिट्रेशन करणेपुर्वी प्रथम Mediation साठी जाणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर सभेत निर्णय क्रं.४१ अन्वये, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसुरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे प्रथम मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना मिडीएशनची नोटीस द्यावी, असे ठरले त्यासाठी राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांना मिडीएटर म्हणून प्रस्तावित करावे, असे समिती सदस्य मा.अॅड. मोहन जयकर यांनी सूचविले, त्यास समितीने मान्यता दिली. तसेच मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे.

संस्थानचे वतीने अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि. ११/०२/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन करीता नोटीस दिलेली आहे. यामध्ये मिडीएटर म्हणून श्री नितिन जी ठक्कर, सिनिअर काऊंसिल, मुंबई यांची नेमणूक करणेबाबत कळविले होते. उपरोक्त प्रमाणे झालेली कार्यवाही मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेपुढे माहिती व मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. सदरहू सभेतील निर्णय क्र.१८९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे मे.लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना संस्थानचे वतीने अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत मिडीएशन करीता नोटीस देण्यात आलेली असुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच यासाठी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांचे ऐवजी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.ए.पी. कानडे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली."

संस्थानचे वतीने अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि.१७/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन साठी त्यांनी घातलेल्या अटी अमान्य केल्या असल्याचे कळविले आहे. तसेच अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांनी दि.१८/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएटर श्री. नितीन ठक्कर यांना Mediation Failure Report देणेबाबत कळविले आहे.

मा. विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी त्यांचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे.

"Pursuant to the appointment of Mr. Nitin Thakker, Senior Advocate as the learned Mediator, Mr. Thakker had endeavoured to hold mediation meetings. However, M/s. Laservision Ltd., Hongkong came up with absurd suggestions and consequently the Mediator vide his Email dated 22nd October, 2019 has reported failure of the mediation proceedings. A copy of the Email sent by Mr. Thakker to M/s. Junnarkar & Associates is enclosed. Consequently stepswill now have to be taken for initiating arbitration proceedings.

I will now prepare a notice to be addressed to M/s. Laservision Ltd., Hongkong which will be sent through the Solicitors appointed for the Trust M/s. Junnarkar & Associates and will keep you informed of further proceedings."

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे. विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी मे.जून्नरकर ॲण्ड असो., मुंबईयांचे मार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस देणेत येत असल्याचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने कळविले आहे.

तथापी आर्बिट्रेशची कार्यवाही लवकर सुरु व्हावी या करीतासंस्थानचे वतीने मा. उच्च न्यायालयात काम पहाणारे ॲड. नितीन भवर यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही सुरु करणेसाठी दि.०९/११/२०१९ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ॲड. नितीन भवर यांना संस्थानचे वतीने जा. क्र.३१५३/२०१९, दि.१४/११/२०१९ रोजीचे पत्राने मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करणेस कळविणेत आले आहे.

तसेच सदरहू प्रकरणी आता पुढील कार्यवाही ॲड. नितीन भवर, औरंगाबाद यांचेमार्फत करणेत येणार असल्याने मे. जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस पाठविणेत येऊ नये अशा सुचना ॲड. श्री मोहन जयकर यांना संस्थानचे जा. क्रं. ३६०५/२०१९, दि.१६/१२/२०१९ रोजीचे पत्राने देणेत आलेल्या आहेत. यावर ॲड मोहन जयकर यांनी दि.१८/१२/२०१९ रोजीचे ईमेल व्दारे खालीलप्रमाणे कळविले आहे.

"I have received your letter dated the 16th instant in connection with the arbitration to be initiated against M/s.Laseervision Ltd. HongKong. You have informed me that you have taken a decision to appoint Mr.Nitin Bhavar, Advocate to act on behalf of the Sansthan in the said arbitration.

I hope you are aware of the following:

a) The arbitration is an international arbitration.

b) That the venue of the arbitration is Mumbai.

c) The arbitration involves a claim of several crores of rupees.

d) That Mr. Kanade has already been appointed as the Arbitrator by M/s. Junnarkar & Associates pursuant to authority given by the Board.

Could you please inform me whether the instructions given by you are in abrogation of or in supersession of the decision taken by the Board.

I do not have any personal animosity against Mr. Nitin Bhavar but I am sure a dispute of this magnitude affecting the Sansthan should be dealt with deftly especially when Board after due deliberation had taken the decision to appoint M/s. Junnarkar & Associates.

You have informed me that the initiation of the arbitration proceedings has taken time, I hope you have perused the Arbitration Clause which specifically requires the process of mediation to be first gone through and it is only upon the failure in the mediation that arbitration proceedings can be commenced. The mediation proceedings which were pending before Mr. Nitin Thakkar, Senior Advocate of Mumbai High Court in Mumbai has given his Failure Report and it is pursuant thereto that the arbitration proceedings have to commence. I will therefore await your instructions. If, however, you are keen on appointing Mr. Nitin Bhavar, I have no objection and I leave it to your learned opinion.

प्रस्ताव- तरी मे.लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही संस्थानचे पॅनल वरील ॲड. नितीन भवर यांचेमार्फत करणेत यावी अथवा ॲड. श्री मोहन जयकर यांनी उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे मे.जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत करणेत येत असलेली कार्यवाही सुरू ठेवावी याबाबत निर्णय होणेसाठी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि.हॉगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिस्ट्रेशन बाबत काम करणाऱ्या वकीलांची नावे मागविणेत येऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव लवकरात लवकर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०४** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादनासाठी संस्थान निधीतून रु.१६३.५५ कोटी खर्चास व या रस्त्यांचे जमीन खरेदीसाठी दि.२५.०६.२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेस मान्यतेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्येस निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्त (व्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्त (व्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नांच्या तीस टक्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्यातही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यासमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय : ०१. निर्णय क्र.६७६ दि.२०/०८/२०१७.
०२. निर्णय क्र.६९७ दि.२०/११/२०१८.

मा .छाननी समिती निर्णय :

०१. निर्णय क्र.१३ दि.३०/१०/२०१७.
०२. निर्णय क्र.२५ दि.१९/०१/२०१८.
०३. निर्णय क्र.२९ दि.०९/०४/२०१८.
०४. निर्णय क्र.५१ दि.१४/१२/२०१८.

प्रस्तावना:- तत्कालीन मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्राने शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ०६ रस्ते भूसंपादनखर्च रु.१६३,५५,२६,२१०/- व विकसनखर्च रु.४३,७२,२७,५४३/- तसेच अस्तित्वातील ०८ रस्ते विकसनखर्च रु. २२,६९,९१,५१०/- असा एकूण १४ रस्त्यांचा रु.२२९,९७,४५,२६३/- खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर केला होता.त्यात शिर्डी नगरपंचायत हद्दीतील खालील ०६ रस्ते भूसंपादन व विकसनाचा समावेश होता.

| अ. क्र. | रस्त्याचे नांव | लांबी (मी.) | रुंदी (मी.) | अस्तित्वातील रुंदी (मी.) | भूसंपादन करावयाची रुंदी (मी.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विकास योजनेतील २४ मीटर रुंदवळण रस्ता (साई श्रध्दा हाउसिंग सोसायटी कॉर्नर ते सन एड सॅन हॉटेल रस्ता) | २६५० | २४ | - | २४.०० |
| ०२ | विकास योजनेतील १२ मिटर रुंदीचा हॉटेल गोराडीया समोरील रस्ता ( ते निमगांव शिव रस्तापिंपळवाडी रस्ता) | ५५० | १२ | ५५०. | ६५०. |
| ०३ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा बिरेगांव रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता- वराह चौक ते कालिकानगर-१५ मीटर व पुढे बिरोबा मंदिरापर्यंत वहिवाटीप्रमाणे) | ५०० | १५ | १० | ५.०० |
| ०४ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) | ३२० | १५ | - | १५.०० |
| ०५ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा जुना पिंपळवाडी रस्ता (पुष्पांजली हॉटेल चौक ते पिंपळवाडी शिव हद्दीपर्यंत) | १००० | १५ | १० | ५.०० |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रस्ता यांना जोडणारा निता हॉटेल पश्चिमबाजू दक्षिणोत्तर रस्ता) | ३०० | १५ | -- | १५.०० |

उपरोक्त ६ रस्ते भूसंपादन करून विकसन करणेबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६७६ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

"...त्याचप्रमाणे प्रस्तावातील 'क' तक्त्यामध्येनमूद केलेले ०६ रस्ते भुसंपादन करून विकसीत करणेकामी बराचसा कालावधी लागणार असल्यामुळे, प्रथमत: सदरहु रस्ते भुसंपादन करणेकामी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करून देण्यात यावा व भुसंपादन प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ते रस्ते विकसीत करणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा. यासाठी अधिनियमातील तरतूदीनुसार छाननी समितीच्या पुर्वपरवानगीने, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा..."

मा. व्यवस्थापन समितीचे सदरहु निर्णयाबाबत मा.छाननी समितीचे दि.३०/१०/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.१३ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

".. .. उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की, छाननी समिती अध्यक्ष व इतर सदस्य यांनी या ठरावाबाबतची कागदपत्रे / सादरीकरण मागवून घ्यावे. तसेच भूसंपादनासाठीचा प्रत्यक्ष खर्च किती येणार व सदर रस्ते भाविकांना उपयोगाचे आहेत किंवा कसे? याबाबत पुढील छाननी समितीच्या बैठकीत प्रत्यक्ष पाहणी करून निर्णय घेण्यात येईल."

त्यानंतर मा. छाननी समितीचे दि.१९/०१/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.२५ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

".. उपरोक्त प्रस्तावाबाबत संस्थान अभियंत्यांशी नकाशासह प्रत्यक्ष चर्चा झाली, दिनांक २० तारखेस छाननी समिती अध्यक्ष, व्यवस्थापन समिती अध्यक्ष व मा.श्री.धनंजय निकम,उपजिल्हाधिकारी,मा.श्री.मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी, तसेच इतर अधिकारी प्रत्यक्ष निरिक्षणासाठी सकाळी ९ ते १० व दुपारी ०४ ते ०६ या वेळेत जाण्याचे ठरले आहे व प्रत्यक्ष पहाणी केल्यानंतर रस्त्यांची प्रत्यक्ष उपयुक्तता लक्षात घेवून व नगरपंचायतीच्या ठरावाची पहाणी करून पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे ठरले."

दि.२०/०१/२०१८ रोजी मा.छाननी समिती अध्यक्ष यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपजिल्हाधिकारी, संस्थानचे कार्यकारी अभियंता तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व अभियंते यांचेसमवेत वरील रस्त्यांची पहाणी केली. दरम्यान मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी दि.२१/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये ०६ रस्ते भूसंपादन करणेकामी येणारा संभाव्य मोबदला खर्च रु.१६३,५५,२६,२१०/-ऐवजी रु.१८७.०३ कोटी येणार असुन सदर रक्कम मा. उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडे जमा करणेस विनंती केली. त्यानुसार सुधारीत भूसंपादन खर्च रु.२३,४७,७३,७९०/-इतक्या वाढीव खर्चास मान्यता घेणेकामी दि. ०६/०३/२०१८ रोजी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी " अंदाजित कींमतचा प्रस्ताव already छाननी समितीपर्यंत गेलेला आहे. आता शासनाची तत्वत: मंजुरीनंतर वाढीवचा प्रस्ताव करू." असे निर्देश दिले. करीता वाढीव खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला नाही. त्यांनतर दि.२०/०१/२०१८ रोजीचे पाहणीनंतर मा. छाननी समितीचे दि.०९/०४/२०१८ रोजीचे सभेतील नि. क्र.२९ अन्वये ६ रस्त्यांबाबत खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

".. .. संस्थान निधीतून ६ रस्त्यांचे भुसंपादन या विषयाची सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती कायद्यातील तरतुदीप्रमाणे असे निदर्शनास आले की, अस्तित्वातील रस्त्यांच्या रुंदीकरणाचा वाढीव भुसंपादनाचा प्रस्ताव भुसंपादन अधिका-यांमार्फत कार्यान्वित होतो. भुसंपादन अधिकारी भुसंपादनाची प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी भुमि अभिलेख विभागाकडून संयुक्त मोजणी करून घेतात. संयुक्त मोजणीनुसार भू-संपादन संस्थेच्या ताब्यात असलेले क्षेत्र वगळून वाढीव क्षेत्राच्या भू-संपादनाची कार्यवाही भुसंपादन अधिका-यांकडून केली जाते.

दि.२०/०१/२०१८ रोजी स्थळनिरिक्षणासांठी मा. न्या. के. यू. चांदीवाल -छाननी समिती अध्यक्ष, मा. श्रीमती रूबल अग्रवाल (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. श्री.मनोज घोडेपाटील-उपजिल्हाअधिकारी, मा. डॉ. संदिप आहेर-उपकार्यकारी अधिकारी, मा. श्री. आर. एस. घुले- कार्यकारी अभियंता, मा. श्री. आर. बी. आहेर-उप कार्यकारी अभियंता, मा. श्री. सी.पी. खैरनार-उप अभियंता, मा. श्री. आर.डब्ल्यु. भामरे- उपअभियंता, मा. श्री. डी. एम. देसाई-उप अभियंता, मा. श्री. जी. एस. जाधव-कनिष्ठ अभियंता तसेचशिर्डी नगरपंचायतीचे मा. श्री. सतीष दिघे-मुख्याधिकारी, मा. श्री. भुजबळ-कनिष्ठ अभियंता, मा. श्री. गुजर-कनिष्ठ अभियंता हे अधिकारी होते. या अधिका-यांनी रस्त्याच्या उपयुक्ततेबाबत प्रत्यक्ष पाहणी केली व रस्त्याच्या उपयुक्ततेबाबत सांगोपांग चर्चा झाली.आजूबाजुला राहणा-या रहिवाशांशीही चर्चा झाली. छाननी समितीने असे सुचविले की, वरील ६ रस्त्यांचे भुसंपादनाबद्दल संबंधीत जमिनमालकांशी चर्चा करून जर आपसात रक्कम ठरत असेल तर संस्थानच्या

अर्थिक हिताच्या दृष्टीने त्या लोकांशी आपसात तडजोड करून चर्चा करून, जमिनीची किंमत/ मावेजा भूसंपादनाची प्रक्रिया न करता दिल्यास समर्पक राहील. याबाबत विशेष बाब म्हणून शासनाची मान्यता घेवूनच कार्यवाही करता येईल.

नगरपंचायतीतर्फे रु.१६३.५५ कोटि एवढी रक्कम भूसंपादनास लागेल, अशी मागणी आहे. हि रक्कम सध्या तरी अंदाजे दिसते. प्रत्यक्ष मोजमाप, रेडिरेकनर प्रमाणे किंमत, अतिक्रमणे हटविणे यांचा विचार होवून शासन मान्यतेनंतरच भूसंपादनाच्या निर्णयास मुर्त रुप देण्यात यावे.."

०६ रस्त्यांचे भूसंपादन खर्चासाठी रु.१६३.५५कोटी खर्चाबाबत मा. व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे उपरोक्त निर्णयाबाबत शासनाकडून पुढील आदेश व्हावेत याकरीता विधी व न्याय विभागाकडे दि.१५/०५/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर शासनाचे विधी व न्याय विभागाने दि.०४/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये०६ रस्त्यांची जमीन थेट खरेदीपद्धतीने खरेदी करण्यासाठी दि २०१८/०६/२५. शासनरोजीच्या निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करून सुधारीत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे कळविले.

संस्थानचे पत्र जा.क्र.एसएसएसटी/मालमत्ता/३८२४/२०१७, दि.१७/१०/२०१७ अन्वये जमीनी खरेदी करण्यासाठी मागविलेले मार्गदर्शनाचे अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र.सासंवि १०१७/१८४४/ प्र.क्र.२०१, का.१६, दि.२५/०६/२०१८ अन्वये संस्थान करीता खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे.

" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकरीता खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी खाजगी जमीनींचे क्षेत्रफळ,अंतर,जमीनीची सलगता,भूधारकांची संमती,मुल्यांकन,खरेदीची कार्यपध्दती इत्यादी बाबींचा सर्वंकष विचार करुन शासन खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी पुढील धोरण निश्चित करीत आहे -:

१. खरेदी करावयाच्या जमीनीचे क्षेत्रफळ-:

अ. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यासाठी खाजगी जमीन खरेदी करावयाची झाल्यास त्याचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे असणे बंधनकारक राहील.

i. बागायती क्षेत्र असल्यास असे क्षेत्र १ एकरपेक्षा कमी असू नये.

ii. जीरायती क्षेत्र असल्यास असे क्षेत्र २ एकरपेक्षा कमी असू नये.

Iii .संस्थानच्या मालकीच्या असलेल्या जमीनीलगत एखादी बागायत अथवाजिरायत १ एकरापेक्षा कमी क्षेत्र असलेली जमीन जर संस्थानच्या जमीनी लगतव सलग होत असेलतर सदरचे क्षेत्र प्रस्तुत धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेता येईल.

iv. नगरपंचायत हद्दीत मंजूर विकास योजनेतील संस्थानच्या विविध प्रयोजनासाठी आरक्षितअसलेल्या जमीनीचे क्षेत्र कितीही असले तरी ते प्रस्तुत धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेतायेईल.

२. खरेदीची वारंवारता: - श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीने अवास्तव प्रमाणात जमिन खरेदी करु नये. केवळ प्रस्तावित असलेल्या एखाद्या प्रकल्पासाठी आवश्यकता असल्यास जमीन खरेदीचा विचार करण्यात यावा जमीन खरेदी विषयी.शासनाकडे पाठवावयाच्या प्रस्तावामध्ये संबंधितप्रकल्पाचा तपशिलव व्यवस्थापन समितीचा ठराव सादर करणे आवश्यक राहीलके .वळ खाजगीभुधारकाने जमीन विकत घेण्याची विनंती श्री साईबाबा संस्थानला केली आहेया कारणा .स्तव जमिनीचीगरज आणि उपयुक्तता विचारात न घेता अशी जमीन विकत घेण्याबाबत विचार करण्यात येऊ नये.

३. अंतर:- श्री साईबाबा संस्थानसाठी खरेदी करावयाची जमीन ही शिर्डी शहरातील असावी किंवा शिर्डी शहरापासून जास्तीत जास्त १५कि.मी. परीघातील असावी. श्री साईबाबा समाधी मंदिरापासून अतिदुर असलेल्या जमीनी खरेदी करुन संस्थानच्या निधीचा अपव्यय करु नये. मात्र पालखी थांब्यासाठी पालखी मार्गावरील विविध ठिकाणी भाविकांना निवारा व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी खरेदी करावयाच्या जमीन प्रकरणी अंतराची सदर मर्यादा शिथील करता येईल.

४. जमीनीची सलगता:- खरेदी करावयाचे क्षेत्र/जमीन ही खंड/तुकडयांच्या स्वरुपात असू नये. जमीनीची सलगता आणी उपयुक्तता विचारात घेऊनच अशा जमीनीच्या खरेदीचा प्रस्ताव विचारात घेण्यात यावा तसेच हरीतपट्टयात समाविष्ट असलेली खाजगी जमीन खरेदी करु नये. मात्र श्री साईबाबा संस्थानच्या मालकीच्या जमिनी लगत किंवा अशा जमिनीजवळ हरित पट्टयात समाविष्ट एखादी शासकीय जमीन असेल व अशा ठिकाणी संस्थानचा एखादा प्रकल्प प्रस्तावित असेल आणि अशा प्रकल्पासाठी हरितपट्टयात समाविष्ट शासकीय जमीनीची संस्थानला आवश्यकता असल्यास,असे क्षेत्र सदर धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेता येईल.

५. जाहीर नोटीस प्रसिध्द करणे:-

अ.) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकरीता जमीन खरेदी करावयाची झाल्यास, तशा आशयाची जाहीर नोटीस मोठया प्रमाणात वितरित होणाऱ्या स्थानिक दैनिकांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

ब.) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी खाजगी भु-धारकांची जमीन खरेदी करावी असा स्वतंत्र अर्ज खाजगी भुधारकाकडुन प्राप्त झाल्यास अशा जमीनीबाबत हरकती मागविण्यासाठी देखील जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात यावी.

६. भूधारकांची संमती घेणे:- मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी संबंधित खाजगी भुधारक त्यांची जमीन वाटाघाटीद्वारे विकण्यास तयार आहेत, असे संमतीपत्र खाजगीभुधारक यांच्याकडुन घ्यावे.

७. मोजणी करुन घेणे :- मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांनी खरेदी करावयाच्याखाजगी जमीनीची मोजणी भूमी अभिलेख विभागाकडून करुन घ्यावी.

८. कायदेशीर शोध घेणे :-

अ.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी संबंधित खाजगी जमिनींचे सर्व्हे नंबर/गट क्रमांक निहाय सन १९५० पासून आजतागायत पर्यंतचे महसूल अभिलेख (गाव नमुनानं,७/१२, फेरफार नोंदी, गट बुक नकाशा) इत्यादी तपशिल तहसीलदार/संबंधित महसूल कार्यालयाकडुन प्राप्त करुन घ्यावा.

ब.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी संबंधित खाजगी जमिनींचे सर्व्हे नंबर/ गट क्रमांक निहाय गत ३० वर्षातील नोंदणीकृत दस्तांचा तपशिल (खरेदीखते, गहाणखते, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, दानपत्र इत्यादी) दुय्यम निबंधक कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावा.

क) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खरेदी करावयाच्या जमीनीचे शीर्षक शोध प्रमाणपत्र (Title Search Certificate) प्राप्त करुन घ्यावे.

९. मुल्यांकन:- खाजगी भूधारकाची जमीन ही केवळ शासनाच्या नोंदणी विभागाकडील बाजारमुल्य दरतक्त्यातील दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने खरेदी करण्यात यावी.

१०. जमीन खरेदीचे अधिकार:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यासाठी कोणत्याही स्वरुपाची जमीन ही शासन मान्यतेशिवाय खरेदी करु नये. जमीन खरेदीच्या सर्व प्रस्तावांना शासनाची पुर्व मान्यता घेण्यात यावी.

११. अभिहस्तांतरण पत्र / खरेदीखत करणे:-

अ.) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कायदेशीर शोध अहवालाच्या आधारे खाजगी जमिनी संदर्भात कोणताही न्यायालयीन विवाद नसल्याची व खरेदी प्रक्रीयेसाठी कोणतीही बाधा येत नसल्याची खात्री करावी.

ब.) शासनाच्या नोंदणी विभागाच्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे जमीनीची निश्चित केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा कमी दराने निश्चित केलेली रक्कम भुधारकाला अदा करण्यापूर्वी विहीत नमुन्यात भुधारकाकडून क्षतिपूर्ती बंधपत्र घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क.) क्षतिपूर्ती बंधपत्र घेतल्यानंतरच भूधारकाला देय असणारी रक्कम संबंधित भूधारक यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

ड.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी व संबंधित भुधारक यांनी अभिहस्तांतरण पत्र / खरेदी खताची नोंदणी संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये करावी. खरेदीखतामध्ये क्षतिपूर्ती बंधपत्र, देय मोबदला अदा केल्याचा तपशिल आणि अनुषंगिक बाबी नमूद कराव्यात व त्याची कागदपत्रे दस्ताचा भाग म्हणून खरेदी खतात समाविष्ट करण्यात यावा. अशा नोंदणीकृत खरेदी खताच्या मूळ प्रती प्राप्त कराव्यात.

इ.) खरेदी करावयाच्या जमीन पुर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत आहे याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करावी जेणेकरुन कोणत्याहीप्रकारचे हक्क व अधिकार निर्माण होवून न्यायालयीन प्रकरण उद्भवणार नाही.

१२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यासाठी शिर्डी शहराच्या विकास आराखड्यात आरक्षितकेलेल्या जमिनींच्या बाबतीत भुसंपादन कायद्यानुसार करावयाच्या प्रक्रीयेऐवजी खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदी देण्यास जमीन मालक तयार असल्यास अशा जमीनी देखील शासनाच्या पुर्वपरवानगीनेखरेदी करता येतील.

१३. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्याकरीता जमीन खरेदी करताना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम-१८८२ मधील कलम ५४ व ५५ मधील तरतुदींचे पालन करण्यात यावे.

१४. अटी व शर्ती शिथिल करण्याचे अधिकार - अपवादात्मक व विशेष प्रकरणांमध्ये वरीलपैकी कोणतीही अट वा शर्ती शिथिल करण्याचे अंतिम अधिकार शासनास असतील.

१५. खाजगी जमीनी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करण्याच्या अनुषंगाने वरील विहीतकार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.”

करीता शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्त्यांसाठी भूसंपादनाऐवजी खाजगी जमीन खरेदी करणेसाठी उपरोक्त दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.६९७ खालील प्रमाणे संमत झाला आहे.

“ …शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादन (अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी) करणेकामी भूसंपादन कायद्यानुसार प्रक्रिया करणेत यावी, तसेच सदर जमीनीचे भूसंपादन संस्थानसाठी होणारे नसून नगरपंचायतीसाठी होणार आहे. त्यामुळे त्यासाठी दि.२५/०६/२०१८ च्या शासन निर्णयाद्वारे विहीत करण्यात आलेले जमीन खरेदी धोरण सदर प्रस्तावास लागू होणार नाही, असे अभिप्राय छाननी समितीच्या मान्यतेने शासनास सादर करावे,असे ठरले. तसेच शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादनासाठी अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी शिर्डी नगरपंचायतीस देण्यास मान्यता देण्यात आली व सदर प्रस्ताव छाननी समितीचे मान्यतेने शासनाकडे पाठविण्यात यावा तसेच सुधारीत विकास आराखडा मंजूर होईपर्यंत प्रस्तावातील अ.नं.४ विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या प्रस्तावीत रस्त्याच्या भूसंपादनासाठीचा निधी राखुन ठेवण्यात यावा व उर्वरीत ५ रस्त्यांचा भुसंपादनाचा निधी शासनाचे मान्यतेनंतर शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करावा, असे ठरले. तसेच याकामी छाननी समितीची शिफारस घेवून प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असे ठरले.”

तदनंतर सदर प्रस्ताव मा.छाननी समितीचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला. त्यावर सविस्तर चर्चा होवून नि.क्र.५१ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

“.. .. यावर सविस्तर चर्चा झाली, संस्थानचे अधिका-यांनी त्यांचे मत मांडले व संस्थानचे व्यवस्थापनाचे अवाढव्य काम बघता भुसंपादनाचे काम स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे. त्यामुळे व्यवस्थापन समितीने दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेत केलेल्या निर्णयाप्रमाणे रक्कम रु.१६३.५५ कोटी शिर्डी नगरपंचायतीचे ६ रस्त्यांच्या भूसंपादनासाठी देणे योग्य होईल असे अधिका-यांनी सांगितले. सभा चालू असतांना उपरोक्त प्रस्तावातील अ.नं.४ विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या रस्त्यासाठी ज्या ११ व्यक्तींच्या जमिनी भूसंपादन होणारआहेत त्यापैकी

१. श्री.तुकाराम शंकरराव गोंदकर, २ श्री.अशोक खंडूजी कोते,
३. श्री.ज्ञानेश्वर शंकरराव गोंदकर, ४. श्री.दत्तात्रय शंकरराव गोंदकर,
५. श्री.वसंत महादू गोंदकर, ६. श्री.सदाशिव काशिनाथ गोंदकर,
७. श्री.दत्तात्रय तुकाराम गोंदकर, ८. श्री.रमेश भाऊसाहेब गोंदकर,
९. श्री.प्रभाकर तुकाराम गोंदकर,

या व्यक्ती हजर होत्या. त्यांनी विकास योजनेतील उपरोक्त नमुद रस्ता संस्थानला रस्ते विकासासाठी खरेदी देणेबाबत सहमती दर्शविली. याबाबत शासनाचे सध्याचे रेडीरेकनरचे दर अथवा चर्चेअंती जी रक्कम ठरेल ती घेण्यास आम्ही जमीन मालक तयार असल्याचे त्यांनी छाननी समिती समक्ष सांगितले. तसेच विनंती केली की, व्यवस्थापन समितीने या रस्त्यांचे भूसंपादन मागे ठेवण्याचे काही कारण नव्हते. छाननी समितीच्या सदस्यांमध्ये सर्व बाबीवर साधक-बाधक चर्चा होऊन असे ठरले की,शिर्डी नगरपंचायतीतर्फे रक्कम रु.१६३.५५ कोटी एवढी रक्कम भूसंपादनासाठी लागेल अशी जी मागणी आहे त्यानुसार या कार्यासाठी तेवढी रक्कम रु.१६३.५५ कोटी रकमेसाठी शासनाकडून मंजूर घ्यावी. भूसंपादनाची कार्यवाही ही छाननी समिती, व्यवस्थापन समिती, शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांचे समितीमार्फत तडजोडीची बोलणी जमिन मालकाशी थेट खरेदी पध्दतीने शासनाचे शासन निर्णय क्र.सासंवि१०१७/१८४४/प्र.क्र.२०१ का.१६ दि.२५/०६/२०१८नुसारनिश्चित केलेल्या जमिन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन त्यानुसार सुधारीत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. या प्रस्तावामध्ये अ.नं.४ वरील विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या रस्त्याचा समावेश करण्यात यावा”असे ठरले.

दरम्यान मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.८६/२०१८ मधील दि.३००/१२०१९/चे आदेशाने संस्थानला दैनंदिन खर्चाव्यतिरिक्त इतर निधि वर्ग करणेस मनाई केली. मा.छाननी समितीचे उपरोक्त निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेसाठी दि.०७/०२/२०१९ रोजी सादर केलेल्या टिपणीवर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "छाननी समितीचे निर्णयाप्रमाणे प्रस्ताव तयार करा. HC यांचे Stay उठवल्यानंतर" असे निर्देशित केले.

त्यानंतर शिर्डी नगरपंचायतीने दि.०८/०८/२०१९ रोजीचे पत्राने खालील ०२ रस्ते भूसंपादनासाठी निधी मिळणेबाबत विनंती केली आहे.

a. कनकुरी रस्ता ते नांदूर्खी रस्ता यांना जोडणारा १२ मी. रुंदीचा रस्ता - (अंदाजे खर्च रु.६.९७ कोटी)

ब) शिर्डी मंजूर विकास योजनेतील शिर्डी –निमगाव शिव १५.० मी. रूंदीकरण रस्ता (नगर मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडे श्री साईबाबा संस्थान साई प्रसादालयाकडे जाणारा भूसंपादन करणे.) -(अंदाजे खर्च रु.२.५५ कोटी)

दि.१६२०२०/०१/व दि.२७२०२०/०१/रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत व इतर अधिकारी-पदाधिका-यांचे उपस्थीतीत रस्ते भूसंपादन आढावा बैठक झाली. सदर बैठकीत प्रस्तुत प्रकरणी छाननी समितीचे निर्णयाप्रमाणे दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणानुसार पुढील कार्यवाही करणेबाबत मा.तदर्थ समितीची मान्यता घेवून विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेबाबत ठरले.

प्रस्ताव:- तरी छाननी समिती सभा दि.१४/१२/२०१८ मधील निर्णय क्र.५१ अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागपत्र दि.०४/०७/२०१८अन्वये प्रस्तावित ६ रस्यांस जमीन खरेदीसाठी जमीन मालकांशी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने जमीनी खरेदी करण्यासाठी शासनाचे सदर विभागाच्या दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करून त्यानुसार सुधारीत प्रस्ताव मा. प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी सादर करणेविषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी यांचेशी चर्चा करुन तसेच शिर्डी शहर सुधारीत विकास आराखडयाचे अवलोकन करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०५** **संस्थान परिसरातून निघणाऱ्या घनकचऱ्यासाठी एकात्मीकृत घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा (Integrated solid Waste Management System) उभारणेसाठी सल्लागार नेमणूकीकरीता ई-आर.एफ.पी. (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान व शिर्डीनगर पंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०३ अन्वये विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तत्पुर्वी मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रदेश, नाशिक यांनी पत्र दि.१७/१०/२०१८ अन्वये सदरहू प्रकल्पाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तसेच सदरहू प्रकल्पास शासन निर्णय क्र.सा.स.वि-१०१७/१६३४/ प्र.क्र.१७६/ का.१६ दि.०३/०१/२०१९ व दि.०७/०२/२०१९ रोजीचे निर्णयानुसार रक्कम रु.४,३५,३५,९४६/- मात्र इतक्या किंमतीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत आली आहे.

त्यानुसार दि.०७/०५/२०१९ रोजीचे टिपणीतील मान्यतेनुसार याकामी व्दितीय मागणी (Second Call) ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. ई-निविदा जमा करणेसाठी दि.२९/०६/२०१९ पर्यंतचे मुदतीत तिन निविदाधारकांनी ई-निविदा जमा केल्या होत्या. प्राप्त तिनही ई-निवीदेचे तांत्रिक माहीतीचे लिफाफे खरेदी समितीच्या दि.०३/०७/२०१९ रोजीच्या सभेपुढे (Online) उघडणेत आले व निवीदाधारक यांनी बिडींग कपॅसीटी संबंधी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने तिनही ई-निविदा तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरल्या होत्या.

सदरहू ई-निविदेच्या किमान पात्रता निकषातील बिडींग कपॅसीटी संबंधीची तरतूद रद्द करुन फेर ई-निवीदा प्रक्रिया राबवीणेस मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.४३२ अन्वये त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर विहीत पद्धतीने ई-निवीदा सूचना प्रसिद्ध करुन

निवीदा मागविणेत आल्या होत्या. दि.२०/०९/२०१९ पर्यंत ई-निवीदा जमा करणेचे अंतिम कालावधीत ०२ निवीदाधारकांनी ई-निवीदा अपलोड केल्या होत्या.

सदरहू निवीदांचा तांत्रीक लिफाफा दि.०७/०१/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदरहू ई-निविदेच्या किमान पात्रता निकषातील बिडींग कपॅसीटी संबंधीची तरतूद रद्द करुन फेर ई-निवीदा प्रक्रिया राबविलेली असल्याने सदरची ई- निवीदा प्रक्रिया ही प्रथम मागणी (First Call) होत असल्याने सदरची निवीदा प्रक्रिया रद्द करुन याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी असे ठरले आहे.

उक्त निविदा प्रक्रियेत दि.०४/०९/२०१९ रोजी झालेल्या निवीदापूर्व बैठकीचे वेळी काही इच्छुक निवीदा सादरकर्त्यांनी समक्ष तसेच ई-मेलव्दारे संस्थानचे कचरा डेपोचे ठिकाणी येणा-या सेंद्रीय कच-याचे प्रमाण फारच कमी म्हणजे सुमारे २ ते ३ टन प्रती दिवस इतकेच आहे असे निर्दशननास आणले आहे. त्यामुळे १० TPD क्षमतेच्या प्लांटचा पूर्ण क्षमतेने वापर होणार नाही. तसेच शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचे हद्दीतील कच-यासाठी कम्पोस्टींग प्रक्रीया सुरू केलेली असल्याने नगरपंचायतीकरीता उभारावयाच्या नियोजीत १० TPD क्षमतेच्या प्लांटची सद्यस्थितीत आवश्यकता दिसून येत नाही.

संस्थानचे विविध परीसरातून आरोग्य विभागामार्फत दैनंदीन कचरा संकलीत केला जातो. आरोग्य विभागाकडील माहितीनुसार संस्थान परिसरातून निघणा-या कच-याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | परीसराचे नाव | कच-याचा तपशिल | विल्हेवाट |
|---|---|---|---|
| ०१. | समाधी मंदीर परीसर व नियोजीत दर्शनरांग इमारत परीसर | अ) निर्माल्य - फुले | अगरबत्ती तयार करणेसाठी वापरणेत येतात. |
| | | ब) सुका कचरा - प्लास्टिकबॉटल, कागद, लाडू पाकिट व नाष्टा पाकिट यांची पाकिटे, चहाचे कप इ. | प्लास्टिकबॉटल सोडून उर्वरीत कचरा संस्थानचे कचरा डेपोवर टाकणेत येतो. |
| | | क) ओला कचरा - साईनिवास अतिथीगृह व साई सभागृह यांचे कॅन्टीन मधील कचरा | कचरा संस्थानचे कचरा डेपोवर टाकणेत येतो. |
| ०२. | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय, व्दारावती भक्तनिवासस्थान, व साईनगर कर्मचारी वसाहत | अ) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील हॉस्पिटल वेस्टेज | विहीत प्रकारे कच-याची विल्हेवाट करणेत येतो. |
| | | ब) सुका कचरा - प्लास्टिकबॉटल, कागद, चहाचे कप व कर्मचारी निवासस्थानातील सुका कचरा इ. | कचरा संस्थानचे कचरा डेपोवर टाकणेत येतो. |
| | | क) ओला कचरा - व्दारावती पार्कींगमधील भोजनालय तसेच साईनगर कर्मचारी वसाहतीमधून निघणारा ओला कचरा | |
| ०३. | श्री साईबाबा भक्तनिवास(५०० रुम्स), साईआश्रम भक्तनिवास व साईसहवास कर्मचारी वसाहत व परिसर | अ) सुका कचरा - प्लास्टिकबॉटल, कागद, चहाचे कप व कर्मचारी निवासस्थानातील सुका कचरा इ. | कचरा संस्थानचे कचरा डेपोवर टाकणेत येतो. |
| | | ब) ओला कचरा - श्री साईबाबा भक्तनिवास(५०० रुम्स),भोजनालय तसेच साईसहवास कर्मचारी वसाहतीमधून निघणारा ओला कचरा | |
| ०४ | श्री साईप्रसादालय, साईधर्मशाळा व सेवाधाम वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान | अ) प्रसादालयातील दैनंदीन निघणा-या ओला कचरा | बायोगॅस प्लांट मध्ये प्रक्रीया करणेत येते. |
| | | ब) सुका कचरा - प्लास्टिकबॉटल, कागद, चहाचे कप व कर्मचारी निवासस्थानातील सुका कचरा इ. | कचरा संस्थानचे कचरा डेपोवर टाकणेत येतो. |
| | | क) ओला कचरा - साईधर्मशाळा व सेवाधाम वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान कर्मचारी वसाहतीमधून निघणारा ओला कचरा | |

सध्या मंदिर परिसरातून निघणारी सर्व हार व फुले (निर्माल्य) अगरबत्ती निर्मितीसाठी वापरण्यात येत आहेत. संस्थानमार्फत श्री साई प्रसादालय परीसरात ०५ TPD क्षमतेचा बायोगॅस प्लांट उभारलेला आहे. प्रसादालयातील दैनंदीन निघणा-या अंदाजे ०१ ते ०२ टन ओल्या कच-यावर सदर बायोगॅस प्लांटमध्ये प्रक्रीया करणेत येत आहे.

सध्या उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या श्री साईप्रसादालय वगळता इतर ठिकाणातील कच-यातून प्लास्टीक बॉटल वेगळया करुन संस्थानचे अभिलेख कक्षामार्फत वार्षिक मंजूर दराने विक्री केली जाते व उर्वरीत सर्व कचरा (ओला व सुका) एकत्रितपणे संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. १८२ मधील कचरा डेपोवर टाकण्यात येतो. संस्थानचे सर्व ठिकाणांचे कर्मचारी निवासस्थाने व इतर परिसरात निघणारा ओला कचरा स्वतंत्ररित्या संकलीत करुन श्री साईप्रसादालयातील बायोगॅस प्लॅन्टला प्रक्रिया करणेसाठी पाठविता येईल, असे मत आहे. अशा प्रकारे श्री साई प्रसादालय येथील विद्यमान ०५TPD क्षमतेच्या बायोगॅस प्लान्टचा पूर्ण क्षमतेने वापर करता येईल. तथापि त्यासाठी सध्या संस्थान परिसरातून किती ओला सेंद्रीय कचरा निघतो याचे निश्चित मोजमाप होणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्पासाठी कुठल्याही सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली नाही. तसेच बांधकाम विभाग हा अशा प्रकारच्या Biomethanation तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्पासाठी तज्ञ विभाग नाही.

याबाबत केंद्रीय नगर विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रकाशित केलेल्या MUNICIPAL SOLID WASTE MANAGEMNET MANUAL 2016 चे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी खालील संबंधीत तरतुदी दिसून येतात.

*"1.2 GUIDING PRINCIPLES FOR MUNICIPAL SOLID WASTE MANAGEMENT.*

*1.2.1 THE INTEGRATED SOLID WASTE MANAGEMENT SYSTEM*

*MSWM and adoption of processing technologies are dependent on quantity and characteristics of the total waste generated in a local authority, the financial recourses available and in house capability of local authorities to oversee project implementation.*

.........

*Figure 1.1: Integrated Solid Waste Management System Hierarchy*




*1.4.5.12 PROCESS SELECTION AND BEST AVAILABLE TECHNOLOGY FOR PROCESSING AND DISPOSAL*

.............

*The selection of waste management processes and technology shall be based on the five- tier ISWM hierarchy, which is explained in Section 1.2 of this chapter. The corresponding illustration of the ISWM hierarchy is reiterated in Figure 1.1 for easy reference.*
*The Selection of technology should be based on defined selection criteria and local conditions, subject to a detailed due diligence study. The criteria are listed in Table 1.18 and applied to a number of common strategy and technology options.*
*In cases where municipal authorities feel challenged to ensure appropriate selection processes, they may seek external expertise to ascertain the most viable solutions."*

उक्त MSWM Manual मधिल Table 1.18:Indicative Criteria for Selection of Appropriate Technology or Combination of Technologies मध्ये नमूद केलेनुसार १०-५० TPD क्षमतेच्या Biomethanation Plant साठी २०० मीटर Buffer Zone (No Development Zone) ची आवश्यकता आहे.

वरील विषयांकित Biomethanation Plant चे मौजे निमगांव को. गट नं. १८२ मधिल नियोजित जागेपासून उत्तर बाजूस सुमारे १८० मीटर इतक्या अंतरावर मौजे निमगांव को. गट नं. १८३ मधिल जागेत संस्थानचे शैक्षणिक संकुलाचे बांधकाम सध्या प्रगतीत आहे. तसेच सदर नियोजित जागेच्या पश्चिमेस गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधिल संस्थान मालकीचे जागेत साईसृष्टी प्रकल्प प्रस्तावित आहे. सदर नियोजित जागेच्या लगत उत्तर बाजूसही संस्थानची मोकळी जागा शिल्लक आहे, ज्यामध्ये भविष्यात संस्थानची विकासकामे हाती घेता येणे शक्य आहे. अशा प्रकारे Biomethanation Plant चे नियोजित जागेच्या अवती

भोवती संस्थानचे विकास प्रकल्प प्रगतीत तसेच नियोजित असल्याने त्या ठिकाणी २०० मीटर अंतराचा Buffer Zone (No Development Zone) ठेवणे सुसाध्य होणार नाही.

विभागाचा अभिप्राय- तरी श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी १० TPD क्षमतेचे दोन Biomethanation Plant उभारणे ऐवजी संस्थान परिसरातून निघणा-या घनकच-यासाठी एकात्मीकृत घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा (Integrated Solid Waste Management System) उभारणे उचित होईल, असे मत आहे. तथापि बांधकाम विभाग हा या विषयातील तज्ञ नसल्याने यासाठी तज्ञ सल्लगाराची नेमणुक करुन त्यांचे सल्ल्याने पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे.

MSWM Manual नुसार सर्वप्रथम संस्थान परिसरातून निघणा-या सर्व ओला (सेंद्रीय) कचरा व सुका कचरा यांचे विभागवार व प्रकारानुसार मोजमाप करुन त्याचे परिमाण व प्रकार (Quantity and Characteristics). ही मुलभूत स्वरुपाची माहिती तयार झालेनंतर एकात्मीकृत घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा (Integrated Solid Waste Management System) करणेसाठी आराखडा व तंत्रज्ञान ठरविता येईल. याबाबतची आवश्यक कार्यवाही तज्ञ सल्लागारामार्फत करता येईल.

प्रस्ताव- तरी श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून प्रत्येकी १० TPD क्षमतेचे दोन Biomethanation Plant उभारणे ऐवजी संस्थान परिसरातून निघणा-या घनकच-यासाठी एकात्मीकृत घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा (Integrated Solid Waste Management System) उभारणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणेसाठी सल्लागारांकडून ई-आरएफपी (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातून निघणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी शिर्डी नगरपंचायत यांना लेखी पत्र देऊन शिर्डी नगरपंचायतीने तो घनकचरा न्यावा, अशी विनंती करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०६** **मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील पी.आय.एल.नं.८६/२०१८ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.१७९१ ऑफ २०२०-शिर्डी नगरपंचायत, शिर्डी-२४ रस्ते विकसनासाठी संस्थानकडून निधी मागणीबाबतचे दि.१३.०२.२०२० चे आदेशातील पॅरा नं.११,१२ व १३ मध्ये नमुद शिर्डी-औरंगाबाद रस्त्याचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुद :- कलम २१.(१क)- पोट-कलम(१) च्या तरतुदींना अधिन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधिन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वेस्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा या सारख्या पायाभुत सुविधा पुरविणेसाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना साहाय्यक अनुदान देता येईल अशी तरतुद आहे.

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णय –नि.क्र.०९ दि.१४/०१/२०२०

प्रस्तावना:- मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे उत्तमराव रंभाजी शेळके यांनी दाखल केलेल्या पी.आय.एल.नं.१२०/२०१९ मधील मा.न्यायालयाने दि.०९/१०/२०१९ रोजीचे आदेशातील पॅरा नं.१६ व १७ मध्ये शिर्डी-औरंगाबाद रस्त्याबाबत खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

*16. It is a common knowledge that the road from Aurangabad to Shirdi town is not in a good shape. The travelers are the sufferers of this unworthy road and it is also common knowledge that a large number of devotees either local devotees or devotees coming from other parts of the country or even from the other nations take the ride from Aurangabad to Shirdi for 'darshan' and badly shaped roads only result in displeasure and anguish expressed by the commuters.*

*17. We can only hope and trust that respondent no.2- Sansthan can certainly take a recourse to the provisions referred above and a decision for making these infrastructural*

*facilities of road available within reasonable time, would only achieve the object and intent of sub-section (1)(A) of Section 21..”*

याबाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१४/०१/२०२० रोजीचे सभेत नि.क्र.०९ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

“..यावर सविस्तर चर्चा झाली, समितीसमोर महाराष्ट्र शासनाचे मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक/औरंगाबाद, राष्ट्रीय महामार्ग औरंगाबाद यांचेशी झालेला पत्रव्यवहार दाखविणेत आला. यावरून असे निदर्शनास येते की, राष्ट्रीय महामार्ग औरंगाबाद विभागातील कि.मी.१७ ते कि.मी.५९ या ४२ कि.मी. अंतरातील रस्ता वगळता उर्वरीत रस्त्याची दुरुस्ती संबंधित विभागामार्फत चालू आहे. उपरोक्त ४२ कि.मी. रस्त्याचे कोणत्या भागात कोणत्या स्वरूपाचे दुरूस्तीचे काम गरजेचे आहे, त्या दुरुस्ती कामाचा तपशिल काय आहे, त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, काम पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे, याबाबतचा सविस्तर अहवाल सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मागविण्यात यावा. तसेच समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, श्रीरामपुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. लहू कानडे यांनी जनहित याचिका नं.१२०/२०१९चे संदर्भाने नेवासा फाटा ते बाभळेश्वर या रस्त्याचे चौपदरीकरणासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करणेबाबत विनंती केली आहे. अशाच आशयाची विनंती श्री केतन खोरे यांनीही केली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग यांचेकडून सविस्तर अहवाल व अंदाजे खर्च याची माहिती मागविण्यात यावी असे ठरले.”

त्यानुसार इकडील दि.०४/०२/२०२० रोजीचे पत्राने कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांना “सदर ४२ कि.मी.(कि.मी.१७ ते कि.मी.५९) लांबीत रस्त्याचे कोणत्या भागात कोणत्या स्वरूपाचे दुरस्तीचे काम गरजेचे आहे, त्या दुरुस्ती कामाचा तपशिल काय आहे, त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, काम पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे, याबाबतचा सविस्तर अहवाल इकडील कार्यालयास पाठविण्यात यावा.” असे कळविण्यात आले.

तसेच दि. ०४/०२/२०२० रोजीचे पत्राने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना “.. सदर रस्त्याचे काम हाती घ्यावयाचे नियोजन असल्यास ते कधी सुरु होणार व कधी पूर्ण होणार याबाबतचे माहितीसह सदरहु रस्त्याचे कामाबाबत व सद्यस्थितीबाबतचा सविस्तर अहवालवअंदाजपत्रकीय खर्च याबाबतची माहिती याबाबतची माहिती इकडील कार्यालयास कळविण्यात यावी.” असे कळविण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

तदनंतर मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथील पी.आय.एल.नं.८६/२०१८ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १७९१ ऑफ २०२०-शिर्डी नगरपंचायत, शिर्डी विरुद्ध संजय भास्कर काळे मधील दि.१३/०२/२०२० चे आदेशातील पॅरा नं. ११, १२ व १३ मध्ये उपरोक्त रस्त्याचे कामाबाबत खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

11. Before parting, we state that two members committee referred to the issue of approach roads to Shirdi and it is common knowledge that these approach roads to Shirdi town are not in a good condition. It can be stated here that majority of the devotees coming from other States of the country proceed to Shirdi via Aurangabad by various means of transport, such as, by Air, by Road and by Railways.

From Aurangabad to Shirdi, the road/roads, not being in good condition, the period for travelling is not only expanded but it also suffers from a smooth transportation facility. It is also the common knowledge that respondent No.3 – Shree SaibabaSansthan Trust, Shirdi receives handsome amount of donations from the devotees from the country as well as from the devotees, who are not the residents and/or the foreigners.

12. Considering the aforesaid facts, we may seek the response from respondent No.3 so as to establish the communication with the State Government and submit the proposal to the State Government to share responsibility of the State to provide good facilities of transport from Aurangabad to Shirdi. Such proposal be submitted to respondent No.2 – State of Maharashtra within a period of two weeks from today.

13. In case, respondent No.3 - Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi forms a positive opinion to share the responsibility as suggested by this Court, respondent 3 – Trust to submit proposal to the State Government within a period of two weeks. The State Government, on receipt of such proposal may consider the aspect of the modalities and procedural formalities and if there is no serious rider or objection from the State Government, the State Government may also respond to the proposal positively.

The response as sought for by this Court be submitted to this Court by way of short affidavit within six weeks from today. ..”

याबाबतचे शासनाचे विधी व न्याय विभाग यांचे दि.११/०३/२०२० रोजीचे पत्राचे अनुषंगाने इकडील दि.०७/०३/२०२० रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

“.. अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, औरंगाबाद यांचेकडून इकडील जा. क्र. ४६८४ दि.२७/०२/२०२० अन्वये माहिती मागविण्यात आली आहे. तसेच दुरध्वनीवरून व समक्ष संपर्क साधून माहीती घेतली असता, सदरहू शिर्डी-औरंगाबाद रस्त्याचे चौपदरीकरणाबाबत राज्य व केंद्र शासन स्तरावरून माहिती संकलित करण्यात येत असल्याचे सांगितले. याबाबतची सविस्तर माहीती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत येईल. माहितीस्तव सविनय सादर.”

त्यानंतर अधिक्षक अभियंता,राष्ट्रीय महामार्ग मंडळ,औरंगाबाद यांनी दि.१२/०३/२०२०चे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे.

‘..सदरील शिर्डी-औरंगाबाद या रस्त्याच्या एकूण १०१ कि.मी.लांबीबाबत नमूद करण्यात येत की,एएस क्लब औरंगाबाद ते औरंगाबाद जिल्हा हद्द या लांबीतील सदरील ६६ कि.मी. लांबीचा रस्ता या मंडळाच्या अधिपत्याखाली असून औरंगाबाद जिल्हा हद्द ते शिर्डी लांबी पुणे राष्ट्रीय महामार्ग मंडळ यांच्या अखत्यारीत येते. आपण विचारल्यानुसार प्रस्तावाची खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | भाग | लांबी | कार्यकक्षा | विश्लेषण |
|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी ते सावली विहीर फाटा (रा.म.१६०) | ४ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक | यावर कोणताही प्रस्ताव नाही. |
| २ | सावली विहीर फाटा ते पुणतांबा फाटा (रा.म.७५२ जी) | ६ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक | यावर कोणताही प्रस्ताव नाही. |
| ३ | पुणतांबा फाटा ते औरंगाबाद जिल्हा हद्द (रा.म.७५२ आय) कि.मी.०/०० ते १७/०० | १७ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद | यांचेमार्फत चालू वर्षात मजबुतीकरणाचे रु.१८ कोटीचे काम हाती घेण्यात येत आहे. निविदा मंजुर, कार्यारंभ आदेश देणे बाकी. |
| ४ | औरंगाबाद जिल्हा हद्द ते लासूर (रा.म.७५२ आय)कि.मी.१७/०० ते २९/०० कि.मी.३२/०० ते ४०/०० कि.मी. ४७/०० ते ५४/०० | २७ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद | चालू वर्षी MORT&H Gov. यांच्याकडे मजबुतीकरण करण्याचा प्रस्ताव रु.२५.६१ कोटीचा सादर. मंजुरी प्रलंबित. |
| ५ | वैजापूर ते लासूर (रा.म.७५२ आय) कि.मी.२९/००ते ३२/०० कि.मी.४०/०० ते ४७/००कि.मी.५४/००ते ५९/०० | १५ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद | यांचेमार्फत चालू वर्षात नियतकालीक नूतणीकरणाचे काम हाती घेण्यात येत आहे. निविदा मंजुर,कार्यारंभ आदेश देणे बाकी. |
| ६ | लासूर ते औरंगाबाद (एएस क्लब) (रा.म.७५२आय)कि.मी.५९/००ते८३/०० | २४ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद | यांचेमार्फत सन २०१७-१८ मध्ये नियतकालीक नूतणीकरणाचे काम पूर्ण. |
| ७ | लासूर ते औरंगाबाद (एएस क्लब) (रा.म.७५२आय)कि.मी.८३/००ते९१/०० | ८ कि.मी. | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अंतर्गत चार पदरी रस्त्याचे काम प्रगतीत. |

तसेच कार्यकारी अभियंता, जागतिक बँक (सा.बां. विभाग) प्रकल्प, अहमदनगर यांनी दि.२०/०३/२०२०चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

“..कोपरगाव-शिर्डी-कोल्हार रस्ता प्र.रा.मा.०८ कि.मी. ७८/२०० ते १२०/०० या विभागाच्या कार्यक्षेत्रात आहे. त्यापैकी संदर्भिय पत्रात नमूद केलेप्रमाणे शिर्डी-औरंगाबाद रस्त्याच्या पुणतांबा चौफुली ते शिर्डी

कि.मी. ८१/८०० ते ९३/९०० पर्यंतची लांबी या विभागाच्या कार्यक्षेत्रात आहे. कोपरगाव-शिर्डी-कोल्हार चौपदरी रस्त्याच्या मजबुतीकरण व सुधारणा करणेसाठी या विभागाने माहे फेब्रुवारी-२०२० च्या अर्थसंकल्पात समावेश करणेसाठी कार्यालयाचे पत्र जा.क्र.प्रशा/२७७/सन २०२० दि.०७/०२/२०२० अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी २०२० च्या अर्थसंकल्पात सदर कामाचा समावेश झालेला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम प्रगतीत असून त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रीया पूर्ण झालेनंतर काम पूर्ण करण्याची  कार्यवाही करण्यात येईल."

वरील बाबी विचारात घेता या रस्त्याचे कामाबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | भाग | लांबी | कार्यकक्षा | विश्लेषण |
|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी ते सावली विहीर फाटा (रा.म.१६०) | ४ कि.मी. | जागतिक बँक (सा.बां. विभाग) प्रकल्प, अहमदनगर | जागतिक बँक (सा.बां. विभाग) प्रकल्प, अहमदनगर यांनी कळविलेनुसार कोपरगाव - शिर्डी - कोल्हार चौपदरी रस्त्याच्या मजबुतीकरण व सुधारणा करणेसाठी त्यांनी माहे फेब्रुवारी २०२० च्या अर्थसंकल्पात समावेश करणेसाठी जा.क्र.प्रशा/२७७/सन २०२० दि.०७/०२/२०२० अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी २०२० च्या अर्थसंकल्पात सदर कामाचा समावेश झालेला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम प्रगतीत असून त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रीया पूर्ण झालेनंतर काम पूर्ण करण्याची  कार्यवाही करण्यात येईल. |
| २ | सावली विहीर फाटा ते पुणतांबा फाटा (रा.म.७५२ जी) | ८.१० कि.मी. | जागतिक बँक (सा.बां. विभाग) प्रकल्प, अहमदनगर | |
| ३ | पुणतांबा फाटा ते औरंगाबाद जिल्हा हद्द (रा.म.७५२ आय) कि.मी.०/०० ते १७/०० | १७ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद | यांचेमार्फत चालू वर्षात मजबुतीकरणाचे रु.१८ कोटीचे काम हाती घेण्यात येत आहे. निविदा मंजुर,  कार्यारंभ आदेश देणे बाकी. |
| ४ | औरंगाबाद जिल्हा हद्द  ते लासूर (रा.म.७५२ आय)कि.मी.१७/०० ते २९/०० कि.मी.३२/०० ते ४०/०० कि.मी. ४७/०० ते ५४/०० | २७ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद | चालू वर्षी MORT&H Gov. यांच्याकडे मजबुतीकरण करण्याचा प्रस्ताव रु.२५.६१ कोटीचा सादर. मंजुरी प्रलंबित. |
| ५ | वैजापूर ते लासूर (रा.म.७५२ आय) कि.मी.२९/००ते ३२/०० कि.मी.४०/०० ते ४७/००कि.मी.५४/००ते ५९/०० | १५ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद | यांचेमार्फत चालू वर्षात नियतकालीक नूतणीकरणाचे काम हाती घेण्यात येत आहे. निविदा मंजुर,कार्यारंभ आदेश देणे बाकी. |
| ६ | लासूर ते औरंगाबाद (एएस क्लब) (रा.म.७५२आय)कि.मी.५९/००ते८३/०० | २४ कि.मी. | राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद | यांचेमार्फत सन २०१७-१८ मध्ये नियतकालीक नूतणीकरणाचे  काम पूर्ण. |
| ७ | लासूर ते औरंगाबाद (एएस क्लब) (रा.म.७५२आय)कि.मी.८३/००ते९१/०० | ८ कि.मी. | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अंतर्गत चार पदरी रस्त्याचे काम प्रगतीत. |

प्रस्ताव:- मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे उपरोक्तप्रमाणे आदेशाबाबत संस्थान ॲडव्होकेट यांचे सल्ल्याने पुढील कार्यवाही करणेत येत आहे. माहितीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी-औरंगाबाद (घोटी-नागपुर महामार्ग) या महामार्गाचे मजबुतीकरण व सुधारणा करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संबधीत यंत्रणाकडून सुरु असलेल्या कामाची सद्यस्थिती व संस्थानने केलेल्या पत्रव्यवहाराची माहिति मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे अवलोकनार्थ सादर करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.०७** **श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा मंडप-२०२० कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रक्कम रु.१३,८९,०००/-अपेक्षीत अंदाजपत्रकीय खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-

१. अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

२. अधिनियमाचे कलम १७(१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, हि समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे सालाबादप्रमाणे श्रावणमास निमित्त श्री साईचरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात येत असतो. सदरहू कार्यक्रम मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत डोम टाईप मंडप, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्थेसह व्यवस्था करण्यात येत असते. त्यानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाचे निमित्ताने योगिराज गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे कालावधीत शिर्डी ग्रामस्थ यांनी हरिनाम सप्ताह व श्री साईचरित्र पारायण सोहळा हा जवळ-जवळ करणेबाबत सुचविले होते. त्यानुसार सन २०१८ मधील साईसच्चरित पारायण सोहळा कार्यक्रम श्री साईप्रसादालयाचे दक्षिणेकडील श्री.रमेश गोंदकर यांचे जागेत आयोजित केला होता.

त्यानंतर सन-२०१९ मध्ये करावयाचे श्री साईसच्चरीत पारायण सोहळयाचे आयोजन साईआश्रम भक्तनिवास येथील मंडपामध्ये करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मान्यता देणेत आली होती. तथापी, शिर्डी ग्रामस्थांनी साईचरित्र पारायण सोहळा साईआश्रम भक्तनिवास ऐवजी साईनगर मैदानावर घेणेबाबत सुचविले व त्यानुसार सन-२०१९ मधील साईचरित्र पारायण सोहळा साईनगर मैदानावर आयोजित करणेत आला. याकामी रक्कम रु.११,८८,६५६/- इतका खर्च आला होता.

आता, चालू वर्षी सन-२०२० मध्ये श्री साईसच्चरित पारायण सोहळा– २०२० कार्यक्रमाकरीता ५००० ते ६००० व्यक्तींचे क्षमतेचा मंडप, स्टेज, स्वागत कमानी, मॅटीन, बॅरेकडींग, विद्युत व्यवस्था, ध्वनीक्षेपक व्यवस्था इ. करीता ०९ दिवसाचे कालावधीसाठी व्यवस्था करणेकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

दि.२१/०७/२०२० ते दि.२९/०७/२०२० अखेर (कालावधी ०९ दिवस)

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:- वॉटरप्रुफ छत असलेला व आतील बाजूने सुशोभित कापड असलेल्या पत्रा मंडपाची उभारणी करणे. (लोखंडी कॉलम व कैच्याची नट बोल्ट फीटींग असलेला मंडप). | ४४८०० | चौ. फुट | २०.०० | ८९६०००.०० |
| २. | स्टेज व्यवस्था:- ६०' x ४०' साईजचे स्टेज, जमिनीपासून ४' ते ५' फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर लाल रंगाचे कारपेट टाकणे. | १२०० | चौ. फुट | ७१.५० | ८५८००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | पी. व्ही. सी. मॅटींग:- बैठकव्यवस्थेसाठी संपूर्ण मंडपामध्ये पी. व्ही. सी. मॅटींग टाकणे. सदर मॅटींगचे सॅम्पल सक्षम अधिका-यांकडून प्रमाणित करुन घेणे. | ४३६०० | चौ. फुट | ३.३० | १४३८८०.०० |
| ४. | बॉक्स टाईप स्वागत कमान:- स्वागतासाठी आवश्यक त्याठिकाणी २'x२' बॉक्स टाईप आकाराची स्वागत कमानी उभारणे. कमानींची रुंदी २५ फुट व उंची १८ फुट असावी तसेच सदर कमानीस नवीन पांढरे व सुशोभित कापड लावणे अथवा निर्देश देण्यात येईल त्याप्रमाणे उभारणी करुन देणे. | ०५ | नग | ५५००.०० | २७५००.०० |
| ५. | बॅरेकेडींग व्यवस्था करणे:- एम. एस. पाईप वापरुन भक्कम स्वरुपाचे ४ फुट उंचीचे आवश्यक त्याठिकाणी लोखंडी बॅरीकेडींग व्यवस्था करणे. | ५०० | र. फुट | ५५.०० | २७५००.०० |
| ६. | स्वागत कक्ष व माहिती कक्ष :- एका युनिटमध्ये - प्रत्येकी ०४ खुर्च्या व ०२ टेबलसह मंडप व्यवस्था करणे, तसेच सदर कक्षामध्ये सिंथेटीक रेड कारपेट टाकणे. १५ फुट x १५ फुट x ०१ युनिट. | ०१ | यूनीट | ५०००.०० | ५०००.०० |
| ७. | ग्रीन रूम:- १५'x१५' - ०१ नग - प्रत्येकी ०४ खुर्च्या, ०१ टेबल व आरशासह बंदिस्त मंडप व्यवस्था करणे, तसेच सदर ग्रीन रूममध्ये सिंथेटीक रेड कारपेट टाकणे. | ०२ | यूनीट | ७५००.०० | १५०००.०० |
| ८. | मंडपामध्ये व स्टेज साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे. | ०१ | यूनीट | ६६०००.०० | ६६०००.०० |
| ९. | मंडप व स्टेजची विद्यूत व्यवस्था जनरेटर बॅकअपसह करणे. | ०१ | यूनीट | १२२१००.०० | १२२१००.०० |
| | | | | एकूण पूर्णांकित रक्कम रु. | १३,८९,०००.०० |

वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्रावणमास निमित्त श्री साईसच्चरित पारायण सोहळा–२०२० कार्यक्रमाकरीता साईभक्तांचे सोईसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.१३,८९,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर काम मोठया स्वरूपाचे असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागेल.

प्रस्ताव– संस्थान मार्फत सालाबादाप्रमाणे साजरा करणेत येणारा श्री साईसच्चरित पारायण सोहळा–२०२० कार्यक्रमाकरीता साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी येणारे अंदाजे रु.१३,८९,०००/- मात्रचे खर्चास व सदर व्यवस्था करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देणेस तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संपुर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने त्या पार्श्वभुमीवर श्री साईसच्चरित पारायण सोहळा कार्यक्रमाचे स्वरुपाबाबत शिर्डीतील ग्रामस्थ, वैद्यकीय अधिकारी व इतर संबधीत अधिकारी यांचे समवेत सामाजिक अंतर (Social distancing) शासनाची ॲडव्हाझरी व इतर अनुषंगीक बाबींवर चर्चा करुन अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०८** **शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मध्ये संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणे कामाचे ठेकेदार युनिव्हर्सल फायर ॲन्ड सेफ्टी सर्व्हिसेस, म्हापे नवि मुंबई यांचे अतिम देयक रक्कम रु.१०,६२,३३६/-मंजुर करणे व त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.२,९९,३३६/- ठेकदार यांना आदा करणेस मंजूरी देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतूद – अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा–अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणेसाठी आणि पार पाडणेसाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्त गणांना आवश्यक त्या सोयी - सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे. अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता– महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि २००६/६७/(८७) का. सोळा मंत्रालय, मुंबई -४०० ००३ दि. १३/०१/२००९ अन्वये शिर्डी येथील बसस्थानक अत्याधुनिक पध्दतीने बांधण्याकरीता रु. ७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावना– मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ५५७ (७) अन्वये शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी ठेकेदार युनिव्हर्सल फायर ॲन्ड सेफ्टी सर्व्हिसेस, नवी मुंबई यांची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी सदरचे काम दि.२०/०९/२०१९ रोजी पूर्ण केले असून झालेल्या कामाचे पहिले व अंतिम बील सादर केले आहे. इकडील विभागामार्फत सदर बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. सदर कामाचा व अंतिम बिलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | कामाचे नाव | शिर्डी येथील स.नं. १७१/१२ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणे.. |
|---|---|---|
| १. | ठेकेदाराचे नाव | युनिव्हर्सल फायर ॲण्ड सेफ्टी सर्व्हिसेस, नविमुंबई |
| २. | मंजूर निविदा रक्कम | रु. ११,३६,७७४- |
| ३. | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.व दि. | निर्णय क्रं. ५५७, दि.०६/०९/२०१८ |
| ४. | ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश क्रं. व दिनांक | जा. नं. एसएसएसटी /बांधकाम /४३०५/२०१८, दि.२९/११/२०१८ |
| ५. | अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम | रु. १०,६२,३३६/- |
| ६. | यापुर्वी अदा केलेली रक्कम | रु. ७,६३,०००/- |
| ७. | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु. २,९९,३३६/- |
| ८. | मंजूर निविदेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु. ७४,४३८/- (६.५४८१% ) कमी |
| ९. | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मुदत | ०४ महिने – दि.१३/०४/२०१९ अखेर |
| १०. | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२०/०९/२०१९. |
| ११. | काम पूर्ण करणेस झालेला विलंब | १७० दिवस |
| १२. | निविदा शर्तीनुसार विलंबापोटी होणारी दंडाची रक्कम (निविदा रकमेच्या जास्तीत जास्त ५% प्रमाणे) | रु.५६,८३९/- |

ठेकेदार युनिव्हर्सल फायर ॲन्ड सेफ्टी सर्व्हिसेस, नवी मुंबई यांनी शिर्डी येथील स.नं. १७१/१२ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणेचे काम दि.२०/०९/२०१९ अखेर पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी सदरहू कामाचे रु.११,४१,५९६/- मात्र रकमेचे दुसरे व अंतिम बील सादर केले आहे. सदरहू बिलाची तपासणी केली असता प्रत्यक्ष झालेल्या मोजमापानुसार बिलाची एकूण रक्कम रु.१०,६२,३३६/- मात्र इतकी होते. म्हणजेच मंजूर निविदा रकमेपेक्षा रु.७४,४३८/-(६.५४८१ % कमी) इतका कमी खर्च झालेला आहे.

सदरहू काम मेकॅनिकल स्वरुपाचे असल्याने संस्थानचे मेकॅनिकल विभागामार्फत उक्त अंतिम बिलाची तपासणी करण्यात आली असून त्यांनी दि.२७/०१/२०२० चे पत्राव्दारे अंतिम बील रक्कम रु.१०,६२,३३६/- अदा करणेस हरकत नाही असा अभिप्राय दिला आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ४४९ अन्वये प्रत्येक कामाचे अंतिम बिल आदा करणेपुर्वी पूर्ण झालेल्या कामाची प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत पाहणी करण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार आदेश क्र.१९४२ /२०१९ दि.१२/१२/२०१९ अन्वये प्रशासकिय अधिकारी श्री. एस.व्ही. गमे यांनी दि.०३/०१/२०२० रोजी सदरहू कामाची समक्ष पाहणी केली आहे.

ठेकेदार युनिव्हर्सल फायर अॅन्ड सेफ्टी सर्व्हिसेस, नवी मुंबई यांनी शिर्डी येथील स.नं. १७१/१२ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी (१४/१२/२०१८ ते १३/०३/२०१९) ०४ महिने होता. सदरचे काम ठेकेदार यांनी दि.२०/०९/२०१९ अखेर पूर्ण केले आहे. सदरचे काम पूर्ण करणेस १७० दिवस विलंब झालेला आहे. निविदेत नमुद केले नुसार रु.१०००/-प्रती दिवसाप्रमाणे रु.१,७०,०००/- इतकी दंडाची रक्कम होते. तथापी निविदा शर्तीनुसार निविदा रकमेच्या जास्तीत जास्त ५% इतकी रक्कम विलंबापोटी दंड म्हणून कपात करावयाची आहे. त्यानुसार सदरहू दंडाची रक्कम रु.५६,८३९/- ठेकेदार यांचे पहिले रनिंग बिलाचे अॅडव्हान्स बिलातून कपात करणेत आलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- ठेकेदार यांनी सदर काम निविदा शर्तीनुसार पूर्ण केलेले असल्याने त्यांचे उक्त अंतिम बिल मंजूर करणेस हरकत नाही.

प्रस्ताव– तरी ठेकेदार युनिव्हर्सल फायर अॅन्ड सेफ्टी सर्व्हिसेस, नवी मुंबई यांचे शिर्डी येथील स.नं. १७१/१२ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणे कामाचे दुसरे व अंतिम देयक रक्कम रु.१०,६२,३३६/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२,९९,३३६/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मध्ये संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणेचे काम पुर्ण झालेले असुन त्यास शिर्डी नगरपंचायत यांनी परवानगी दिली असल्याने (की जे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर सांगीतले.) सदर कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.१०,६२,३३६/- मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२,९९,३३६/- मात्र सदर कामाचे ठेकेदार युनिव्हर्सल फायर अॅन्ड सेफ्टी सर्व्हिसेस, नवी मुंबई यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रापैकीचे क्षेत्रात शिर्डी नगरपंचायत अतिक्रमण केलेल्या ६.२५ आर इतके क्षेत्र नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७ समितीचे कर्तव्ये व अधिकार यातील कलम १७(२)(छ) मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची वेळोवेळी तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि अशा मालमत्तांवर कोणतेही अतिक्रमण झाले असल्यास ते दुर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करील,अशी तरतुद आहे.

तसेच कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

तसेच कलम २१(२)(दोन) यात स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतला सहाय्य करण्यासाठीची तरतुद आहे.

प्रस्तावना- प्रकरणाची पूर्वपिठीका– शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.३ मधील जलकुंभाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१०७ पै. उत्तर-पूर्व कोप-यात व झोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता सर्वे नं.१२६ पै. मधील नांदुर्खी रस्त्यालगत

(प्रस्तावित विकास योजनेतील १८ मीटर वळण रस्त्यालगत) प्रत्येकी १२ आर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीचे क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६/४ पै. ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

उपरोक्त सर्वे नं.१२६/४ चे क्षेत्रात नगरपंचायतीने नव्याने बांधकामासाठी आखणी केलेचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेवरुन बांधकाम विभागाकडील मुकादम श्री.गिरीश चोळके व मालमत्ता विभागाकडील कं.मोजणीदार श्री.बाळासाहेब जाधव यांना तात्काळ संस्थानचे उक्त क्षेत्राचे समक्ष स्थळनिरीक्षण करुन अहवाल सादर करणेबाबत सुचित करणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी दि.१६/०२/२०१९ रोजी उक्त क्षेत्राची समक्ष पाहणी करुन इकडेस अहवाल सादर केलेला आहे. त्यात त्यांनी "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पैकी नांदुर्खी रस्त्यालगत क्षेत्र १२ आर इतके शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्याचवेळेस सदर क्षेत्राचा ताबा घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.त्या व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर क्षेत्रात कर्मचारी निवासस्थान बांधण्याचे व कंपाऊंड करणेचे प्रस्तावित केलेले असलेचे आज दि.१६/०२/२०१९ रोजी आमचे निदर्शनास आले असून सदर जलकुंभाचे परिसरात कर्मचारी निवासस्थानाचे चुना फक्कीने लाईनआऊट केलेले असून कॉलमचे खड्डे घेतलेले असलेचे दिसून आले आहे. सदरचे लाईनआऊटचे निरीक्षण केले असता नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थानचे क्षेत्रात उक्त बांधकाम प्रस्तावित केले असलेचे दिसून येत आहे." असेबाबत इकडेस अहवाल सादर केलेला आहे.

मात्र संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे उर्वरित क्षेत्रात नगरपंचायतने तयांचे कर्मचारी निवासस्थान व कंपाऊंडचे बांधकाम प्रस्तावित केलेले असलेचे व त्याप्रमाणे लाईनआऊट केलेचे संस्थानचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेले आहे. सदर आखणी करतेवेळेस नगरपंचायतने संस्थानला कोणतीही पूर्वसुचना दिलेली नाही. यास्तव संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचाच वापर करावा. त्या व्यतिरिक्त संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये अथवा त्यात बांधकाम करु नये,असेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायतयांना इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ अन्वये कळविणेत आलेले आहे.

तद्रुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-८/२/४९१/२०१९ दि.०१/०३/२०१९ अन्वये प्रस्तुत प्रकरणी इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ च्या पत्रास अनुसरुन "शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्वे क्रं.१२६/४ पै. मधील १२.७९ आर जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.२४ निर्णय क्रं.३०५ नुसार व शासन निर्णय क्रं. सासंवि-२००६/५८०/ (७९)/का.सोळा दि.२० डिसेंबर २००६ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस मिळालेली आहे. सदर जागेची महसुल दप्तरी ७/१२ उता-यावर नगरपंचायतची मालकी हक्क सदरी नोंद झालेली आहे. सदर जागेची उपअधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन नकाशा प्राप्त करुन घेणेत आलेला आहे. सदरची जागा ही सुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनेमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहसंचालक,नगररचना विभाग,नासिक यांचे शिफारशी नुसार सहायक संचालक,नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.बां.प/मौ.शिर्डी, ता.राहाता/ स.नं.१२६/४ (१२६/१ जुना) ससंअ/२७७५/१८ दि.२०/०८/२०१८ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे. मंजूर बांधकाम नकाशानुसार नगरपंचायत मालकीच्या सदर जागेतच बांधकाम चालू आहे. शिर्डी नगरपंचायतने नगरपंचायत मालकीचे जागेतच प्रस्तावित बांधकामाचे लाईन आऊट करुन बांधकाम सुरु केलेले असल्याने श्री साईबाबा संस्थानला पूर्वसुचना देण्याचा प्रश्नच उदभवत नाही,"असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुत पत्राचे अवलोकन केले असता नगरपंचायतीने शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे. शिवाय प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक, नगररचना यांनी मंजुरीची शिफारस

केलेली असलेचेही नमुद केलेले आहे. म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने त्यांना संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरीत क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.

वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.

मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. यास्तव सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची मालकीची जागा पूर्ववत करुन देणेत यावी. संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये, असेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५८३८/२०१९ दि.०५/०३/२०१९ अन्वये पुन:श्च कळविणेत आले व प्रत संस्थानचे बांधकाम विभागास देणेत येवून शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत उपरोक्त ठिकाणी चालू असलेले बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे व संस्थान मालकीची जागा पूर्ववत करुन घेणेत यावी,असेबाबत सुचित केलेले आहे.

तदनुषंगाने संस्थानचे बांधकाम विभागाने त्यांचेकडील दि.१३/०३/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणी अन्वये मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ मधील संस्थान मालकीचे क्षेत्रापैकी ०.१२ आर क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकामासाठी देणेत आले होते. सदरहू जागेत नगरपंचायत,शिर्डी यांनी जलकुंभाचे बांधकाम सन २००६ मध्ये केले आहे. जलकुंभाचे पश्चिमेस नवीन रिंग रोड संस्थान निधीतून भुसंपादन करुन सन २०१०-१२ या कालावधीत विकसित करणेत आला आहे. या रस्त्याचे भुसंपादन व डिमार्केशन शिर्डी नगरपंचायतीने केलेले आहे. त्यानुसार सदर रिंग रोडलगत उपरोक्त जलकुंभासाठी दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थानचे अंदाजे ०.६ आर क्षेत्र शिल्लक असलेचे दिसून येते. संस्थानचे मालमत्ता विभागाकडील दि.२३/०२/२०१९ व दि.०५/०३/२०१९ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने बांधकाम विभागाचे उपअभियंता,संरक्षण विभागाचे मुकादम,मालमत्ता विभागाचे लिपीक व कं.मोजणीदार यांनी उक्त साईटवर दि.०७/०३/२०१९ रोजी समक्ष जावून सदरचे बांधकाम बंद करणेबाबत साईटवरील ठेकेदार प्रतिनिधी यांना समक्ष सांगितले. त्यावर ठेकेदार प्रतिनिधींनी नगरपंचायतीकडून काम बंद करणेबाबत कोणत्याही प्रकारची सुचना नसल्याने काम बंद करणेस असमर्थता व्यक्त केली, असेबाबत निदर्शनास आणून दिलेले आहे.

याशिवाय मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थानने त्यांना निर्गत केलेल्या उपरोक्त पत्रास कोणताही प्रतिसाद दिलेला नसलेने प्रस्तुत प्रकरणा संदर्भात दि.०२/०४/२०१९ रोजी तहसिलदार,राहाता, मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी,उपअधिक्षक,भुमी अभिलेख,राहाता यांची बैठक घेण्यात आली**.**

सदर बैठकीत मुख्याधिकारी,नगरपंचायत,शिर्डी यांनी"संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै. चे शिर्डी-नांदुर्खी या १८ मी. रस्त्यालगत ०.१२ गुंठे जागा नगरपंचायतीचे शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभाकरीता सन २००६ मध्ये शासनाच्या मान्यतेने दिलेली आहे. त्याप्रमाणे नगरपंचायतचे नावाने नोंद झालेली आहे व सदर क्षेत्रात सन २०१३ मध्ये जलकुंभाचे बांधकाम पूर्ण करणेत आलेले आहे. संस्थानकडून नगरपंचायतला जलकुंभासाठी मिळालेल्या ०.१२ गुंठे जागेची मोजणी होवून निश्चिती करणेत आलेली नव्हती. त्यामुळे नगरपंचायतीने भुमी अभिलेख विभागाकडून नगरपंचायतीस मिळालेल्या जागेची मोजणी करुन घेतली असता सदर १८ मी. रस्त्यालगतच्या जागेपासून मोजमापानुसार संस्थानच्या जागेत सुमारे ५ ते ५.५ गुंठयात संस्थानच्या जागेकडे टाकी सरकलेली आहे. रस्त्याकडील जागेत शिर्डी सुधारीत प्रारुप विकास आराखडयात

नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. त्या अनुषंगाने नगररचना विभागाकडून नगरपंचायतीने बांधकामास परवानगी घेतली आहे. त्यासाठी सुमारे २.५ कोटीचे टेंडर काढण्यात आलेले आहे आणि ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देखील देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे टाकीचे दक्षिण बाजूकडील रस्त्यालगतच्या जागेत नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम चालू करणेत आलेले आहे. सदरचे बांधकाम आता बंद करता येणार नाही. जलकुंभाचे बांधकाम संस्थानच्या जागेत सरकलेले आहे. सदरच्या अग्निशमन केंद्राचा उपयोग सार्वजनिक हितासाठीच होणार आहे. त्यासाठी सदरचे क्षेत्र नगरपंचायतीस संस्थानकडून मिळणेकामीचा प्रस्ताव नगरपंचायती मार्फत अलाहिदा सादर करणेत येईल व सदर जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेन. तरी सदरचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे चालू असलेले बांधकाम बंद करु नये,”असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी विनंती केली.

प्रस्तुत बैठकीत झालेल्या चर्चेत संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभासाठी देणेकामी सन २००६ साली शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र त्यावेळेस सदर क्षेत्राचा ताबा देणे-घेणेची कार्यवाही झालेली नसलेचे दिसून आले. तसेच शासन निर्णयामध्ये सदरचे ०.१२ आर क्षेत्र हे प्रस्तावित १८ मी. रुंदीच्या रस्त्यालगत पासून देण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र सदरचा रस्ता  त्यावेळी अस्तित्वात नसल्याकारणाने त्यावेळेस सदर ०.१२ आर क्षेत्राचे हद्दी निशाण्या निश्चित झालेल्या नसलेचे दिसून येते. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदर ०.१२ आर क्षेत्राची मोजणी करणेकामीची हद्द सध्यस्थितीत असलेल्या शिर्डी-नांदुर्खी रोडलगत पासून गृहीत धरुन त्या ठिकाणापासून मोजणी केली असल्याकारणाने नगरपंचायतीमार्फत बांधणेत आलेले जलकुंभ संस्थानच्या जागेत सरकलेले असलेचे दिसून येत आहे. नगरपंचायतने दि.०७/०४/२०१८ रोजीची मोजणी बेस धरुन संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रात अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे प्रस्तावित बांधकाम न करणेबाबत संस्थान प्रशासनाने नगरपंचायतीमार्फत सदर क्षेत्रात बांधकामासंबंधीची आखणी केली त्याचवेळेस लेखी कळविलेले आहे व तदनंतर देखील नगरपंचायतने सुरु केलेले बांधकाम संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राची निश्चिती होईपर्यंत बांधकाम करु नये,असेबाबत देखील नगरपंचायतीस संस्थानने लेखी कळविलेले आहे. तरीदेखील नगरपंचायतीने सदरचे बांधकाम सुरुच ठेवलेले आहे,असे निदर्शनास आलेले आहे.

नगरपंचायतमार्फत सुरु असलेले अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम हे सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून होत असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितले असून त्यासाठीचे टेंडर काढून ठेकेदारास कार्यारंभ आदेश देखील पारित केला आहे व त्या ठिकाणी बांधकाम सुरु देखील करणेत आलेले आहे. अशा परिस्थितीत बांधकाम बंद करणे सार्वजनिक हिताचे दृष्टिने हितावह ठरणार नाही. सदर क्षेत्राची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला देणेस तयार आहे आणि जागा मागणीचा प्रस्ताव नगरपंचायत संस्थानकडे सादर करणार असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सांगितलेने “नगरपंचायत,शिर्डी यांनी तसा जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करावा. तदनंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी,” असे बैठकीत ठरले.

सदर बैठकीत ठरलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील उक्त सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त नगरपंचायतीने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेकामीचे उक्त सभेत ठरलेप्रमाणेच्या निर्णयास मंजूरी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात सदरचा विषय स्थगित ठेवणेत येवून मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३१८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायतीने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच नगर-मनमाड रस्ता ते १६ गुंठे पर्यंतचा जुना पिंपळवाडी रोड No Vehicles Zone व No Hawkers Zone म्हणून घोषित करणेसाठीचा प्रस्ताव मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांचेकडे पाठविण्यात यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/१६१०/२०१९ दि.३०/०७/२०१९ अन्वये मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना नगरपंचायतीने संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रातील नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थान मालकीचे इतर क्षेत्रात केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करणेत यावा,असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१६४/४ पै. चे क्षेत्रापैकी नगरपंचायत, शिर्डी यांना दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रापैकीचे क्षेत्रात नगरपंचायतने केलेल्या ०.०६.२५ आर इतके अतिक्रमण केलेले क्षेत्र नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस वर्ग

करणे कामीचा परिपूर्ण प्रस्ताव इकडेस सादर न केल्याने प्रस्तुत कामीचा परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेकामी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३८४९/२०१९ दि.३१/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत येवून त्यात खालीलप्रमाणे पुर्तता करणेबाबत सुचित करणेत आलेले आहे.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात केलेल्या अतिक्रमित क्षेत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केलेला आहे अथवा उक्त अतिक्रमित क्षेत्र ६.२५ आर हे नगरपंचायतीकडे वर्ग करणेचे प्रयोजन काय आहे. याबाबत प्रस्तावात उल्लेख करावा.

२) उक्त अतिक्रमित क्षेत्रात केलेल्या बांधकामाचा रेखांकन आराखडा व बांधकाम अंदाजपत्रक प्रस्तावासोबत सादर करावे.

३) सदर बांधकामास नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायाचे पत्राची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी.

४) सक्षम अधिकारी यांचा बांधकाम परवाना प्रस्तावासोबत सादर करावा.

५) उक्त अतिक्रमित क्षेत्राचा मोजणी नकाशा सादर करावा.

६) उक्त अतिक्रमित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग करणेबाबतचा नगरपंचायत कमिटीचा ठराव प्रस्तावासोबत सादर करावा.

७) सदरचे अतिक्रमित क्षेत्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या रकमेस नगरपंचायत, घेण्यास तयार आहेत काय याबाबत प्रस्तावात खुलासा करावा.

तदनुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.०८/४१/२०२० दि.०६/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये इकडेस प्रस्ताव सादर केला असून त्यात त्यांनी “उक्त जलकुंभाकरीता शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि २००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ नुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या १२ आर क्षेत्राव्यतिरिक्त उत्तर बाजूस असलेल्या विद्यमान पाण्याच्या टाकीखालील ६.२५ आर जागा मागणी प्रस्ताव सादर केला आहे. संदर्भ क्रं.४ अन्वये कळविण्यात आलेल्या पत्रानुसार खालीलप्रमाणे पुर्तता करण्यात येत आहे.

| अ.नं. | संस्थानद्वारे उपस्थित केलेला मुद्या | नगरपंचायतीद्वारे पुर्तता केलेली. |
|---|---|---|
| १ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात केलेल्या अतिक्रमित क्षेत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केलेला आहे अथवा उक्त अतिक्रमित क्षेत्र ६.२५ आर हे नगरपंचायतकडे वर्ग करण्याचे प्रयोजन काय याबाबत प्रस्तावात उल्लेख करावा. | सर्वे नं.१२६/४ पै.मधील ६.२५ आर जागा ही विद्यमान पाण्याच्या टाकीकरीता वापरणेत येत आहे. तरी त्याखालील जागा ही विद्यमान पाण्याच्या टाकीसाठी वापरण्याचे प्रयोजन आहे. याबाबत नगरपंचायतने सादर केलेल्या प्रस्तावात सर्वे नं.१२६/४ खालील जागेत उत्तर बाजूस सरकलेली पाण्याच्या टाकीखालील जागा ६.२५ आर जागा नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.<br>याबाबत संदर्भ क्रं.१ चे प्रस्तावात व त्यानंतरच्या झालेल्या पत्रव्यवहारामध्ये सदर जागा मागणी केलेले प्रयोजनाचा उल्लेख झालेला आहे.<br>सदर बाबत प्रस्ताव हा दि.०२/०४/२०१९ रोजी आपलेसोबत |

| | | |
|---|---|---|
| | | झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे पाण्याच्या टाकीखालील संस्थानच्या जागेत असलेले अतिरिक्त क्षेत्र मागणी करणेबाबत ठरलेनुसार दाखल केला आहे. |
| २ | उक्त अतिक्रमित क्षेत्रात केलेल्या बांधकामाचा रेखांकन आराखडा व बांधकाम अंदाजपत्रक प्रस्तावासोबत सादर करावे. | ६.२५ आर जागा मागणी प्रस्तावातील विद्यमान पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेचे कामाचे वेळी संस्थान यांनी दर्शविण्यात आलेल्या जागेत पूर्ण करण्यात आलेले आहे. याबाबत पाण्याच्या टाकीचे बांधकामाचा आराखडा व प्रकल्प अहवालातील टाकीचे बांधकामाचे अंदाजपत्रक सोबत देण्यात येत आहे. |
| ३ | सदर बांधकामास नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायाचे पत्राची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी. | पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे पाणीपुरवठा योजनेतील मंजुर उपांग असून सदर योजना ही महाराष्ट्र शासनाद्वारे मंजूर करण्यात आलेली असल्याने टाकीसाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतलेले नाही. |
| ४ | उक्त अतिक्रमित क्षेत्राचा मोजणी नकाशा सादर करावा. | नगरपंचायतने मागणी केलेल्या प्रस्तावामध्ये ६.२५ आर जागा ही मोजणी नकाशावर दर्शविण्यात येवून सदर नकाशा नगरपंचायतने जा.क्रं.नपंटे-८/२५४/१/२०१९ दि.१९/०८/२०१९ रोजी प्रस्तावात जोडलेला आहे. त्याबाबत सदर नकाशाचे कृपया अवलोकन करण्यात यावे. |
| ५ | उक्त अतिक्रमित क्षेत्र नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबतचा नगरपंचायत कमिटीचा ठराव प्रस्तावासोबत सादर करावा. | दि.२१/१२/२०१९ रोजी नगरपंचायत सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या ठरावाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. |
| ६ | सदरचे अतिक्रमित क्षेत्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या रकमेस नगरपंचायत घेण्यास तयार आहेत काय, याबाबत प्रस्तावात खुलासा करावा. | ६.२५ आर जागा मागणी प्रस्तावातील विद्यमान पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेचे कामाचे वेळी संस्थान यांनी दर्शविण्यात आलेल्या जागेत पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर जागा ही विनामुल्य नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबत प्रस्ताव आहे. |

संदर्भ क्रं.४ चे पत्रात नमुद ६.२५ आर क्षेत्राबाबत अतिक्रमित क्षेत्र असा वारंवार उल्लेख करण्यात आलेला असून त्याबाबत आक्षेप नोंदविण्यात येत आहे. नगरपंचायत सार्वजनिक पाण्याच्या टाकीचे बांधकाम करतेवेळी संस्थानचे संबंधीत अधिकारी यांचे उपस्थितीत सदर बांधकाम सुरु होवून मागील साधारण १० वर्षापासून सदर टाकीबाबत संसथानचे काहीही आक्षेप नव्हते. दि.०२/०४/२०१९ रोजीचे आपले समवेत व तहसिलदार,राहाता यांचेसह संस्थान उपमुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिका-यांच्या उपस्थितीत झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे ठरले आहे. सध्यस्थितीत उभा असलेला जलकुंभ हलविणे अगर त्याची अंशत: जागा संस्थानला देणे शक्य नसल्याने सार्वजनिक हिताच्या दृष्टिने जलकुंभाचा जेवढा भाग संस्थानच्या जागेत गेलेला आहे तेवढया अतिरिक्त जागेची मागणी नगरपंचायद्वारे श्री साईबाबा संस्थानकडे करण्यात यावी. शिर्डी नगरपंचायतने संदर्भ क्रं.५ व ६ चे पत्रान्वये याबाबत सविस्तर खुलासा केलेला आहे. सदरबाबत दि.०२/०४/२०१९ रोजी आपलेसोबत झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे नगरपंचायत पाण्याच्या टाकीखालील संस्थानच्या जागेत असलेले अतिरिक्त क्षेत्र मागणी करणेबाबत ठरलेनुसार सदर प्रस्ताव दाखल केला आहे. तरी विद्यमान पाण्याच्या टाकीखालील उत्तर बाजूस असलेली ६.२५ आर जागा शिर्डी नगरपंचायतकडे विनामुल्य हस्तांतर/वर्ग करणेबाबतची आवश्यक कार्यवाही पार पाडणेस विनंती आहे." असेबाबत नमुद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय-मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावातील दि.०७/०४/२०१८ रोजीच्या मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता संस्थान मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्र १८.२५ आर इतके सध्यस्थितीत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे ताब्यात असलेचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात मात्र शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उक्त सर्वे नं.१२६/४ पै. चे ०.१२ आर इतकेच क्षेत्र महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे जलकुंभासाठी वर्ग करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. म्हणजेच

नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रापैकी ६.२५ आर इतके क्षेत्रात जास्तीचे अतिक्रमण केलेले असलेचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

मात्र मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे जागेत उत्तर बाजूस सरकलेली पाण्याचे टाकीखालील ०.०६.२५ आर जागा नगरपंचायतीकडे वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर प्रस्तावात पाण्याची टाकी सरकलेबाबतचा केलेला उल्लेख संयुक्तिक वाटत नाही. सदर पाण्याच्या टाकीचे बांधकाम नगरपंचायतीने सन २००६ मध्येच पूर्ण केलेले आहे. त्यामुळे सदरची पाण्याची टाकी सरकण्याचा प्रश्न उदभवत नाही.

नगरपंचायत,शिर्डी यांना संस्थान मालकीचे उक्त क्षेत्रापैकी यापूर्वी जलकुंभासाठी ०.१२ आर क्षेत्र अलाहिदा वर्ग केलेले आहे व सदर क्षेत्रात नगरपंचायत,शिर्डी यांनी जलकुंभाचे बांधकाम त्याच वेळेस अलाहिदा पूर्ण केलेले आहे. आजमितीस नगरपंचायत,शिर्डी यांचे ताब्यात संस्थान मालकीचे उक्त सर्वे नं.१२६/४ पैकी ०.१८.२५ आर इतके क्षेत्र असलेचे मोजणी नकाशावरुन दिसून येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी यापूर्वी नगरपंचायत,शिर्डी यांना फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र वर्ग केलेले आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी उक्त सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात ६.२५ इतके अतिरिक्त क्षेत्रात अतिक्रमण केलेले असलेचे दिसून येत आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांना वर्ग केलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त ०.६.२५ आर इतके जास्तीचे क्षेत्रात अतिक्रमण केलेले असलेचे निष्पण्ण होत आहे.

प्रस्तुतचे अतिक्रमण संबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी /मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे उर्वरित क्षेत्रात नगरपंचायतने त्यांचे कर्मचारी निवासस्थान व कंपांऊडचे प्रस्तावित केलेले बांधकाम करु नये व संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

तदनुषंगाने शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरची जागा हीसुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनेमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहसंचालक,नगररचना विभाग, नाशिक यांचे शिफारशीनुसार सहायक संचालक,नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.२०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे, वगैरेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तदनुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५८३८ /२०१९ दि.०५/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे.

शिवाय प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक,नगररचना यांनी मंजुरीची शिफारस केलेली असलेचेही नमुद केलेले आहे. म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे व त्याप्रमाणे बांधकाम सुरु केलेले असलेचे आमचे निदर्शनास आले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने, नगरपंचायतीस संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरित क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.

वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.

मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. तरी सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची सदरची जागा पूर्ववत स्थितीत करणेत यावी व संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा कोणत्याही परिस्थितीत संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस तात्काळ सादर करावा,असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.०६/०१/२०२० रोजीच्या प्रस्तावात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात नगरपंचायत, शिर्डी यांनी अतिक्रमण केलेले क्षेत्र ०.०६.२५ आर इतके विनामुल्य वर्ग करणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि प्रस्तुत अतिक्रमणासंबंधात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय स्तरावर दि.०२/०४/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सदर अतिक्रमित जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेल,असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितलेले आहे. तेंव्हा संस्थानचे हिताचे दृष्टिकोनातून सदर अतिक्रमित क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या मुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना वर्ग करणे विधीग्राहय ठरेल.

यास्तव शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रात अतिक्रमण केलेले ०.०६.२५ आर इतके क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-यामुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेस परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१८ मधील झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करता येईल.

प्रस्ताव - शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रात अतिक्रमण केलेले ०.०६.२५ आर इतके क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या मुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेस परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१८ मधील झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्ताव स्पष्ट नाही, "वर्ग करणे" ही बाब स्पष्ट नाही. शिर्डी नगरपंचायत सदर अतिक्रमीत जागा रेडीरेकनर दराने विकत घेण्यास तयार आहे का? हे स्पष्ट नाही. याबाबत सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१०** **संस्थानचे भक्तनिवासस्थान परिसरामध्ये स्वागत कक्षाशेजारी दैनिक सार्वमत,श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. अहमदनगर यांचेमार्फत हॅप्पीनेस ड्राईव्ह या उपक्रमांतर्गत एचयुएलचे एक्सक्लुसिव्ह विक्री केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबत मा.कार्यकारी संपादक, सार्वमत,अहमदनगर यांचेकडील फेब्रुवारी २०२० चे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.कार्यकारी संपादक,दैनिक सार्वमत,श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.-- फेब्रुवारी २०२० चे पत्रान्वये "श्री साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेली साईनगरी देशातील अध्यात्मिक

केंद्र म्हणून उदयास आली आहे. देश- विदेशातील करोडो भाविकांचे हे श्रध्दास्थान नि:स्सिम श्रध्देचे प्रतिक ठरले आहे. साईभूमीत येणा-या भाविकांचा आनंद द्विगुणित व्हावा. यासाठी सार्वमत-देशदूत वृत्तसमूह हॅपीनेस ड्राईव्ह या विशेष उपक्रमाची आखणी करत आहे. साई दर्शनाच्या अलौकीक आनंदासह स्वच्छ शहराच्या सामाजिक चळवळीचा संदेश त्यांच्यामार्फत देशभर पोहचावा, असा या उपक्रमाचा हेतू. यासाठी हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड (एचयुएल) हा बहुराष्ट्रीय उद्योगसमुह उपक्रमात सक्रिय सहभागी आहे. जीवन स्वच्छ व सुंदर असावे,अशा स्पष्ट भुमिकेसह एचयुएल या उपक्रमात सामील आहे. मात्र हा उपक्रम साई संस्थानच्या भरीव सहकार्यासह तडीस जाणे शक्य नाही. आपला सहभाग उपक्रमास नवा आयाम देईल.

या उपक्रमात

१) साई संस्थान भक्तनिवास आश्रमांमध्ये स्वागतकक्षा शेजारी एचयुएलच्या विक्री केंद्रास जागा उपलब्ध करुन द्यावी. याठिकाणी स्वच्छता उत्पादने सवलतीच्या दरात उपलब्ध केले जातील. हे एचयुएलचे एक्सक्लुसिव्ह विक्री केंद्र असेल.

२) साईभक्तनिवास आश्रमांतील सर्व खोल्यात एचयुएल उत्पादित साबणे ठेवण्याची मुभा मिळावी.

३) साईआश्रम खोली सोडतेवेळी भक्तांना साईंचा आशिर्वाद म्हणून रोप भेट देणार आहोत. ज्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाईल. (एका खोलीसाठी एक).

४) साईप्रसादालय वास्तूत (व्हीआयपीसह) एचयुएलला सामाजिक प्रबोधन संदेशासह फ्लेक्स ब्रॅण्डींगची परवानगी मिळावी.

५) परिसरातील शाळा,महाविद्यालये व गावांमधील विद्यार्थी/जनतेला एचयुएलची स्वच्छता उत्पादने देणगी स्वरुपात देण्यासाठी सार्वमत टिम व्हीआयपी पास घेणा-या साईभक्तांना प्रोत्साहीत/विनंती करेल. (देणगी देणा-या साईभक्ताला व्हॉटसअॅपद्वारे वस्तू लाभार्थ्यांना पोहचल्याचे कळविले जाईल. याची नोंदणी सार्वमत-देशदूत टिम ठेवेल.त्याची माहिती वेळोवेळी साई संस्थानला देण्यात येईल.)

६) शिर्डी मंदिर परिसरातील प्रसाद-फुल विक्रेत्यांना एचयुएल कापडी पिशव्यांचा पुरवठा करेल. या पिशव्यांमधूनच साहित्याची विक्री व्हावी. यासाठी त्यांना प्रोत्साहित केले जाईल. प्लॅस्टिक कचरा मुक्तीसाठी प्लॅस्टिक पिशव्या प्रसारावर ठेवण्याचे हे असेल. साई संस्थानच्या पुढाकारातून विक्रेत्यांसोबत बैठकीचे नियोजन व उपक्रम राबविला जाईज. हॅपीनेस ड्राईव्ह या उपक्रमासाठी आम्ही उत्साहित आहोत. हा स्वच्छ आणि सुंदर शिर्डीसाठीचा एक प्रयत्न आहे. त्यायोगे साईभक्तांना एका वेगळया आनंदाची अनुभूती देऊया," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - यापूर्वी खाजगी कंपनीची उत्पादने विक्री करणेसाठी संस्थान परिसरात अशी परवानगी देणेत आलेली नाही.दैनिक सार्वमत,श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.अहमदनगर या संस्थेस हॅप्पीनेस ड्राईव्ह या उपक्रमासाठी संस्थानचे भक्तनिवासस्थाने परिसरात स्वागतकक्षां शेजारी एचयुएलच्या विक्री केंद्रास जागा/गाळे उपलब्ध करुन दिल्यास इतर खाजगी संस्था/खाजगी कंपनी/खाजगी व्यक्ती देखील त्यांची उत्पादने विक्रीसाठी संस्थान परिसरात जागा मागणी करणेची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मा.कार्यकारी संपादक,दै.सार्वमत,श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.अहमदनगर या संस्थेस श्री साईबाबा संस्थानच्या शिर्डी येथील भक्तनिवासस्थाने परिसरात स्वागतकक्षांशेजारी एचयुएलच्या विक्री केंद्रांसाठी जागा/गाळे उपलब्ध करुन देणे उचित होणार नाही.

प्रस्ताव- मा.कार्यकारी संपादक,दै.सार्वमत,श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.अहमदनगर या संस्थेस श्री साईबाबा संस्थानच्या शिर्डी येथील भक्तनिवासस्थाने परिसरात स्वागतकक्षांशेजारी एचयुएलच्या विक्री केंद्रांसाठी जागा/गाळे उपलब्ध करुन देणे अथवा न देणेच्या निर्णयार्थसादर.

**निर्णय क्र.२४४ सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.११ स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौ.मी. ए.टी.एम.साठी वापरास दिलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण

टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अथवा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१९९ अन्वये स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.चे वापरासाठी साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील दिलेल्या ९ चौमी जागेस दि.२८/०५/२०१९ ते दि.२७/०४/२०२० या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,२६०/- + १०% रु.७२६/- = एकूण रु.७,९८६/- मात्र भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यास व त्याबाबतचा करारनामा करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे उक्त कालावधीचा लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी. इतकी ए.टी.एम.साठी वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत दि.२७/०४/२०२० रोजी संपत असलेने मा.शाखाधिकारी,स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०७/०४/२०२० रोजीच्या पत्रान्वये उक्त जागा वापराची मुदत पुढील कालावधीसाठी वाढवून मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय– स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०७/०४/२०२० रोजीच्या उक्त जागा वापराचे मुदतवाढीचे पत्राचे अनुषंगाने साईभक्तांना सेवा-सुविधा पुरविण्यासाठी त्यांना ए.टी.एम.चे वापरासाठी साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील दिलेल्या ९ चौमी.जागेस पुढील दि.२८/०४/२०२० ते दि.२७/०३/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,९८६/-+१०% रु.७९९/- = एकूण रु.८,७८५/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराने जागा वापराची मुदत वाढवून देता येईल व यापूर्वीप्रमाणेच लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी.इतकी ए.टी.एम.चे वापरासाठी दिलेल्या जागेच्या वापराची पुढील मुदत दि.२८/०४/२०२० ते दि.२७/०३/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,९८६/-+१०% रु.७९९/-अशी एकूण रक्कम रु.८,७८५/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराने जागा वापराची मुदत वाढवून देणेच्या व यापूर्वीप्रमाणेच लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी.जागा स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.चे वापरासाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,९८६/- +१०% (रु.७९९/-) अशी एकूण रक्कम रु.८,७८५/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराने दि.२८/०४/२०२० ते दि.२७/०३/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वापरासाठी देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच पुर्वीप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१२** **आयकर विषयक मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे Writ Petition, Special Leave Petition दाखल करणे व संस्थानची बाजू मांडणे इ.करीता विधिज्ञांचे पॅनल तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आयकर विभागाने संस्थानला करनिर्धारण वर्ष २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१७-१८ व २०१८-१९ करनिर्धारण, फेर करनिर्धारणा संबंधीत नोटीसा दिल्या आहेत. करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे करनिर्धारण आदेशाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली Writ Petition, Special Leave Petition दाखल करण्यात आली होती. करनिर्धारण आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यास व दोन्हीही वर्षांची अपिल्स् एकत्रित सुनावणी करणेबाबत व तोपर्यंत देय कराला स्थगिती आदेश मा.उच्च न्यायालयाने दिला आहे. सदर करनिर्धारण वर्षांची अपिल्स् आयकर विभागाकडे दाखल करण्यात आली असून त्यावर अद्याप सुनावणी झालेली नाही.

दरम्यानच्या कालावधीत आयकर विभागाने २०१७-१८ चे करनिर्धारण करुन दि.३०.१२.२०१९ रोजी रु.५८,४५,८०,७००/- देय कर कळविला आहे. संस्थान नियुक्त लेखापरिक्षक सीए आर.आर. मुनी ॲण्ड कं., मुंबई यांचेमार्फत करनिर्धारणाचे व आयकर विभागाकडे अपील दाखल करण्यात आले आहे. २०१४-१५ चे फेर करनिर्धारण करणेकामी आयकर विभागाने नोटीस दिली आहे, त्याविरोधात मा.उच्च न्यायालयात, मुंबई येथे दि.१४.१२.२०१९ रोजी विधिज्ञ मे.जुन्नारकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेमार्फत Writ Petition दाखल करण्यात आले असून मा.सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एस. गणेश, दिल्ली बाजू मांडत आहेत, पुढील सुनावणी दि.२५.०२.२०२० रोजी नियोजित आहे.

अशाप्रकारे आयकर विषयक सद्यस्थिती असून उर्वरीत करनिर्धारण वर्षांची करनिर्धारणे, फेर करनिर्धारणे आयकर विभागामार्फत करण्याचे नियोजन आहे. बाबत, सर्व संबंधीत व इतरही ज्येष्ठ विधिज्ञांकडून न्यायालयासंबंधीत आयकर विषयक कामकाज करण्यासाठी कामाच्या स्वरुपानुसार त्यांना अपेक्षित असलेली फी कळविणेबाबत दि.१२.१२.२०१९ व दि.२५.०१.२०२० रोजी ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करण्यात आला होता. काही विधिज्ञांनी कामाचे स्वरुप व अपेक्षित फी कळविली आहे. तर काही विधिज्ञांनी प्रत्यक्ष दुरध्वनीवरुन कामाबाबत दरपत्रक देता येणार नाही तथापि काम करण्यास तयार असलेबाबत चर्चा केली आहे. अशाप्रकारे प्राप्त दर व कामाचे स्वरुप याबाबत काही विधिज्ञांनी खालीलप्रमाणे कळविले आहे :-

| Sr. No. | Name of Advocate/ Senior Counsel | Nature of Work | Last Year Fees | Quoted for AY 2014-15, AY 2017-18 |
|---|---|---|---|---|
| 1 | Lakshmi kumaran & Sridharan Attorneys, Mumbai | Quoted for AY 2014-15 & AY 2017-18<br>CIT Appeal, High Court, Supreme Court work. | N.A. | Email dt.13.12.2019- 1. Drafting, Drafting Appeal CIT(A), and Filling of Submission. 2. Hearing/ Appearance before AO Rs.25,000/-<br>3. Drafting & Filling Submission to Appellate Proceeding to CIT(A) & ITAT(A) Rs.40,000/- each.<br>4. High Court & Supreme Court Drafting and Filling Appeal before HC, SC Rs.75,000/- each.<br>5. Writ Petition – Rs.1 Lakh each.<br>6. Legal Research enclosed details Plus GST & Out of Pocket Expenses. |
| 2 | Senior Counsel Porus F. Kaka | | N.A. | Discussed with Mr.Devesh Chawla told will inform you. But not yet informed |
| 3 | Senior Counsel ParsiPardiwalla | | N.A. | Discussed with Adv. Parsi Pardiwalla, not ready to give quotation but ready to work, said will send on paper but not yet received. |
| 4 | Senior Counsel Bhupendra Shah, Mumbai | Appeal before CIT(A), ITAT | N.A. | Email dt.13.12.2019 For each Assessment Year Rs.2.50 Lakh+ GST |
| 5 | Senior Advocate S. Ganesh, Delhi | Present on behalf of Sansthan in High Court, Supreme Court | Not charging Fees+Reimbur-sement of out-of-pocket. | Email dt.14.12.2019<br>Not charging Fees<br>+ Reimbursement of out-of-pocket. |
| 6 | M/s. Junnarkar and Associates, Mumbai | File Writ Petition in Hon'ble High Court | Not charging Fees Reimbur-sement of out-of-pocket. | Ready to work but not given quotation of fees. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | Adv. Mehul Gupta, Delhi, Hon'ble Supreme Court | File Special Leave Petition in Hon'ble Supreme Court, Delhi | Not charging Fees+Reimbur-sement of out-of-pocket. | Discussed ready to work but not giving quotation. Quotation not yet received. |

उपरोक्तप्रमाणे संबंधीत विधिज्ञांकडून आयकर विषयक कामकाजाकरिता मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे Writ Petition, Special Leave Petition व संस्थानची बाजू मांडणे करिता अपेक्षित फी नमूद केली तर काही विधिज्ञांनी दरपत्रके देण्यास नकार दिला आहे. तथापि, काम करण्यास तयार असलेबाबत दुरध्वनीवर चर्चा केली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, पॅनल तयार करणेची गरज नाही. व ज्याप्रमाणे गरज पडेल तशी कार्यवाही करावी.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३** **संस्थानकरीता तज्ञ जी.एस.टी.कर सल्लागार (GST Consultant) नेमणूक करणेकामी आलेल्या दरपत्रकांच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन होऊन, न्युनतम दरधारक लेखापरिक्षण संस्थेची जी.एस.टी.कर सल्लागार (GST Consultant) नेमणूक होणेबाबत.**

**प्रस्ताव-** वित्त विभाग भारत सरकार यांनी वस्तु व सेवा कर (GST) हा कर दि.१ जुलै,२०१७ पासुन नव्यानेच लागु केलेला आहे. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. संस्थानचे आर्थिक व्यवहार संख्येने व रक्कमेने मोठे आहेत. लागु असलेल्या करप्रणालीनुसार व वेळावेळी नव्याने पारित करण्यात आलेल्या करप्रणालीस अनुसरुन आर्थिक व्यवहार अचुकपणे होण्याच्या दृष्टीने व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने आणि आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही होऊन अंतर्गत नियंत्रण सक्षम राहणेकामी, तज्ञ कर सल्लागारांची नेमणुक करण्यात येतात. अशाप्रकारे मा.व्य.स. निर्णय क्र.२२५(२)/ दि.०४.०४.२०१८ अन्वये मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौंटंटस् अहमदनगर यांची वार्षिक एकत्रित रु.३,००,०००/- फी वर दि.०१.०८.२०१७ ते दि.३१.०७.२०१९ या कालावधी करिता नियुक्ती करण्यात आली होती. मा.व्य.स. निर्णय क्र.१७९/दि.०६.०६.२०१९ अन्वये दि.०१.०७.२०१९ ते दि.३१.०३.२०२० या कालावधीकरिता पुर्वीच्याच अटी शर्तींवर मुदतवाढ देण्यात आली होती. त्यांची मुदत दि.३१.०३.२०२० रोजी पुर्ण होत आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे जी.एस.टी कर सल्लागार (GST Consultant)नेमणुक करणेकामी माहिती प्रसिध्द करण्यास मा.तदर्थ समिती निर्णय क्र. ५१/दि.०६.०२.२०२० अन्वये मान्यता मिळाली होती. त्यास अनुसरुन, दि.२९.०२.२०२० रोजी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. उपरोक्त माहितीस अनुसरुन जी.एस.टी कर सल्लागार (GST Consultant)नेमणुक होणेकामी अंतिम दि.१६.०३.२०२० अखेर एकुण ०४ लेखापरिक्षण संस्थांची तांत्रिक व वाणिज्यीक लिफाफे विहीत वेळेत प्राप्त झाले होते. विहीत वेळेत प्राप्त झालेल्या लेखापरिक्षण संस्थांचे तांत्रिक लिफाफे दि.२०.०३.२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले होते. पैकी पात्र सर्व ४ लेखापरिक्षण संस्थांचे वाणिज्यिक लिफाफे दि.२०.०३.२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले होते . त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे –

| S.No | Name of the CA firm | Expected Annual Fees with GST | Remark |
|---|---|---|---|
| **1** | **SAAI & Co. CA Ahmednagar** | **1,88,000/-** | **L1** |
| 2 | V K Dhingra& Co. CA New Delhi | 2,33,640/- | L2 |
| 3 | MDS & Co. LLP Pune. | 2,36,000/- | L3 |
| 4 | Kailash Chand Jain & Co. CA Mumbai | 7,08,000/-out of pocket expenses as actual | L4 |

मा.तदर्थ समिती निर्णय क्र. ५१/दि.०६.०२.२०२० रोजीचे निर्णयास अनुसरुन जीएसटी कर सल्लागार (GST Consultant) कामकाजासाठी मुदतीत आलेले ०४ सिलबंद लिफाफे मा.खरेदी समितीचे सभेसमोर

उघडण्यात आलेले आहेत. त्यामधील पात्र लेखापरिक्षकांच्या फी चा तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन होऊन, न्युनतम दरधारक SAAI & Co. CA Ahmednagar या लेखापरिक्षण संस्थेची दि.०१.०४.२०२० पासुन साधारणः तीन वर्षे कालावधीकरिता संस्थानचे जीएसटी कर सल्लागार (GST Consultant) म्हणुन नेमणुक होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकरीता तज्ञ जी.एस.टी.कर सल्लागार (GST Consultant) नेमणूक करणेकामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरधारक SAAI & Co. CA Ahmednagar या लेखापरिक्षण संस्थेचे सर्व करांसहीत वार्षिक निम्नतम दर रक्कम रु.१,८८,०००/- मात्र स्विकारणेत येऊन त्यांची दि.०१.०४.२०२० पासुन पुढील तीन वर्षे कालावधीकरिता संस्थानचे जीएसटी कर सल्लागार (GST Consultant) म्हणुन नेमणुक करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१४** **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकाराची तसेच मौल्यवान खडे (Precious Stone) मुल्यांकनकरांच्या मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** अ) प्रस्तावना:– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील, समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षकाखाली कलम १७ (२) झ मध्ये, " सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील, अशा सर्व गोष्टी करील." असे नमूद केलेले आहे.

संस्थानला दक्षिणापेटीमध्ये व लेखाशाखेत समक्ष देगणी स्वरुपात येणा-या सोने-चांदीच्या वस्तु, अलंकार/मौल्यवान खडे यांची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, तत्कालीन मा.त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०९ ऑक्टोबर,२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९०५ अन्वये, विहित पद्धतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, सन २०१५-१६ करिता ०१) श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी व नरेश एन.मेहता ०२) श्री.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स या शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकारांची दि.०१ एप्रिल २०१५ ते दि.३१ मार्च २०१६ अखेर (एक वर्ष) कालावधीकरीता नेमणूक करण्यात आली होती. त्यानंतर सदर मुल्यांकनकारांची आहे त्याच अटी-शर्तीवर प्रतिवर्षी प्राप्त झालेल्या खडे वस्तूंच्या मुल्यांकनासाठी वेळोवेळी (प्रति वर्षी ) मा.व्यवस्थापन समिति सभेतील निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच दि.०६/०६/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१८१ सन २०१८ -१९ या आर्थिक वर्षातील प्राप्त खडेवस्तू मुल्यांकनासाठीही त्यांना त्याच अटी-शर्तीवर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मुल्यांकनकाराची नेमणुक व त्यांनी केलेल्या कामांची वर्षानिहाय माहीती पुढील प्रमाणे

१. खडे मुल्यांकनकारांची नेमणूक वर्तमानपत्रामध्ये विहित पद्धतीने जाहिरात देऊन तत्कालीन मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेने करणेत आलेली आहे / होती.

२. मुल्यांकनकारांनी त्यांचे नेमणुकीचे कालावधीत, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील दि.०१ जून, २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीतील प्राप्त (२०९) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १७,८७०/- मात्र असे एकूण रुपये ३५,७४०/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

३. मुल्यांकनकारांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील दि.०१ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीतील प्राप्त (२२३) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १९,२३४/- मात्र असे एकूण रुपये ३८,४६८/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

४. मुल्यांकनकारांनी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील दि.०१ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीतील प्राप्त १३२ (९९ नग) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये ८,५३८/- मात्र असे एकूण रुपये १७,०७६/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

५. मुल्यांकनकारांनी सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षातील दि.०१ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीतील प्राप्त (९५ नग) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले आहे, श्री जवेरी यांचे बिल प्राप्त झालेले असुन बिलाची रक्कम रुपये ८,५३८/- मात्र त्यांना आदा करण्यात आली आहे. श्री शिवलाल सोनी यांचे बिल प्राप्त झालेले नाही.

६. मुल्यांकनकारांनी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील दि.०१ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीतील प्राप्त (९१ नग) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये ८,०५४/- मात्र असे एकूण रुपये १६,१०८/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

मुल्यांकनकाराकडून खडेवस्तु तपासणी करून त्यांनी बाजारभावाप्रमाणे निश्चित केलेल्या किंमतीच्या नोंदी त्या आर्थिक वर्षाच्या हिशोबात घेण्यात येतात.

दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधीत १८८ खडे वस्तू प्राप्त झाल्या असुन नेहमीप्रमाणे मुल्यांकनकाराकडून तपासणी करुन किंमती ठरवुन घेणे गरजेचे आहे.

१) सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, २) श्री.प्रदिपकुमार जे.जवेरी, मुंबई व नरेश एन.मेहता या दोन्ही मुल्यांकनकांराना विचारणा केली असता, त्यांनी सन २०१९-२० या कालावधीत संस्थानला प्राप्त झालेल्या खडे वस्तु तपासणीचे कामकाज पुर्वीच्याच दराने व अटी शर्तीवर करण्यास तयार आहोत,असे सांगितले असून याबाबत त्यांनी उपरोक्त संदर्भ क्र.०२ व ०३ अन्वये, कळविले आहे.

मागील वर्ष सन २०१८-१९ चे आदेशातील अटी शर्ती पुढील प्रमाणे होत्या.

१. आपली नियुक्ती दि.०१ एप्रिल,२०१८ ते दि.३१ मार्च,२०१९ अखेर कालावधी करीता राहील. या कालावधीतमध्ये संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खडयांची तपासणी शिर्डी येथील लेखाशाखा कार्यालयात येऊन करावी लागेल.

२. सदरील मुदतीनंतर आपली नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. मुदत संपलेनंतर याकामी आपणास पुढील नेमणुकीकरीता हक्क सांगता येणार नाही.

३. आपणांस संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खडे स्वच्छ करुन त्याची तपासणी करणे, खडयांची शुद्धता, वजन, बाजारभावाप्रमाणे किंमत यानुसार मुल्यांकन करणे, त्याची फोटोग्राफी करणे, तद्नंतर मुल्यांकनाचे फोटोसह प्रमाणपत्र स्वाक्षरी –शिक्यानिशी संस्थानला द्यावे लागेल. सदरचे काम आपणास विहीत वेळेत पुर्ण करावयाचे आहे.

४. मुल्यांकन करणे कामी लागणारे सर्व उपकरणे / साहीत्य आपण स्वखर्चाने शिर्डी येथे आणु मुल्यांकनाचे काम पुर्ण करावयाचे आहे. उपकरणे / साहीत्याची ने आण करणे जोखमी आपलेवर राहील.

५. माळ / हार,अंगठी व पेंडल इत्यादी दागिन्यांमध्ये एकापेक्षा जास्त खडे असल्यास त्याची गणना ०१ खडा (परिमाण) करणेत येईल.

६. मुल्यांकन करणेसाठी शिर्डी येथे आल्यावर आपली निवासाची (जास्तीत जास्त ०३ खोल्या) तसेच भोजन, दर्शन / आरती व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल.

७. मुल्यांकनाचे शुल्क (मानधन) म्हणुन आपणास प्रति खडा रुपये ७५/- ( अक्षरी रुपये पंच्याहत्तर मात्र) अधिक लागु असलेला ( वस्तु व सेवा दर (GST) आदा करणेत येईल.

८. आपले देय मानधनातुन प्रचलित दराप्रमाणे शासकीय कर कपात करणेत येतील.

९. मुल्यांकनासंबधीत काही कायदेशीर बाबी अगर वादविवाद निर्माण झाल्यास तो निराकरण करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. तसेच मुल्यांकनाबाबत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्याकामी आपणास न्यायालयात हजर राहावे लागेल.

१०. मुल्यांकन / तपासणीचे कामकाज त्रैमासिक पद्धतीने अथवा संस्थान निश्चित करील त्यावेळेस पुर्ण करुन द्यावे लागेल.

११. आपणास आदा करणेत येणा-या मानधनातुन ५% रक्कम संस्थानकडे अनामत खाती जमा करुन ठेवली जाईल. सदरची अनामत रक्कम कामकाज पुर्ण झाल्यानंतर / संस्थानने खात्री केलेनंतर यथावकाश परत करणेत येईल.

उपरोक्त मुल्यांकनकाराचे काम समाधानकारक असून सन २०१९-२० या कालावधीकरीता त्यांची नेमणुक पुर्वीप्रमाणे उपरोक्त अटी शर्तीवर करता येईल, असे मत आहे.

प्रस्ताव:- सन-२०१९-२० मध्ये दि.०१ एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च २०२० पर्यंतच्या कालावधीतील संस्थानला १८८ खडे वस्तु नग प्राप्त झालेले आहेत. सोने-चांदीच्या वस्तु अलंकार / मौल्यवान खडे यांची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, व श्री.नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी, मुंबई यांचे काम अत्यंत समाधानकारक असून, ते सेवाभावी स्वरुपात सेवा देत असल्याने, तसेच ते घेत असलेले मानधन तुलनेने अत्यंत अल्प असल्याने, त्यांचेकडून पुर्वीच्याच अटी- शर्तीवर खडे स्वच्छ, पॉलिशींग, तपासणी, पॅकींग, फोटोग्राफी व

प्रमाणपत्रे तसेच मुल्यांकन इ.चा समावेश करण्यात येऊन, प्रति खडा रुपये ७५/-+जीएसटी या मानधनावर त्यांची नेमणुक करता येईल व त्यांचेकडून सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील प्राप्त झालेल्या १८८ खडे वस्तुचे मुल्यांकन करुन घेता येईल, त्यासाठी अंदाजे रुपये २८२००/-+जीएसटी इतका खर्च येईल. तसेच त्यांची नेहमीप्रमाणे तपासणी कालावधीत साईनिवास अथिती गृह येथे निवास व्यवस्था व प्रसादालयामार्फत भोजन व्यवस्था मोफत करता येईल.

तरी सदरचा प्रस्तावावर निर्णय होणेकामी मा.तदर्थ समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकाराची तसेच मौल्यवान खडे (Precious Stone) यांची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, श्री.नरेश एन.मेहता,मुंबई व श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी, मुंबई यांची प्रति खडा रुपये ७५/-+जीएसटी या मानधनावर पुर्वीच्याच अटी शर्तीवर नेमणुक करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच तपासणी कालावधीत साईनिवास अथिती गृह येथे निवास व्यवस्था व प्रसादालयामार्फत भोजन व्यवस्था मोफत करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१५** **निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान,शिर्डी , नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगाव नगरपरिषद संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२ चे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मुख्य अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.२५/०१/२०१८ रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) योजनेस श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे)–अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C.charge यांची गणना करुन अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असून या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजनेविषयी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे विक्रांत रुपेंद्र काले व इतर यांनी जनहितयाचिका क्रं.PIL-१३३-२०१६ दाखल करणेत आलेली आहे. सदरहू जनहित याचिका क्रं.PIL-१३३-२०१६ मधील सिव्हील ॲप्लिकेशन १४८४५-२०१८ बाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१९/१२/२०१९ रोजीचे आदेशामध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित केला आहे. (सोबत दि.१९/१२/२०१९ रोजीचे आदेशाची प्रत सादर केली आहे)

48. In view of the above, we permit the respondents No. 10 to 12 to go ahead with the work of Phase II of laying the pipeline from Nilwande Dam to Shirdi town (including Kopargaon), so that the allocation of water made from Nilwande Dam, to the respondents No. 10 to 12, as of date, can be properly utilised. Needless to say, that it would be open to the Authorities under the MWRRA Act, 2005, to review or modify the order dated 26/11/2018, as and when the need for being so, is brought to its notice and it is satisfed that any modifcation or review is called for

निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे टप्पा क्रं.२ चे कामासाठी ई-निविदा सादर करावी लागणार आहे. परंतू दि.०७/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयात अट क्रं.२ खालीलप्रमाणे नमुद आहे.

"...योजनेसाठी आवश्यक उद्भव प्रमाणपत्र, पाणी आरक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी, अहवाल, उपांगासाठी लागणा-या जमिनीची संमतीपत्रे व अनुषंगिक परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नयेत."

सदरहु अटी नुसार टप्पा क्रं.२ चे कामाकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे वाटते.

**१)** योजनेतील हेडवर्क्समधील इन्टेकवेल, अॅप्रोच चॅनल, कनेक्टिंग मेन, जॅकवेल व पंपगृह, अॅप्रोच ब्रिज ही उपांगे निळवंडे धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये येत असल्याने उपरोक्त उपांगासाठी काम करण्यास जलसंपदा खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्से आवश्यक व जागा निश्चितीबाबत जलसंपदा खात्याचे पत्र घेणे आवश्यक आहे.

**२)** बीपीटी कर्मचारी निवासस्थाने हेडवर्क्स जवळ उंच टेकडीवर प्रस्तावित केलेली आहे. सदरची जागा जलसंपदा खात्याची असल्याने जलसंपदा खात्याकडून जागा निश्चिती प्रमाणपत्र वसदरची जागा योजनेच्या कामास वापरण्यासाठी ना हरकत दाखला प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

**३)** योजनेतील ६.५ लक्ष लिटर क्षमतेचा जी.एस.आर. तळेगांव दिघे ता.संगमनेर शिवारात खाजगी जागेत बांधण्याचे असून या जागेचे संमतीपत्र घेणे आवश्यक आहे.

**४)** कर्मचारी निवासस्थाने बांधणेसाठी शिर्डी संस्थानच्या मालकीची जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात निमगांव गट नं.२२१ मधील जागा उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानचे संमतीपत्र, ठराव प्राप्त करुन व ७/१२ उतारा जोडणे आवश्यक आहे.

**५)** रस्त्याचे कडेने टाकावयाच्या १०१.१० किमी. लांबीच्या पाईपलाईनसाठी सा.बां/जि.प./रा.म./ यंत्रणेकडून रस्त्याच्या कडेने पाईपलाईन टाकणेस परवानगी मिळणेसाठीचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच जवळपास एकुण ७४० मीटर लांबीमध्ये रस्ता क्रॉस करुन पाईपलाईन टाकावयाची असल्याने रोड क्रॉसिंग परवानगी प्रस्ताव संबंधीत यंत्रणेकडे सादर करुन परवानगी प्राप्त करणे आवश्यक आहे.

**६)** अशुध्द पाणी दाबनलिका, अशुध्द पाणी गुरुत्वनलिका यांचे एल सेक्शन नकाशे, तसेच Type Design Drawing of staff quarter महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडुन तयार करुन जोडणे आवश्यक आहे.

सदरहू योजनेसाठी पाणी आरक्षण प्रस्ताव मंजूर असून बिगर सिंचन पाणी पुरवठयासाठी करारनामा करणे आवश्यक आहे. करारनामा करण्यापुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, शिर्डी नगरपंचायत व कोपरगांव नगरपरिषद यांचेकडुन पायाभुत व तरंगती लोकसंख्या व त्यानुसार लागणारे पाणी यांचे दृढिकरण करुन घेणे आवश्यक आहे.

तरी निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२ बाबत मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दि.१९/१२/२०१९चे आदेशान्वये निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देणेत आलेली असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना निविदा प्रक्रीया राबविणे व पुढील योग्य ती कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२४९** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. तसेच निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान,शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगाव नगरपरिषद संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२ चे कामाबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.१६** **श्रींचे मंदिरात व व्दारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित असणाऱ्या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२२/११/२०१९ रोजी श्रींचे गुरुवारचे नित्याचे पालखीचे वेळी पालखीचे मागे व पुढे न राहणे बाबत सुचना देवूनही पालखी समवेत व पालखी समोर चाललेले ०७ ग्रामस्थ १) श्री शिवाजी अमतृराव गोंदकर २) श्री दिलीप कन्हैयालाल संकलेचा ३) श्री कैलास जाधव ४) श्री स दा गोंदकर ५) श्री राजेंद्र हरीभाऊ गोंदकर ६) श्री अमोल

पोपटराव गायके ७) श्रीकृष्णा आढाव यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांना जा.क्र.एसएसएसटी/संरक्षण/९१०/२०१८दि.२७/११/२०१८चे पत्राने कळविणेत आले होते. त्यानुसार पोलीस विभागामार्फत संबंधीतांना कलम १४९ नुसार नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीस संदर्भात श्री शिवाजी अमृतराव गोंदकर, रा. शिर्डी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात, श्री.शिवाजी अमृतराव गोंदकर, शिर्डी यांनी महाराष्ट्र शासन, मा.जिल्हाधिकारी साहेब, अ.नगर, मा.अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विरुध्द क्रिमीनल रिट पिटीशन क्र.-३७५/२०१९ अन्वये दाखल केलेले होते. सदर रिट पिटीशन संबंधी नोटीसांच्या प्रती संस्थानला दि.१८/०४/२०१९ रोजी प्राप्त झालेल्या होत्या..

सदरचे रिट पिटीशन मध्ये याचीकाकर्त्याने खालील प्रमाणे कोर्टास विनंती केली होती.

A) Criminal Writ Petition may kindly be allowed.

B) The impugned Notice bearing Out ward no Shirdi Pose/4422/2018 Dtd. 29/11/2018 issued by the respondent No.4 U/s 149 of Cr.P.C. thereby initiated preventive action against petitioner may kindly be quashed and set aside :

C) Pending hearing and final disposal of this criminal Writ Petition, Notice bearing Out ward No.ShirdiPo.Ste/4422/2018 dated 29/11/2018 issued by the respondent No.4 U/s 149 of Cr.P.C. may kindly be stayed & petitioner may be permitted to take part in the traditional weekly (i.e. on every Thursday) Palkhi ceremonies / festivals at Sai Baba Sansthan at Shirdi.

D) The Respondent authorities may kindly be directed to give adequate compensation to the petitioner for violating his fundamental right by fixing individual responsibility.

E) Pass such orders as this Honorable High Court deems fit and proper.

सदर प्रकरणी संस्थानचे वतीने कामकाज पाहणेसाठी जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/३६३/२०१९ दि.०१/०५/२०१९रोजीचे पत्राने ॲड. संजय चौकीदार यांची नेमणुक करण्यात आली होती. सदरचे क्रिमीनल रिटपिटीशनमध्ये वेळोवेळी कोर्टाच्या तारखा होऊन मा.न्यायालयाने दि.२६/०६/२०१९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

1. Rule. Rule Made returnable forthwith. Heard Finally with consent of learned counsels for the parties.

2. The proceeding if filed to challenge the notice given by respondent No.4 Police Inspector, Police Station, Shirdi, TalukaRahata, District Ahmednagar, under Section 149 of the Code of Criminal Procedure, 1973 (Cr.P.C.) In the notice it is mentioned that on 22/11/2018, when there was Palkhi Procession of ShriSai Baba, The present petitioner was walking along side the Palkhi and ahead of Palkhi when he was not authorized to do so. It is mentioned that during the Palkhi procession, he

entered in the ChavadiMandir and due to that some villagers become angry and they made complaint against him. It is mentioned that in future if he enters in the Palkhi procession then there will be some problem of law and order. In notice, it is also mentioned that, ShriSai Baba Sansthan had made application for taking action against the petitioner and due to that notice was given. It is mentioned that if in future he or his associate does any act during Palkhi procession and due to that there is breach of public peace and there is question of law of order, action will be taken under provision of the Bombay Police Act, 1951.

3. Learned counsel for the petitioner submitted that there are no rules, as such and as a devotee, he has right to walk along sidePalkhi Procession on Palkhi Marg. This matter was adjourned last time to give an opportunity ot the learned counsel of ShirdiSansthan to show the rules with regard to Palkhi procession. Today, Mr. Chowkidar, leared counsel

for respondent No.5 – Sansthan submitted that he is ready with the reply, but the reply is not approved by the committee of respondent No.5. He is not able to show the rules made with regard to Palkhi Procession. Today, learned counsel for the respondent No.5 made statement that the petitioner is not claiming any right to carry and hold Palkhi. In view of such statement, this Court holds that relif needs to be given.

4. In the notice given under Section 149 of the Cr. P.C. there is mention that the petitioner was not authorized to do such thing. Such opinion can be formed, only when there are rules. When there are no rules, such opinion can not be formed and it is unfortunate that only because, on request, such notice was issued against petitioner.

5. In the result, petition is allowed. The aforesaid notice is quashed and set aside. Rule made absolute.

वरील प्रमाणे आदेशामध्ये मा.कोर्टाने पालखी सोहळयाकामी नियमावली बनविणेचे निर्देश दिलेले आहेत. तत्पुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.२०/११/२०१८ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ श्री राजेंद्र सोपानराव जगताप, (विद्युत पर्यवेक्षक, प्र.पाणी पुरवठा विभाग प्रमुख (अतिरीक्त कार्यभार, प्र.अधिक्षक मंदिर विभाग) यांचे विरोधात शिर्डी पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या प्रथम माहिती अहवाल व निवेदनाबाबतचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७१४ अन्वये श्रींचे मंदिरात व द्वारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचेवेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थीत असणाऱ्या स्थानीक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करावी, असे ठरले. तसेच पुढील पालखीचे दरम्यान होणाऱ्या गर्दीचे वेळी सुरक्षा व्यवस्था चोख ठेवून कोणताही अनुचीत प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावे, असे ठरले होते.

त्यानुसार संरक्षण विभागामार्फत श्रींचे मंदिरात व द्वारकामाई येथे दर्शनासाठी,आरतीचे वेळी,पालखी / रथमिरवणूकीसाठी तसेच स्थानीक उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थीत असणाऱ्या स्थानीक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समिती दि.०४/०७/२०१९चे सभेत आयत्या वेळेचा विषयनं.२२ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरचा प्रस्ताव निर्णय क्र.३६५ नुसार स्थगित ठेवण्यात आला आहे.

मा.न्यायालयाने पालखी सोहळयाकामी नियमावली बनविणे बाबत निर्देश दिलेले असून श्रीचे रथ / पालखी मिरवणूकीचे वेळी श्री गोंदकर किंवा इतर मानकरी यांना प्रवेश द्यावा किंवा कसे याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये चर्चा होऊन नियमावली अंतीम करणे आवश्यक आहे.

श्रींचे गुरुवारचे पालखी व इतर वेळी होणारी गर्दी कमी करण्यासाठी व श्रींचे पादुका, सटका व फोटोचे पावीत्र्य राखण्यासाठी करावयाची नियमावली खालील प्रमाणे तयार करणेत आली आहे.

१. ज्या ग्रामस्थांना पालखीसाठी हजर रहावयाचे असेल त्यांनी ९.०० वाजेपूर्वीच दर्शन घेऊन व्दारकामाई व चावडी परिसरात बॅरीगेटींगचे आत जाऊन बसावे. पालखी पूर्वी १० मिनिटे कोणालाही पालखी मार्गातून समाधी मंदिरात दर्शनासाठी सोडले जाणार नाही.इतर साईभक्तांनी सध्याचे प्रचलीत पध्दतीप्रमाणे बॅरीगेटचे बाहेर पालखी सोहळा पाहणेकामी बसावे.

२. पालखीसाठी येणारे ग्रामस्थांनी दिव्यांग गेटने प्रवेश करुन दर्शन झालेनंतर व्दारकामाईचे किंग गेटने द्वारकामाई व चावडी चे परिसरात पालखीचे वेळी बसून रहावे.

३. पालखी वेळी दर्शनलाईन ऑफीस बाजू दोन लाईनने मागे काढावी. पादुका बाजु दोन लाईनमध्ये ग्रामस्थांना दर्शनासाठी सोडावे, सदर ग्रामस्थांनी नमूद दोन दर्शन रांगमध्ये दर्शनानंतर थांबून येत तसेच गाभा-यातून दर्शनासाठी जावू नये.

४. संस्थानचे पालखी सोहळयासाठी नेमणुक केलेले कर्मचारी व्यतीरीक्त कोणीही कर्मचारी हे स्वत: किंवा त्यांचे कुटूंबीय समाधी मंदीर ते द्वारकामाई या मार्गात पालखीच्या मागे-पुढे चालणार नाहीत. त्यांनी द्वारकामाई व चावडी समोरील जागेत पालखीसाठी बसावे.

५. श्रींच्या गुरुवार पालखी मिरवणूकीचे वेळी पालखीसमोर, मागे व समाधी गाभारा ते व्दारकामाई यामार्गात अधिकृत व्यक्ती (कै.तात्या पाटील कोते यांचे ०१ वंशज व कै.बयाजी पाटील कोते यांचे ०१ वंशज, छत्री धरणे करीता कै. भागोजी शिंदे यांचे ०१ वंशज, बत्तीधारक ०२, डफ वादक ०२, ताशा वादक ०२,

अब्दागिरीधारक ०१, शिंग वादक ०२, पालखी सेवेकरी ०४, व बंदोबस्त कर्मचारी, भजनीमंडळ) यांचे शिवाय कोणीही चालु नये अथवा उभे राहु नये.

६. ग्रामस्थांनी पालखी सोहळा/मिरवणूक संपलेनंतर बाहेर जाणेकरीता व्दारकामाईचे किंग लहान गेट व दिव्यांग गेट यांचा वापर करावा.

७. रात्रौ. ८.३०वा. चार पैकी पादुका बाजु दोन दर्शन रांगा भक्तांना दर्शनासाठी बंद कराव्यात. फक्त ऑफीस बाजु दोन दर्शन रांगा चालू ठेवाव्यात. गर्दीचा अंदाज घेऊन बायोमेट्रीक पास वितरण बंद करणेबाबत निर्णय घ्यावा.

८. श्रींची पालखी व्दारकामाई व चावडी येथे जातांना व पुन्हा समाधी मंदिराकडे परत येतांना जाळी बाहेरील भाविकांना श्रींचे पालखी मिरवणुक सुलभतेने बघता यावी याकरीता ग्रामस्थांनी पालखी मार्गात उभे न राहता चावडी व व्दारकामाई समोरील मोकळया जागेत खाली बसावे.

९. पालखीचे वेळी फोटो धरण्याकरीता कै.तात्यापाटील कोते यांचे ०१ वंशज व कै.बयाजीपाटील कोते यांचे ०१ वंशज, छत्री धरणेकरीता कै. भागोजी शिंदे यांचे ०१ वंशज, बत्तीधारक०२, डफ वादक ०२, ताशा वादक ०२, अब्दागिरीधारक ०१, शिंग वादक ०२, पालखी सेवेकरी०४ हजर राहतील. त्यापैकी कोणी गैरहजर असल्यास किंवा आवश्यकता असल्यास मंदिरातील चोपदारांनी नमूद काम करावे.

१०. श्रींच्या पादुका व सटका एक पुजारी यांचे हातात राहील. त्यांचे बाजूला मंदिर अधिक्षक/पर्यवेक्षक यांचेकडे श्रींचा कोट असेल. श्रींच्या फोटोसमोर दोन पुजारी चौरी हलवतील. त्यांचे दोन्ही बाजूला मंदिर डयुटीचे पुजारी व चोपदार व संरक्षण डयुटीचे गार्ड हजर राहतील.

११. स्थानीक उत्सव / मुख्य उत्सवाचे वेळी देवधिकांचा फोटो (उदा. विठ्ठलाचा फोटो किंवा श्रीराम प्रभुंचा फोटो किंवा श्रीकृष्णाचा फोटो, इत्यादी) पादुकांच्या मागे संस्थान पुजारी धरतील.

१२. भजनी मंडळामध्ये चालण्यासाठी मंदिर विभागाने दिलेले कार्ड सोबत ठेवावेत. भजनी मंडळात ०७ टाळकरी व मंदिर विभागाचे एक मृदुंग वादक हजर राहतील.

१३. भजनीमंडळाचे पुढे स्थानिक झांजपथकाचे जास्तीत जास्त २० सदस्य व त्यापुढे शाळकरी मुले लेझीम पथकाचे २० मुले यांना मागणीनुसार परवानगी देता येईल. सदर इच्छुकांनी आपली नावे पालखी पूर्वी मंदिर व संरक्षण विभागाकडे द्यावीत. पालखी चावडीत गेल्यानंतर चावडीतील आरतीनंतर बाबा चावडीमध्ये विश्रांतीसाठी थांबत असल्यामुळे पालखी चावडी मधून समाधी मंदिरात माघारी येताना कोणतेही वाद्य वाजवू नये. सर्व वाद्य वादक हे चावडी परिसरातच थांबून राहतील. त्यांनी पालखी बरोबर माघारी समाधी मंदिरात येवू नये. बाहेर जाण्यासाठी त्यांनी दिव्यांग गेट किंवा गुरुस्थान गेटचा वापर करावा.

१४. स्थानीक गांवकरी, कर्मचारी यांनी समाधीमंदिर ते द्वारकामाई गेट दरम्यान थांबू नये. ज्यांना पालखीसाठी हजर रहावयाचे आहे त्यांनी द्वारकामाई, मुखदर्शन हॉल, चावडी परिसर येथे पालखी पूर्वीच जावून बसावे. ग्रामस्थांची जास्त गर्दी झाल्यास सदर संख्या बाबत वेगळे आदेश काढण्यात येतील.

१५. चावडीमध्ये श्रींचा फोटो व पादुका नेलेनंतर चावडीमध्ये चिलीमसाठी फोटो धरणारे व छत्री धरणारे व्यक्तींशिवाय कोणीही ग्रामस्थांनी थांबु नये.

१६. सर्व आरतीचे वेळी जाळीचे पुढे, जाळीचे आत महत्वाचे/अतिमहत्वाचे व्यक्ती/देणगीदार यांना जनसंपर्क विभागाचे निर्देशानुसार ठरवून दिलेल्या जागीच उभे करावे. ग्रामस्थांनी आरतीचे वेळी जाळीचे पुढे उभे राहू नये. याकामी जनसंपर्क विभाग, मंदिर विभाग व संरक्षण विभागाचे कर्मचारी संयुक्तीक जबाबदारी पार पडतील.

१७. फोटो/छत्री धरणारे मानकरी यांना सुतक/वृध्दी असल्यास अथवा गैरहजर असल्यास सर्व अधिकार मंदिर अधिक्षक / पर्यवेक्षक यांना राहील.

१८. श्रींचे तिनही मुख्य उत्सव किंवा स्थानीक उत्सवाचे वेळी शिर्डी गावातून पालखी व रथ मीरवणुकीचे वेळी वरीलप्रमाणे सर्व कामकाज चालेल.

१९. पालखी/रथ/आरती/दर्शन व्यवस्था नियमामध्ये बदल करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

श्रींचे मा.व्यवस्थापन समिती दि.२०/११/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७१४ व मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबादचा दि.२६/०६/२०१९चे आदेशानुसार गुरुवारचे नित्याची पालखीकरीता वरीलप्रमाणे नियमावली तयार करणेत आलेली आहे. रथ/पालखीचे सोबत मिरवणुकीचे वेळी पादुका/फोटो/सटका/रथ/ पालखीचे जवळ कोणास प्रवेश द्यावा, कोणास प्रवेश देऊ नये हे निश्चीत नसल्याने भविष्यात कायदा व

सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता नियमावली अंतीम होणे आवश्यक आहे. तरी सदर पालखी नियमावली अंतिम करणे कामी सविस्तर चर्चा होऊन नियमावलीमध्ये वाढ करणे अथवा नियम कमी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे मंदिरात व व्दारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित असणाऱ्या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करणेकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिर्डीतील मान्यवर ग्रामस्थ व संबधीत अधिकारी यांचेशी चर्चा करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.१७** **संस्थानचे भांडार विभागासाठी स्टेशनरी साहित्य खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे भांडार विभागासाठी स्टेशनरी साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | संस्थानचे भांडार विभागासाठी स्टेशनरी साहित्य खरेदी |
| ०२ | मागणी | स्टेशनरी साहित्य |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. १६.०१.२०२० ते दि. २७.०१.२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ०८ निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ०८ ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १६.०१.२०२०<br>टेक्निकल बीड – २९.०१.२०२०<br>कमर्शियल बीड – २०.०२.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०८ (आठ) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०८ (आठ) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०८ ही निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे |

| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | RACCA PRINTERS | CLASSIC STATIONERS, CO. | Mital Stationery and Printers | Mangalmurti Enterprises | HIMALAYA EXIM AND TRADE | Vyankatesh Suppliers | LAXMI MARKETING | SAMATA ELECTRICALS AND GENERAL SUPPLIERS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आखिव कागद - दस्ते 13"x17" 70 Gsm डबल फुलस्केप- सुंदरम | 700 | दस्ते | 22.50 | **11.50** | 246.50 | 180.00 | 12.32 | 0.00 | 352.00 | 0.00 |
| 2 | आलेख पेपरसाईज 11"x08" (१०० नगाचे ०१ पॅकेट) | 40 | पॅकेट | 46.95 | 69.00 | 84.00 | **36.00** | 71.46 | 0.00 | 44.00 | 72.80 |
| 3 | एच.बी.पेन्सिल-नटराज-621 | 1000 | नग | 3.65 | 3.20 | 3.90 | **2.60** | 3.08 | 0.00 | 3.90 | 3.90 |
| 4 | ऑफिस प्लॅस्टीक ट्रे हेवी (26x37) निलकमल/ मिलन | 25 | नग | 160.00 | 125.00 | **65.00** | 160.00 | 129.80 | 0.00 | 0.00 | 0.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | कातरी (कार्यालयीन काम काजाकरीता साईज 8") स्टेनलेस स्टील- गोदरेज | 100 | नग | 185.00 | 152.00 | 155.00 | 198.00 | **45.43** | 149 | 94.00 | 252.00 |
| 6 | कार्बन पेपर- निळा कलर (पेटी) 210mm x330mm (१०० नगाचे ०१ पॅकेट) - कॅमल/कोरस/ कांगारु | 120 | पॅकेट | 178.00 | 150.00 | 180.00 | **141.00** | 153.16 | 184. | 165.00 | 156.00 |
| 7 | कॅलक्युलेटर मोठे (DJ-120D Plus 12 digit)- कॅसिओ | 90 | नग | 569.00 | 420.00 | **390.00** | 475.00 | 584.10 | 105 | 605.00 | 498.00 |
| 8 | कॅलक्युलेटर लहान - OT-512GT 12 Digit- कॅसिओ/सिटीझन/ ओरपॅट | 20 | नग | 163.00 | 200.00 | 130.00 | **125.00** | 129.80 | 350. | 132.00 | 156.00 |
| 9 | खडु-कलर (१०० नगाचे बॉक्स) डस्टलेस 78 mm x 9.7 mm dia - कोरस | 300 | बॉक्स | 56.00 | 74.00 | 74.00 | 36.00 | 55.00 | **35** | 77.00 | 54.90 |
| 10 | खडु-पांढरे (१०० नगाचे बॉक्स) डस्टलेस 78 mm x 9.7 mm dia - कोरस | 500 | बॉक्स | 43.00 | 50.00 | 48.00 | 36.00 | 41.80 | **28** | 71.50 | 39.50 |
| 11 | खाकी कागद पोस्टेज पॅकींगकरीता 80gsm 36"x44"- ०१ पॅकेट ५००नगाचा | 5 | पॅकेट | 7500 | 3500 | 3920 | 2000 | 4114.88 | 0.00 | **70.00** | 0.00 |
| 12 | खोड रबर (33mm x 17mm x 10mm) - नटराज | 150 | नग | 1.20 | **.90** | 2.80 | 2.15 | 1.69 | 3.50 | 1.50 | 2.45 |
| 13 | ग्ल्यु स्टीक (Glue Sticks) 15gm- पेडेलाईट (फेव्हीकॉल) | 25 | नग | 39.00 | 35.00 | 38.00 | 32.00 | 34.07 | **31** | 47.00 | 37.00 |
| 14 | झेरॉक्स पेपर-स्टेटमेंट साईज-A-3 80Gsm (०१ पॅकेट ५०० नग)- जे.के/स्पेक्ट्रा/ट्रेडंट/TNPL | 80 | पॅकेट | **351.00** | 400.00 | 409.00 | 410.00 | 441.32 | 385. | 390.00 | 465.00 |
| 15 | टाचणी पीन 50 ग्रॅ.पॅकेट- रोलेक्स/कोरस/ कांगारु | 400 | पॅकेट | 18.00 | 16.00 | **13.50** | 14.90 | 14.28 | 25 | 24.00 | 0.00 |
| 16 | टेप - खाकी मोठा 2"x50 मिटर- वंडर | 150 | नग | 29.50 | 27.00 | 34.00 | **20.50** | 24.01 | 36 | 0.00 | 25.00 |
| 17 | टेप - टिस्को लहाण 1/2"x50 मिटर- वंडर | 50 | नग | 10.00 | 15.00 | 12.00 | **6.00** | 6.04 | 31.5 | 0.00 | 8.50 |
| 18 | टेप - सफेद मोठा 2"x50 मिटर- वंडर | 200 | नग | 29.50 | 27.00 | 34.00 | **20.50** | 24.01 | 36.5 | 0.00 | 29.00 |
| 19 | टोचा-लाकडी- Good quality | 20 | नग | 21.40 | 25.00 | 18.00 | 12.00 | **11.68** | 30.00 | 20.0 | 14.00 |
| 20 | डस्टर-लाकडी हेवी ॲण्ड गुड क्वॉलीटी- ओमेगा | 350 | नग | 26.00 | 35.00 | 34.00 | 24.00 | **14.78** | 52.00 | 29.0 | 0.00 |
| 21 | डिंक बाटली मोठी 700 ml - कॅमल | 210 | नग | 117.00 | 54.00 | 110.00 | 94.00 | **49.97** | 71.00 | 105 | 111.00 |
| 22 | डिंक बाटली ब्रश सह लहान 300 ml - कॅमल | 120 | नग | 65.00 | 36.00 | 55.00 | 53.00 | **33.10** | 0.00 | 60 | 51.50 |
| 23 | तारखेचे शिक्के- Music/पारनमी | 100 | नग | 45.00 | 54.00 | 60.00 | 45.00 | **38.94** | 120.00 | 90 | 45.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 24 | दोरा बंडल (१० मिटरचे ०१ बंडल)- सन | 200 | बंडल | 31.00 | 35.00 | 73.00 | 20.00 | 103.84 | 45.00 | 0.00 | 9.50 |
| 25 | पीन कुशन- ओमेगा | 50 | नग | 38.00 | 36.00 | 39.00 | 32.00 | **26.41** | 60.00 | 0.00 | 34.00 |
| 26 | पेन काळा फाईन क्लासीक- नटराज | 50 | नग | 3.00 | 2.40 | 4.80 | **2.00** | 2.22 | 6.00 | 5.00 | 3.50 |
| 27 | पेन ड्राईव्ह 32 जी. बी.- सोनी | 20 | नग | 478.00 | 790.00 | 440.00 | **350.00** | 367.33 | 500.00 | 0.00 | 625.00 |
| 28 | पेन निळा फाईन क्लासीक- नटराज | 1000 | नग | 3.00 | 2.40 | 4.80 | **2.00** | 2.22 | 6.00 | 6.00 | 3.15 |
| 29 | पेन लालफाईन क्लासीक- नटराज | 150 | नग | 3.00 | 2.40 | 4.80 | **2.00** | 2.22 | 6.00 | 6.00 | 3.15 |
| 30 | पेन्सिल सेल लहान AA 3DG 1.5 volts carbon zinc battery- निप्पो | 200 | नग | 9.50 | 14.00 | 46.00 | **6.00** | 8.80 | 0.00 | 8.00 | 0.00 |
| 31 | पेपर पंचिंग मशिन मेडियम -(Model-DP-500)- कांगारु | 60 | नग | 153.00 | 119.00 | 140.00 | **100.00** | 101.24 | 0.00 | 115. | 120.00 |
| 32 | फाईल फ्लॅग - ०3 कलरमध्ये 1"x3"x150 sheets- Music 555 | 550 | नग | 15.80 | 17.00 | 28.00 | **12.00** | 12.98 | 50.00 | 20.0 | 0.00 |
| 33 | फुट पट्टी स्टील 12" - इलोरा-अजंता | 120 | नग | 18.00 | 15.00 | 24.00 | **11.00** | 18.48 | 30.00 | 28.0 | 24.50 |
| 34 | फुल बंद पॅड मोठी साईज/A-3थिक ॲण्ड हेवी | 50 | नग | 75.00 | 100.00 | 58.00 | 100.00 | **54.52** | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 35 | फॅक्स रोल साईज 210mm x 216 mm- Mitsubhishi | 50 | रोल | 150.00 | 200.00 | 120.00 | **50.00** | 58.41 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 36 | मार्कर पेन-मोठा काळा- कॅमलीन | 200 | नग | 18.00 | 16.50 | 17.00 | **10.50** | 12.94 | 30.00 | 18.0 | 15.50 |
| 37 | रजिस्टर १ क्वायर 20.3x32.5cms (68 pages)- सुंदरम/क्लासमेट | 150 | नग | 32.40 | 49.00 | 44.00 | 35.00 | 51.92 | 25.00 | **23.4** | 47.00 |
| 38 | रजिस्टर २ क्वायर 20.3x32.5cms (136 pages)- सुंदरम/ क्लासमेट | 200 | नग | 51.60 | 73.00 | 78.00 | 55.00 | 75.28 | 42.00 | **39.4** | 54.00 |
| 39 | रजिस्टर ३ क्वायर 20.3x32.5cms (184 pages) सुंदरम/क्लासमेट | 150 | नग | **64.80** | 99.00 | 105.00 | 75.00 | 101.24 | 68.00 | 0.00 | 84.00 |
| 40 | रजिस्टर ५ क्वायर 20.3x32.5cms- सुंदरम/क्लासमेट | 40 | नग | 92.40 | 265.00 | 128.00 | 150.00 | 132.40 | 90.00 | **80.08** | 0.00 |
| 41 | रबर बॅण्ड लहान - दिड इंच-लहान- नायलॉन | 50 | किलो | 378.00 | 400.00 | 359.00 | 290.00 | 369.60 | **170.00** | 354 | 381.00 |
| 42 | रिमोट सेल AAA 4UT- निप्पो | 50 | नग | 14.00 | 14.00 | 18.00 | 8.00 | **7.70** | 30.00 | 9.00 | 0.00 |
| 43 | लेजर पेपर हिरवा 11" x 8" (80 GSM) (500 paper-01 पॅकेट) जे.के/स्पेक्ट्रा/ट्रेडंट/TNPL | 30 | पॅकेट | **235.00** | 320.00 | 320.00 | 240.00 | 308.00 | 320.00 | 350 | 285.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 44 | लेजर पेपर हिरवा 13" x 8" (80 GSM) (500 paper-01 पॅकेट) जे.के/स्पेक्ट्रा/ट्रेडंट/TNPL | 80 | पॅकेट | **244.00** | 350.00 | 300.00 | 270.00 | 320.32 | 350.00 | 350 | 299.00 |
| 45 | लेबलस्टिकर 3.5x10cm 01 (1page16 sheet).-व्हाईट | 52000 | शीट | 2.67 | 2.99 | 4.90 | 3.00 | **1.88** | 0.00 | 0.00 | 3.20 |
| 46 | लेस फाईल मोठी F/s हेवी ॲण्ड गुडक्वॉलीटी-रजत/ज्योती/प्राईम | 175 | नग | 34.00 | 35.00 | 28.00 | **19.00** | 35.05 | 80.00 | 39.0 | 0.00 |
| 47 | व्हाईट बोर्ड - मार्कर पेन-कॅमल | 200 | नग | 23.20 | 21.00 | 17.00 | **15.50** | 16.02 | 30.00 | 19.0 | 18.00 |
| 48 | शॉर्पनर- नटराज /कॅमल | 50 | नग | 3.50 | 2.75 | 3.00 | **1.90** | 2.28 | 4.00 | 3.00 | 4.90 |
| 49 | सिडी मार्कर पेन लाल कलर- कॅमल | 260 | नग | 9.85 | 8.20 | 8.00 | **6.50** | 6.94 | 10.00 | 9.00 | 8.50 |
| 50 | स्केच पेन-मोठी साईज१२ कलरचे पॅकेट- कॅमल | 20 | पॅकेट | 24.00 | 23.00 | 24.00 | **16.50** | 18.48 | 36.00 | 19.0 | 21.50 |
| 51 | स्टॅपलर मशिन- 24/6-कांगारु | 50 | नग | 118.00 | 193.00 | 215.00 | 95.00 | **84.37** | 240.00 | 87.0 | 114.00 |
| 52 | स्टॅपलर मशिन पीन Max-10- कांगारु | 1200 | पॅकेट | 8.00 | 6.25 | **5.50** | 96.00 | 5.52 | 0.00 | 9.00 | 6.25 |
| 53 | स्टॅपलर मशिन-Max-10- कांगारु | 150 | नग | 48.00 | 33.00 | 35.00 | **27.00** | 28.56 | 0.00 | 169. | 40.00 |
| 54 | स्टॅम्प पॅड बॉटल - निळी 25 ml pack- कॅमल | 450 | नग | 21.60 | 19.00 | 21.00 | **16.50** | 17.22 | 35.00 | 25.0 | 21.50 |
| 55 | स्टॅम्प पॅड मोठा निळा १५७x९६ mm (लोखंडी बॉडी)- कॅमलिन | 100 | नग | 66.00 | 63.00 | 65.00 | **52.50** | 57.75 | 91.00 | 85.0 | 59.00 |
| 56 | स्टॅम्प पॅड मोठा- लाल १५७x९६ mm (लोखंडी बॉडी)- कॅमलिन | 2 | नग | 66.00 | 68.00 | 65.00 | **52.50** | 57.75 | 91.00 | 105. | 59.00 |
| 57 | स्टॅम्प पॅड लहान-निळा 11x7c.m. लोखंडी बॉडी- कॅमलिन | 80 | नग | 29.00 | 40.00 | 44.00 | **22.50** | 37.12 | 48.00 | 97.0 | 39.00 |
| 58 | स्टेप्लर पीन - २३/१५-कांगारु | 40 | पॅकेट | 47.00 | 40.00 | 46.00 | **35.00** | 40.24 | 0.00 | 39.0 | 42.00 |
| 59 | हजेरी मस्टर महिना दोन क्वायर फुल साईज/20.3x32.5cmsसुंदरम/क्लासमेट/जागृती | 50 | नग | 140.00 | 118.00 | 248.00 | 130.00 | **116.82** | 165.00 | 0.00 | 150.00 |
| 60 | हजेरी मस्टर महिना एक क्वायर फुल साईज/ 20.3x32.5cms-सुंदरम/क्लासमेट/जागृती | 35 | नग | 80.00 | 59.00 | 224.00 | 65.00 | **62.30** | 100.00 | 0.00 | 82.00 |
| 61 | हायलायटर पेन पिवळा कलर- कॅमलिन | 150 | नग | 18.00 | 16.00 | 15.00 | **11.50** | 12.32 | 30.00 | 16.0 | 13.50 |
| 62 | व्हाईटनर पेन (07 ml)-कॅमल/सेलो | 150 | नग | 23.50 | 20.00 | 17.00 | **14.90** | 16.37 | 30.00 | 22.0 | 18.50 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – --- | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | ---- |
| १७ | मागील पुरवठादार | ---- |

| | | |
|---|---|---|
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. मंगलमुर्ती एंटरप्रायजेस, अ.नगर, मे. मितल स्टेशनरी & प्रिंटर्स, मुंबई, मे. हिमालया एक्जिम & ट्रेड, रायगड, मे. लक्ष्मी एंटरप्रायजेस, नासिक,मे. व्यंकटेश सप्लायर्स, औरंगाबाद, मे. राका प्रिंटर्स, नसिक मे. समता इलेक्ट्रीक & जनरल सप्लायर्स, राहाता आणि मे. क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर -करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त | |
| | ---- --- ---- ---- | |

२३. संक्षिप्त टीप–(प्रस्ताव)-संस्थानचे भांडार विभागासाठी स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्याची मुदत दि. २७.०१.२०२० रोजी संपलेली होती. या ई- निविदेत ०८ निविदाकारांनी भाग घेतला होता. दि. २९.०१.२०२०रोजी या निविदेचे तांत्रिक बीड उघडण्यात आले आहेत. यामध्ये सर्व ०८ निविदाकार तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरले होते. त्यामुळे एकुण ८ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. २०.०२.२०२० रोजीचे मा. खरेदी समिती सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे. मंगलमुर्ती एंटरप्रायजेस, अ.नगर, मे. मितल स्टेशनरी & प्रिंटर्स, मुंबई, मे. हिमालया एक्जिम & ट्रेड, रायगड, मे. लक्ष्मी एंटरप्रायजेस, नासिक, मे. राका प्रिंटर्स, नसिक, मे. क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई मे. समता इलेक्ट्रीक & जनरल सप्लायर्स, राहाता आणि मे. व्यंकटेश सप्लायर्स, औरंगाबाद यांचे दर वर itemwise गडद व अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत. त्यांचेशी त्यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.२५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भांडार विभागासाठी स्टेशनरी साहित्य खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील एकुण आठ निम्नतम दरधारक यांचेशी दरांबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा/वाटाघाटी करुन सद्यस्थितीत ५० टक्के किंवा आवश्यकतेप्रमाणे पुरवठा आदेश देण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१८** **संस्थानचे विद्युत विभागासाठी विद्युत साहित्य खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे संस्थानचे विद्युत विभागासाठी विद्युत साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | संस्थानचे विद्युत विभागासाठी विद्युत साहित्य खरेदी |
| ०२ | मागणी | विद्युत साहित्य |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. १३.०१.२०२० ते दि. २१.०१.२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ०६ निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ०६ ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १३.०१.२०२०<br>टेक्निकल बीड – २७.०१.२०२०<br>कमर्शियल बीड – २०.०२.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०७ ही निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे |

| Sl. No | Description of Item(s) | No.of Qty | Union Trading | m/s laxmi enterprises | JADHAV ELECTRICALS | GANDHI BROTHERS | swapnil enterprises | HIMALAYA EXIM AND TRADE | SAMATA ELECTRICALS AND GENERAL SUPPLIERS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SINGLE PHASE ENERGY METER, Size-230 VOLT,5-20AMP, Company-L&T, Type-EM-101 B | 50 | 1070.00 | **909.00** | 942.00 | 1291.00 | 1050.00 | 1130.56 | 1121.00 |
| 2 | PEDESTAL FAN, Size - 750 MM, Company-CROMPTON/ ALMONARD/ HAVELLS/ BAJAJ Type-AC750PED-1 | 50 | 8980.00 | 7349.00 | 9840.0 | 11664.0 | **7200.00** | 8220.09 | 8400.00 |
| 3 | LED BULB, Size-40 WATT, Company-PHILIPS/ SYSKA/ JAQUAR/ HAVELLS/ LUKER | 500 | 628.00 | 612.00 | 529.00 | 765.00 | 625.00 | **498.23** | 525.00 |
| 4 | LED BULB Size - 50 WATT, Company-PHILIPS/ SYSKA/ JAQUAR/ HAVELLS/ LUKER | 300 | 796.00 | 739.00 | 661.00 | 965.00 | 725.00 | **603.05** | 699.00 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – --- | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - ---- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | ---- |
| १७ | मागील पुरवठादार | ---- |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. हिमालया एक्जिम & ट्रेड, रायगड, मे. लक्ष्मी एंटरप्रायजेस, नासिक आणि मे. स्वपनील एंटरप्रायजेस, नासिक |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर -करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | मागील खरेदी    सध्याचे प्राप्त दर    फरक    % ने कमी/जास्त | |
| | ----    ---    ----    ---- | |

२३. संक्षिप्त टीप–(प्रस्ताव)-संस्थानचे विद्युत विभागासाठी साहित्य खरेदीसाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्याची मुदत दि. २१.०१.२०२० रोजी संपलेली होती. या ई- निविदेत ०७ निविदाकारांनी भाग घेतला होता. दि. २७.०१.२०२० रोजी या निविदेचे तांत्रिक बीड उघडण्यात आले आहेत. यामध्ये सर्व ०७ निविदाकार तांत्रिक दृष्टया पात्र ठरले होते. त्यामुळे एकुण ०७ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. २०.०२.२०२० रोजीचे मा. खरेदी समिती सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे. हिमालया एक्जिम & ट्रेड, रायगड, मे.लक्ष्मी एंटरप्रायजेस, नासिक आणि मे. स्वपनील एंटरप्रायजेस यांचे दर वर itemwise गडद व अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत. त्यांचेशी त्यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.२५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विद्युत विभागासाठी विद्युत साहित्य खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील एकुण सात निम्नतम दरधारक यांचेशी दरांबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा/वाटाघाटी करुन सद्यस्थितीत ५० टक्के किंवा आवश्यकतेप्रमाणे पुरवठा आदेश देण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांचेकडील खाद्यतेलाचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे संस्थानचे झालेले नुकसान भरपाईसाठी दिवाणी दावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** भांडार विभागाने लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणामाल व अनुषंगिक साहित्य रक्कम रु.३६,९२,३५,०००/- मात्रची खरेदी ई-निविदा पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २ अन्वये मान्यता घेतलेली आहे. सदर प्रस्ताव दि.२५.०१.२०१९ रोजी खरेदी विभागाकडे देण्यात आला होता. त्यानुसार खरेदी विभागाने प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा दि.११.०२.२०१९ ते ०२.०३.२०१९ या कालावधीत मागविल्या होत्या. यामध्ये खादय तेलाचा समावेश होता. खादय तेलाच्या ई-निविदा ४ क्वार्टरसाठी ४ टप्प्यांमध्ये स्वतंत्र दरांसाठी मागविण्यात आल्या होत्या.

खादय तेल खरेदीच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०७.०३.२०१९ रोजी उघडण्यात आल्या होत्या. तथापि दि.१०.०३.२०१९ रोजी लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरू झाल्यामुळे याबाबतची पुढील नमूने निवडणे, कमर्शिअल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी करणे व मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मान्यता घेणे वगैरे कार्यवाही आचारसंहिता संपलेनंतर करणेचे ठरले होते. त्यास अनुसरून तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेले खादयतेलाचे नमुने तज्ञांकडून दिनांक २१.०५.२०१९ रोजी निवडण्यात आले आहेत. तसेच दि.३०.०५.२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत कमर्शिअल बीड उघडण्यात आले होते.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना हरबरा दाळ व खादय तेलामध्ये त्यांचे दर न्यूनतम असल्याचे व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत चर्चा व वाटाघाटीसाठी करणेसाठी उपस्थित राहणेबाबत त्यांना दि.४/६/२०१९ रोजी दूरध्वनीवर कळविण्यात आले होते.

त्यानंतर मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी दि.५/६/२०१९ रोजी सायंकाळी खालीलप्रमाणे ई-मेल पाठविला होता.

We had participated in the captioned tender process. It is learnt that we are L1 in the abovementioned Tender for Edible Oil.

However, after going through the commercial bids of other bidders, we realized that inadvertently while calculathing per Quintal rate, we had considered " per Litre rate" (instead of per kilogram rate) while quoting per Quintal rate (as per the Standard 15 litre packing rate quoted to us by the manufacturers).

Under such circumstances, we request you to kindly reconsider our rate calculating as-per litre rate in proportion to per quintal rate; instead of per kilo rate in proportion to per quintal rate. Otherwise it will not be possible for us to supply the Edible Oil as required by you. This is nothing but a calculation error as per Litre rate is used and prevailing in the market as a standard.

सदर ई-मेलबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे निर्णय क्रं.२६० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्रं.२६०- प्रस्तुत प्रकरणी राविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक अमितकुमार ट्रेडिंग कंपीन, बार्शी हे आजचे व्यवस्थापन समितीसभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. तथापि त्यांनी दि.०५.०६.२०१९ रोजी ई-मेलव्दारे खादयतेलाचे दर हे लिटरचा विचार करून भरलेले आहेत. व त्यामुळे सदर दरामध्ये दरवाढ मिळावी अन्यथा ते खादयतेल पुरवठा करणेस असमर्थ असल्याचे कळविले होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदा अटी-शर्ती व सुधारित खरेदी नियमावलीतील दरवाढ देण्याची तरतुद नसल्यामुळे मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बर्शी यांची विनंती फेटाळण्यात येऊन, ते पुरवठा करण्यास तयार नसल्यामुळे व त्यांनी MSME सवलत घेऊन निविदा भरलेली असल्यामुळे, पुढील तीन वर्षासाठी त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी त्वरीत फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आवश्यक असणारे खादयतेल मागील पुरवठाधारक यांचेकडून मंजूर दराने खरेदी करावे, ते पुरविण्यास तयार नसल्यास तातडीने दरपत्रके मागवुन खादयतेल खरेदी करावे, असे ठरले.

वरील निर्णयाप्रमाणे मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचा काळया यादीत समावेश करून तसे त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/९१५/२०१९ दि.१३.०६.२०१९ अन्वये कळविण्यात आले होते. तसेच

खादयतेल खरेदीकामी संस्थानने जुलै ते सप्टेंबर २०१९, ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ व जानेवारी ते मार्च २०२० या कालावधीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन यामध्ये मे.कैलास फुड अॅण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. दरम्यानचे कालावधीत नवीन फेर ई-निविदा प्रक्रिया होईपर्यंत मे.कैलास फुड अॅण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचेकडून मागील तिमाहीचे (जानेवारी ते मार्च-२०१९) चे दराने संस्थानने खादयतेलाची खरेदी केली होती.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांनी वरील त्यांचे ई-मेल अन्वये दरवाढ मागितली होती. ती नामंजूर करण्यात आली आहे. तथापि निविदा अटी-शर्तीमधील N. आपत्ती/नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाई या तरतुदीमध्ये अ.नं.३ मध्ये खालील तरतुद आहे.

तरतुद क्रं.३ - निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

वरील तरतुदीचा विचार करता मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी खादयतेल पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे, संस्थानला खालील A,B व C मध्ये नमूद केलेप्रमाणे जादा खर्च आलेला आहे. तसेच F मध्ये नमूद केलेप्रमाणे जाहिरात खर्च आला आहे आणि D व E नमूद केलेप्रमाणे मार्च २०२० पर्यंत जादा खर्च येणार आहे.

A. ११ जून २०१९ ते ३१/७/२०१९ या फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी संस्थानला मागील वर्षाचे पुरवठाधारक मे.कैलास फुड अॅन्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचेकडून मागील तिमाहीचे (जानेवारी ते मार्च २०१९) दराने खादय तेल खरेदी करावे लागले होते. त्यामुळे याकामी जादा आलेला खर्च खालील तक्त्यात नमूद केलेला आहे.

| खरेदी केलेचा कालावधी | परिमाण क्विंटल | दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १८.०६.२०१९ | ५१.६० | ८,८७५/- | ८,८६५/- | ३,५०१/- |
| २५.०६.२०१९ | २४८.५५ | ८,८७५/- | ८,८६५/- | |
| ०६.०७.२०१९ | ४९.९५ | ८,८७५/- | ८,८६५/- | |
| एकुण | ३५०.१०० | | | |

B. खादय तेलाचे फेर ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर ई-निविदेचा पुरवठा आदेश दि.१/८/२०१९ रोजी मे.कैलास फुड अॅन्ड जनरल स्टोअर्स, सातारा यांना देण्यात आलेला आहे. त्यांचेकडून दि.१/८/२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत संस्थानने नवीन ई-निविदा दराने मे.कैलास फुड अॅन्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचेकडून खादय तेल खरेदी केलेले आहे. सदर तेल खरेदीसाठी आलेला जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| खरेदी केलेचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.०८.२०१९ ते ३०.०९.२०१९ | ५४९.९५ | ९,१५०/- | ८,८६५/- | १,५६,७३५.७५ |

C. संस्थानला ०१ ऑक्टोंबर २०१९ ते ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत फेर ई-निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेले दराने निविदेमध्ये नमूद केलेले उर्वरित परिमाणाइतके खादयतेल खरेदीसाठी येणारा जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| खरेदी केलेचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.१०.२०१९ ते ३०.११.२०१९ | २२९.३८ | ९,१९०/- | ८,८७५/- | ७२,२५४.७० |

D. संस्थानला ०१ डिसेंबर २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत फेर ई-निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेले दराने निविदेमध्ये नमूद केलेले परिमाणाइतके खादयतेल खरेदीसाठी येणारा जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| खरेदी करावयाचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.१२.२०१९ ते ३१.१२.२०१९ | ३८९.७६ | ९,१९०/- | ८,८७५/- | १,२२,७७४/- |

E. संस्थानला जानेवारी २०२० ते मार्च २०२० पर्यंत फेर ई-निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेले दराने निविदेमध्ये नमूद केलेले परिमाणाइतके खादयतेल खरेदीसाठी येणारा जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| खरेदी करावयाचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.०१.२०२० ते ३१.०३.२०२० | ७५०.५० | ९,२५०/- | ८,८७५/- | २,८१,४३७.५० |

F. संस्थानचा खादय तेल खरेदी फेर ई-निविदा प्रक्रिया जाहिरातीसाठी खर्च झालेला आहे. जनसंपर्क कार्यालयाकडून दि.२५.०७.२०१९ व दि.१४.०८.२०१९ चे पत्राने प्राप्त झालेला खर्च एकत्रित करुन तो खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| अ.नं | तपशिल | आलेला खर्च |
|---|---|---|
| १ | जाहिरात खर्च | ८९,२६२/- |

| | |
|---|---|
| एकुण वर नमूद A to F प्रमाणे संस्थानचा झालेला व जादा होणारा खर्च | ७,२५,९६४.९५ |
| पुर्णांकित रक्कम रूपये | ७,२५,९६५/- |

वरील A,B,C,D,E व F प्रमाणे संस्थानला आलेला जादा खर्च व येणारा जादा खर्च तसेच जाहिरात खर्च असे एकुण खादयतेल खरेदीसाठी संस्थानचा जादा खर्च रू.७,२५,९६५/- वर सविस्तर नमूद केले प्रमाणे झालेला आहे.

वरीलप्रमाणे वाढीव झालेला व होणारे मार्च २०२० पर्यंतची खर्चाची रक्कम त्यांचेकडून वसुल करणेकामी त्यांना सदर रक्कम संस्थान खाती जमा करणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२३०/२०१९ दि.१०.०९.२०१९ अन्वये पत्र देण्यात आले होते. त्यावर त्यांनी सदर नोटीसचा खुलासा श्री.जितेंद्र वाघ, अॅडव्होकेट, हायकोर्ट, औरंगाबाद यांचेमार्फत दि.२८.०९.२०१९ रोजी केला आहे. तो यासोबत सादर केला आहे. सदर खुलाशाबाबत संस्थानकडून पुढे काय कारवाई करणे उचित होईल याबाबत कायदेशीर मार्गदर्शन घेणेचे ठरले होते. त्यास अनुसरून अॅड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३०६०/२०१९ दि.०९.११.२०१९ अन्वये मार्गदर्शन मिळणेबाबत पत्र देण्यात आले होते.

त्यावर अॅड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांनी दि. १४.११.२०१९ चे पत्रान्वये त्यांनी संस्थानचे झालेले नुकसानीसाठी “In view of the above, as per our opinion, it would appropriate for Shri Saibaba Sansthan Trust to file a civil suit in Civil Court for claiming the amount losses & damages against M/s. Amitkumar Trading Company, Barshi. असे मत कळविले होते.

सदर प्रस्ताव दि.२७.११.२०१९ रोजी पुढील आदेशार्थ सादर केला असता त्यावर सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करण्याचे निर्देश होते. त्यानुसार हा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.१४.०१.२०२० चे सभेत सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.२१- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची पुर्न:तपासणी करून सविस्तर फेर प्रस्ताव मा.तदर्थ समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

वरील मा.तदर्थ समितीचे निर्णयास अनुसरून, सदर प्रस्तावाचे पुर्न: तपासणीमध्ये खालील मुद्द्यांबाबतची माहिती घेऊन हा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेत पुन्हा सादर करण्याचे ठरले होते.

१. सदर दिवाणी दावा दाखल करणेसाठी येणारा स्टॅम्प खर्च,

२. सदर दाव्यासाठी ॲडव्होकेट यांना दयावी लागणारी अंदाजे फी,

३. या दाव्यासाठी कोर्टामध्ये लागणारा अंदाजे वेळ

४. सदर दाव्यात संस्थानच्या बाजूने निकाल लागण्याची शक्यता,

५. संस्थानचे बाजूने निकाल लागल्यास संस्थानला प्राप्त होणारी अंदाजे रक्कम,

६. सदर दाव्याचे अनुषंगाने होणारा इतर खर्च,

वरील मुद्द्यांबाबत माहिती घेणेसाठी ॲड.श्री.जगन्नाथ गोंदकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/४५८०/२०२० दि.१९.०२.२०२० अन्वये पत्र देण्यात आले होते. त्यावर त्यांनी दि.०२.०३.२०२० अन्वये खालील माहिती कळविलेली आहे.

१. सदर दिवाणी दावा दाखल करणेसाठी येणारा स्टॅम्प खर्च हा संस्थानचे जादा झालेले साधारण ८ लाखाची रक्कम व त्यावर अंदाजे १८ टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम काढून साधारण १६-१७ हजाराचे आसपास कळविला आहे. सदर खर्च दाव्याची रक्कम निश्चित केल्यावर निश्चित करता येईल असे त्यांनी कळविले आहे.

२. सदर दाव्यासाठी ॲडव्होकेट यांना दयावी लागणारी अंदाजे फी- साईबाबा संस्थान जो निर्णय घेईल त्याप्रमाणे दयावी.

३. या दाव्यासाठी कोर्टामध्ये लागणारा अंदाजे वेळ- मे.अतिमकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना दाव्याचे समन्स लागलेनंतर दिड ते दोन वर्षाचा अंदाजे कालावधी कळविला आहे. परंतु निश्चित नाही. असे त्यांनी कळविले आहे.

४. सदर दाव्यात संस्थानच्या बाजूने निकाल लागण्याची शक्यता- सदर दाव्यामध्ये संपुर्ण कागदपत्रे संस्थानकडे उपलब्ध असल्यामुळे त्या सर्व कागदपत्राची शाबीती करून संस्थानचे बाजुने निकाल लागणेस अडचण येईल असे वाटत नाही. असे त्यांनी कळविले आहे.

५. संस्थानचे बाजूने निकाल लागल्यास संस्थानला मिळणारी अंदाजे रक्कम- दाव्याची रक्कम अधिक त्यावर मे.कोर्टाने मंजूर केलेली व्याजाची रक्कम संस्थानला मिळू शकेल. तथापि सदर प्रकरणाचा निकाल संस्थानच्या बाजूने झालेनंतर रक्कम वसुलीची कारवाई/अंमलबजावणी बार्शी येथे करावी लागेल. तसेच दावा दाखल करणेचे अगोदर मे.अतिमकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांचेकडे जादा खर्च व त्यावरील व्याजाची मागणी नोटीस करणे जरूरीचे राहील.

६. सदर दाव्याचे अनुषंगाने होणारा इतर खर्च- सदर दावा दाखल करणेकामी झेरॉक्स, टायपिंग, क्लर्केज, इतर कोर्टाच्या नकला व इतर अनुषंगीक खर्च होणार आहे. असे त्यांनी कळविले आहे.

ॲड.श्री.जे.के.गोंदकर, शिर्डी यांनी दिलेले दि.०४.०३.२०२० चे पत्र यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.

तरी संस्थान ॲडव्होकेट यांचे सल्ल्यानुसार मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचे विरूध्द राहाता येथील वरीष्ठ दिवाणी न्यायालयात दावा दाखल करावा अगर कसे? याबाबत पुढील उचित निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र.२५३** **सदर विषयावर आजचे सभेतील विषय नं.२० निर्णय क्र.२५४ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२०** **मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी,बार्शी यांचेकडील हरबराडाळ पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे संस्थानचे झालेले नुकसान भरपाईसाठी दिवाणी दावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** भांडार विभागाने लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणामाल व अनुषंगिक साहित्य रक्कम रु.३६,९२,३५,०००/- मात्रची खरेदी ई-निविदा पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २ अन्वये मान्यता घेतलेली आहे. सदर प्रस्ताव दि.२५.०१.२०१९ रोजी खरेदी विभागाकडे देण्यात आला होता. त्यानुसार खरेदी विभागाने प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा दि.११.०२.२०१९ ते ०२.०३.२०१९ या कालावधीत मागविल्या होत्या. यामध्ये गहू,

तांदुळ, साखर, व हरभरा दाळीचे एकत्रीत ई-निविदेचा समावेश होता. गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीच्या ई-निविदा ४ क्वार्टरसाठी ४ टप्प्यांमध्ये स्वतंत्र दरांसाठी मागविण्यात आल्या होत्या.

गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०७.०३.२०१९ रोजी उघडण्यात आल्या होत्या. तथापि दि.१०.०३.२०१९ रोजी लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरू झाल्यामुळे याबाबतची पुढील नमूने निवडणे, कमर्शिअल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी करणे व मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मान्यता घेणे वगैरे कार्यवाही आचारसंहिता संपलेनंतर करणेचे ठरले होते. त्यास अनुसरून तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेले गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीचे नमुने तज्ञांकडून दिनांक २१.०५.२०१९ रोजी निवडण्यात आले होते. तसेच दि.३०.०५.२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत कमर्शिअल बीड उघडण्यात आले होते.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना निवडलेल्या हरबरादाळीचे नमुन्यांचे दरांमध्ये त्यांचे दर न्यूनतम असल्याचे व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत चर्चा व वाटाघाटीसाठी करणेसाठी उपस्थित राहणेबाबत त्यांना दि.४/६/२०१९ रोजी दूरध्वनीवर कळविण्यात आले होते. तथापि ते चर्चा वाटाघाटीस अनुपस्थित होते.

मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांचे हरभरा दाळीसाठीचे प्रती क्विंटल दर तज्ञांनी निवडलेले हरभरा दाळीचे नमुन्यांमध्ये इतर निविदाधारकांपेक्षा ४ ही क्वार्टरमध्ये न्यूनतम आहेत. त्यामुळे मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/८३४/२०१९ दि.११/६/२०१९ रोजीचा पुरवठा आदेश ई-मेलद्वारे देण्यात आला होता.

तथापि, मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी दि.११ जून, २०१९ रात्रौ ९.४२ वाजता खालीलप्रमाणे ई-मेलद्वारे कळविले होते.

We have learnt about allotment of Tender to us by going through attached Work Order sent through this email.

However, you are hereby informed that, in view of unexpected unforeseen financial difficulties which our firm is going through at present and considering the terms and conditions mentioned in the Work Order, it would be difficult for us to enter into any agreement.

संस्थानच्या किराणा माल व इतर अनुषंगिक साहित्याचे वार्षिक ई-निविदेमध्ये प्रथमच मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी हरभरा दाळ पुरविणेस असमर्थता दर्शविली होती. त्यामुळे हरबराडाळ खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया करावी लागली होती. तसेच हरबराडाळ ३०० क्विंटल तातडीने दरपत्रकातील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून प्रती क्विंटल रू.५,३३९/- दराने खरेदी करावी लागली असून याकामी रू.१६,०१,७००/- खर्च आला होता. थोडक्यात हरबराडाळ खरेदी साठीची निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत आवश्यकतेप्रमाणे एकुण ६८५.१७ क्विंटल हरबराडाळ रू.५३३९/- प्रती क्विंटल दराने मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिक यांचेकडून खरेदी करण्यात आली होती.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी हरबराडाळ व खादयतेलाचा पुरवठा न केल्याने संस्थान ॲडव्होकेट यांचे सल्ल्याने कारवाई करणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्रं.३५८- यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी हरबराडाळ पुरवठा करण्यास नकार दिल्याने तातडीने दरपत्रकाव्दारे करण्यात आलेल्या ३०० क्विंटल हरबराडाळ खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रू.१६,०१,७००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच तातडीने हरबराडाळ खरेदी कामी आलेल्या वाढीव खर्चाची रक्कम मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचेकडून वसुल करण्यात येऊन त्यांचे नाव पुढील तीन वर्षासाठी काळया यादीत टाकण्यात यावे तसेच MSME अंतर्गत निघणा-या त्रुटी बाबत सविस्तर तपासणी करून प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

हरबराडाळ खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आवश्यक असणारी हरबराडाळ सध्याचे दरपत्रकातील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यास तसेच ते पुरवठा करण्यास तयार नसल्यास दरपत्रकाव्दारे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांनी दि.११.०६.२०१९ चे मेल अन्वये हरबराडाळ पुरविणेस असमर्थता दर्शविली होती. त्यामुळे संस्थानला दरपत्रके मागवून तातडीने डाळ खरेदी करावी लागली होती. तसेच फेर ई-निविदा प्रक्रिया करावी लागली होती. त्यामुळे निविदा अटी-शर्तीमधील तरतुदीनुसार मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांचेकडून संस्थानची झालेली नुकसान भरपाई वसुल होणे गरजेचे आहे. निविदा अटी-शर्तीमधील N. आपत्ती/नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाई या तरतुदीमध्ये अ.नं.३ मध्ये खालील तरतुद आहे.

तरतुद क्रं.३ -निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

वरील तरतुदीचा विचार करता मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांनी हरबराडाळ पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे A,B व E मध्ये नमूद केलेप्रमाणे जादा खर्च आलेला आहे. तसेच C व D मध्ये नमूद केलेप्रमाणे डिसेंबर २०१९ पर्यंत जादा खर्च येणार आहे. जानेवारी २०२० ते मार्च २०२० या कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया होऊन याकामीचा दर मे.अमितकुमार ट्रेडिंग, बार्शी यांचे दरापेक्षा कमी असल्यामुळे याकामी संस्थानला जादा खर्च येणार नाही. त्यामुळे या कालावधीसाठी रक्कम वसुलीचा प्रश्नच उद्भत नाही.

A. ११ जून २०१९ ते २९/७/२०१९ या फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी संस्थानने दरपत्रकाव्दारे मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून हरबराडाळ खरेदी केली त्यासाठी झालेला खर्च खालील तक्त्यात नमूद केलेला आहे.

| तारीख | परिमाण | दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| २७.०६.२०१९ | १६८.३० | ५,३३९/- | एप्रिल ते जुन २०१९- ५,३५०/-<br>जुलै ते सप्टेंबर २०१९- ५,४००- | - |
| ०१.०७.२०१९ | ११९.०४ | | | |
| ११.०७.२०१९ | १९९.२० | | | |
| १७.०७.२०१९ | ९९.२३ | | | |
| १८.०७.२०१९ | ९९.४० | | | |
| एकुण क्विंटल | ६८५.१७ | | | |

B. दि.३०.०७.२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत मे.प्रमोद सप्लायर्स,मुंबई यांचेकडून खरेदी केलेल्या हरबराडाळीसाठी जादा आलेला खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| तारीख | परिमाण | मे.प्रमोद सप्लायर्स यांचे दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ३०.०७.२०१९ ते ११.१०.२०१९ | १८१२.५० | ५,४७०/- | ५,४००/- | १,२६,८७५/- |

C. संस्थानला १२ ऑक्टोंबर २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत हरबराडाळ खरेदीसाठी आलेला जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| तारीख | परिमाण | दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १२.१०.२०१९ ते ३१.१२.२०१९ | १८९९.९० | ५,७७०/- | ५,५००/- | ५,१२,९७३/- |

D. संस्थानचा हरबराडाळ खरेदी फेर ई-निविदा प्रक्रिया जाहिरातीसाठी खर्च झालेला आहे. जनसंपर्क कार्यालयाकडून दि.२५.०७.२०१९ व दि.१४.०८.२०१९ चे पत्राने प्राप्त झालेला खर्च एकत्रित करुन तो खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| अ.नं | तपशिल | आलेला खर्च |
|---|---|---|
| १ | जाहिरात खर्च | १,०१,२०९/- |

| | |
|---|---|
| एकुण वर नमूद A to D प्रमाणे संस्थानचा झालेला व जादा होणारा खर्च | ७,४१,०५७/- |

वरील A,B,C व D प्रमाणे संस्थानला आलेला जादा खर्च व येणारा सर्व खर्च रू.७,४१,०५७/- वर सविस्तर नमूद केला आहे.

वरीलप्रमाणे डिसेंबर २०१९ पर्यंत झालेले वाढीव खर्चाची रक्कम त्यांचेकडून वसुल करणेकामी त्यांना सदर रक्कम संस्थान खाती जमा करणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२३१/२०१९ दि.१०.०९.२०१९ अन्वये पत्र देण्यात आले होते. त्यावर त्यांनी सदर नोटीसचा खुलासा श्री.जितेंद्र वाघ, अॅडव्होकेट, हायकोर्ट, औरंगाबाद यांचेमार्फत दि.२८.०९.२०१९ रोजी केला होता. सदर खुलाशाबाबत संस्थानकडून पुढे काय कारवाई करणे उचित होईल याबाबत कायदेशीर मार्गदर्शन घेणेचे ठरले होते. त्यास अनुसरून अॅड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३०६०/२०१९ दि.०९.११.२०१९ अन्वये मार्गदर्शन मिळणेबाबत पत्र देण्यात आले होते.

त्यावर अॅड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांनी दि. १४.११.२०१९ चे पत्रान्वये त्यांनी संस्थानचे झालेले नुकसानीसाठी “In view of the above, as per our opinion, it would appropriate for Shri Saibaba Sansthan Trust to file a civil suit in Civil Court for claiming the amount losses & damages against M/s. Amitkumar Trading Company, Barshi. असे मत कळविले होते.

सदर प्रस्ताव दि.२७.११.२०१९ रोजी पुढील आदेशार्थ सादर केला असता त्यावर सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करण्याचे निर्देश होते. त्यानुसार हा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.१४.०१.२०२० चे सभेत सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.२०- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची पुर्न:तपासणी करून सविस्तर फेर प्रस्ताव मा.तदर्थ समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

वरील मा.तदर्थ समितीचे निर्णयास अनुसरून, सदर प्रस्तावाचे पुर्न: तपासणीमध्ये खालील मुद्द्यांबाबतची माहिती घेऊन हा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेत पुन्हा सादर करण्याचे ठरले होते.

१. सदर दिवाणी दावा दाखल करणेसाठी येणारा स्टॅम्प खर्च,
२. सदर दाव्यासाठी अॅडव्होकेट यांना दयावी लागणारी अंदाजे फी,
३. या दाव्यासाठी कोर्टामध्ये लागणारा अंदाजे वेळ
४. सदर दाव्यात संस्थानच्या बाजूने निकाल लागण्याची शक्यता,
५. संस्थानचे बाजूने निकाल लागल्यास संस्थानला मिळणारी अंदाजे रक्कम,
६. सदर दाव्याचे अनुषंगाने होणारा इतर खर्च

वरील मुद्द्यांबाबत माहिती घेणेसाठी अॅड.श्री.जगन्नाथ गोंदकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/४५८०/२०२० दि.१९.०२.२०२० अन्वये पत्र देण्यात आले होते. त्यावर त्यांनी दि.०४.०३.२०२० चे पत्रान्वये खालील माहिती कळविलेली आहे.

१. सदर दिवाणी दावा दाखल करणेसाठी येणारा स्टॅम्प खर्च हा संस्थानचे जादा झालेले साधारण ८ लाखाची रक्कम व त्यावर अंदाजे १८ टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम काढून साधारण १६-१७ हजाराचे आसपास कळविला आहे. सदर खर्च दाव्याची रक्कम निश्चित केल्यावर निश्चित करता येईल असे त्यांनी कळविले आहे.

२. सदर दाव्यासाठी अॅडव्होकेट यांना दयावी लागणारी अंदाजे फी- साईबाबा संस्थान जो निर्णय घेईल त्याप्रमाणे दयावी.

३. या दाव्यासाठी कोर्टामध्ये लागणारा अंदाजे वेळ- मे.अतिमकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना दाव्याचे समन्स लागलेनंतर दिड ते दोन वर्षाचा अंदाजे कालावधी कळविला आहे. परंतु निश्चित नाही. असे त्यांनी कळविले आहे.

४. सदर दाव्यात संस्थानच्या बाजूने निकाल लागण्याची शक्यता- सदर दाव्यामध्ये संपुर्ण कागदपत्रे संस्थानकडे उपलब्ध असल्यामुळे त्या सर्व कागदपत्राची शाबीती करून संस्थानचे बाजुने निकाल लागणेस अडचण येईल असे वाटत नाही. असे त्यांनी कळविले आहे.

५. संस्थानचे बाजूने निकाल लागल्यास संस्थानला मिळणारी अंदाजे रक्कम- दाव्याची रक्कम अधिक त्यावर मे.कोर्टाने मंजूर केलेली व्याजाची रक्कम संस्थानला मिळू शकेल. तथापि सदर प्रकरणाचा निकाल संस्थानच्या बाजूने झालेनंतर रक्कम वसुलीची कारवाई/अंमलबजावणी बार्शी येथे करावी लागेल. तसेच दावा दाखल करणेचे अगोदर मे.अतिमकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांचेकडे जादा खर्च व त्यावरील व्याजाची मागणी नोटीस करणे जरूरीचे राहील.

६. सदर दाव्याचे अनुषंगाने होणारा इतर खर्च- सदर दावा दाखल करणेकामी झेरॉक्स, टायपिंग, क्लर्केज, इतर कोर्टाच्या नकला व इतर अनुषंगीक खर्च होणार आहे. असे त्यांनी कळविले आहे.

ॲड.श्री.जे.के.गोंदकर, शिर्डी यांनी दिलेले दि.०४.०३.२०२० चे पत्र यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.

तरी संस्थान ॲडव्होकेट यांचे सल्ल्यानुसार मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचे विरूध्द राहाता येथील वरीष्ठ दिवाणी न्यायालयात दावा दाखल करावा अगर कसे? याबाबत पुढील उचित निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र.२५४** **उपरोक्त विषय नं.१९ व २० या दोन्ही विषयावर एकत्रित सविस्तर चर्चा करत असतांना तदर्थ समितीच्या असे निदर्शनास आले की, ॲड नितीन भवर व ॲड राहुल गोंदकर यांचेकडून कायदेविषयक सल्ला घेण्यात आलेला आहे. ॲड गोंदकर यांचे दि.०४.०३.२०२० रोजीचे कायदेशीर मताचे अवलोकन करता, सन २०१९-२०२० करीता हरबरा डाळ व खाद्य तेलाचा पुरवठा करण्यासाठीची मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांची निविदा स्विकृत करण्यात आलेली होती. मात्र या निविदेत नमुद दराने सदरहु मालाचा पुरवठा करण्यास मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनीने असमर्थता दाखवुन जादा दराची मागणी केली, की जो कराराचा भंग आहे. सहाजिकच संस्थानला निविदेतील दरापेक्षा जास्त दराने इतर पुरवठादाराकडून सदरचा माल विकत घ्यावा लागला. व संस्थानचे आर्थिक नुकसान झाले.**

**करीता, मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनीवर कारवाई करण्याचे अनुषंगाने कायदेशीर मत मागीतले असता, ॲड गोंदकर यांनी दिवाणी दावा दाखल करण्याविषयी मत दिलेले आहे. ॲड गोंदकर यांनी या दाव्यासाठी रक्कम रु.३२,४३०/-चा कोर्ट फी स्टॅम्प लावावा लागणार असल्याचे कळविले आहे. व त्याव्यतिरिक्त वकील फी व तदनुषंगीक खर्च येईल व अंतिमत: या दाव्यामध्ये यश येईल अथवा अपयश येईल हे खात्रिशीर रित्या सांगता येत नाही. असे कळविले आहे. दाव्याच्या अंतिम निकालाचा कालावधीही अनिश्चीत आहे. संस्थानने मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनीकडून अनामत रक्कमही घेतलेली नाही.**

**कराराचा अभ्यास करता, दाव्याचे एकुणच स्वरुप हे दुरस्थ नुकसान (Remote Damages) चे आहे. दाव्यासाठी येणारा खर्च, लागणारा कालावधी, अंतिम निकालाची अशाश्वती व सर्व अनुषंगीक बाबीचा विचार करता अमितकुमार ट्रेडिंग कंपनी विरुध्द नुकसान भरपाई वसुलीसाठी दावा करणे उचित होईल असे समितीस वाटत नाही. सबब विषय नं.१९ व २० एकमताने नामंजुर करुन मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचा काळया यादीत (Black List) मध्ये समावेश करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.२१** **संस्थानचे विविध ठिकाणच्या सबस्टेशनमध्ये व जनरेटर रुममधील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, व्ही.सी.बी./ओ.सी.बी.मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल,ए.एम.एफ.पॅनेल तसेच सब पॅनेल्सचे ठिकाणी कर्मचाऱ्याला शॉक बसू नये याकरीता सुरक्षिततेचा उपाय म्हणून सिंथेटीक इलास्टोमर इलेक्ट्रीकल इन्स्युलेटेड रबरी मॅट खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनतम दर निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध ठिकाणच्या सबस्टेशनमध्ये व जनरेटर रुममधील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, व्ही.सी.बी./ ओ.सी.बी., मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल, ए.एम.एफ.पॅनेल तसेच सब पॅनेल्सचे ठिकाणी कर्मचा-याला शॉक बसू नये याकरीता सुरक्षिततेचा उपाय म्हणून सिंथेटीक इलास्टोमर इलेक्ट्रीकल इन्स्युलेटेड रबरी मॅट खरेदी करणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | संस्थानचे विविध ठिकाणच्या सबस्टेशनमध्ये व जनरेटर रुममधील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, व्ही.सी.बी./ओ.सी.बी., मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल, |

| | | |
|---|---|---|
| | | ए.एम.एफ.पॅनेल तसेच सब पॅनेल्सचे ठिकाणी कर्मचा-याला शॉक बसू नये याकरीता सुरक्षिततेचा उपाय म्हणून सिंथेटीक इलास्टोमर इलेक्ट्रीकल इन्स्युलेटेड रबरी मॅट खरेदी करणे. |
| ०२ | मागणी | - |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.२०-०१-२०२० ते दि.०५-०२-२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | दि.१७-०१-२०२० रोजी दैनिक पुण्यनगरी, पुणे व दैनिक लोकमत, अहमदनगर तसेच दि.१८-०१-२०२० रोजी दैनिक इंडियन एक्सप्रेस, मुंबई www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ठेकेदारांना ई-मेल व्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | दि.१७-०१-२०२० रोजी ८६ ठेकेदारांना ई-मेलव्दारे. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.२०-०१-२०२०, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि. २०-०२-२०२०<br>कमर्शियल बीड दि.०२-०३-२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | - |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | ई-निविदेत नमूद केले आहे. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| | अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | ई-निविदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| | १ | मे.आर्या इंजिनिअरींग, पुणे | रु. ३,६१,४००/- |
| | २ | मे.इलेक्ट्रोपथ एन्टरप्राईजेस, औरंगाबाद | रु. २,०२,५४०/- |
| | ३ | मे.हिमालय एक्झिम ॲण्ड ट्रेड कळंबोली, रायगड | रु. २,५१,८७५/- |
| | ४ | **मे.लक्ष्मी रबर इंडस्ट्रीज, मुंबई** | **रु. १,८४,०८०/-** |

| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
|---|---|---|---|---|
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | - |
| १७ | मागील पुरवठादार | - |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | रु.१,८४,०८०/- |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.लक्ष्मी रबर इंडस्ट्रीज, मुंबई |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी,<br>उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) तथा प्र.कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) |
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | रु. ४,९०,८८०/- |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | |

| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
|---|---|---|---|---|
| | - | - | - | - |

२५). संक्षिप्त टिप:- विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे संस्थानचे विविध ठिकाणच्या सबस्टेशनमध्ये व जनरेटर रुममधील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, व्ही.सी.बी. / ओ.सी.बी., मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल, ए.एम.एफ.पॅनेल तसेच सब पॅनेल्सचे ठिकाणी कर्मचा-याला शॉक बसू नये याकरीता सुरक्षिततेचा उपाय म्हणून सिंथेटीक इलास्टोमर इलेक्ट्रीकल इन्स्युलेटेड रबरी मॅट खरेदी करणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदाकारांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.०२-०३-२०२० रोजी उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले मे.लक्ष्मी रबर इंडस्ट्रीज, मुंबई यांचे न्युनतम दर रु.१,८४,०८०/- येत आहेत.

तरी न्युनतम दरधारक मे.लक्ष्मी रबर इंडस्ट्रीज, मुंबई यांचेशी ई-निविदेत दिलेल्या दराबाबत चर्चा/ वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध ठिकाणच्या सबस्टेशनमध्ये व जनरेटर रुममधील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, व्ही.सी.बी./ओ.सी.बी.मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल,ए.एम.एफ.पॅनेल तसेच सब पॅनेल्सचे ठिकाणी कर्मचाऱ्याला शॉक बसू नये याकरीता सुरक्षिततेचा उपाय म्हणून सिंथेटीक इलास्टोमर इलेक्ट्रीकल इन्स्युलेटेड रबरी मॅट खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक मे.लक्ष्मी रबर इंडस्ट्रीज, मुंबई यांचेशी दरांबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२२** **एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०२०-२१ साठी देणेकामी मे.श्री साई पॉवर कंन्ट्रोल्स कुकटपल्ली, हैदराबाद यांनी पाठविलेल्या दि.२४.०२.२०२० रोजीचे ई-मेल वर निर्णय होणेस तसेच उघडण्यात आलेल्या इतर निविदांवर विचार विनिमय होऊन निम्नतम दर निविदाधारकाशी वाटाघाटी/चर्चा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ साठी देणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ साठी देणेबाबत. |
| ०२ | मागणी | - |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | ०१). दि.२०-०१-२०२० ते दि.०५-०२-२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | दि.१७-०१-२०२० रोजी दैनिक सकाळ, पुणे व दैनिक लोकमत, अहमदनगर तसेच दि.१८-०१-२०२० रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम्स, मुंबई, www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ठेकेदारांना ई-मेल व्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | दि.१७-०१-२०२० रोजी १०४ ठेकेदारांना ई-मेलव्दारे. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.२०-०१-२०२०, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि. २०-०२-२०२०<br>कमर्शियल बीड दि. ०२-०३-२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | ई-निविदेत नमूद केले आहे. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |
| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | ई-निविदा रक्कम रुपये |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मे.ओके एजन्सीज मुलुंड, मुंबई | | | रु. १६,७२,२००/- |
| २ | मे.प्रेसिजन सर्व्हीस सेंटर, मुंबई | | | रु. १६,०१,३८४/- |
| ३ | मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद | | | रु. १२,७४,८९८/- |
| ४ | मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई | | | रु. १५,३८,३३६/- |
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - | | |
| १६ | मागील वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टची रक्कम | रु. १५,००,०००/- | | |
| १७ | मागील ठेकेदाराचे नाव | मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई | | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचे न्युनतम दर रक्कम रु.१५,३८,३३६/- इतके येतात. | | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई | | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) तथा प्र.कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | | |
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | रु. १५,००,०००/- | | |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | | | |
| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | - | - | - | - |

२५). संक्षिप्त टिप:- विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ साठी देणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदाकारांनी भाग घेतला होता. यामध्ये चारही निविदाधारक पात्र झालेले आहे. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.०२-०३-२०२० रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांचे न्युनतम दर रु. १२,७४,८९८/- इतके येत आहे.

परंतू मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी दि.२४-०२-२०२० रोजी संस्थानला ई-मेल पाठवून कळविलेले आहे की, ‘‘आम्ही एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी झालेलो आहे. परंतू आम्ही हैद्राबाद येथील असून शिर्डी हे आमचे क्षेत्र नाही. परंतू आमचेकडून चुकून सदरचे टेंडर भरण्यात आलेले आहे. त्यामुळे आम्ही सदरच्या ई-निविदा प्रक्रियेमधून माघार घेत आहोत. तरी सदरच्या ई-मेलचा विचार करण्यात यावा तुमच्या असुविधेकरीता आम्ही क्षमस्व आहोत.’’

ई-निविदेच्या टेक्नीकल बीडमध्ये पान क्र.१५ वर कॉन्ट्रॅक्टरने दयावयाच्या हमी पत्रातील खालील अट नमूद आहे.

I/We understand that, the amount of earnest money will not bear interest and shall be liable to be forfeited to the Sansthan if I/we fail (i) to keep the offer open for the period mentioned above and (ii) if this offer is accepted, fail to sign and complete the contract documents as required by The Chief Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi or furnish the security deposit as specified under terms and conditions of the

contract. The amount of earnest money may be adjusted towards the security deposit or refunded to me/us unless the same or any part thereof has been forfeited as aforesaid.

उपरोक्तप्रमाणे,

०१). मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी पाठविलेल्या दि.२४-०२-२०२० रोजीचे ई-मेलवर निर्णय होणेस तसेच त्यांनी ई-निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्यामुळे त्यांनी भरलेल्या अर्नेस्ट मनी डिपॉझिटवर निर्णय होणेस,

तसेच

०२). मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी सदरच्या ई-निविदा प्रक्रियेमधून माघार घेतलेली असल्याने व इतर राहिलेल्या ई-निविदेतील L-2 निविदाधारक मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांनी रुपये १५,३८,३३६/- इतका दर नमूद केला असून त्यांना चर्चा / वाटाघाटी करीता बोलवावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०२०-२१ साठी देणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांना दरांबाबत चर्चा/वाटाघाटी करणेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मंदिरातील मान्यवरांचे मोफत दर्शन बाबतचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील ठरावांबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकार" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

प्रस्ताविक– उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये श्री संजय काळे, रा. कोपरगांव यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मंदिरातील मान्यवरांचे मोफत दर्शन रुपाचा भ्रष्टाचार त्वरीत बंद करण्यात यावा, अशी तक्रार महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडे दाखल केली आहे. यात मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मोफत दर्शन / आरती साठी वेळोवेळी घेतलेले निर्णय रद्द करणेबाबत कळविलेले आहे.

यामध्ये श्री संजय काळे यांनी शासनास सादर केलेल्या पत्रात, मा. व्यवस्थापन समितीच्या व त्रिसदस्य समितीच्या सभेत वेळोवेळी झालेल्या मोफत दर्शन / आरती साठी खालील प्रमाणे ठरावांचा समावेश आहे.

१) दिनांक १४/११/२०१३ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ९०७ अन्वये संस्थानने आरतीसाठी मोफत सोडण्यात येणा-या मान्यवरांची यादी तयार करण्यात आली.

२) दिनांक ०९/१२/२०१४ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १०४१ अन्वये त्रिसदस्य समिती अध्यक्ष, सदस्य व उपकार्यकारी अधिकारी यांचा कार्यकाळ संपल्यानंतर देखील एकूण चार व्यक्तींना दर्शन व्यवस्था मोफत केली.

३) दिनांक ३०/११/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ८७० प्रमाणे उपरोक्त विषयावर सांगोपांग चर्चा हाऊन, मा. त्रिसदस्य समितीचे दि.१४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९०७ अन्वये ठरविणेत आलेले मान्यवर तसेच शासना मधील सर्व प्रकारचे वर्ग-अ अधिकारी व समिती सदस्यांनी सुचविलेले मान्यवर यांचा मोफत दर्शन / आरतीच्या यादी मध्ये समावेश करण्यात यावा असे ठरले.

४) दिनांक ०७/०३/२०१८ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ४० व निर्णय क्र. १७८ प्रमाणे सन १९८४ पासुनच्या सर्व माजी विश्वस्तांना त्यांच्यासह, त्यांचे कुटुंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन व आरतीकरीता ओळखपत्र देण्याचे मान्य करण्यात आले. व ह्या सर्वांना मोफत दर्शन व आरती मिळण्याचा मार्ग सुखकर करण्यात आले.

५) दिनांक ०४/०७/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेच्या विषय क्र.३६, निर्णय क्र. ३७९ प्रमाणे खलील निर्णय घेण्यात आला.

मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ३०/०१/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ९२ अन्वये शताब्दी वर्षाचे कालावधीतील मुख्य कार्यकारी अधिकारी व शताब्दी मोहत्सवासाठी निर्माण करण्यात आलेल्या शताब्दी कक्षासाठी संस्थान आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात महाराष्ट्र शासनाकडील प्रतिनियुक्तीवर आलेल्या उपजिल्हाधिकारी, पोलीस उपनिरीक्षक, मुख्य लेखाधिकारी यांचेसह त्यांचे कुटुंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन / आरती करीता ओळखपत्र देण्यात आलेली आहेत. त्याच प्रमाणे शताब्दी महोत्सवानंतर त्या पुढे शासना मार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्त होणारे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर शासकिय अधिकारी यांचेसह त्यांचे कुटुंबातील ४ व्यक्तींसाठी ओळखपत्र देण्यास मान्यता देण्यात आली.

अशा रीतीने श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त मंडळाने आजी माजी विश्वस्त व प्रतिनियुक्तीवर येणा-या अधिकारी व त्यांच्या कुटूंबीयांची मोफत दर्शनाची बेकायदा कायमची सोय करून घेतली आहे. हा अधिकार व पदाचा दुरूपयोग त्यांनी संगनमताने व कटाने करुन संस्थानचे नुकसान केलेले आहे.

संस्थान व्यवस्थापन समितीच्या बैठकीत जनसंपर्क विभागाने खालील प्रश्न उपस्थीत केलेत.

१) माजी विश्वस्तांचे कुटूंबातील त्यांचेसह (१+ ३ = ४) व्यक्तींचे मोफत दर्शन / आरती व्यवस्था करावी. तथापी त्यांचे सह इतर कोणत्या ३ व्यक्तींची मोफत दर्शन / आरती व्यवस्था करावी ?

➢ ह्या प्रश्नाचे उत्तर नाही दिलेले, त्यामुळे कर्मचारी व अधिकारी संभ्रमात आहे.

२) चारपेक्षा जास्त व्यक्ती असल्यास त्यांची प्रचलित पध्दतीने नियमाप्रमाणे शुल्क आकारुन दर्शन / आरतीची व्यवस्था करावी किंवा कसे ?

➢ ह्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही व्यवस्थापनाने, त्यामुळे अधिकारी / कर्मचारी संभ्रमात आहे.

३) माजी विश्वस्तांची महिन्यातुन, वर्षातुन किती वेळा मोफत दर्शन/ आरती व्यवस्था करावी ?

➢ ह्या प्रश्नाचे देखील उत्तर व्यवस्थापन समितीने दिलेले नाही.

४) ओळख पत्रावर माजी विश्वस्तांचा फोटो व नाव तसेच त्यांचे कुटूंबातील इतर ०३ व्यक्तींचे फक्त नावे नमुद करण्यात येतील. दर्शन व आरतीसाठी येताना ओळखपत्रावर नमुद इतर०३ व्यक्तींनी आपले आधार कार्ड बरोबर आणणे आवश्यक राहील.

➢ सदरची बाब व्यवस्थापन समितीने स्पष्टता केलेली नाही त्यामुळे भ्रष्टाचाराला मोठी वाव आहे.

व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३०.११.२०१६ रोजीच्या सभेतील निर्णयाने ( निर्णय क्र. ८७०) साईबाबा संस्थानचे मोठे नुकसान झालेले आहे व निरंतर होत आहे. समिती सदस्य, अधिकारी यांनी स्थानिक हॉटेल वाल्यांशी संगनमत करुन स्वतःचे खाजगी सचिव नेमलेले आहेत. व हे सचिव दिवसाला प्रत्येकी वीस ते तीस भक्त दर्शन व आरतीसाठी मोफत सोडतात.

व्यवस्थापन समितीने गावकरी गेटवर CCTV कॅमेरा ठेवलेला नाही. कोणत्या विश्वस्ताने किती भक्त मोफत दर्शन व आरती साठी सोडले याची नोंदवही ठेवलेली नाही. विश्वस्त अधिकारी यांचे सचिव व हॉटेल मालक झटपट दर्शनाच्या नावाखाली भक्तांची लुट व संस्थानची फसवणूक करीत आहे.

विश्वस्त अधिकारी हे श्रीमंत आहेत अधिकारी वर्गाला सातवा वेतन आयोग लागु असल्यामुळे त्यांना व त्यांच्या सोबत येणा-या कोणत्याही व्यक्तीला मोफत दर्शन देण्याचा संबंधच नाही. त्यामुळे सातवा वेतन आयोगाचा गलेलठ्ठ पगार घेणा-यांनी सशुल्क दर्शन घ्यावे. ही सुविधा कायमची रद्द व्हावी.

माजी विश्वस्तांना संस्थानवर नियुक्त करतांना त्यांचे राजकीय पुनर्वसन झालेले आहे / होते. त्यामुळे हे सर्व माजी विश्वस्त आर्थिक दृष्टया सबळ असल्याने त्यांचेसाठी मोफत दर्शन / आरती देणे म्हणजे संस्थानचे आर्थिक नुकसान आहे. विश्वस्तांचे तसेच अधिका-यांचे दर्शनासाठी नेमलेले शिर्डीतील स्विय सहाय्यक पैशाच्या नादात कुणालाही VIP म्हणुन सोडण्याची बळजबरी सुरक्षा रक्षकांवर करतात. सुरक्षा रक्षक विश्वस्तांच्या, अधिका-यांच्या भितीने त्यांने पाठवलेल्या VIP ना सोडतात तपासणी करीत नाही. त्यामुळे मंदिर सुरक्षेसाठी मोठा धोका निर्माण होण्याची प्रचंड भिती आहे.

ज्या दरवाजाने हे सर्व VIP सोडले जातात त्या दरवाजावार CCTV नाही, भक्तांची कुठलीही नोंदवही नसल्यामुळे होणा-या भ्रष्टाचाराचे कुठलेही ताळेबंद ठेवले जात नाही. विश्वस्त, अधिकारी स्वतःच आता पैसे कमवण्यासाठी एजंटचा व्यवसाय करीत आहेत. हा त्वरीत थांबवावा. झालेले सर्व ठराव रद्द व्हावेत. माजी विश्वस्त, माजी अधिकारी यांना मोफत दर्शन / आरती त्वरीत बंद व्हावे. त्यांनी सशुल्क दर्शन घ्यावे. आमदार,

खासदार, मंत्री यांनी देखील दर्शन सशुल्क घ्यावे. त्यांना चांगला पगार मिळतो, पेन्शन मिळते त्यांचे सोबत कुणालाही मोफत जानेचा अधिकार नसावा.

केवळ शिर्डीच्या पंचक्रोशीत राहणारे व दररोज दर्शनासाठी येणा-या ग्रामस्थ भक्तांना तसेच दर गुरूवारी शिर्डीला पायी वारी करणारांनाच मोफत दर्शनाची सुविधा प्राप्त असावी. ग्रामस्थांच्या पाहूण्यांना देखील ही सुविधा उपलब्ध नसावी. प्रत्येक ग्रामस्थ व दररोज येणा-या भक्तांचे आधार कार्ड स्कॅन व्हावे.

मेट्रो रेल्वे स्टेशन प्रमाणे स्कॅन झाल्याशिवाय भक्ताला आत जाण्यासाठी परवानगी नसावी. ही यंत्रणा संस्थानने सुरक्षेसाठी कार्यान्वीत करावी, हे आवाहन आहे. वरील सर्व ठराव त्वरीत रद्द व्हावेत. व समानता व पारदर्शकता आणावी. याचिके पूर्वीची नोटीस. असे श्री संजय काळे यांनी शासनास कळिवलेले आहे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मंदिरातील मान्यवरांचे मोफत दर्शन रूपाचा भ्रष्टाचार त्वरीत बंद करणेबाबत, श्री संजय काळे, कोपरगांव यांच्या उपरोक्त संदर्भादिन पत्रातील सर्व मुद्यांबाबतची माहिती ( विवरणपत्र स्वरूपात) तात्काळ शासनास सादर करणेबाबत कळविले आहे.

मागणी- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे मा. व्यवस्थापन समितीच्या व त्रिसदस्य समितीच्या सभेत मोफत दर्शन / आरती बाबत घेतलेले निर्णय रद्द करणेसाठी मार्गदर्शन मिळणेबाबत.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- श्री संजय काळे, रा. कोपरगांव,यांनी शासनास श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मंदिरातील मान्यवरांचे मोफत दर्शन रुपाचा भ्रष्टाचार त्वरीत बंद करण्यात यावा, तसेच मा. व्यवस्थापन समितीच्या त्रिसदस्य समितीच्या सभेत मोफत दर्शन / आरती साठी वेळोवेळी घेतलेले निर्णय रद्द व्हावेत. अशी तक्रार महाराष्ट्र शासन,विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दाखल केली आहे. तरी सदरची बाब ही मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ ठेवावी असे मत आहे.

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे मा. व्यवस्थापन समितीच्या व त्रिसदस्य समितीच्या सभेतील मोफत दर्शन / आरती साठी वेळोवेळी घेतलेले निर्णय रद्द व्हावेत, यासाठी श्री संजय काळे, रा. कोपरगांव यांनी शासनाकडे तक्रार दाखल केलेली आहे. त्यामुळे सदरच्या प्रस्तावावर मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सविस्तर चर्चा होऊन निर्णय हाणेस विनंती.

**निर्णय क्र.२५७** **विषय क्र.२३ वर चर्चा करत असतांना तदर्थ समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, श्री साईबाबांच्या दर्शनासाठी व आरत्यांसाठी मोफत सोडण्यात येणारांची संख्या खुप मोठी आहे. वास्तविक पाहता व्यवस्थापन समितीने दि.१४.११.२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय क्र.९०७ मध्ये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी व आरत्यांसाठी कोणत्या मान्यवर व्यक्तींना मोफत सोडण्यात येईल त्याचा अंतर्भाव अ.नं.१ ते ७ मध्ये केलेला आहे व अशा मान्यवर व्यक्ती व्यतिरिक्त दर्शन/आरतीची विनाशुल्य व्यवस्था करण्यासाठीचे प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचे अधिकार समितीचे अध्यक्ष, सदस्य व कार्यकारी अधिकारी यांना राहतील असा निर्णय घेतलेला आहे. तसेच त्या निर्णयामध्ये अंध, मतीमंद, जे स्वत:ची देखभाल करण्यास असमर्थ आहेत असे अपंग अथवा अतिवृध्द व्यक्तिंची फक्त दर्शनाची व्यवस्था करावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.**

**तदर्थ समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, दि.३०/११/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये कोणत्या मान्यवरांची (एका दिवशी एका कुटुंबातील किती व्यक्तिंची किती आरत्या /दर्शनासाठी) निशुल्क व्यवस्था करावी याबाबतचा निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव ठेवला गेलेला दिसतो. ज्या कारणासाठी सदरचा विषय ठेवला गेला व अभ्यासिला गेला त्याबाबत कुठलाही निर्णय घेण्यात आलेला नाही. मात्र तत्कालीन व्यवस्थापन समितीने दि.३०/११/२०१६ रोजी क्र.८७० चा निर्णय घेताना पुर्वीच्या दि.१४/११/२०१३ रोजीच्या निर्णय क्र.९०७ मध्ये ठरविण्यात आलेल्या मान्यवरांव्यतिरीक्त "शासनामधील सर्व प्रकारचे वर्ग अ अधिकारी व समिती सदस्यांनी सुचविलेले मान्यवर" यांचा मोफत दर्शन/आरतीच्या यादीमध्ये समावेश करण्यात यावा, असा निर्णय घेतलेला दिसून येतो.**

**वास्तविक शासनाचे वर्ग-अ अधिकारी यांच्यापेक्षाही वरिष्ठ अधिकारी शासन सेवेत असतांना त्यांचा समावेश मात्र या यादीमध्ये केलेला दिसून येत नाही. "शासनामधील सर्व प्रकारचे वर्ग-अ अधिकारी" हा शब्दप्रयोग सर्वच शासनाबाबत दिसून येतो (फक्त महाराष्ट्र शासनासाठी नाही.) त्यामुळे असे बदल करणे सर्वथा अनुचित दिसून आले. कारण कुठल्याही शासन सेवेतील वर्ग-अ अधिकारी हे सर्वच राज्यांच्या उच्च न्यायालयाच्या मा.न्यायमुर्ती पेक्षा कनिष्ठच आहेत. असे असतांना इतर राज्याच्या**

न्यायमुर्तींना दर्शन/आरतीसाठी शुल्क आकारणे आणि वर्ग-अ अधिकाऱ्यांना ही सुविधा देणे सर्वथा अनुचित आहे.

समितीच्या पुढे असेही निदर्शनास आले की, "शासनामधील सर्व प्रकारचे वर्ग-अ अधिकारी व समिती सदस्यांनी सुचविलेले मान्यवर" या वाक्यातील "समितीच्या सदस्यांनी सुचविलेले मान्यवर" हा शब्दप्रयोग दि.१४.११.२०१३ चे समितीच्या बैठकीतील निर्णयाला (जो मा.उच्च न्यायालयाने कायम केला आहे.) अनुसरुन नाही. समिती सदस्यांनी सुचविलेले मान्यवर या अंतर्गत नवीन प्रकारे मोफत दर्शनाची/आरतीची सोय करणे हे न्यासाचे आर्थिक हिताचे विरुध्द आहे व त्यात स्वत: समितीने सहभागी होणे सर्वथा अनुचित आहे, असे तदर्थ समितीचे मत आहे.

वरील परिस्थितीचा सांगोपांग विचार करता ही तदर्थ समिती दि.३०/११/२०१६ चा निर्णय क्र.८७० अधिक्रमित करुन व दि.१४/११/२०१३ रोजीच्या निर्णय क्र.९०७ च्या अनुषंगाने आज खालील प्रमाणे सुधारणा करुन (अ) हा निर्णय सर्वानुमते घेत आहे.

तदर्थ समिती सदस्यांच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, इंग्रजी वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दर वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भक्तभाविक येत असतात. समितीच्या काही सदस्यांनी स्वत: अनुभवले की, नवीन वर्षाची सुरुवात श्रींचे समाधीलगत समोर उभे राहुन, रात्री १२ वाजता नवीन वर्षाचा प्रारंभ होतेक्षणी श्रींचे समाधीदर्शन घेण्यासाठी एकच तोबा गर्दी होते व बाबांचे आशिर्वाद घेण्यासाठी बरेच मान्यवरही श्रींचे समाधीलगत अगदी समोर हजर होतात. समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, पुर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दि.३१ डिसेंबर रोजी भक्तभाविकांचे दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले राहते.

समितीचे तसेच की सदस्यांचे असेही निदर्शनास आले की, अशा वेळी प्रचंड गर्दी होत असतांना बरेच भाविक तसेच मान्यवर बाबांच्या समाधीसमक्ष जमा होतात. बाबांचे समाधीलगत असणारी जागा खुपच मर्यादित आहे व या जागेत एका ठराविक मर्यादेपर्यंतच व्यक्ति सामावू शकतात.

या बाबींचा सांगोपांग विचार करुन ३१ डिसेंबरच्या रात्री १२ वाजणेच्या सुमारातील दर्शनाबाबत खालील प्रमाणे (ब) हा निर्णय घेण्यात येत आहे.

**निर्णय**

**(अ)**

(१) दर्शनाकरीताचे देणगी मुल्य २०० रु. यात वाढ करुन, ३०० रुपये आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

(२) सध्याच्या धोरणाप्रमाणेच बाबांच्या सर्व आरत्याचे आठवडयातील सर्व दिवस प्रत्येक आरतीसाठी ऑन लाईन १५० व जनसंपर्क कार्यालयातून दिले जाणारे २०० देणगी शुल्क आरती पासेस देणे पुढे चालू राहील. मात्र आजच्या बैठकीतील निर्णय क्र.५ अनुसार सशुल्क आरती पासेसचे शुल्क खालील प्रमाणे आकारण्यात येईल.

| | |
|---|---|
| काकडी आरती | रु.१०००/- |
| मध्यान्ह आरती | रु.८००/- |
| धुपारती | रु.८००/- |
| शेजारती | रु.८००/- |

(३) मोफत दर्शन/आरतीचा लाभ खालील मान्यवर व्यक्तिंना देण्यात यावा.

१. शिडीतील ग्रामस्थांची दर्शन/आरतीची व्यवस्था मोफत केली जाते, ती यापुढेही सुरु ठेवावी. प्रत्येक ग्रामस्थाला त्याची ओळख पटण्यासाठी त्याचे आधार कार्ड आणि निवडणूक ओळखपत्र बंधनकारक राहील. ओळखपत्रांची संस्थान तपासणी कर्मचारी व संरक्षण कर्मचारी यांनी काटेकोर तपासणी करावी.

२. श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागांच्या दैनंदिन कार्यालयीन कामकाजा करीता येणाऱ्या व्यक्ति तसेच उत्सव काळात येणारे मानकरी व संस्थान निमंत्रित कलाकार.

३. श्री.के.व्ही.रमणी, अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे रु.११० कोटीचे देणगीतून "साईआश्रम प्रकल्प" साकारलेला असल्याने श्री. रमणी व त्यांच्या कुटुंबीयांचे साईप्रती असलेले योगदान लक्षात घेता, त्यांना तहहयात मोफत साईदर्शन/आरती लाभ, मोफत निवासव्यवस्था करण्यात यावी.

४. श्री साईबाबांची समाधी ज्या गाभाऱ्यात आहे, ती वास्तु बुट्टीवाडा म्हणून प्रसिध्द आहे. या बुट्टी कुटूंबातील त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या चार सदस्यांना तहहयात मोफत साई दर्शन/आरती लाभ, मोफत निवासव्यवस्था करण्यात यावी.

५. भारतीय गणराज्याचे मा.राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.उपराष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मा.उपपंतप्रधान, भारतीय गणराज्याचे भुतपुर्व मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान, मा.उपपंतप्रधान, भारतीय गणराज्याचे सर्वोच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायमुर्ति व सर्वोच्च न्यायालयाचे इतर सर्व न्यायमुर्ति, लोकसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल, मुंबई उच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायमुर्ति, व देशातील सर्व उच्च न्यायालयाचे सर्व न्यायमुर्ति, महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्यातील सर्व आमदार व खासदार, तसेच भारतरत्न, पद्मभूषण, पद्मश्री पुरस्कार प्राप्त व्यक्ती तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच पोलीस महासंचालक, तसेच भारतीय स्थलसेना, नौसेना व वायूसेनेमधील परमवीर चक्र, महावीर चक्र, अशोक चक्र मिळालेले अधिकारी/सैनिक आदि अतिमहत्वाच्या व्यक्तिंची दर्शन/आरती व्यवस्था निशुल्क राहील.

६. भारत देशाच्या कानाकोपऱ्यातुन येणारे साधुसंत यांची दर्शन/आरती व्यवस्था निशुल्क राहील.

७. व्यवस्थापन समितीवरील सदस्य/विश्वस्तांना ते स्वत: त्यांची पत्नी/पती व ०२ मुले यांना मोफत दर्शन/आरतीचा लाभ देण्यात येईल. चार पेक्षा जास्त व्यक्ती असल्यास पुढील प्रत्येक जादा व्यक्तिचा सशुल्क पास घ्यावा लागेल. तसेच माजी विश्वस्तांना ते स्वत: त्यांची पत्नी/पती व ०२ मुले यांना महिन्यातुन एकदा मोफत दर्शन/आरतीचा लाभ देणेत येईल. चार पेक्षा जास्त व्यक्ती असल्यास पुढील प्रत्येक जादा व्यक्तिचा सशुल्क पास घ्यावा लागेल.

८. वर अ.नं.१ ते ७ मध्ये उल्लेख केलेल्या मान्यवर व्यक्तिखेरीज इतर व्यक्तिंची मोफत दर्शन/आरती व्यवस्था करावयाची झाल्यास, त्याबाबतचे प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील व अशा मान्यवरांना (फक्त १+३ मोफत दर्शन/आरतीचा लाभ देण्यात येईल, चार पेक्षा जास्त व्यक्ति असल्यास पुढील प्रत्येक जादा व्यक्तिचा सशुल्क पास घ्यावा लागेल).

९. श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे अंध, मंतिमंद व अशा प्रकारचे अपंग व्यक्ति अथवा अतिवृध्द व्यक्ति की जे स्वत:ची देखभाल करणेस असमर्थ आहेत, अशा साईभक्तांची फक्त दर्शनाची व्यवस्था मोफत करण्यात यावी व त्यांच्या दर्शनाची संपुर्ण जबाबदारी ही जनसंपर्क कार्यालय/संरक्षण विभाग यांची राहील. जेष्ठ नागरीक (वय वर्ष ६५ व त्यावरील) यांची ओळखपत्र तपासून, मोफत दर्शनाची व्यवस्था संरक्षण व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेत यावी.

४) वर अ.नं.३ मधील मान्यवर व्यक्तिंना फक्त नंदीगेटने मंदिरात सोडण्यात येईल तसेच सदर ठिकाणी गर्दीवर नियंत्रण ठेवणेसाठी त्वरीत सीसीटीव्ही लावणेत यावेत. संस्थानचे अधिकारी, वरील मान्यवर व्यक्ति अथवा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किंवा श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देशीत केलेल्या व्यक्तीखेरीज कुणा इतर व्यक्तिस मंदिरात प्रवेश देतांना आढळून आल्यास संबधीत कर्मचारी याचेवर खातेनिहाय चौकशीची कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल.

५) दि.१५/०२/२०२० च्या तदर्थ समितीच्या बैठकीतील निर्णय क्र.७४ नुसार सुरक्षा रक्षकांच्या गैरप्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने अशा गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी एक उपसमिती नेमण्यात आलेली आहे. त्या उपसमितीमध्ये सेक्युरिटी एजन्सीचा एक प्रतिनिधी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. ही उपसमिती सेक्युरिटी एजन्सीच्या सुरक्षा रक्षकाने सशुल्क रांगेतुन विनापास अथवा पासाच्या संख्येपेक्षा जास्त व्यक्ति सोडल्यास त्या सुरक्षा कर्मचाऱ्याची चौकशी करुन अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे देईल व त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी निर्णय घेतील.

**६) आठवडयातील प्रत्येक वारी शिर्डीतील ग्रामस्थांना मोफत दर्शन/आरतीचा लाभ देतांना व दर गुरुवारी शिर्डी व पंचक्रोशीतील ग्रामस्थांना दर्शनाचा लाभ देतांना करावयाची अंमलबजावणी ही चोखरित्या केली जाईल. अशा ग्रामस्थांची त्यांचे आधारकार्ड आणी निवडणूक ओळखपत्र यावरुन ओळख पटली तरच त्यांना मंदिरात प्रवेश दिला जाईल. गेटवरील रजिष्टरमध्ये अशा ग्रामस्थांची नोंद घेतली जाईल. एका दिवसात मोफत दर्शनाचा लाभ फक्त एकदाच दिला जाईल. संबधीत सुरक्षा रक्षक, संस्थान कर्मचारी किंवा संस्थानचे अधिकारी, यामध्ये कसुर करतांना आढळून आल्यास त्यांचेवर खातेनिहाय चौकशीची कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल.**

**७) कुणाही व्यक्तिने गेटवरील संबधीत सुरक्षा रक्षक, संस्थान कर्मचारी किंवा संस्थानचे अधिकारी यांचेवर मोफत दर्शन/आरतीसाठी कुणा व्यक्तिस सोडण्यासाठी दबाव आणल्यास, अरेरावी केल्यास, अशा संबधीतावर संबधीत सुरक्षा रक्षक, संस्थान कर्मचारी किंवा संस्थानचे अधिकारी भारतीय दंड विधानान्वये कार्यवाही करतील.**

**८) गर्दीचे वेळी परिस्थीतीनिरुप सशुल्क दर्शन/आरती पास चालु बंद करणेबाबत निर्णय घेणेचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असतील.**

**(ब)**

**३१ डिसेंबरच्या रात्री १२ वा. चे सुमारास दर्शनासाठी समाधी समक्ष उभे राहण्यासाठी/ थांबण्यासाठी इच्छुक भाविक, मान्यवर, ग्रामस्थ इत्यादी गर्दी करतात. अशा वेळी सदर ठिकाणची गर्दी नियंत्रीत करुन भाविकांचे व मान्यवरांचे दर्शन सुरळीत राहील यांची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.**

**वरील निर्णय सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन त्वरीत मा.उच्च न्यायालयासमोर मंजुरीसाठी ठेवण्यात यावा व मा.उच्च न्यायालयाची मंजुरी (सुचवलेल्या बदलासह) प्राप्त झाल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी सुरु करण्यात यावी.**

**निर्णय सर्वानुमते मंजूर.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग/संरक्षण विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२४ साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या वेबसाईटसाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :१७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचाठरावक्रं.:

१) मा. व्य. समितीचे दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील नि. क्रं.४८.

२) मा.व्य.समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील नि. क्रं.१०५१(०२).

प्रास्तविक:श्री साईभक्तांनाInternet व्दारे रुम बुकींग, आरती/दर्शनपास,अभिषेक/सत्यनारायण कुपन आरक्षण, साईलिला मासिक/ भक्तमंडळ सभासद व देणगी इ. सुविधा उपलब्ध करुन देणेकामी साईटेक प्रकल्पांतर्गत online.sai.org.in ही वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदर वेबसाईट व संस्थान अंतर्गत इंटरनेट वापरासाठी 10 Mbps Internet Link ची सुविध उपलब्ध करणेकामी मा. व्य. समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १०५१(०२) अन्वये, M/s. Bharti Airtel Ltd यांना संदर्भ क्रं.०१ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. सदर लिंक बरोबरच M/s SwiftmailCommयांचेमार्फत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले 50 Mbps Internet Link चाही वापर सद्यस्थितीत चालू आहे. सदरच्या दोन्ही लिंक Primary व Secondary Link म्हणून कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. काही तांत्रिक अडचणींमुळे Primary Link बंद पडल्यास साईभक्तांना Internet व्दारे उपलब्ध सुविधेचा लाभ घेण्यास अडचण निर्माण होऊ नये, तसेच संस्थानचे कार्यालयीन कामकाजात व्यत्यय येऊ नये याकरीता Secondary Link वरुन सदरच्या सुविधा उपलब्ध होतात.

M/s. Bharti Airtel Ltd यांनी सदरची लिंक दि.१४.०३.२०१८ रोजी कार्यान्वीत केलेली असल्याने त्यांना याकामी दोन वर्षाकरीता देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.१३.०३.२०२० अखेर संपुष्टात येणार आहे. सबब, सदरची लिंक उपलब्ध करणेकामी प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा राबवावी लागणार आहे.

त्यानुसार ई-निविदेमध्ये मागणी करावयाचे Internet Link ची क्षमता व तांत्रिक तपशिलाबाबत मा. व्य. समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे निर्णय क्रं.२७५ यांस अधिन राहून मे. टिसीएस यांना अभिप्राय देणेस कळविणेत आले होते. त्यानुसार मे. टिसीएस यांनी दि.२०.०१.२०२० राजीचे ई-मेलव्दारे याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

सद्यस्थितीत दोन Internet Link ची आवश्यकता असून निविदा प्रसिध्द करणेपुर्वी निविदा मसुदा दाखविणेत यावा, निविदा मसुद्यामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव करणेत यावा.

1. Speed should minimum 50 Mbps.
2. It should be supported BGP configuration.
3. Link should be laying with fibre optical cable.
4. Vender should ensure the redundancy connectivity (One Link goes down, second link will be up)

उपरोक्त मे. टिसीएस यांचे अभिप्रायाप्रमाणे सद्यस्थितीत M/s Swift mail यांचेमार्फत 50 Mbps ची Internet Link देणगी स्वरुपात पुरविणेत येते. सदर लिंकचा Secondary Link म्हणून उपयोग करणेत येतो. तसेच सध्या कार्यान्वीत असलेल्या M/s Bharati Airtel यांचे 10 Mbps Internet Link ही Primary Internet Link म्हणून वापरात आहे. M/s Bharati Airtel यांचे 10 Mbps Internet Link चीमुदत दि.१३.०३.२०२० अखेर संपुष्टात येणार असल्याने मे. टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सदर लिंकचे जागी नव्याने 50 Mbps Internet Link कार्यान्वीत करणे आवश्यक आहे.

सबब, मे. टिसीएस यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार 50 Mbps Internet Link सुविधेसाठीचे दराबाबत या क्षेत्रातील पुरवठाधारकांकडे ई-मेलव्दारे विचारणा केली असता, त्यांचेमार्फत पुढीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| **अ.नं** | **पुरवठाधारक** | **वार्षिक दर** | **18%GST** | **एकूण** | **इतर चार्जेस** | **दोन वर्षाचे एकूण दर** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | M/s Vodafone Idea Ltd | ३,२०,००० | ५७,६०० | ३,७७,६०० | १०,००० | ७,६५,२०० |
| २ | M/s Gazonindia Ltd | ५,००,००० | ९०,००० | ५,९०,००० | - | ११,८०,००० |
| | | | | | **एकूण-** | **१९,४५,२००** |
| | | | | | **सरसरी (दोन वर्षाकरीता येणारा)अंदाजीत खर्च रक्कम रु.-** | **९,७२,६००** |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे पुढील दोन वर्षाकरीता 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी अंदाजे रक्कम रु.९,७२,६००/-इतका खर्च अपेक्षित आहे. सबब, मे. टिसीएस यांचे अभिप्रायानुसार साईटेक प्रकल्पांतर्गत श्री साईभक्तांसाठी कार्यान्वीत असलेल्या online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत Internet वापरासाठी पुढील दोन वर्षाकरीता 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी विहित पध्दतीनेई-निविदा प्रक्रिया राबविता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविकेत नमुद केलेनुसार सद्यस्थितीत M/s Bharti Airtel Ltd यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या 10 Mbps Internet Link चा कालावधी दि.१३.०३.२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने, मे. टिसीएस यांचे अभिप्रायानुसार साईटेक प्रकल्पांतर्गत श्री साईभक्तांसाठी कार्यरत असलेल्या online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत Internet वापरासाठी नव्याने 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी विहित पध्दतीनेई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी पुढील दोन वर्षाकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/-(सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थमा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोरसादर करणेस मान्यता असावी, ही नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान : तांत्रिक, आर्थिक व प्रशासकिय

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- साईटेक प्रकल्पांतर्गत श्री साईभक्तांसाठी कार्यान्वीत असलेल्या online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत Internet वापरासाठी10 Mbps Internet Link प्रचलित पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबवून M/s Bharti Airtel Ltd यांना दोन वर्षाकरीता कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांनी सदरची लिंक दि.१४.०३.२०१८ रोजी कार्यान्वीत केलेली असल्याने दोन वर्षाचा कालावधी दि.१३.०३.२०२० रोजी संपुष्टात येणार आहे. सबब, याकामी नविन पुरवठाधारकाची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे. सबब, याकामी मा. व्य. समितीचे

दि.०४.०४.२०१८ रोजीचे निर्णय क्रं.२७५ यांस अधिन राहूनमे. टिसीएस यांना Internet Link ची क्षमता व तांत्रिक तपशिलाबाबत अभिप्राय देणेस कळविणेत आलेले होते. त्यानुसार मे. टिसीएस यांनी दि.२०.०१.२०२० रोजीचे ई-मेलव्दारे online.sai.org.in या वेबसाईटला साईभक्तांचा वाढता प्रतिसाद व संस्थान अंतर्गत Internet वापराची आवश्यकता यानुसार 50 Mbps Internet Link घेणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.मे. टिसीएस यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार 50 Mbps Internet Link सुविधेसाठीचे दराबाबत या क्षेत्रातील पुरवठाधारकांकडे ई-मेलव्दारे विचारणा केली असता, याकामी दोन वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु.९,७२,६००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

मे. टिसीएस यांचे अभिप्रायानुसार 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी पुढील दोन वर्षाकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या वेबसाईटसाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी 50 Mbps Internet Link उपलब्ध करण्याच्या मागणी संदर्भात सद्यस्थितीत किती Internet वापरकर्ते (users) आहेत व त्यानुसार किती Mbps ची Internet Link आवश्यक आहे. याचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येऊन त्यास १५ दिवसाचे आत चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२५** **साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या संकेतस्थळासाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी M/s Bharati Airtel Ltd. यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या 10 Mbps Internet Link चे सुविधेस मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- १७ (१) नुसार भक्तगणांना सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:- ०१. दि.२५.०२.२०१७ निर्णय क्रं. ४८.
०२. दि.०८.१२.२०१७ निर्णय क्रं.१०५१ (०२)

प्रास्तविक:- साईभक्तांना Internet व्दारे रुम बुकींग, आरती/दर्शनपास, अभिषेक/सत्यनारायण कुपन आरक्षण, साईलिला मासिक/भक्तमंडळ सभासद व देणगी इ. सुविधा उपलब्ध करुन देणेकामी साईटेक प्रकल्पांतर्गत online.sai.org.in ही वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदर वेबसाईट व संस्थानअंतर्गत इंटरनेट वापरासाठी 10 Mbps Internet Link ची सुविधा उपलब्ध करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१०५१ (०२) अन्वये, M/s. Bharti Airtel Ltd यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/५४६५/ २०१८, दि.१२.०१.२०१८ ने, दोन वर्षे कालावधीकरीता पुढील दराप्रमाणे कार्यादेश देणेत आलेला आहे.

| Installation and configuration for uncompressed premium 10 MBPS Internet Lease Link for 2 years | | |
|---|---|---|
| **Sr. No.** | **Particular** | **Amount (in Rs)** |
| 01 | One Time Installation Charges | 20,000 |
| 02 | First Year Bandwidth Charges | 1,80,000 |
| 02 | Second Year Bandwidth Charge | 1,80,000 |
| | **Total** | **3,80,000** |
| Amt. in words : Rs. Three Lack Eighty Thousands + Taxes | | |

त्यानुसार M/s. Bharti Airtel Ltd यांनी सदरची लिंक दि.१४.०३.२०१८ रोजी कार्यान्वीत केलेली आहे. सबब, कार्यादिशानुसार त्यांचा दोन वर्षाचा कालावधी दि.१३.०३.२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. परंतू त्यांचेमार्फत सदरची लिंक आजपावेतो सुरळीत चालू आहे. सदर लिंक बरोबरच M/s Swiftmail Comm यांचेमार्फत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले 50 Mbps Internet Link चा ही वापर सद्यस्थितीत चालू आहे. सदरच्या दोन्ही लिंक Primary व Secondary Link म्हणून कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. काही तांत्रिक अडचणींमुळे Primary Link बंद पडल्यास साईभक्तांना Internet व्दारे उपलब्ध सुविधेचा लाभ

घेण्यास अडचण निर्माण होऊ नये, तसेच संस्थानचे कार्यालयीन कामकाजात व्यत्यय येऊ नये, याकरीता Secondary Link वरुन सदरच्या सुविधा उपलब्ध होतात.

M/s. Bharti Airtel Ltd यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.१३.०३.२०२० अखेर संपुष्टात येणार असल्याने, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार याकामी नव्याने 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा राबविणेस मान्यता मिळणेकामीच्या सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.२७.०३.२०२० रोजीचे सभेमध्ये सदरचे प्रस्तावावरील चर्चा स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

M/s. Bharti Airtel Ltd यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत संपुष्टात आल्याने सदरची लिंक चालू ठेवण्याच्या आवश्यकतेबाबत मे.टिसीएस यांना दि.०६ एप्रिल, २०२० रोजीचे ई-मेलद्वारे अभिप्राय देणेस कळविणेत आले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांचे ई-मेलमध्ये पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

We recommend to continue both Airtel 10 Mbps and Swiftmail 50 Mbps to ensure the high availability on the connectivity.

Once the new ISP provider establishes the connectivity, we can discontinue Airtel 10 Mbps. Critical connectivity requirements:

- All bookings from NextGen platform are synched with legacy application servers through Internet
- TCS associates connecting from home through internet (VPN).
- Once the temple operations are started, there is a full utilization on both the links by the end users/officers.

मे.टिसीएस यांनी उपरोक्त ई-मेलमध्ये नमुद केलेप्रमाणे Cloud Server चा Data संस्थानचे आयटी विभागातील डेटा सेंटर येथील सर्व्हरवर Save करणेसाठी तसेच, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना अनुषंगिक कार्यवाही करणेसाठी सद्यस्थितीत M/s Bharti Airtel Ltd यांचेमार्फत कार्यान्वीत असलेली लिंक चालू ठेवावी लागणार आहे. सबब, नविन 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकरीता प्रचलित पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून, प्रक्रियेअंतर्गत पात्र पुरवठाधारकाकडून इंटरनेट लिंक उपलब्ध होईपर्यंत, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link चालू ठेवणेकामी M/s Bharti Airtel Ltd यांना कार्यादेशातील आहे त्याच दराने व अटी/शर्तीनुसार मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रिय पद्धतीने सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत इंटरनेट वापरासाठी M/s Bharti Airtel Ltd यांना 10 Mbps Internet Link कार्यान्वीत करणेकरीता देणेत आलेल्या कार्यादेशाचा कालावधी दि.१३.०३.२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. सबब, नविन 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकरीता प्रचलित पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून, प्रक्रियेअंतर्गत पात्र पुरवठाधारकाकडून इंटरनेट लिंक उपलब्ध होईपर्यंत, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link चालू ठेवणेकामी M/s Bharti Airtel Ltd यांना कार्यादेशातील आहे त्याच दराने (Annual Bandwidth Charge Rs. 1,80,000/- + Tax) व अटी/शर्तीनुसार मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- online.sai.org.in हया वेबसाईसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत इंटरनेट वापरासाठी M/s Bharti Airtel Ltd यांना 10 Mbps Internet Link कार्यान्वीत करणेकरीता देणेत आलेल्या कार्यादेशाचा कालावधी दि.१३.०३.२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. सबब, याकामी मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार नव्याने 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला आहे. दि.२७.०३.२०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेमध्ये सदरचा प्रस्तावावरील चर्चा स्थगित ठेवणेत आलेली आहे.

मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार Cloud Server चा Data संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथील सर्व्हरवर Save करणेसाठी तसेच, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना अनुषंगिक कार्यवाही करणेसाठी सद्यस्थितीत M/s Bharti Airtel Ltd यांचेमार्फत कार्यान्वीत असलेली लिंक चालू ठेवणे आवश्यक आहे.

सबब, नविन 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकरीता प्रचलित पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून, प्रक्रियेअंतर्गत पात्र पुरवठाधारकाकडून इंटरनेट लिंक उपलब्ध होईपर्यंत, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link चालू ठेवणेकामी M/s Bharti Airtel Ltd यांना कार्यादेशातील आहे त्याच दराने (Annual Bandwidth Charge Rs. 1,80,000/- + Tax) व अटी/शर्तीनुसार मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या संकेतस्थळासाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन पात्र पुरवठाधारकाकडून इंटरनेट लिंक उपलब्ध होईपर्यंत किंवा आज पासुन दोन महिने यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link चालू ठेवणेकामी M/s Bharti Airtel Ltd यांना कार्यादेशातील आहे त्याच दराने (Annual Bandwidth Charge Rs.1,80,000/-+Tax) व अटी/शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२६** **०३ नग Line printer-LIPI 6815 व प्रिंटर रिबन खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियाअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाकारांबरोबर चर्चा होऊन याकामी त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** कार्यालयीन कामकाजासाठी ०३ नग Line printer-LIPI 6815 व प्रिंटर रिबन खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल. | ०३ नग Line printer-LIPI 6815 व १०० नग रिबन कार्टेज |
| ०२ | मागणी | **Sr.No.** / **Description** / **Qty**<br>01 / Line Printer-LIPI 6815 (With 2 years warranty) / 03<br>02 / Original Lipi Ribbon Cartridges for Printer / 100 |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.०८.०२.२०२० ते दि.२८.०२.२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट (sai.org.in) व ई-मेलद्वारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | ०५ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले. |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.०८.०२.२०२० सकाळी ११:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.०२.०३.२०२०<br>व्यावसायीक निविदा- दि.११.०३.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ? | लागू नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ? | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | लागू नाही. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| अ. नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर (प्रती नग रु.) | स्थिती |
|---|---|---|---|
| **Line Printer-LIPI 6815** (With 2 years warranty) | | **03 Nos Qty** | |
| **01** | **M/s Minitek Systems India Pvt Ltd,** | **4,53,450** | **L1** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **Nashik** | | |
| | 02 | M/s Gray Technologies Pvt Ltd, Mumbai | 4,63,740 | L2 |
| | 03 | M/s Himalaya Exim & Trade, Raigad | 4,76,784.90 | L3 |
| | 04 | M/s Smartnet Software Pvt Ltd., Pune | 5,04,999 | L4 |
| | **Original Lipi Ribbon Cartridges for Printer** | | | **100 Nos Qty** |
| | 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 2,519 | L2 |
| | **02** | **M/s Gray Technologies Pvt Ltd, Mumbai** | **2,419** | **L1** |
| | 03 | M/s Himalaya Exim & Trade, Raigad | 2,646.15 | L4 |
| | 04 | M/s Smartnet Software Pvt Ltd., Pune | 2,620 | L3 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| Sr.No | Year-2018-2019 | UOM | Amount | |
|---|---|---|---|---|
| | | | 2017-2018 | 2018-2019 |
| 01 | Line Printer-LIPI 6815 (With 2 years warranty) | Nos | -- | -- |
| 02 | Original Lipi Ribbon Cartridges for Printer | Nos | -- | -- |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.नं. | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| 01 | Line Printer-LIPI 6815 (With 2 years warranty) | -- | -- |
| 02 | Original Lipi Ribbon Cartridges for Printer | -- | -- |
| एकूण रक्कम | | | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक | निरंक |
| १६ | मागील खरेदी दर | अ.नं. १३ प्रमाणे |

१७ मागील पुरवठादार

| अ.नं. | वस्तूचे वर्णन | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|
| 01 | Line Printer-LIPI 6815 (With 2 years warranty) | निरंक |
| 02 | Original Lipi Ribbon Cartridges for Printer | निरंक |

१८ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराने सादर केलेले दर

| Sr. No. | Specification of Material | Amount |
|---|---|---|
| 01 | Line Printer-LIPI 6815 (With 2 years warranty) | 4,53,450 |
| 02 | Original Lipi Ribbon Cartridges for Printer | 2,419 |

१९ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराचे नाव

| Sr.No. | Name of Bidder | Specification of Material |
|---|---|---|
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | Line Printer-LIPI 6815 (With 2 years warranty) |
| 02 | M/s Gray Technologies Pvt Ltd, Mumbai | Original Lipi Ribbon Cartridges for Printer |

| | | |
|---|---|---|
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रकल्प (प्रस्ताव) खरेदी समितीसमोर सादर | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.वि.प्रमुख,आयटी विभाग |

| | | |
|---|---|---|
| | करणेत आला असल्यास उपस्थितांची नावे | |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कम रुपये ----प्रतिसेट मार्केट रेट रुपये ---- | |
| २३ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त<br>रु.-------------- रु.---------------------- रु.----------- रु.----------------- | |

| अ. नं. | तपशिल | मागील खरेदी दर | सध्याचे दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Line Printer - LIPI 6815 (With 2 years warranty) | -- | 4,53,450 | -- | -- |
| 02 | Original Lipi Ribbon Cartridges for Printer | -- | 2,419 | -- | -- |

२४. संक्षिप्त टिप:- कार्यालयीन कामासाठी ०३ नग Line printer-LIPI 6815 व रिबन कार्टेज खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १५,७८,०००/- मात्रचे खर्चास व फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस दि.१०.१०.२०१९ रोजीचे टिपणीअन्वये मान्यता घेणेत आलेली होती. त्यानुसार राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गंत M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik यांनी Line Printer-LIPI 6815 साठी देऊ केलेले दर रक्कम रुपये ४,५३,४५०/- (०३ नगांसाठी एकूण रक्कम रुपये १३,६०,३६०/-) तसेच M/s Gray Technologies Pvt Ltd, Mumbai यांनी रिबन कार्टेजसाठी देऊ केलेले दर रक्कम रुपये २,४१९/- (१०० नगांसाठी एकूण रक्कम रुपये २,४१,९००/-) मात्र हे निम्नत्तम आहेत. सबब, M/s Minitek Systems, Nashik व M/s Gray Tech, Mumbai यांनी देऊ केलेल्या निम्नत्तम दरांबाबत त्यांचेबरोबर चर्चा होऊन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानचे कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यात येणारे Line printer-LIPI 6815 प्रतिमहा रु.४,०००/- प्रमाणे भाडेदराने वापरण्यात येतात. त्यासाठी येणारा खर्च व नविन Line printer-LIPI 6815 व प्रिंटर रिबन खरेदी करणेकामी येणारा खर्च व नविन प्रिंटरचे कालानुसार होणारे अवमुल्यन या बाबींचा विचार करता सदरचा Line printer-LIPI 6815 व प्रिंटर रिबन खरेदीचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा, असे ठरले. तसेच Line printer-LIPI 6815 पुर्वीप्रमाणे भाडे तत्वावर घेण्यास व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२७** **श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा D2H (डिश टिव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- दि.२८.०४.२०१७ निर्णय क्रं. ३२२ (१३)

प्रास्ताविक:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) D2H (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गंत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१३) अन्वये, M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांनी देऊ केलेले पुढीलप्रमाणे उच्चत्तम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२० या कालावधीकरीता याकामी कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेले होते.

१. DTH (डिश टिव्ही) साठी M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | $1^{st}$ Year | $2^{nd}$ Year | $3^{rd}$ Year | Total |
|---|---|---|---|---|
| DTH | 1,96,00,000 | 1,97,00,000 | 1,98,00,000 | 5,91,00,000 |
| Total- | | | | 5,91,00,000 |

२. इंटरनेट व मोबाईल प्लॅटफॉर्मसाठी M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| Mobile & Internet | 19,00,000 | 21,00,000 | 23,00,000 | 63,00,000 |

१. T.V. चॅनलसाठी M/s Tata व M/s Associated Broadcasting यांनी देऊ केलेले Non Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| M/s Tata Communications Ltd., Mumbai | 3,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 12,00,000 |
| M/s Associated Broadcasting Co Pvt Ltd., | 25,30,000 | 25,30,000 | 25,30,000 | 75,90,000 |
| | | | Total- | 87,00,000 |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे, M/s Tata Comm, Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१०५९ ते १०६१/२०१७ दि.३० मे, २०१७ अन्वये, व जा.नं.एसएसएसटी/आयटी/५६७६/२०१८ दि.२४ जानेवारी, २०१८ अन्वये तीन वर्षांकरीता (दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२०) कार्यादेश देणेत आलेले आहेत.

याकामी यापुर्वी प्रत्येक Platform साठी स्वतंत्रपणे प्रकाशीत करणेत आलेल्या ई-निविदेमध्ये निविदाकारांकडून पुढीलप्रमाणे दर मागविणेत आलेले होते.

01) DTH Platform- a. Exclusive Rate b. Non Exclusive Rate
02) TV Channel- a. Exclusive Rate b. Non Exclusive Rate
03) Mobile & Internet- a. Exclusive Rate b. Non Exclusive Rate

दरम्यानचे कालावधीमध्ये श्रींचे लाईव्ह दर्शन टिव्ही चॅनेलद्वारे प्रक्षेपीत करणेस परवानगी मिळणेबाबत अनेक टिव्ही चॅनेल चालकांनी संस्थानकडे विनंती केलेली आहे. परंतू सदर चॅनेल्सने पुर्ण वेळ लाईव्ह दर्शन ऐवजी ठराविक आरतींचे उदा.काकड आरती इ. चे थेट प्रक्षेपण दाखविणेस परवानगी मागितलेली आहे. परंतू याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत श्रींचे आरतीसाठी दरांची स्वतंत्र मागणी करणेत आलेली नव्हती.

उपरोक्तप्रमाणे याकामी M/s Tata Comm व M/s Associated यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने व सदर सुविधेचा लाभ घेणा-या साईभक्तांच्या संख्येत होणारी लक्षणीय वाढ याचा विचार करता, याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकांची नेमणूक करावी लागणार आहे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उपलब्ध करणेकामी यापुर्वी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्रत्येक Platform साठी संपुर्ण दर्शनासाठीचे दर मागविणेत आलेले होते. सबब, इतर टिव्ही चॅनेल्सने त्यांचे चॅनेलवर ठराविक आरत्यांचे थेट प्रक्षेपण सदरचे दरामध्ये करणेस असमर्थता दर्शविलेली होती. सबब, प्रस्तावित ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्रत्येक Platform साठी ०१) संपुर्ण दर्शन ०२) सर्व आरत्या ०३) काकड आरती ०४) माध्यान्ह आरती ०५) धुपारती ०६) शेजारती इ. करीता स्वतंत्र Exclusive व Non-Exclusive दर मागविल्यास संस्थानचे दृष्टीने हितावह होऊन अधिक चॅनेल्सधारकांना सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल. तसेच त्यानंतरही काही टिव्ही चॅनेल्सने ठराविक आरत्यांचे थेट प्रक्षेपणाची परवानगी मागीतल्यास सदर दराप्रमाणे त्यांना परवानगी देता येईल.

M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना श्रींचे ऑनलाईन (Live Darshan) सुविधा उपलब्ध करणेकामी देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि. ३१ मे, २०२० रोजी संपुष्टात येणार असल्याने याकामी पुढील तीन वर्षांकरीता विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) D2H (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१ मे, २०२० रोजी संपुष्टात येत आहे.

सबब, सदरची सुविधा पुढील तीन वर्षांकरीता D2H (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी स्वतंत्र ई-निविदा प्रकाशित करुन प्रत्येक Platform साठी ०१) संपुर्ण दर्शन ०२) सर्व आरत्या ०३) काकड आरती ०४) माध्यान्ह आरती ०५) धुपारती ०६) शेजारती इ. करीता स्वतंत्र Exclusive व Non-Exclusive दर प्राप्त करणेकरीता विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) D2H (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१ मे, २०२० रोजी संपुष्टात येत आहे.

सबब, सदरची सुविधा पुढील तीन वर्षांकरीता D2H (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी स्वतंत्र ई-निविदा प्रकाशित करुन प्रत्येक Platform साठी ०१) संपुर्ण दर्शन ०२) सर्व आरत्या ०३) काकड आरती ०४) माध्यान्ह आरती ०५) धुपारती ०६) शेजारती इ. करीता स्वतंत्र Exclusive व Non-Exclusive दर प्राप्त करणेकरीता विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा D2H (डिश टिव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी Exclusive rights व Non-Exclusive rights देणेबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२८** **श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिश टिव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी देण्यात आलेल्या कार्यादेशास मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम २१(१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- दि.२८.०४.२०१७ निर्णय क्रं. ३२२ (१३)

प्रास्ताविक:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१३) अन्वये, M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyd यांनी देऊ केलेले पुढीलप्रमाणे उच्चत्तम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२० या कालावधीकरीता याकामी कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली होती.

१. DTH (डिश टिव्ही) साठी M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| DTH | 1,96,00,000 | 1,97,00,000 | 1,98,00,000 | 5,91,00,000 |
| Total- | | | | 5,91,00,000 |

२. इंटरनेट व मोबाईल प्लॅटफॉर्मसाठी M/s Tata Comm यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| Mobile & Internet | 19,00,000 | 21,00,000 | 23,00,000 | 63,00,000 |

३. T.V. चॅनलसाठी M/s Tata व M/s Associated यांनी देऊ केलेले Non Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| M/s Tata Comm., Mumbai | 3,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 12,00,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| M/s Associated Broadcasting., Hyd | 25,30,000 | 25,30,000 | 25,30,000 | 75,90,000 |
| | | | Total- | 87,00,000 |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे, M/s Tata Comm व M/s Associated यांना जा.नं.एसएसएसटी /आयटी/ १०५९ ते १०६१/२०१७ दि.३० मे, २०१७ अन्वये, व जा.नं.एसएसएसटी/आयटी/५६७६/ २०१८ दि.२४ जाने., २०१८ अन्वये तीन वर्षांकरीता (दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२०) कार्यादेश देणेत आलेले आहेत.

M/s Tata Comm व M/s Associated यांना देणेत आलेल्या कार्यादेशाप्रमाणे त्यांचेमार्फत साईभक्तांसाठी लाईव्ह दर्शन सुविधा सुरळीत सुरू आहे. कार्यादेशामध्ये नमुद दराप्रमाणे M/s Tata Comm यांचेमार्फत दि.२९.०२.२०२० अखेरची रक्कम संस्थानखाती जमा करणेत आलेली आहे. तसेच M/s Associated यांचेमार्फत दि.३०.११.२०१९ अखेरची रक्कम संस्थानखाती जमा करणेत आलेली आहे. त्यांचेमार्फत प्रलंबीत असलेली रक्कम प्राप्त होणेकामी त्यांना पत्राद्वारे कळविलेले आहे.

M/s Tata Comm व M/s Associated यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने याकामी नविन पुरवठाधारकांची नेमणूक करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.तदर्थ समितीची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेस इकडील विभागाचे दि.२०.०३.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, मान्यता घेणेत येऊन सभाकामकाज विभागास सादर करणेत आलेला आहे.

सद्यस्थितीत कोरोना विषाणू (Covid-19) प्रादुर्भाव रोखणेकामी उपाय-योजनेअंतर्गत चालू असलेल्या कार्यवाहीचा विचार करता, सदरचे प्रस्तावावर चर्चा होऊन मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकाची नेमणूक वेळेत होणे शक्य वाटत नाही. लाईव्ह दर्शन सुविधेचा लाभ घेणा-या साईभक्तांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत आहे. तसेच कोरोना विषाणू (Covid-19) प्रादुर्भाव रोखणे संदर्भातील उपाय योजनेअंतर्गत लॉकडाऊनचे काळात देश-विदेशातील फार मोठ्या प्रमाणात साईभक्त सदर सुविधेद्वारे साईबाबांचे दर्शन घेत असल्याचे निदर्शनास येत आहे.

नमुद केलेप्रमाणे M/s Tata Comm व M/s Associated Broadcasting यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० रोजी संपुष्टात येत आहे. याकामी मा.तदर्थ समितीचे मान्यतेने ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकाची नेमणूक होणेस विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, सदर सुविधेस साईभक्तांचा मिळणारा प्रतिसाद पाहता साईभक्तांसाठी लाईव्ह दर्शन सुविधा सुरळीत सुरू राहणेकामी M/s Tata Comm यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामधील दरामध्ये नमुद वार्षिक वाढीप्रमाणे तसेच M/s Associated Broadcasting यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये नमुद वार्षिक दर व अटी/ शर्तीप्रमाणे त्यांना ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देता येईल.

याकामी देणेत आलेल्या कार्यादेशातील दर व प्रस्तावीत मुदतवाढ (चतुर्थ वर्ष) करीताचे दर पुढीलप्रमाणे.

01. Tata Communication Ltd, Mumbai (Tata Sky)

| Platform | 1st year | 2nd year | 3rd year | 4th year (Extension) |
|---|---|---|---|---|
| DTH (Exclusive) | 1,96,00,000/- | 1,97,00,000/- | 1,98,00,000/- | 1,99,00,000/- |
| Mobile & Internet (Exclusive) | 19,00,000/- | 21,00,000/- | 23,00,000/- | 25,00,000/- |
| TV Channel (Non-Exclusive) | 3,00,000/- | 4,00,000/- | 5,00,000/- | 6,00,000/- |

**02** M/s Associated Broad casting co. pvt Ltd, Hyderabad (TV9)

| Platform | 1st year | 2nd year | 3rd year | 4th year (Extension) |
|---|---|---|---|---|
| TV Channel (Non-Exclusive) | 25,30,000/- | 25,30,000/- | 25,30,000/- | 25,30,000/- |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे M/s Tata Comm व M/s Associated Broadcasting यांना उपरोक्त तक्त्यातील वार्षिक दराप्रमाणे याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm व M/s Associated यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१ मे, २०२० रोजी संपुष्टात येत आहे. याकामी नविन पुरवठाधारकांची नेमणूक होणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.तदर्थ समितीची मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.२० मार्च, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये सभाकामकाज विभागास सादर करणेत आलेला आहे. सदर मान्यतेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकाची नेमणूक वेळेत होणे शक्य नाही. सबब, सदर सुविधेस जगभरातील साईभक्तांचा प्रतिसाद पाहता, याकामी M/s Tata Comm व M/s Associated Broadcasting यांना पुढील दरानुसार यापुर्वी देणेत आलेल्या कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**01. Tata Communication Ltd, Mumbai (Tata Sky)**

| **Platform** | **1st year** | **2nd year** | **3rd year** | **4thyear (Extension)** |
|---|---|---|---|---|
| DTH (Exclusive) | 1,96,00,000/- | 1,97,00,000/- | 1,98,00,000/- | **1,99,00,000/-** |
| Mobile & Internet (Exclusive) | 19,00,000/- | 21,00,000/- | 23,00,000/- | **25,00,000/-** |
| TV Channel (Non-Exclusive) | 3,00,000/- | 4,00,000/- | 5,00,000/- | **6,00,000/-** |

02. **M/s Associated Broad casting co. pvt Ltd, Hyderabad (TV9)**

| **Platform** | **1st year** | **2nd year** | **3rd year** | **4th year (Extension)** |
|---|---|---|---|---|
| TV Channel (Non-Exclusive) | 25,30,000/- | 25,30,000/- | 25,30,000/- | **25,30,000/-** |

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm व M/s Associated Broadcasting यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१ मे, २०२० रोजी संपुष्टात येत आहे. याकामी नविन पुरवठाधारकांची नेमणूक होणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.तदर्थ समितीची मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.२० मार्च, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये सभाकामकाज विभागास सादर करणेत आलेला आहे. सदर मान्यतेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकाची नेमणूक वेळेत होणे शक्य नाही. सबब, सदर सुविधेस जगभरातील साईभक्तांचा प्रतिसाद पाहता, याकामी M/s Tata Comm व M/s Associated यांना पुढील दरानुसार यापुर्वी देणेत आलेल्या कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**01. Tata Communication Ltd, Mumbai (Tata Sky)**

| **Platform** | **1st year** | **2nd year** | **3rd year** | **4th year (Extension)** |
|---|---|---|---|---|
| DTH (Exclusive) | 1,96,00,000/- | 1,97,00,000/- | 1,98,00,000/- | **1,99,00,000/-** |
| Mobile & Internet (Exclusive) | 19,00,000/- | 21,00,000/- | 23,00,000/- | **25,00,000/-** |
| TV Channel (Non-Exclusive) | 3,00,000/- | 4,00,000/- | 5,00,000/- | **6,00,000/-** |

**02. M/s Associated Broad casting co. pvt Ltd, Hyderabad (TV9)**

| **Platform** | $1^{st}$ **year** | $2^{nd}$ **year** | $3^{rd}$ **year** | $4^{th}$ **year (Extension)** |
|---|---|---|---|---|
| TV Channel (Non-Exclusive) | 25,30,000/- | 25,30,000/- | 25,30,000/- | **25,30,000/-** |

**निर्णय क्र.२६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिश टिव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm व M/s Associated यांना पुर्वीचेच दरानुसार मागील कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे त्यांच्या पुर्वीच्या कार्यादेशाची मुदत संपल्यानंतर एक महिना कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२९** **Tread Mark व Copy Right नोंदणी संदर्भात ॲड श्री.प्रशांत माळी यांनी Copy Right Office, Delhi येथे सुनावणीकामी उपस्थित राहणेकरीता मागणी केलेल्या खर्चाचे रकमेवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम २१(१)ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य, समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- ०१. दि.१२.०३.२०१५ निर्णय क्र.७४ (२०)
०२. दि.०६.०९.२०१८ निर्णय क्र.५५०

प्रास्ताविक:- श्री साईबाबा संस्थानचे नावाशी साधर्म्य असलेल्या खाजगी विश्वस्त संस्था, वेबसाईट इ. द्वारे साईभक्तांची दिशाभूल होत असल्याने ॲड.प्रशांत माळी, Cyber Expert/Consultant, मुंबई हायकोर्ट यांचे सल्ल्यानुसार संस्थानचे नाव, वेबसाईट, बोधचिन्हे व प्रकाशने इ. चे Trademark व Copy Right रजिस्ट्रेशन संबंधीची कार्यवाही हाती घेणेत आलेली आहे. त्यानुसार इकडील विभागाचे दि.२२.११.२०१४ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये, जा.नं.एसएसएसटी/आयटी/३९३८/२०१४, दि.२८.११.२०१४ रोजीचे परिपत्रकाद्वारे सर्व विभागांना Trademark व Copy Right रजिस्ट्रेशन करुन घेणेकामी माहिती मागविणेत आलेली होती. सदर माहितीचे अनुषंगाने Trademark व Copy Right संबंधी रजिस्ट्रेशनकरीता येणा-या अंदाजे खर्चाबाबत ॲड.प्रशांत माळी यांचेकडे ई-मेलद्वारे चौकशी करणेत आलेली होती. ॲड.प्रशांत माळी यांचेकडे ई-मेलद्वारे चौकशी केली असता, त्यांनी दि.०४.०२.२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे यास एकूण १,७१,७००/- मात्रचा खर्च अपेक्षीत असल्याचे कळविले आहे. सदरची रक्कम हि फक्त नोंदणीसाठी आवश्यक असलेली रक्कम असल्याचे त्यांनी ई-मेलमध्ये नमुद केलेले होते.

उपरोक्तप्रमाणे संकलीत करणेत आलेली माहिती व ॲड.प्रशांत माळी यांनी कळविलेला अंदाजे खर्च यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०३.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४ (२०) अन्वये, संस्थानचे अधिकृत वेबसाईट संदर्भात सर्व Trademark व Copy Right रजिस्ट्रेशन ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांचेकडून विनामोबदला करुन घेणेस व त्याकामी येणारे रक्कम रुपये १,७१,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेत आलेली होती. सदर निर्णयान्वये, संस्थानचे वेबसाईट, प्रकाशने, बोधचिन्हे, नावे यांचे Trademark व Copy Right रजिस्ट्रेशनची कार्यवाही करणेकामी ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१६०२/२०१६, दि.०५.०७.२०१६ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. ॲड.प्रशांत माळी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये नमुद रक्कम रुपये १,७१,७००/- मात्र त्यांना इकडील विभागाचे दि.१९.०८.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये अग्रीम स्वरुपात अदा करणेत आलेली आहे.

ॲड.प्रशांत माळी यांचेमार्फत Copy Right, Trademark व Word Mark याबाबत चालू असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे.

Copy Right साठी नोंदणी करणेत आलेल्या पुस्तकांबाबत (एकूण - ४४ पुस्तके)

| अ.नं. | तपशिल | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | Copy Right Certificate प्राप्त झालेली पुस्तके | १३ | कॉपीराईट सर्टिफिकेटची स्कॅन कॉपी संस्थानला ई-मेलद्वारे प्राप्त झालेली आहे. |
| ०२ | नोंदणी झालेले परंतू Certificate प्राप्त होणे प्रलंबीत असलेली पुस्तके | ०३ | सदर पुस्तकांच्या कॉपीराईटबाबतची सर्व पुर्तता ॲड. प्रशांत माळी यांचेमार्फत करणेत आलेली |

| अ.नं. | तपशिल | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| | | | असून सर्टिफिकेट प्राप्त होणे प्रलंबीत आहे. |
| ०३ | नोंदणी केलेले परंतू पुस्तक प्रकाशीत होऊन ६० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने Certificate प्राप्त होऊ शकत नसलेले पुस्तके | ०४ | सदरचे पुस्तके प्रकाशित होऊन ६० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने त्यांचे करीता कॉपीराईट नोंदणी करता येणार नाही, असे ॲड. प्रशांत माळी यांनी कळविलेले आहे. |
| ०४ | नोंदणी केलेले परंतू फेटळणेत आलेले पुस्तके | ०३ | सदर पुस्तकांचे नोंदणी करणेत आलेली होती परंतू कॉपीराईट कार्यालयाकडून सदरची नोंदणी नाकारण्यात आलेली असून याबाबत कोणताही त्रुटी अहवाल प्राप्त झालेला नाही. |
| ०५ | त्रुटी अहवालानंतर नोंदणी रद्द करणेत आलेले पुस्तके | ०१ | पुस्तकांचे कॉपीराईटबाबत काही त्रुटी प्राप्त झाल्याने सदर पुस्तकांचे कॉपीराईटसाठी नव्याने नोंदणी करणेत येणार असल्याचे कळविले आहे. |
| ०६ | नोंदणी केलेले व त्रुटी अहवालानंतर लेखकाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर केलेले व Certificate प्राप्त होणे प्रलंबीत असलेली पुस्तके | ०४ | त्रुटी अहवालानुसार सदर पुस्तकांचे लेखक/ लेखकांचे वारसदारांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणेत आले आहे. परंतू सर्टिफिकेट प्राप्त होणे प्रलंबीत आहे. |
| ०७ | नोंदणी केलेले परंतू नंतर माघारी घेतलेले पुस्तके | ०१ | |
| ०८ | नोंदणी झालेले परंतू लेखकांचे ना-हरकत प्रमाणपत्र अभावी प्रलंबीत असलेले पुस्तके | १५ | सदर लेखक/वारसदारांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त होऊ शकत नाहीत. |
| | एकूण- | ४४ | |

नोंदणी करणे प्रलंबीत असलेले पुस्तके (एकूण – १४ पुस्तके)

| अ.नं. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| ०१ | लेखक/वारसदाराचे ना - हरकत प्रमाणपत्र सादर केलेले परंतू नोंदणी प्रलंबीत | ०४ |
| ०२ | लेखक/वारसदाराचे ना - हरकत प्रमाणपत्र उपलब्ध नसलेने नोंदणी प्रलंबीत | १० |
| | एकूण- | १४ |

Word Mark

| अ.नं. | तपशिल | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साईनाथ रक्तपेढी, शिर्डी | ०१ | Word Mark Certificate ची स्कॅन कॉपी ई-मेलद्वारे प्राप्त झालेली आहे. |
| ०२ | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | ०१ | Word Mark Certificate प्राप्त होणे प्रलंबीत आहे. |
| | एकूण- | ०२ | |

"श्री साईबाबा" किंवा "साईबाबा" ह्या शब्दांचा प्रतिबंधीत यादीमध्ये समावेश असल्याने, संस्थानचे ज्या नावांमध्ये अथवा बोधचिन्हांमध्ये "श्री साईबाबा" किंवा "साईबाबा" हे शब्द आलेले आहेत, अशा नावांचे Word Mark व बोधचिन्हांचे Trade Mark संस्थानला प्राप्त होणे शक्य नाही, असे ॲड.प्रशांत माळी यांनी याअगोदरच कळविलेले आहे.

अद्यापपावेतो ॲड.प्रशांत माळी यांचेमार्फत संस्थान प्रकाशित १३ पुस्तकांचे Copy Right Certificate ची स्कॅन कॉपी व श्री साईनाथ रक्तपेढी, शिर्डी या नावाचे Word Mark Certificate ची स्कॅन कॉपी ई-मेलद्वारे प्राप्त झालेली आहे.

कॉपीराईट कार्यालय, दिल्ली यांचेकडून पुढील पुस्तकांचे कॉपीराईट बाबतचे हरकतींवरील सुनावणीसाठी दि.३०.०८.२०१८ रोजी उपस्थित राहणेकामी ॲड.प्रशांत माळी यांना नोटीस प्राप्त झालेल्या असून सदर नोटीसीची एक प्रत संस्थानलाही प्राप्त झालेली आहे.

| अ.नं. | पुस्तकांचे नाव | अ.नं. | पुस्तकांचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी (कन्नड) | १२ | चिल्ड्रन साईबाबा (तेलगू) |
| ०२ | श्री साई सच्चरित (सिंधी अरबी) | १३ | श्री साई सच्चरित (मराठी) |
| ०३ | श्री साईलिला अमृत (मराठी ) | १४ | चिल्ड्रन साईबाबा (हिंदी) |
| ०४ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी (गुजराथी) | १५ | श्री साईनू सच्चरित (गुजराथी) |
| ०५ | श्री साई सच्चरित (इंग्रजी) | १६ | दैनंदिन साईबोध (गुजराथी) |
| ०६ | श्री साई चरित्र (उर्दु) | १७ | श्री साईबाबा ऑफ शिर्डी |
| ०७ | श्री साई रुद्रध्याय (अध्याय-११) | १८ | दादासाहेब खापर्डे यांची रोजनिशी (मराठी) |
| ०८ | शिर्डी डायरी | १९ | श्री साईनाथ स्थवनमंजिरी व श्री साई सुमनांजली (मराठी) |
| ०९ | श्री साई सच्चरित (तेलगू) | २० | दैनंदिन साईबोध |
| १० | श्री साईनाथ सगुणोपासना (जर्मन) | २१ | गुरूपाठाचे अभंग (मराठी) |
| ११ | श्री साई समर्थ सत्चरित्र | | |

ॲड. प्रशांत माळी यांनी दि.१४.०८.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे संस्थानने कॉपीराईटसाठी केलेल्या नोंदणी संदर्भात त्यांना कॉपीराईट कार्यालय, दिल्ली येथे सुनावणीसाठी दि.३०.०८.२०१८ रोजी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले असल्याचे संस्थानला कळविलेले होते. सदरचे ई-मेलमध्ये त्यांनी संस्थानला जर त्यांचेमार्फत सदरची कार्यवाही चालू ठेवायची असेल तर सुनावणीसाठी हजर राहणेकामी रक्कम रुपये ८०,०००/- +प्रवास खर्चासाठी रक्कम रुपये २०,०००/- अशी एकूण १,००,०००/- मात्र प्रति सुनावणी इतकी रक्कम त्यांना देण्यात यावी, असे नमुद केलेले आहे. तसेच संस्थानने यापुर्वी अदा केलेल्या रकमेमध्ये सुनावणीसाठी अथवा युक्तीवादाकरीता कोणतीही रक्कम त्यांना अदा केलेली नाही, असे नमुद केलेले आहे. तसेच दि.२९.०८.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे ॲड.प्रशांत माळी यांनी आज दुपारी ०४:०० वाजेपर्यंत त्यांनी कळविलेल्या खर्चास संस्थानने मान्यता न दिल्यास उद्या होणा-या सुनावणीला ते उपस्थित राहणार नाहीत, सबब संस्थानचे कॉपीराईटबाबतची विनंती अमान्य करणेत येईल, असे कळविलेले होते.

संस्थानचे वेबसाईट, प्रकाशने, बोधचिन्हे, नावे यांचे Trademark व Copy Right बाबत ॲड. प्रशांत माळी, यांनी सुनावणीसाठी हजर राहणेकामी मागणी केलेल्या प्रतिसुनावणी रक्कम रुपये १,००,०००/- मात्र बाबत निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२०१८ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन नि.क्र.५५० अन्वये, "याबाबत समिती सदस्य मा.ॲड.श्री मोहन जयकर सो. यांनी ॲड.प्रशांत माळी यांचेबरोबर चर्चा करावी, त्यानंतर प्रस्तुत विषयाबाबत निर्णय घ्यावा" असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५० अन्वये, देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे समिती सदस्य मा.ॲड.श्री मोहन जयकर सो. यांचेबरोबर इकडील विभागामार्फत प्रत्यक्ष भेटून याबाबत चर्चा करणेत आलेली आहे. तसेच त्यांना सदर विषयी हवी असलेली माहिती दि.०८.०९.२०१८ व दि.२७.०२.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे सादर करणेत आलेली आहे. मा.ॲड.श्री मोहन जयकर सो. हे वेळोवेळी शिर्डी येथे आले असता, त्यांचेकडे इकडील विभागामार्फत सदर विषयी पाठपुरवा करणेत आलेला आहे. परंतू याबाबत इकडील विभागास आजपावेतो कोणताही अभिप्राय त्यांचेमार्फत प्राप्त झालेला नाही.

उपरोक्तप्रमाणे Copy Right, Trade Mark व Word Mark याबाबत ॲड.प्रशांत माळी यांचेमार्फत चालू असलेल्या कार्यवाहीची वस्तूनिष्ठ माहिती व याकामी कॉपीराईट कार्यालय, दिल्ली येथे हरकतींवरील सुनावणीकामी उपस्थित राहणेकरीता त्यांनी मागणी केलेल्या रक्कम रुपये १,००,०००/- मात्रचे रकमेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे संस्थानचे वेबसाईट, प्रकाशने, बोधचिन्हे, नावे यांचे Trademark व Copy Right तसेच Word Mark बाबतची कार्यवाही ॲड. प्रशांत माळी, Cyber Expert/Consultant, मुंबई हायकोर्ट यांचेमार्फत चालू आहे. याकामी त्यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/३९३८/२०१४, दि.२८.११.२०१४ रोजीचे परिपत्रकाअन्वये, संकलीत करणेत आलेली माहिती पुढील कार्यवाहीकरीता देणेत आलेली होती. त्यानुसार त्यांनी एकूण ४४ पुस्तकांची कॉपीराईटसाठी व ०२ नावांचे Word Mark साठी नोंद केलेली आहे. त्यापैकी आजपावेतो १३ पुस्तकांचे Copyright certificate ची स्कॅनकॉपी व श्री साईनाथ रक्तपेढी, शिर्डी या नावाचे Word Mark certificate ची स्कॅनकॉपी ई-मेलद्वारे

इकडील विभागास प्राप्त झालेली आहे. ॲड. प्रशांत माळी यांना कॉपीराईट ऑफिस, दिल्ली यांचेकडून २१ पुस्तकांचे कॉपीराईट बाबतचे हरकतींवरील सुनावणींसाठी उपस्थित राहणेकामी नोटीस प्राप्त झालेली आहे. त्यानुसार ॲड. प्रशांत माळी यांनी कॉपीराईट ऑफिस, दिल्ली येथे सुनावणीसाठी उपस्थित राहणेकामी प्रतिसुनावणी रक्कम रुपये १,००,०००/- मात्रची मागणी केलेली आहे.

नमुद केलेप्रमाणे संस्थानचे वेबसाईट, प्रकाशने, बोधचिन्हे, नावे यांचे Trademark व Copy Right बाबत ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांचेमार्फत चालू असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती व त्यांनी सुनावणी साठी कॉपीराईट ऑफिस,दिल्ली येथे हजर राहणेकामी प्रतिसुनावणी रक्कम रु.१,००,०००/- मात्र बाबत निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- संस्थानचे वेबसाईट, प्रकाशने, बोधचिन्हे, नावे यांचे Trademark व Copy Right तसेच Word Mark बाबतची कार्यवाही ॲड. प्रशांत माळी, Cyber Expert/Consultant, मुंबई हायकोर्ट यांचेमार्फत चालू आहे. याकामी त्यांना जा.नं.एसएसएसटी/ आयटी/३९३८/२०१४, दि.२८.११.२०१४ रोजीचे परिपत्रकाअन्वये, संकलीत करणेत आलेली माहिती पुढील कार्यवाहीकरीता देणेत आलेली होती. त्यानुसार त्यांनी एकूण ४४ पुस्तकांची कॉपीराईट साठी व ०२ नावांचे Word Mark साठी नोंद केलेली आहे. त्यापैकी आजपावेतो १३ पुस्तकांचे Copyright certificate ची स्कॅनकॉपी व श्री साईनाथ रक्तपेढी, शिर्डी या नावाचे Word Mark certificate ची स्कॅनकॉपी ई-मेलद्वारे इकडील विभागास प्राप्त झालेली आहे. ॲड. प्रशांत माळी यांना कॉपीराईट ऑफिस, दिल्ली यांचेकडून २१ पुस्तकांचे कॉपीराईट बाबतचे हरकतींवरील सुनावणींसाठी उपस्थित राहणेकामी नोटीस प्राप्त झालेली आहे. त्यानुसार ॲड. प्रशांत माळी यांनी कॉपीराईट ऑफिस, दिल्ली येथे सुनावणीसाठी उपस्थित राहणेकामी प्रति सुनावणी रक्कम रुपये १,००,०००/- मात्रची मागणी केलेली आहे.

नमुद केलेप्रमाणे संस्थानचे वेबसाईट, प्रकाशने, बोधचिन्हे, नावे यांचे Trademark व Copy Right बाबत ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांचेमार्फत चालू असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती व त्यांनी सुनावणीसाठी कॉपीराईट ऑफिस,दिल्ली येथे हजर राहणेकामी प्रतिसुनावणी रक्कम रु.१,००,०००/- मात्र बाबत निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Tread Mark व Copy Right नोंदणी संदर्भात सद्यस्थिती बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ समितीपुढे ठेवण्यात यावा, तसेच सदरचे काम दिल्ली येथील साईभक्त वकीलांकडून मोफत करुन घेता येईल का? हे पडताळूण पाहवे, असे ठरले.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३०** **माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewell कालबाहय झाल्याने नविन दोन नग Firewell प्रचलित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खचा्रस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- ०१. दि.०७.११.२००९ निर्णय क्र. ७९९
०२. दि.२३.०५.२०१७, निर्णय क्र.४३२
०३. दि.०४.०४.२०१८, निर्णय क्र.२७५

प्रास्ताविक:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९ अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली होती. याकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून प्रकल्प उभारणीसाठी मे.कॉग्नीझंट टेक्नोलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानुसार प्रकल्पाअंतर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत संस्थानचे विविध विभागांचे मागणीनुसार त्यांचे विभागाकरीता एकुण ३८ संगणकीय प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. तसेच, मे.कॉग्नीझंट यांचेमार्फत सदरच्या प्रणाली कार्यान्वीत करणेकरीता आवश्यक असलेले डेटा सेंटर, नेटवर्क, हार्डवेअर, युपीएस व इतर अनुषंगिक सुविधा कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. साईटेक प्रकल्पासाठी

करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार प्रकल्प देखभालीचा मे.कॉग्नीझंट टेक्नोलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे-एप्रिल-२०१७ अखेर संपुष्टात आलेला आहे.

मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा प्रकल्प देखभालीचा कालावधी संपुष्टात आल्याने, "साईटेक प्रकल्प-०१" चे पुढील काळासाठी दुरुस्ती/देखभाल व आवश्यकतेनुसार अदयावतीकरण ("साईटेक प्रकल्प-०२") साठी नविन कंपनीची नेमणुक करणेकामी इकडील विभागामार्फत प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. त्यानुसार "साईटेक प्रकल्प-२" साठी ई-निविदा मुतदवाढीसह दि. २०.०३.२०१७ ते दि. २४.०७.२०१७ या कालावधीत प्रसिद्ध करणेत आलेली होती. सदरचे कालावधीमध्ये ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत आवश्यक निविदा प्राप्त झालेल्या नव्हत्या. सबब, याकामी नविन कंपीनीची नेमणुक होईपर्यंत मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सदरची कार्यवाही सुरु ठेवणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३२ अन्वये त्यांना दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०१८ या कालावधी करीता कार्यादेश देण्यात आलेला होता.

दरम्यानचे कालावधीमध्ये "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत संगणक प्रणालीबाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Network बाबत सल्ला व व्यवस्थापनबाबतची कार्यवाही मोफत स्वरुपात करुन देण्याचे मे.टाटा सन्स यांचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२७५ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. सदर निर्णयान्वये मे.टाटा सन्स यांनी मागणी केलेप्रमाणे प्रकल्प हस्तांतरीत करणेकामी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुढील तीन महिन्याकरिता (मे-२०१८ ते जुलै-२०१८) मुदतवाढ देणेत आली होती. त्याचप्रमाणे Hardware करीता मे.टाटा सन्स यांचे सल्ल्यानुसार संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी, असे निर्देशही सदर निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये मे.टाटा सन्स यांचेमार्फत मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (मे.टिसीएस) यांनी प्रकल्प हस्तांतरीत करणेची कार्यवाही दि.१५.०४.२०१८ पासून सुरु करुन प्रकल्पाअंतर्गतचे प्रत्यक्ष कार्यवाहीस दि.०१.०९.२०१८ पासून सुरुवात केलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेले हार्डवेअर (सर्व्हर, संगणके, युपीएस व संगणकीय साहित्य) नेटवर्क साहित्य (फायरवाल, स्विचेस, राऊटर्स, नेटवर्क रॅक, लॅन केबल, ऑप्टीक फायबर केबल) इ. सन-२०१०-११ मध्ये मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत खरेदी करुन कार्यान्वीत केलेले आहेत. प्रकल्प कालावधीकरीता या सर्व प्रणाली व साहित्यांचे व्यवस्थापन, दुरुस्ती/देखभाल याची कार्यवाही करारनाम्याप्रमाणे मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी केलेली आहे. सद्यस्थितीत सदरचे सर्व साहित्य कालबाह्य झालेले असून उत्पादक कंपनीमार्फत सदर साहित्यांचे दुरुस्ती/देखभालीचा कालावधीही संपुष्टात आलेला आहे.

सबब, सदरचे साहित्य खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.२७५ अन्वये दिलेल्या निर्देशनुसार मे.टिसीएस यांचे अभिप्रायाप्रमाणे संस्थानचे प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविणे प्रस्तावीत आहे. त्यानुसार प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत प्रणालींना वारंवार येणा-या अडचणींचे निरसण होणेकामी डेटा सेंटर येथे कार्यान्वीत असलेले सर्व्हर बदलणेकामी नविन सर्व्हर खरेदी व online.sai.org.in हि वेबसाईट Cloud Server वर स्थलांतरीत करणेची कार्यवाही, मे.टिसीएस यांचे मार्गदर्शन व अभिप्रायाप्रमाणे संस्थानचे प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून पुर्ण करणेत आलेली आहे. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत साहित्य तसेच नविन आवश्यक असलेल्या साहित्याबाबत मे.टिसीएस यांना प्रत्यक्ष पहाणी/पडताळणी करुन अभिप्राय देणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार त्यांचेमार्फत खरेदी करावयाचे आवश्यक साहित्याचा तपशील इकडील विभागास प्राप्त झालेला असून, त्यानुसार सदरचे साहित्य खरेदी करणेकामी संस्थानचे प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे प्रस्तावीत आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे १६ सर्व्हर व नव्याने खरेदी केलेले ११ ब्लेड सर्व्हर कार्यान्वीत आहेत. सदरचे सर्व्हर हे प्रकल्पाअंतर्गतच्या सर्व प्रणाली कार्यान्वीत करणे, संस्थानचे विविध सुविधांचा प्रणालीमार्फत लाभ घेण्या-या साईभक्तांची महत्वाची माहिती (Data) संकलीत करणे, संस्थानअंतर्गत व बाहेरील इंटरनेट व ई-मेल देवाण-घेवाण व्यवस्थापन इ., User व्यवस्थापन इ. करीता कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. सर्व्हरवरील माहितीचे सुरक्षिततेच्या दृष्टीने Firewall कार्यान्वीत करणेत आलेला आहे. Firewall चा मुख्य उद्देश सर्व्हरवरील माहिती सुरक्षीत रहावी, सर्व्हरला व्हायरसचा प्रादुर्भाव होऊ नये तसेच माहिती इंटरनेटचे माध्यमातून कोणी चोरु (Hack) करु नये हा आहे. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Online.sai.org.in हया वेबसाईटद्वारे जगभरातील साईभक्तांनी विविध सुविधांचे केलेल्या बुकींगचा डेटा

Cloud Server वरुन पुढील प्रक्रियेकरीता इंटरनेटद्वारे डेटा सेंटर येथील सर्व्हरवर वेळोवेळी स्टोअर केला जातो. तसेच मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञ प्रकल्पाअंतर्गत प्रणालीबाबतचे कार्यवाहीकरीता इंटरनेटद्वारे सदरचे सर्व्हरला संलग्न होतात. संस्थानअतंर्गत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजाकरीता सदरचे सर्व्हरमार्फतच इंटरनेट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

नमुद केलेप्रमाणे डेटा सेंटर येथे कार्यान्वीत असलेला Firewall हा कालबाहय झालेला असुन उत्पादक कंपनीकडून त्याचे देखभालीचा कालावधीही संपुष्टात आलेला आहे, सबब सदरचे Firewall बाबत वारंवार तांत्रिक अडचणी येत आहेत. दि.०७.०४.२०२० रोजी रात्री ८.०० वा. Firewall काही तांत्रिक अडचणीमुळे बंद पडला होता. Firewall हा restart केलेनंतर पुर्ववत चालू झालेला आहे. याबाबत मे.टिसीएस यांनी दि.०८.०४.२०२० रोजीचे ई-मेलदवारे सदरचा Firewall तातडीने बदलणेबाबत कळविलेले आहे. ई-मेलमध्ये त्यांनी Firewall बाबत वारंवार अडचणी येत आहेत.सबब, प्रणालींबाबतची कार्यवाही करणेस अडचणी येऊ नये तसेच साईभक्तांची महत्वाची माहिती सुरक्षीत राहणेचे दृष्टीने सदरचा Firewall बदलणे अत्यावश्यक असल्याचे कळविलेले आहे. प्रकल्पाअंतर्गत त्यांचेमार्फत सद्यस्थितीत एकुण ४५ तंत्रज्ञ काम करत असून त्यांना अनुषंगिक कार्यवाहीकरीता सर्व्हरला सलंग्न व्हावे लागते. यापुर्वीही सदरचा Firewall बाबत जुन-२०१९, ऑगष्ट-२०१९, ऑक्टोबर-२०१९, फेब्रुवारी-२०२०, व एप्रिल-२०२० मध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊन Firewall बंद पडला होता. सबब, Firewall पुन्हा बंद पडल्यास त्यांचे तंत्रज्ञांना अनुषंगिक कार्यवाही करणे शक्य होणार नाही. Firewall बंद पडल्यास सर्व्हरला व्हायरसचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच साईभक्तांचे महत्वाची माहितीचे सुरक्षीततेबाबतही अडचण येऊ शकते, असे ही ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे.

संदर्भीय ई-मेलमध्ये नमुद Firewall बदलणेकामी नविन Firewall चे तांत्रिक तपशील, संख्या व अंदाजे खर्च कळविणेबाबत मे.टिसीएस यांना सुचित करणेत आले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.१०.०४.२०२० चे ई-मेलदवारे Palo Alto, Check Point अथवा Fortinet यापैकी कोणत्याही उत्पादक कंपनीचे ०२ नग Firewall खरेदी करणेबाबत अभिप्राय दिलेला आहे. सदरचे Firewall ची अंदाजे किंमत प्रती नग Palo Alto रक्कम रु.२५,००,०००/- व Fortinet रक्कम रु.४५,००,०००/- सरासरी रक्कम रु.३५,००,०००/- + कर, ०२ नगाकरीता एकुण रक्कम रु. ७०,००,०००/- + कर इतका खर्च अपेक्षीत असल्याचे ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे.

मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना प्रणालीविषयक कार्यवाही करणेस अडचण येऊ नये तसेच संस्थानअंतर्गत व बाहेर ई-मेल देवाण-घेवाण करणेकामी इंटरनेट सुरक्षीतरित्या सुरळीत सुरु राहणे आवश्यक आहे. सबब, याककरीता मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे माहिती तंत्राज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने जोडणेत आलेला Firewall कालबाहय झालेला असल्याने याबाबत वारंवार अडचणी निर्माण होत आहेत. मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना प्रकल्पाअंतर्गत प्रणालीविषयक कार्यवाही करणेस अडचण येऊ नये तसेच संस्थानअंतर्गत व बाहेर ई-मेल देवाण-घेवाण करणेकामी इंटरनेट सुरक्षीतरित्या सुरळीत सुरु राहणे आवश्यक आहे. सबब, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीसमोर सादर करणेस मान्यता असावी,हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- माहिती तंत्राज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने जोडणेत आलेला Firewall कालबाहय झालेला असल्याने याबाबत वारंवार अडचणी निर्माण होत आहेत. मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना प्रकल्पाअंतर्गत प्रणालीविषयक कार्यवाही करणेस अडचण येऊ नये तसेच संस्थानअंतर्गत व बाहेर ई-मेल देवाण-घेवाण करणेकामी इंटरनेट सुरक्षीतरित्या सुरळीत सुरु राहणे आवश्यक आहे. सबब, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने

ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/-+कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीसमोर मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewell कालबाहय झाल्याचे संबधीत विभागाने नमुद केले आहे. तथापी सदरचा Firewell Virtual आहे की software based की Hardware based आहे, याबाबत खात्री करावी. आणि जर Firewell software based असेल तर अनज्ञप्ती (Licences) नुतनीकरण करता येईल काय? याबाबतचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३१** **साईभक्तांना संस्थानचे विविध उपक्रम, भक्तनिवासचे खोल्यांचे उपलब्धतेबाबतची तसेच श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजनाकरीता देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे प्रसारीत करणेकामी Outdoor LED Display खरेदी करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील पुष्ठ क्र.३५५ वरील १४-२(घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–निरंक

प्रस्तावना– श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजनाकरीता देणगी देणा-या देणगीदारांची नांवे द्वारावती भक्तनिवास, श्री साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, व मंदिर परिसर येथे Display बोर्डवर दाखविणे कामी Display बोर्ड खरेदी करणेबाबत श्री साई प्रसादालय विभागामार्फत दि.१२/०३/२०२० चे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय, द्वारावती भक्तनिवास, श्री साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, श्री साईधर्मशाळा येथे साईभक्तांना भक्तनिवासमधील खोल्यांचे उपलब्धतेबाबत सद्यस्थिती, संस्थानचे विविध उपक्रमाची माहितीदेखील सदर Outdoor LED Display वर प्रकाशित करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी निर्देश दिलेले आहे.

त्यास अनुसरुन, संबंधीत पुरवठाधारक Videowall India, Alpha Digital, Balu Vahadne, IntelliSystems यांना सदरकामी दरपत्रक सादर करणेबाबत वेळेवेळी अनुक्रमे दि.११/०३/२०२०, दि.१८/०३/२०२० व दि.२०/०३/२०२० रोजी ई-मेलद्वारे तसेच दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन, सबंधीत पुरवठाधारक यांनी चर्चेअंती माहे - जानेवारी-२०२० व फेब्रुवारी-२०२० पासुन परदेशात व देशात कोरोना (कोव्हीड -१९) विषाणुचा प्रादुर्भाव सर्वत्र असल्याने सर्व ठिकाणी मार्केट पुर्णतः बंद आहे. त्यामुळे सबंधीत पुरवठाधारक यांनी सदरील Outdoor LED Display बाबत दरपत्रक देणे अशक्य असल्याचे तसेच कोरोना (कोव्हीड -१९) विषाणुचा प्रादुर्भाव बंद झाल्यानंतरच प्रत्यक्ष पाहणी व मागणी याचा एकत्रित अंदाज घेवुनच दरपत्रक संस्थानला देता येईल, असे दुरध्वनीद्वारे कळविलेले आहे. तसेच LG, Samsung, Sony कंपनीचे TV हे Indoor असल्याने ते Outdoor साठी वापरता येणार नाही. तथापी, त्याकरीता Outdoor LED Display खरेदी करणे योग्य होईल अथवा भाडेतत्वावर सदर Outdoor LED Display बसविणेबाबतचे दरपत्रक देता येईल, असे इतर पुरवठाधारकांनी सांगितले आहे.

तसेच साईभक्त श्री अभिनव पाटील, IntelliSystems यांनी दि.०१/०४/२०२० चे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

I get your E-mail regarding inquiry for the LED Display for various place to show Information and Live Darshan on board,

Your requirement is very useful to all Saidevotee, also I am Sai bhakt so I wish to tell you my real opinion for Saibaba Sansthan regarding Information Display I suggest you

**1)** Not to purchase TV as a information display because TV is not useful for outdoor.

**2)** Not purchase the Led Display because its coast is very high also you get problem regarding maintenance and updates of software, so please execute this project as on rent basis with LED Outdoor Display, some benefit and drawback are as below

| Sr. No. | Key point | Purchase Information display | On rent basis information display |
|---|---|---|---|
| 1 | Cost | May be higher than rent basis | May be Lower than purchase |
| 2 | Life | Not use after 5 years, you have to purchase new display | Not to worry about life of display |
| 3 | Hardware Maintenance | Depend on 1 vendor, not to take any hard action if service is not provide , also delaying in service because vendor priority is another new costumer | He give immediate service without follow up because it is on rent you can stop his rent of that month |
| 4 | Software Maintenance | Again you must depend upon 1 vendor, for software you cannot change Vendor or you have to develop this software from scrap | You can change Vendor |
| 5 | Man Power | You want at least 1 or 2 dedicated man power for this project | Not to worried about manpower |
| 6 | Any change in Sansthan software, or hardware system | You have to pay more money to synchronise information display and sansthan software | Nominal increasing rental you can get this service |
| 7 | Resell Cost | Very low | Not to worry |
| 8 | Payment Term | Onetime payment its more amount | You can split amount so no more burden on sansthan. |
| 9 | Vendor | You must have to stuck on 1 Vendor | You can change if Vendor service is not satisfied |

Now days every where is lockdown , for LED Video Wall all raw material will import from China so right now I cannot give you exact cost for LED Display for Rent or Purchase after lockdown is over I will give you all details.

सबब, उपरोक्त ई-मेलमध्ये पुरवठाधारकाने Outdoor LED Display खरेदी करणे ऐवजी भाडेतत्वावर बसविणे संस्थानला हितावह व योग्य राहील, असे नमुद कले आहे.

तथापी, “ अ ” श्री सागर धावरे, Xtreme Media, पुणे यांनी दि.०२/०४/२०२० चे ई-मेलद्वारे 6.56ft X 4.92ft साईजचे Outdoor LED Display खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे.

| Sr. No. | Pixel Pitch | Proposed LED | LED Size in ft | | Total Sq.ft | Per Sq. ft Rate | Warranty |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Width | Hight | | | |
| 1 | 3.9 | Regel Micro | 6.56 | 4.92 | 32.29 | 25,332 | 1 Year |
| 1 (a) | 3.9 | Regel Micro | 6.56 | 4.92 | 32.29 | 28,000 | 5 Year |
| 2 | Video Processor, Transportation, Installation & Commissioning alog with Media player & Colud License | | | | | 80,000 | One Time |
| 3 | Structure (Wall mount) | | | | | 1,33,000 | One Time |
| GST Extra | | | | | | | |
| Integration with Sansthan Software if required will be extrra | | | | | | | |

**" ब "** संदेश पब्लिसीटी & मार्केटींग पुणे यांनी दि.०२/०४/२०२० चे ई-मेलद्वारे 6.56ft X 4.92ft साईजचे Outdoor LED Display खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे.

| **Sr. No.** | **Pixel Pitch** | **Lame Make** | **LED Size in ft** | | **Total Sq.ft** | **Per Sq. ft Rate** | **Total** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Width | Hight | | | |
| **1** | **3.91** | Nationstar Gold | 6.56 | 4.92 | 32.29 | 16,500 | 5,32,785 |
| **2** | Video Processor, Transportation, Installation & Commissioning alog with Media player & Colud License | | | | 1 | 63,000 | 63,000 |
| **3** | Structure, Wall Mount | | | | 1 | 1,04,000 | 1,04,000 |
| | | | | | | Total | 6,99,785 |
| | | | | | | GST 18% | 1,25,961.3 |
| For 01 Screen with Nation Star Gold Lamp & 5 Years Warranty | | | | | | **Total** | **8,25,746.3** |

उपरोक्त **"अ"** मध्ये Xtreme Media, पुणे यांनी अनुक्रमे प्रति स्क्वेअर फुटास रक्कम रु.२५,३३२/- मात्र एक वर्षास व प्रति स्क्वेअर फुटास रक्कम रु.२८,०००/- मात्र पाच वर्षाकरीता दर कळविलेला आहे. सदर दराचे अवलोकन करता, त्यांनी देय दर प्रति स्क्वेअर फुटास अतिरीक्त असल्याचे दिसुन येत आहे.

तथापी, उपरोक्त **"ब"** संदेश पब्लिसीटी & मार्केटींग पुणे यांनी दि.०२/०४/२०२० चे ई-मेलमध्ये नमुद केलेनुसार, 6.56ft X 4.92ft साईजचे Outdoor LED Display खरेदी करणेकामी अनुक्रमे प्रति स्क्वेअर फुटास रक्कम रु.१६,५००/- मात्र दर पाच वर्षाचे Warranty सह देऊ केले असल्याचे नमुद केले आहे.

श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजनाकरीता देणगी देणा-या देणगीदारांची नांवे तसेच साईभक्तांना भक्तनिवासमधील खोल्यांचे उपलब्धतेबाबत सद्यस्थिती व संस्थानचे विविध उपक्रमाची माहिती दाखविणेकामी 6.56ft X 4.92ft साईजचे Outdoor LED Display संस्थानचे विहीत पद्धतीने खरेदी करावयाचे झाल्यास साधारणतः १० नग Outdoor LED Display खरेदी करावे लागतील. सदर Outdoor LED Display प्रति नग रु.८,२५,७४६/- मात्र प्रमाणे एकुण १० नगास रक्कम रु.८२,५७,४६३/- मात्र इतका खर्च येईल. सदर ठिकाणांची सुची खालीलप्रमाणे –

| **अ.नं.** | **ठिकाणाचे नांव** | **नग** |
|---|---|---|
| **१.** | श्री साईप्रसादालय (गेट नं.२ साईभक्तप्रवेशद्वाराचे वर-०१ व प्रसादालायाचे वरील बाजुला उंचावर-०१) | ०२ |
| **२.** | द्वारावती भक्तनिवास (दर्शनी भागातील प्रवेशद्वाराचे वर) | ०१ |
| **३.** | श्री साईबाबा भक्तनिवास (दर्शनी भागातील प्रवेशद्वाराचे वर) | ०१ |
| **४** | साईआश्रम भक्तनिवास (दर्शनी भागातील प्रवेशद्वाराचे वर) | ०१ |
| **५.** | मंदिर परिसर / संस्थान परिसर | ०४ |
| **६.** | श्री साईधर्मशाळा भक्तनिवास | ०१ |

तरी, सदरकामी येणा-या खर्चाचा व पुरवठाधारकाने देवु केलेल्या Warranty चा सारासार विचार करता, सदर 6.56ft X 4.92ft साईजचे १० नग Outdoor LED Display भाडेतत्वावर घेणेऐवजी सदरकामी विविध पुरवठाधारकांकडुन संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निवीदा मागवुन खरेदी करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.८२,५७,४६३/- (सर्व करांसह) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेल्या विवेंचनास अनुसरुन, सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करत आहे.

विभागाचा प्रस्ताव– उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार साईभक्तांना संस्थानचे विविध उपक्रम, भक्तनिवासचे खोल्यांचे उपलब्धतेबाबतची तसेच श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजनाकरीता देणगी देणा-या देणगीदारांची नांवे प्रसारीत करणेकामी 6.56ftX4.92ft साईजचे १० नग Outdoor

LED Display भाडेतत्वावर घेणेऐवजी सदरकामी विविध पुरवठाधारकांकडुन संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निवीदा मागवुन खरेदी करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.८२,५७,४६३/- (सर्व करांसह) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना संस्थानचे विविध उपक्रम, भक्तनिवासचे खोल्यांचे उपलब्धतेबाबतची तसेच श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजनाकरीता देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे प्रसारीत करणेकामी Outdoor LED Display खरेदी करणेकामी खर्च व तो कसा कार्यान्वीत होईल, याबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सादर करण्यात यावा, तसेच Outdoor LED Display साठी रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार/चर्चा करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कक्ष)**

---

**विषय नं.३२** **संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे CAMC देणेकरीता प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.फोनिक्स इलेव्हेटर (इ.) प्रा.लि.,पुणे यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे CAMCदेणेकामी |
| २ | प्रशासकिय मान्यता | मा. तदर्थ (Ad-hoc) समिती दिनांक १४.०१.२०२० चे सभेतील निर्णय क्रं. १७ |
| ३ | अंदाजे खर्च | रु. १२,१३,८७५/- |
| ४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | श्री साईभक्तांचे तसेच रुग्णालयातील रुग्णाचे सोई सुविधेकरीता लिफ्ट सुरळीत कार्यान्वित राहणे करीता एकुण ३० लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता विहीत पद्धतीने ई निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. १२,१३,८७५/- मात्रचे खर्चास दिनांक १४.०१.२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेतील निर्णय क्रं. १७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. |
| ५ | ई निविदा तपशिल | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.inया वेब साईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक १०.०२.२०२० ते दिनांक १८.०२.२०२० देणेत आलेली होती. सदर मुदतीत तीन पेक्षा कमी निविदा आलेली असल्याने दिनांक २६/०२/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. परंतु सदर मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होणेसाठी दुस-यांदा दिनांक २७.०२.२०२० ते दिनांक ४.०३.२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. |
| | I. कामाची मुदत | ३६५ दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक ११.०३.२०२० रोजी सकाळी ११.०० वा. |
| | III. प्राप्त ई निविदा | ०३ |
| | IV. प्राप्त ई निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | तिन निविदाधारकांनी ई निविदा जमा केल्या होत्या. त्यापैकी २निविदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्र ऑनलाईन जमा केले असून मे. न्यु सह्याद्री इलेव्हेटर्स, मुंबई यांनी कंपनी रजिस्टेशन व तत्सम प्रकारचे कामाचे अनुभवाचे कागदपत्र जमा केलेली नसल्याने ते अपात्र दर्शविणेत आले आहे. |
| | V. सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का ? | होय |
| | VI. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु . | रु. १०,७९,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | VII. | मागील निम्नत्तम दरधारक | मे. फोनिक्स इलेव्हेटर (इ) प्रा. लि. पुणे |

ई निविदा प्रक्रियातील तांत्रिक दुष्टया पात्र निविदाधारकांची दिनांक २०.०३.२०२० रोजीचे मा. खरेदी समिती सभेपुढे कमर्शियल बीड उघडणेत आले असून दराचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ नं. | निविदाधारकांचे नाव | ई निविदेतील दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. व्हिक्टोरा लिफ्ट प्रा. लि. मुंबई | १२,३०,०००/- | L2 |
| २ | मे. फोनिक्स इलेव्हेटर (इं) प्रा. लि. पुणे | १०,६९,०००/- | L1 |

उपरोक्त श्री साईभक्तांचे तसेच रुग्णालयातील रुग्णाचे सोई सुविधेकरीता लिफ्ट सुरळीत कार्यान्वित राहणे आवश्यक असलेने करीता एकुण ३० लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी मे. फोनिक्स इलेव्हेटर (इं) प्रा. लि. पुणे यांचे रक्कम रुपये १०,६९,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये दहा लाख एकोणसत्तर हजार ) मात्र निम्नत्तम असून त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा वाटाघाटी करुन त्यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे (Ad-Hoc) सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे CAMC देणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक मे. फोनिक्स इलेव्हेटर (इं) प्रा. लि. पुणे यांचेशी दराबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.३३** **सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता श्रींचे दर्शनार्थ येणारे महत्वाचे, अतिमहत्वाचे मान्यवर साईभक्तांचे सत्काराकामी पावडर मार्बलमुर्ती, प्युअर मार्बल मुर्ती या विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम व तरतूद |
|---|---|---|
| २१ | विश्वस्त व्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन, १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. १ (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. |

मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.४५, निर्णय क्र.८४ - "यावर सविस्तर चर्चा होऊन, सन२०२०-२०२१ या वर्षाकरीता उपरोक्त प्रस्तावाद नमुद पावडर मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती वगळता उर्वरीत फुटाणे प्रसाद, विडयाची पाने व काशी पावडर अष्टगंध खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे तसेच व्दारकामाई धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदी करणेकामी व सत्यनारायण, अभिषेक पुजेकरीता नारळ खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच पावडर मार्बल मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती खरेदीकामीचा स्वतंत्रप्रस्ताव मा.तदर्थ (Adhoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले."

प्रस्तावना– १) पावडर मार्बल मुर्ती - श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त मंडळ, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्यकार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांना आवश्यकतेप्रमाणे पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मूर्ती देऊन सत्कार करण्यात येतो. त्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पुरवठादारांकडुन पावडर मूर्ती नंबर ३, मूर्ती नंबर ४, मूर्ती नंबर

५ अशा पावडर मूर्ती खरेदी करण्यात येतात. माहे-एप्रिल-२०१९ ते माहे-डिसेंबर-२०१९ अखेर या कालावधीत ०४ नंबर मूर्ती-एकूण ६९० नग दर रु.१८९/- प्रमाणे एकूण रु.१,३०,४१०/- (अक्षरी रुपये एक लाख तीस हजार चारशे दहा मात्र) खर्च झालेला आहे.

२) प्युअर मार्बल मुर्ती - तसेच मा.महामहिम राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.मुख्यमंत्री महोदय, मा.सुप्रिम कोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी., देणगीदार साईभक्त व इतर तत्सम महत्वाचे व्यक्ती मंदिरात दर्शनासाठी येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल,उदी देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तींना वेळप्रसंगी वरिष्ठांचे सूचनेनुसार प्युअर/ मकराना मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते. ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केटमधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी कराव्या लागतात त्याची संख्या निश्चित नसते. माहे-एप्रिल-२०१९ ते माहे-आक्टोंबर -२०१९ अखेर मंदिर विभागामार्फत खर्च झालेला नाही.

मा.तदर्थ समितीचे सभेत सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मार्बल मुर्ती, प्युअर मार्बल मुर्ती व काशी पावडर अष्टगंध कोटेशन पध्दतीने खरेदी करणेस तसेच व्दारकामाई धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदी करणेकामी तसेच सत्यनारायण,अभिषेक पुजेकरीता नारळ खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रीया करणेव त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता.

त्यावर मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील विषय क्र.४५, निर्णय क्र.८४ अन्वये पावडर मार्बल मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती खरेदीकामीचा स्वतंत्र प्रस्ताव मा. तदर्थ (Adhoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले आहे.

तरी सन-२०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजे खालीलप्रमाणे पावडर मार्बल मुर्ती खरेदी करावी लागणार आहे-

| अ. क्र | तपशील | एप्रिल-२०१९ ते डिसेंबर-२०१९ खर्च सध्याचे दर व खर्च | | सन-२०-२१ ची मागणी (अंदाजे) (आवश्यकतेप्रमाणे) | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च रुपये | एकूण अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर रुपये | प्रमाण | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| ०१ | **पावडर मूर्ती नं.३** | ११८/- | --- | **१०० नग** | १२५ | ०० | नग | १२,५००/- | **१,८१,२५०/-** |
| | **पावडर मूर्ती नं.४** | १८९/- | ६९० नग | **७०० नग** | २०० | ०० | नग | १,४०,०००/- | |
| | **पावडर मूर्ती नं.५** | ५५५/- | --- | **५० नग** | ५७५ | ०० | नग | २८,७५०/- | |

विभागाचा अभिप्राय–माहे एप्रिल २०१९ ते माहे डिसेंबर-२०१९ अखेर प्युअर मार्बल मुर्तीचा मंदिर विभागामार्फत खर्च झालेला नाही. त्यामुळे श्रींचे दर्शनार्थ व्हिव्हिआयपी व अति व्हिव्हिआयपी मान्यवर दर्शनार्थ येणार असल्यास आवश्यकतेप्रमाणे प्युअर मार्बल मुर्ती थेट खरेदी करता येईल तसेच उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे मुर्ती रु.३,००,०००/- मात्र रकमेचे आत असल्याने विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता श्रींचे दर्शनार्थ येणारे महत्वाचे, अतिमहत्वाचे मान्यवर साईभक्तांचे सत्कारकामी पावडर मार्बलमूर्ती या विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास तसेच प्युअर पावडर मुर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत Set policy नाही, "मान्यवर व्यक्ती", "महत्वाची व्यक्ती", "अतिमहत्वाची व्यक्ती" कोण ही बाब स्पष्ट नाही. करीता योग्य ती policy तयार करुन हा विषय policy सह पुन्हा मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३४** **देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग,हैदराबाद यांचेकडून देणगीदाखल स्विकारलेले सोन्यामधील "श्रध्दा सबुरी" नावे श्री व्दारकामाई मंदिरामध्ये बसविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२०, निर्णय क्र.६३२ अन्वये देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, है.बाद यांनी सोन्यामध्ये देणगीदाखल दिलेली "श्रध्दा" आणि

"सबुरी" अशी दोन नावे व्दारकामाई येथे लावणेत यावी, असे ठरले होते. त्यानुसार मा.व्यव्स्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेत सदरहू प्रस्ताव सादर केला असता त्यास निर्णय क्र.७४६ अन्वये " देणगीदार साईभक्त श्री.ठाकूर गजेंद्र सिंग, है.बाद यांचे सोन्यामध्ये "श्रध्दा आणि सबुरी " नावे देणगीदाखल स्विकारणेस व श्री व्दारकामाई येथे बसविणेस मान्यता देण्यात आली."

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग यांनी सोन्यामधील "श्रध्दा आणि सबुरी" नाव लाकडावर फिक्स करुन आणले होते. परंतू लेखाशाखा विभागाने सदरहू सोन्याचे वजन करता येणार नसल्याने त्यांना ते स्वतंत्र करुन घेऊन येणेस सांगीतले. त्यानुसार देणगीदार यांनी सदरचे नाव परत नेऊन, दुस-यांदा त्यांचेकडील कारागीरासह सोन्याचे नाव व लाकुड हे स्वतंत्र पध्दतीने शिर्डीला घेऊन आले. त्यावेळी लेखाशाखा विभागामार्फत स्वतंत्र सोन्याचे वजन करण्यात येऊन, देणगीदार यांना देणगी पावती (पा.नं.GLD-19-123, दि.२३/०८/२०१९) देणेत आलेली आहे. सदरची अक्षरे लेखाशाखा विभागाकडे जमा केलेली आहे.

परंतु त्यावेळी तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्रीव्दारकामाई मंदिरात सदरची नावे लावावयाची झाल्यास खिळे, स्क्रु लावावी लागेल, करीता तूर्त स्थगित करणेबाबत मौखिक आदेश दिले होते.

दरम्यानचे काळात देणगीदार साईभक्तांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयात सदरहू बाबतीत चौकशी केली. त्यानुसार श्री.जगताप सो., चॅरीटी असिस्टंट कमिशनर यांनी सदरहू सोन्यामधील "श्रध्दा आणि सबुरी" नावाचे संदर्भात मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचे स्विय सहाय्यक यांचेशी दुरध्वनीव्दारे चौकशी केली आहे. त्याअनुषंगाने श्री.जगताप सो. यांचेशी भ्रमणध्वनीवर (९८२२८१२५०२) सदरहू बाबतीत चर्चा केली असता, त्यांनी सदरची नावे लवकरात लवकर बसविणेकामी कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार सदरहू "श्रध्दा आणि सबुरी" नावे व्दारकामाई मंदिरात प्रवेश केल्यानंतर समोरचे भिंतीवर (निंबरला हार घालण्यात येतो त्याठिकाणीचे दोन्ही बाजूला) खिळे किंवा स्क्रु न मारता एरोलडाईट लोशनने बांधकाम विभागामार्फतच चिकटविणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. परंतु सदरहू प्रस्तावावर मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी " ठरावामध्येव्दारकामाई मंदिरात कोणत्या ठिकाणी सदरहू "श्रध्दा आणि सबुरी" ही नावे लावावी याबाबत दिसून येत नाही. तरी सदर ठिकाण निश्चितीकामी मा.तदर्थ समितीसमोर प्रस्ताव सादर करावे," असे निर्देश दिलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- बांधकाम विभागाकडील प्रतिनिधी यांनी सदरची नावे भिंतीला खिळे, स्क्रु न मारता, एरोलडाईट लोशनने चिकटविता येतील, असे सांगीतले आहे. तसेच सदरची नावे श्रीव्दारकामाई मंदिरात बसविणेकामी देणगीदार साईभक्तासह बांधकाम विभागाचे प्रतिनिधी व मंदिर प्रमुख यांनीजागेची समक्ष पहाणीही केलेली आहे. त्यानुसार व्दारकामाई मंदिरातील धुनीजवळील समोरील भिंतीचे बाजुला (निंबरचे दोन्ही बाजुला) एरोलडाईट लोशनने सदरची "श्रध्दा आणि सबुरी" नावे चिकटविता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी श्री व्दारकामाई मंदिराकरीता देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, हैद्राबाद यांनी देणगीदाखल दिलेली सोन्यातील "श्रद्धा-सबुरी" नांवे व्दारकामाई मंदिरात कोणत्या ठिकाणी लावणेत यावी? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग,हैदराबाद यांचेकडून देणगीदाखल स्विकारलेले सोन्यामधील "श्रध्दा सबुरी" नावे श्री व्दारकामाई मंदिरामध्ये बसविणेकामी देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, हैद्राबाद यांचे समवेत समक्ष पाहणी करुन याबाबत निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३५** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० साजरा करणेस व याकामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

प्रस्तावना- उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत. यंदाचा श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० शनिवार, दि.०४.०७.२०२० ते सोमवार, दि.०६.०७.२०२० (आषाढ शु.१४ शके १९४२ ते आषाढ कृ.०१ शके १९४२ ) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

विभागाचा अभिप्राय– सन-२०२० मध्ये साजरा करावयाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

| अ.नं | तपशील | श्री गुरुपौर्णिमा -२०२० चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| ०१ | उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०९/०३/२०२० रोजी सन २०२० मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका सामान्य,आजीव,आश्रयदाते सभासद, प्रतिष्ठीत मान्यवर व ग्रामस्थ यांना पाठविणेस मान्यता दिली आहे. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज अॅटम) प्रसिध्दीस देण्यात येईल. |
| | सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी | श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्रीसाईंचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे.<br>श्री साईसच्चरित<br>साईबाबा महासंत \| धीर उदार आणि दान्त \| यात्रेकरुंसी कृपावंत \| पैसे अत्यंत वांटिती\|\|४\|\| दिडक्या चवल्या हाताचा कीस \| अधेल्या-पावल्यांचा पाऊस \| रुपये दहा कोणास वीस \| कोणास पन्नास ते देत \|\|५\|\| हें काय सणासुदा दिसी \| कार्यविशेषीं कां पर्वकाळासी \| प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं \| संतोषेंसीं अर्पीत \|\|६\|\| पहूड येती भवय्ये नाचती \| गवय्ये गाती भाट वानिती \| तमासगीर मुजरे देती \| भजनीं रंगती हरिभक्त \|\|७\|\| ऐसे महाराज उदारवृत्ती \| दानधर्मी सढळ स्थिती \| ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति \| इच्छा धरिती दर्शनाची \|\|८\|\| कधीं आलिया बाबांचे चित्तीं \| पांथस्थांतेंही पैसे वांटिती \| दीनदुबळयांचा परामर्ष घेती \| कृपामुर्ति साईनाथ \|\|९\|\|<br>श्री साईंचे सत्य चरित्र<br>साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी किंमतीची नाणी.४ पैसे = १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. |
| | | कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या दिवशी काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानाच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये ( तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. |

| | | |
|---|---|---|
| | | साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळयांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत.<br>थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा–चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वतः सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे. |
| ०२ | अ) सांस्कृतिक कार्यक्रम | संस्थानमार्फत |
| | प्रारंभ दिवस,<br>शनिवार, दि.०४/०७/२०२०<br>आषाढ शु १४ शके १९४२ | उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावयाचे आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात येत/आला आहे. मागील श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील (२०१९) कलाकार कार्यक्रम साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुठें) याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. आता सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. |
| | मुख्य दिवस<br>रविवार, दि.०५/०७/२०२०<br>आषाढ शु १५ शके १९४२ | १) सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.<br>२) कलाकार हजेरी कार्यक्रमात रात्रौ. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यत (दि.०६/०७/२०२०) इच्छुक कलाकारांच्या साईभजनांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस<br>सोमवार, दि.०६/०७/२०२०<br>आषाढ शु.१६ शके १९४२ | सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. |
| | शनिवार, दि.०४/०७/२०२०<br>(सायं. ४ ते ६)<br>रविवार, दि.०५/०७/२०२०<br>(सायं. ४ ते ६)<br>सोमवार, दि.०६/०७/२०२०<br>(सकाळी १० ते १२) | ब) कीर्तन कार्यक्रम - उत्सवाचे तिन्ही दिवसांकरीता कीर्तनकार निश्चित करावयाचा आहे. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.<br>निमंत्रीत कीर्तनकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल.<br>नेहमीच्या प्रथेप्रमाणे कीर्तनकार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेल्या जागेत स्टेज उभारुन करता येईल. |
| ०३ | श्री सत्यनारायण पूजा<br>व अभिषेक पूजा | उत्सव काळात साईभक्तांची गर्दी असल्याने मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेऊन चालू किंवा बंद ठेवता येईल. |
| ०४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दि.०४/०७/२०२० रोजी सकाळी ५.३० वाजता श्री व्दारकामाई मंदिरात श्री साईसच्चरिताचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.०५/०७/२०२० सकाळी ५.०० वाजता त्याची समाप्ती होईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक याप्रमाणे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.०३/०७/२०२० रोजी नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक |
| | | भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नावे ठरविणे आहे. याबाबतची टिपणी मा.तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल. |
| ०५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार,दि.०४/०७/२०२० रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी रविवार, दि.०५/०७/२०२० रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघेल. |
| ०६ | विद्युत रोषणाई | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. मात्र विद्युत रोषणाईचे सामान |

| | | |
|---|---|---|
| | | आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ०७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल.. |
| ०८ | प्रसाद-भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी स्वतंत्र चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅंटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल.<br>सन २०२० चे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. |
| ०९ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यत करण्यात येईल. |
| १० | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता विविध विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी केल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे स्तरावर ज्या-त्या खात्यास जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल. |
| ११ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीमधून तसेच साई आश्रम, व साई धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवासव्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधीत विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील. |
| १२ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था मागील उत्सवाप्रमाणे यंदाही करण्यात येईल नेहमीप्रमाणे पालखी मंडप, वीज व्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. |
| १३ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १४ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१९ मध्ये प्रत्यक्ष खर्च रु.३३,६७,५८०.८६/- (अक्षरी रुपये तेहतिस लाख, सदुसष्ठ हजार, पाचशे ऐंशी पैसे शहाऐंशी ) मात्र इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन-२०२० करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रु. **४७,०७,५५७**/- (रु.सत्तेचाळीस लाख सात हजार पाचशे सत्तावन्न ) मात्र खर्च अपेक्षीत आहे. |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०२० अंदाजपत्रक

| अ. क्र | खर्च तपशिल | श्री गरुपौर्णिमा उत्सव -२०१९ | | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी, स्टेज, व इतर | ४,९३,००० | ५२३०९५.०६ | ५,५०,१२९ |
| २ | कलाकार बिदागी (वाजंत्री, किर्तनकार, निमंत्रीत | १२,००,००० | ४,४५,५०३.०० | ५,३५,९०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कलाकार ) व मंदिराकडील शिराप्रसाद , दहीहंडी, कलाकार निवास, इतर खर्च | | | |
| ३ | भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च (श्रम परिहार मजुरीसह) | १०,८५,१३५ | ८,०७,०४६.८० | ७,२०,९०३ |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च ) | १,२०,००० | ७६,६००.०० | १,२०,००० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, उदीप्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह ) | १३,९६,००० | १३,५०,७११.०० | १०,००,००० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन | ४,७२,१०४ | १,४३,४००.०० | ८,८०,६२५ |
| ७ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅकर डिझेलसह) | ३,२५,००० | ८४०.०० | ३,२५,००० |
| ८ | सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी | ३,६५,००० | - | ३,६५,००० |
| ९ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | २,५०,००० | - | २,००,००० |
| १० | वाहन विभाग भाडोत्री क्रेन | १५,००० | २०३८५.०० | १०,००० |
| | **एकुण रुपये** | **५७,२१,२३९** | **३३,६७,५८०.८६** | **४७,०७,५५७** |

विभागाचा अभिप्राय– मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी उपरोक्त अ.नं.९ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्यापासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नियमित खर्चाचाच भाग आहे. सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा. व्यवस्थापन/तदर्थ समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर त्या त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने उत्सवाच्या नियमीत खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

श्री गुरूपौर्णिमा उत्सव २०२० साजरा करणेसाठी व याकामी संस्थानचे विविध विभागांनी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० साजरा करणेकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ४७,०७,५५७/- (रुपये सत्तेचाळीस लाख सात हजार पाचशे सत्तावन्न ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० चे निमंत्रण भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना, मान्यवरांना ई-मेल/SMS व्दारे देण्यात यावे, व नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात यावी. तसेच उदी प्रसाद पोस्टाव्दारे पाठविण्यात यावा, असे ठरले. यासाठी किती खर्च अपेक्षीत आहे, याचा अभ्यास करुन चक्रिय पध्दतीने मान्यता घ्यावी, असे ठरले.**

**सध्या संपुर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने शनिवार,दि.०४.०७.२०२० ते सोमवार, दि.०६.०७.२०२० याकालावधीत साजरा करावयाच्या 'श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२०' बाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.३६** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमांचे कलाकार व मानधन निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ ( ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदीरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावना:- मागील वर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये खालील नामवंत कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम प्रकार | ठिकाण | दिनांक व वेळ | प्रवास खर्चासह मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | आश्विनी जोशी, नाशिक | साई भजन | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप | सोमवार दि. १५/०७/२०१९ सायं.७.३० ते रात्री १० | विनामुल्य |
| ०२ | पंडीत राजा काळे,मुंबई | भक्ती संगीत | | मंगळवार १६/०७/२०१९ सायं.७.३० ते रात्री १०.०० | २,००,०००/- |
| ०३ | मदन चौहान, रायपूर | साई भजन संध्या | | बुधवार १७/०७/२०१९ सायं.७.३० ते रात्री १०.०० | २,००,०००/- |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० शनिवार, दि.०४.०७.२०२० ते सोमवार, दि.०६.०७.२०२० असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात कार्यक्रम करणेसाठी खालील कलाकारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

| **अ. नं.** | **कलाकाराचे नांव** | **मो.नंबर** | **कार्यक्रमाचा प्रकार** | **कलाकार संख्या** | **मानधन** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नृत्यात्मी डान्स ॲकेडमी, शिर्डी ( कु. धनेश्वर) | ७७२००४००८६ | भक्ती गीतांवर धार्मिक नृत्य | **१५** | विनामुल्य |
| ०२ | मालोबिका मंडळ, दिल्ली | ९८१०५८३४१२ ९९१०९६५२३३ | भक्ती संगीत | ०५ | ७५,०००/- |
| ०३ | विजय साखरकर, मुंबई | ९८२१३९३३२३ | साई स्वर नृत्योत्सव | २५ | २५,०००/- |
| ०४ | श्री.जरनेल सिंग उर्फ नूरजॉली, अमृतसर पंजाब | ९८१५४२९९८५ | साईभजन | १० | ३१,०००/- |
| ०५ | संध्या देशमुख, वर्धा | ९८५०४२०२९९ | साईभजन संध्या | ०९ | विनामुल्य |
| ०६ | नॅशनल क्लासिकल डॉन्स अकॅडमी, कर्नाटक | ९७४०५०९४१६ | नृत्यकला | ३०० | विनामुल्य |
| ०७ | धनश्री कुलकर्णी, पुणे | ९८२३१०१४८७ | अभंग, भजन | ०५ | विनामुल्य |
| ०८ | नागु रेनसोल, हरियाना | - | भक्ती संगीत | २५ | विनामुल्य |
| ०९ | ब्रुंदा दिपक , बंगलोर | ९८४४१२६७०४ | भरतनाट्यम | ३० | विनामुल्य |
| १० | प्राची गडकरी (स्वरमंजिरी वाद्यवृंद) डोंबिवली | ९९८७५६८७५० | भजन संध्या | १४ | ४९,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | निनाद ग्रुप, पुणे, (सौ. पद्मावती पारेकर व सौ. विदुला फणसळकर) | ९६०४६१९५८४ ९८८१२३०४७६ | भक्ती संगीत | १० | २५,०००/- |
| १२ | श्री राम उद्धवराव कोठेकर, हिवरा आश्रम(विवेकानंद आश्रम), बुलढाणा | ९०२१४६१७१९ ९६०४३१७६१८ | भक्ती संगीत व गीत रामायण | ०४ | १५,०००/- |
| १३ | एन. पांडूरंगनाथम, अमृता संगीत पाठशाळा, ओंगल आंध्रप्रदेश | ०९८४९६०४४७८ ०९५५३६४२४२५ | साई भजन | १५ | विनामुल्य |
| १४ | सरस्वती वाद्यवृंद (डॉ. एम.आर. हनुमंता राजु) कर्नाटक | ९३४२१९०८९१ | भजन संध्या | १५ | ५०,०००/- |

विभागाचा अभिप्राय:-श्री गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तीन दिवसांसाठी तीन कलाकार निश्चित करावयाचे आहेत. संस्थानकडे प्राप्त झालेल्या अर्जातील अथवा मा. तदर्थ समिती सुचविल यातून कलाकारांची निवड निश्चित करता येईल असे नम्र मत आहे.

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.१ (कु.धनेश्वर) संस्थान कर्मचा-याची कन्या असुन त्यांना प्रोत्साहन म्हणून श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील कोणत्याही एका दिवशी कार्यक्रम देता येईल असे नम्र मत आहे.

मागील श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील (२०१९) कलाकार कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप ह्या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. चालू वर्षीचे कलाकार कार्यक्रम ही श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप या ठिकाणी आयोजित करता येतील,

प्रस्ताव:- तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संपुर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० चे स्वरुप निश्चीत करण्यात यावे, तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात कार्यक्रम करणेसाठी ज्या कलाकारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत, त्या सर्व कलाकारांना दुरध्वनीव्दारे त्यांचे सहभागाबाबत विचारणा करण्यात येऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.३७** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० साठी किर्तनकार व त्यांचे मानधन निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत साज-या होणा-या श्री गुरुपैर्णिमा उत्सव २०२० मध्ये (शनिवार, दि.०४.०७.२०२० ते सोमवार, दि.०६.०७.२०२०) संदर्भीय इ-मेलव्दारे खालील कीर्तनकार यांनी तीन दिवस कीर्तन सेवेची संधी मिळणेबाबत विनंती केली आहे.

| अ.नं. | किर्तनकारांचे नाव |
|---|---|
| ०१ | ह.भ.प.प्रभंजन भगत, लोणी |
| ०२ | ह.भ.प.सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी ,डोंबिवली पुर्व |
| ०३ | ह.भ.प.मंदार (अभिजीत) व्यास, डोंबिवली |

संस्थानतर्फे साजरे केल्या जाणा-या उत्सवातील कीर्तन मंदिराच्या उत्तर बाजूस असलेल्या मोकळया जागेत स्टेज उभारुन केले जाते.

ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन श्री रामनवमी उत्सवात ठेवण्यात येते. ही परंपरा ह.भ.प. दासगणू महाराज यांनी स्वतः रामनवमी उत्सवात कीर्तन सेवा देण्यास सुरुवात केल्यापासून आजतागायत ती अखंडीत चालू आहे. त्यानुसार ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन रामनवमी उत्सवात परंपरेनुसार ठेवले जाते.

संस्थानमार्फत श्रीगुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवासाठी संस्थानकडे प्राप्त झालेल्या कीर्तनकारांचे सर्व अर्ज एकत्रित करुन याकामी मा. व्यवस्थापन/तदर्थ समितीचे सभेत प्रस्ताव ठेवण्यात येतो, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन योग्य कीर्तनकाराची निवड व मानधनाबाबत निर्णय घेण्यात येतो.

श्री. गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवात श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे कोणत्याही कीर्तनकाराची कीर्तन सेवा करण्याची परंपरा नाही. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कीर्तनकाराची निवड केली जाते.

श्री. गुरुपार्णिमा उत्सवात सेवा दिलेल्या कीर्तनकारांची नांवे खालीलप्रमाणे..

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव | गुरुपौर्णिमा उत्सवात कीर्तन सेवा दिलेले साल |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प .डॉ.ग.प्र.परांजपे,पुणे | दि .१९/०७/१९९७ ते दि.२१/०७/१९९७ |
| ०२ | ह.भ.प .श्री.रा .आळेकर, इंदौर | दि .०८/०७/१९९८ ते दि १०/०७/१९९८ |
| ०३ | ह.भ.प.श्री.उत्तमराव विष्णूजी बडधे, कोपरगांव यांचे प्रथम व दुस-या दिवशी कीर्तन, ह.भ.प.श्री.माधव तुकाराम आजेगांवकर,परभणी यांचे तिस-या दिवशी काल्याचे कीर्तन | दि .२७/०७/१९९९ ते दि.२९/०७/१९९९ |
| ०४ | ह.भ.प .श्री.उत्तमराव विष्णूजी बडदे, कोपरगांव | दि.१५/०७/२००० ते दि.१७/०७/२००० |
| ०५ | ह.भ.प .श्री.महादेव शंकर गोखले, विरार | दि.०४/०७/२००१ ते दि.०६/०७/२००१ |
| ०६ | ह.भ.प .श्री.शरद नेरळकर, नांदेड | दि.२३/०७/२००२ ते दि.२५/०७/२००२ |
| ०७ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली पुर्व जिल्हा-ठाणे | सन २००३ |
| ०८ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली पुर्व जिल्हा-ठाणे | दि.०१/०७/२००४ ते दि ०३/०७/२००४ |
| ०९ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.२०/०७/२००५ ते दि.२२/०७/२००५ |
| १० | ह.भ.प.प्रा.डॉ.माधवराव दिक्षीत पुणे | दि.१०/०७/२००६ ते दि.१२/०७/२००६ |
| ११ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली पुर्व जिल्हा-ठाणे | दि.२८/०७/२००७ ते दि.३०/०७/२००७ |
| १२ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.१७/०७/२००८ ते दि.१९/०७/२००८ |
| १३ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.०६/०७/२००९ ते दि.०८/०७/२००९ |
| १४ | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यासबुवा, डोंबिवली | दि.२४/०७/२०१० ते दि.२६/०७/२०१० |
| १५ | ह.भ.प .मनोहर महाराज कोकलेगांवकर विठ्ठलवाडी, नांदेड. | दि.१४/०७/२०११ ते दि.१६/०७/२०११ |
| १६ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि ०२/०७/२०१२ ते दि.०४/०७/२०१२ |
| १७ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली पुर्व जिल्हा-ठाणे | दि.२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३ |
| १८ | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.११/०७/२०१४ ते दि.१३/०७/२०१४ |
| १९ | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.३०/०७/२०१५ ते दि.०१/०८/२०१५ |
| २० | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.१८/०७/२०१६ ते दि.२०/०७/२०१६ |
| २१ | ह.भ.प.सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली | दि. ०८/०७/२०१७ ते दि.१०/०७/२०१७ |
| २२ | ह.भ.प. चारुदत्त गोविंदस्वामी आफळे | दि. २६/०७/२०१८ ते दि. २८/०७/२०१८ |
| २३ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली पुर्व जिल्हा-ठाणे | दि. १५/०७/२०१९ ते दि. १७/०७/२०१९ |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ मधील कीर्तनकारास तीन दिवसांचे एकत्रित मानधन म्हणून रक्कम रु.१५,००१/- देण्यात आले होते.

विभागाचा अभिप्राय:- श्री गुरुपैर्णिमा उत्सवात कीर्तन सादर करण्यासाठी संस्थानकडे सादर केलेल्या अर्जदार कीर्तनकारांतुन एका कीर्तनकारांची निवड करता येईल.

संस्थानकडे सादर केलेल्या तीन अर्जदारांपैकी अ.नं.२ (सौ.जोशी) व ३ (श्री.व्यास) यांनी यापूर्वी अनुक्रमे सन २०१० व २०१७ यासाली गुरुपौर्णिमा उत्सवात कीर्तनसेवा सादर केली आहे. तर अ.नं.१ ह.भ.प. प्रभंजन भगत, लोणी हे श्री साईबाबांचे समकालीन भक्त श्री.बाळा काशिराम शिंपी यांचे वंशज असून त्यांनी १५ वर्षापासून आतापर्यंत साधारणतः ५०० किर्तने केली आहेत. त्यामुळे यंदाच्या गुरुपौर्णिमा उत्सवात श्री.भगत यांना संधी द्यावी असे नम्र मत आहे अथवा मा. तदर्थ समितीने सुचविलेले कीर्तनकारांचा कार्यक्रम आयोजित करता येईल. त्यासाठी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ प्रमाणेच तीन दिवसासाठी रक्कम रु. १५,००१/- मानधन आदा करता येईल असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० च्या तीन दिवसांसाठी कीर्तनकार व त्यांचे मानधन निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.२७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० मध्ये तीन दिवसांसाठी कीर्तनकार ह.भ.प. प्रभंजन भगत, लोणी यांचा कीर्तनकारांचा कार्यक्रम आयोजित करुन तीन दिवसासाठी रक्कम रु.१५,००१/- मानधन त्यांना आदा करण्यास मान्यता देण्यात आली. तत्पुर्वी त्यांचेशी संपर्क साधुन कोव्हीड-१९ या साथीच्या रोगाच्या प्रार्दुभावाच्या पार्श्वभुमीवर ते किर्तनासाठी येण्यास तयार आहेत काय? याविषयी विचारणा करावी.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.३८** **साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, नाटय रसिच मंच (संच) व शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने २६वा श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा साजरा करणेस व त्याचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्याप्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व तुयाचा विस्तार करील

प्रस्तावना– श्री.आप्पासाहेब खंडू कोते, अध्यक्ष, नाटयरसिक मंच (संच) ,शिर्डी यांनी दि.०६.०४.२०२० चे पत्रान्वये दरवर्षी श्रावण महिन्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी आयोजित नाट्य रसिक मंच (संच) शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांचे सहकार्याने श्री साई सच्चरित पारायण सोहळा आयोजित करण्यात येतो.

मागीलवर्षी २५ वा पारायण सोहळा शुक्रवार, दि.०२.०८.२०१९ ते शुक्रवार, दि.०९.०८.२०१९ अखेर व शनिवार दि.१०.०८.२०१९ रोजी काला कीर्तन व महाप्रसाद असा साजरा करण्यात आला.

यंदाचा पारायण सोहळा वर्षे २६ वे असून तो मंगळवार, दि.२१.०७.२०२० ते मंगळवार, दि.२८.०७.२०२० व बुधवार दि.२९.०७.२०२० रोजी कालाकिर्तन व महाप्रसाद असा साजरा होणार आहे.यंदाच्या पारायण सोहळ्यास अंदाजे पुरुष २५०० व महिला ५,००० पारायणार्थी येण्याची शक्यता आहे.

नाट्यरसिक मंच शिर्डी येणा-या पारायणार्थींची दरवर्षीप्रमाणे नावाची नोंदणी करुन बॅज तयार करुन त्यांना वितरीत करण्याची व्यवस्था करणार आहे.

आपलेकडून नेहमीप्रमाणे पारायणार्थींची मंडप टाकून बैठक व्यवस्था व तदनुषंगिक सोई उपलब्ध करावयाच्या आहेत तसेच निमंत्रीत कलाकार-कीर्तनकार, ग्रंथसमाप्ती मिरवणूकीसाठी चित्ररथ-वेषभूषाकार-वाद्यवादक –पारायणासाठी सेवा देणारे सेवक-निमंत्रीत इत्यादींची आवश्यकतेनुसार निवास,चहा-नाष्टा, जेवण व दर्शन व्यवस्था करावयाची आहे.

तसेच पारायणास बसलेल्या पारायणार्थींची चहा-नाष्टा,काला कीर्तनाचे दिवशी भंडारा- महाप्रसाद वाटप इ.चे नेहमीप्रमाणे आयोजन करावयाचे आहे.

नेहमीप्रमाणे हा पारायण सोहळा आनंदात व उल्हासात साजरा करण्याचा मानस आहे. आपले नेहमीचे सहकार्याबद्दल नाट्य रसिक मंच शिर्डी अध्यक्ष , सदस्य आपले आभारी आहोत,असे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व नाटय रसिक मंच तसेच शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या २५ वर्षापासून दरवर्षी श्रावण शु.१ ते श्रावण शु.८/९ या तिथीत सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन करण्यात येते.

मागीलवर्षी श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजनसाईनगर मैदानावर दोन सत्रात करण्यात आले होते व ७५०० पुरष/महिला पारायणार्थींनी सहभाग नोंदविलेला होता.

चालू यावर्षी नाटय रसिक मंच (संच),शिर्डी यांनी ७५०० चे आसपास पारायणार्थी बसण्याची शक्यता असल्याचे कळविल्याने सदर पारायण सोहळयाचे आयोजन मागीलवर्षाप्रमाणे साईनगर मैदानावर करता येईल. मागीलवर्षी पारायणासाठी अंदाजे रक्कम रु. ५०,००, ०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आली होती प्रत्यक्षात मात्र रु.**२८,२०,४०३**/- मात्र इतका खर्च झालेला आहे.

खर्चाचे अंदाजपत्रक – सन २०१९ मध्ये श्रावण मासानिमित्त श्री साईसच्चरित पारायण सोहळयास संस्थानमार्फत आलेला प्रत्यक्ष खर्च व सन २०२० मध्ये पारायण सोहळयासाठी येणा-या अंदाजे खर्चाबाबत माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे...

| अ.नं. | तपशील | श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०१९ | | श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०२० |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | अंदाजे खर्च |
| १ | मंडप, मॅटिन व स्टेज | २३,०३,४९० | **१२,८१,४००** | १३,८९,००० |
| २ | कलाकार बिदागी | १४,६०,००० | **५,९४,७७१** | ७,१५,००० |
| ३ | प्रसाद खर्च, (चहा,कॉफी व दुध खर्चासह) | ७,८३,४१६ | **५,६७,६४१** | ६,७९,१०७ |
| ४ | जादा (कंत्राटी) कामगार | ३,४३,१३८ | **३,०१,५९१** | ४,६८,६९० |
| ५ | फुल सजावट खर्च | ६०,००० | **७५,०००** | ८०,००० |
| ६ | इतर खर्च | ५०,२४० | - | ७५,२४० |
| | **एकुण** | ५०,००,२८४ | **२८,२०,४०३** | **३९,०७,०३७** |

श्री साईचरित्र पारायण सोहळा आयोजित करणेकामी खालील बाबींवर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) मागीलवर्षाप्रमाणे श्री साईचरित्र पारायण सोहळयाचे आयोजन संस्थान मालकीचे जागेत साईनगर मैदानावर करता येईल (सदरची जागा बैठक व्यवस्थेसाठी मोठी असून या जागेत स्वच्छता गृहांची सुविधा व वाहनतळांची सुविधा असल्याने योग्य ठरेल.)

२) साईनगर येथील जागेवर पत्राशेड मंडप व इतर अनुषंगिक सुविधा उभारणेबाबत.

३) पारायणार्थीसाठी चहा,पाणी, नाष्टा, महाप्रसाद नेहमीचे प्रथेप्रमाणे मोफत पुरविणेबाबत.

४) पारायण कालावधीत आयोजित कार्यक्रमांसाठी निमंत्रीत कलाकार, किर्तनकार, प्रवचनकार यांचे मानधन व निवासव्यवस्था तसेच दर्शन आदि व्यवस्थेबाबत

५) पारायणासाठी बाहेरगावाहुन येणा-या साईभक्तांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेबाबत. (गतवर्षी १०७ साईभक्तांची निवासव्यवस्था साईधर्मशाळा येथील ७ हॉलमध्ये करण्यात आली होती.)

६) पारायणाचे माहितीफलक व बॅनर, निमंत्रण पत्रिका, फुल सजावट व विद्युत रोषणाई आदि बाबींची पुर्तता संस्थानचे संबंधित विभागाकडून करणेबाबत.

७) पारायण समाप्तीनंतरच्या मिरवणुक खर्चास (बॅन्ड, ढोल पथक, सनई- चौघडे, संबळ, देखावे इ.) मान्यता देणेबाबत.

८) पारायण समाप्तीनंतर द्यावयाच्या महाप्रसाद (भंडारा) खर्चास मान्यता देणेबाबत.

९) उपरोक्त नमुद केलेल्या अ.नं.२,३,४,५,६,७,८ बाबींसाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.४०,००,०००/- (अक्षरी रुपये चाळीस लाख मात्रचे) खर्चास मान्यता देणेबाबत.

१०) संस्थान वेबसाईटवरुन श्री साईचरित्र पारायण (वाचन) करणेसाठी साईभक्तांना आवाहन करणेबाबत.

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे सदरच्या अधिसूचनेचा कालावधी कधीपर्यंत असेल हे आज सांगता येणार नाही.

तरी साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून पारायण आयोजित करता येईल असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी उपरोक्त नमूद बाबी व त्यासाठी येणारा सर्व समावेशक खर्च आदि बाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संपुर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने या पार्श्वभुमीवर श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा कार्यक्रमाचे स्वरुप निश्चीत करण्यात येऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.३९** **सन २०२१ ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशीत करणेकामी व साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेसाठी येणाऱ्या छपाई खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ**

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६.- सन-२०२० ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.४,६८,२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच प्रस्तावित केलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका नगांचा शिल्लक साठा संपत आल्यास २५ टक्के जादा छपाई मंजूर दरात करून घेण्यास व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२४.- श्री साई दैनंदिनी-२०२० तिरूपती देवस्थानच्या धर्तीवर (एका पानावर एकच तारीख) छपाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू.६७,५०,०००/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रास्तविकः- श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी तसेच विविध प्रकारच्या श्री साईबाबा दिनदर्शिका छपाई करुन साईभक्तांना विक्रीसाठीउपलब्ध करुन दिल्या जातात.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ व दि.२६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६ व ४२४ नुसार सन-२०२० साठी श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिकांचीछपाई निम्नत्तम दरधारकांकडून करून घेण्यात आली होती त्याची व आजअखेर शिल्लक साठयाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | आदेशीत संख्या | सन-२०२० चे ई-निविदेतील मंजूर दर रु. पै. | विक्री दर रु. पै. | शिल्लक साठा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स -२०२० साईज-(७.५०"x९.७५") | २,२५,००० | ८१.७५ | ९०/- | ९०० |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २०२० पॉकेट साईज (३"x ४.५०") | १,००,००० | ११.२२ | १५/- | २८७० |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०२० (१ पानी मोठे) साईज-(१९"x२९") | ३,२५,००० | १५.३७ | १७/- | २२५२ |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०२० (८ पेजेस) साईज- २२.००"x३५.००" | २०,००० | १७८/- | १९५/- | २१९६ |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स-२०२० (७ पेजेस) साईज- १९.२५" x २७" | १५,००० | १७२/- | १९०/- | २०० |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स-२०२० (सिंगल पेज) साईज- १९.००"x२७.००" | ३,००० | १७७/- | १९५/- | ०७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०७ | श्री साईबाबा श्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०२० (७ पेजेस) साईज- ९.७५"x०७.००" | १५,००० | १०५/- | ११५/- | १२४ |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स-२०२०(१४ पेजेसवर छपाई) साईज- ६.५०" x ९.५०" | १५,००० | ५४/- | ६०/- | ५० |
| ०९ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (ऑफीस) साईज-१९.५०" x २८.००" | १०,००० | २०.४९ | २५/- | २६९ |
| १० | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (घरगुती) साईज-११.००" x १६.८०" | १५,००० | १०.२० | १०/- | २३ |
| ११ | श्री साईबाबा कार कॅलेंडर्स -२०२० साईज-३.८०" x ५.५०" | २५,००० | ५.२५ | ५/- | ५० |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या सन-२०२० च्या साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका छपाईकामी रु.३,४०,५६,१५०/- मात्रचा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका सन-२०२१ ह्या माहे सप्टेंबर-ऑक्टोंबर महिन्यात (विजयादशमी पूर्वी) छपाई होऊन विक्रीसाठी उपलब्ध होणेसाठी आतापासूनच कार्यवाही सुरू करावी लागेल.

सन-२०२० च्या साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका खरेदी कामी साईभक्तांचा चांगलाप्रतिसाद विचारात घेता,सन २०२१ करीता प्रस्तावित छपाई संख्या खालीलप्रमाणे निश्चित करावी असे नम्र मत आहे. अंदाजे छपाई दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल (सन २०२१) | प्रस्तावितछपाई संख्या | अंदाजे छपाई दर | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स -२०२१ साईज-(७.५०"x९.७५") | २,२५,००० | १२०/- | २,७०,००,०००/- |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २०२१, पॉकेट साईज (३"x ४.५०") | १,००,००० | २०/- | २०,००,०००/- |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०२१ (१ पानी मोठे) साईज-(१९"x२९") | ३,२५,००० | २५/- | ८१,२५,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०२१ (८ पेजेस) साईज- २२.००"x३५.००" | २०,००० | २५०/- | ५०,००,०००/- |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स-२०२१ (७ पेजेस) साईज- १९.२५" x २७" | १०,००० | २५०/- | २५,००,०००/- |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉलकॅलेंडर्स-२०२१ (सिंगल पेज) साईज- १९.००"x२७.००" | ३,००० | २५०/- | ७,५०,०००/- |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०२१ (७ पेजेस) साईज- ९.७५"x०७.००" | १५,००० | १५०/- | २२,५०,०००/- |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स -२०२१ (१४ पेजेसवर छपाई) साईज- ६.५०" x ९.५०" | १५,००० | ७५/- | ११,२५,०००/- |
| ०९ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२१ (ऑफीस) साईज-१९.५०" x २८.००" | १५,००० | ३०/- | ४,५०,०००/- |
| १० | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२१ (घरगुती) साईज-११.००" x १६.८०" | १५,००० | २०/- | ३,००,०००/- |
| ११ | श्री साईबाबा कार कॅलेंडर्स -२०२१ साईज-३.८०" x ५.५०" | २५,००० | १०/- | २,५०,०००/- |
| | | | एकूण रुपये. | **४,९७,५०,०००/-** |

(अक्षरी रु. चार कोटी सत्यान्नव लाख पन्नास हजारमात्र.)

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली अंदाजीत रक्कम ही सन-२०२१ चे अंदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी असलेल्या रु.१२ कोटी अंदाजपत्रकीय तरतूदीतून खर्च करता येईल. सबब प्रस्तावित दैनंदिनी / दिनदर्शिकांची २०२१ छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणे गरजेचे आहे.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु.४,९७,५०,०००/- मात्रच्या खर्चाबाबत...

२) जनसंपर्क कार्यालयव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चाबाबत..

३) आय.टी विभागामार्फत संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेबाबत...

४) विहीत पध्दतीने ई-निविदा व त्यापुढील प्रक्रीया राबविणेबाबत..

५) प्रस्तावितकेलेल्याश्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका नगांचा शिल्लक साठा संपत आलेस आणखी २५ टक्के जादा छपाई करुन घेणे व त्याकामी येणा-या खर्चाबाबत..

प्रस्तावः- तरी विभागाच्या अभिप्रायामध्ये नमूद केलेप्रमाणे सन-२०२१ चे श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिकाचे प्रस्तावीत छपाई संख्येस व येणा-या छपाई खर्चास तसेच इतर बाबींवर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.२७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१ ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशीत करणेकामी व साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेकामी छपाई करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.४,९७,५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली. साठा संपत आलेल्या सन २०२१ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांची २५ टक्के जादा छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४०** **सन २०२०-२१ करीता मोतीचुर लाडू, सुटीबुंदी व बर्फी बनविणेकामी उक्त्या मजुरीची ई-निविदा काढणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.०२ कोटीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१(१घ)नूसार श्री साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. - नविन प्रस्ताव

प्रस्ताविक- उपरोक्तप्रमाणे अधिनियमास अनुसरुन लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाची दि.०३/०१/२०१४ रोजीपासून श्री साई प्रसादालय विभागापासुन वेगळा करुन स्वतंत्र स्थापना करणेत आलेली आहे. त्यानुसार सदरचे विभागामार्फत लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद उक्तया मजुरीच्या ई-निविदा मागवुन तयार करण्यात येत आहे.

''श्रीं'' चे दर्शन घेतल्यानंतर दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना साईबाबांचा प्रसाद घरी घेऊन जाता यावा यासात्वीक उद्देशाने व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय व अधिनियम व आयएसओ चे नियमावलीसअधिन राहुन अनुसरुन संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत लाडु व बुंदी प्रसाद तयार करुन त्याचे लाडू प्रसाद वितरण काऊंटर्सवर मोतीचूर लाडू पाकीटांची विक्री केली जाते, तसेच मंदिर दर्शनरांगेत भक्तांना मोफत बुंदी पाकीटे वाटप करण्यासाठी सुटी बुंदी प्रसाद तयार करुन त्याचे ५० ग्रॅम वजनाचे पाकीटे पॅकींग करुन मोफत वाटप करण्यात येतात. त्याचप्रमाणे प्रसादालयामध्ये भक्तांना भोजनात मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी प्रसादालयाचे मागणीनुसार तयार करुन देण्यात येत आहे.

सध्या शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी या लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत मोतीचूर बुंदी लाडू व सुट्टी बुंदी तयार करुन घेण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील (आयत्या वेळेचा विषय) निर्णय क्र.४१०, दि.२६/०७/२०१९ सन २०१९-२० (दि.१६ ऑगस्ट २०१९ ते दि.१५ ऑगस्ट २०२० अखेर) या कालावधीसाठी जा.नं.एसएसएस/लाडुप्रसाद/१८१७/२०१९, दि.१२/०८/२०१९ अन्वये, शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांना मोतीचुर लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देण्याचे उक्त्या मजुरीचे कार्यकंत्राट देण्यात आले असुन, त्यांचे कार्यकंत्राटांचा कालावधी दि.१५ ऑगस्ट २०२० रोजी संपत आहे.

त्यास अनुसरुन सन २०२०-२१ करीता (दि.१६ ऑगस्ट २०२० ते दि.१५ ऑगस्ट २०२१ अखेर) नव्याने मोतीचूर बुंदी लाडू, मोफत वाटपासाठी सुटी बुंदीप्रसाद व भोजनात मिष्ठान्न म्हणुन द्यावयाची बर्फी प्रसाद

निर्मितीचे उक्त्या मजूरीची ई - निविदा विविध वृत्तपत्रात जाहिरात देऊन व www.mahatenders.org.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करुन पुढील कालावधीसाठी श्रींचा प्रसाद तयार करुन घेणेकामी नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

मोतीचुर लाडू, बुंदी व बर्फी निर्मिती प्रक्रीयेसाठी सध्या मोतीचुर लाडु तयार करुन पॅकींग करुन देणेकामी १००० लाडु नगास (५० ग्रॅम वजनाचा ०१ लाडु नग) रक्कम रुपये – २६६/- इतका तर, सुटी बुंदी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी १००० पाकीटांस (५० ग्रॅम वजनाचे ०१ पाकीट) रक्कम रुपये – २८४/- इतकी उक्त्या पध्दतीने मजुरी आदा करण्यात येत आहे.

लाडु व बुंदी प्रसाद तसेच बर्फी प्रसाद तयार करुन घेतांना ठेकेदारांस मागील ०५ वर्षात खालीलप्रमाणे रक्कम उक्ती मजुरी म्हणुन अदा करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | उक्त्या मजुरीच्या स्वरुपात आदा करण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|
| ०१ | सन २०१५-२०१६ | १,३५,८८,९१७/- |
| ०२ | सन २०१६-२०१७ | १,१०,४१,०९२/- |
| ०३ | सन २०१७-२०१८ | १,०७,०४,३८३/- |
| ०४ | सन २०१८-१९ | १,५२,१२,६६९/- |
| ०५ | सन २०१९-२० (माहे फेब्रु.२०२० अखेर) | १,६०,३२,४१६/- |

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- सन २०१९-२० करीता (दि.१६ ऑगस्ट २०१९ ते दि.१५ ऑगस्ट २०२० अखेर) शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचे मोतीचुर लाडु प्रसाद, सुटी बुंदी प्रसाद व बर्फी प्रसाद तयार करुन देण्याचे उक्त्या मजुरीच्या कार्य कंत्राटांचा कालावधी दि. १५ ऑगस्ट, २०२० रोजी संपत आहे, त्यामुळे पुढील ०१ वर्ष कालावधीकरीता लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत साईभक्तांना पुरविला जाणारा प्रसाद तयार करुन घेणेकामी नव्याने नवीन ठेकेदारांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

त्यास अनुसरुन सन २०२०-२१ करीता (दि.१६ ऑगस्ट २०२० ते दि.१५ ऑगस्ट २०२१ अखेर) उपरोक्तप्रमाणे उक्ती मजुरी आदा करणेकामी २०% वाढ गृहीत धरुन सरासरी रक्कम रु. २,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी मात्र) अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

त्यास अनुसरुन

**१)** सन २०२०-२१ करीता (दि.१६ ऑगस्ट २०२० ते दि.१५ ऑगस्ट २०२१ अखेर) मोतीचुर लाडु, बुंदी प्रसाद व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन घेणेकामी आदा करणेत येणा-या उक्त्या मजुरीची अंदाजे रक्कम रु.२,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी मात्र) चे खर्चास मान्यता मिळण्यास,

**२)** सदरचे ई-निविदेची विविध शहरातील (उदा. पुणे, मुंबई, नाशिक, अहमदनगर व औरंगाबाद इ.) मराठी वृत्तपत्रात जाहीरात देण्यास,

**३)** तसेच सदरची ई-निविदा शासनाचे www.mahatenders.org.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्भ (Adhoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ करीता मोतीचुर लाडू, सुटीबुंदी व बर्फी उक्त्या पध्दतीने बनविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.४१** **सन २०१९-२०२० मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा,कॉफी,दुध बिस्कीटे वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५४ नुसार "दर्शन रांगेतील साईभक्तांना आरोचे वॉटर कुलरचे पाणी, चहा,कॉफी,दुध व बिस्किट विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे"असा निर्णय

पारीत झालेला आहे माहे -एप्रिल २०१९ ते मार्च २०२० या कालावधी मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना खालील प्रमाणे चहा,कॉफी,दुध,बिस्किट मोफत वाटप करण्यात आले आहे.

| माहे (कालावधी) | चहा कप/नग | कॉफी कप/नग | दुध कप/नग | बिस्किट पुडे नग | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०१९ | १३५५६९ | ६२३२० | २३०९५ | १८००० | ६१७३८३ |
| मे २०१९ | १७२०२८ | ८४०४० | २६२१० | २२३३२ | ७८६४६६ |
| जुन २०१९ | १५६४८७ | ७७२५० | २६३४५ | १९४१२ | ७२०८१९ |
| जुलै २०१९ | १५०७७४ | ७३७०० | २८७४० | १८४०६ | ७००८९८ |
| ऑगस्ट २०१९ | १३४१३४ | ६२७३० | २८२९० | १८९३६ | ६३६००८ |
| सप्टेबर २०१९ | ११८९६० | ५७७०० | २७१९४ | १५८५५ | ५७१८७७ |
| ऑक्टोबर २०१९ | १३६८२५ | ६४२४० | २८३८५ | २१०४२ | ६५६७३५ |
| नोव्हेबर २०१९ | ११४६७५ | ५१९३० | २५९७० | १६७०५ | ५४६५७५ |
| डिसेबर २०१९ | १२९९६३ | ५९५२० | २७१०० | २१२४८ | ६२६०२६ |
| जानेवारी २०२० | १३४१८० | ६३७९० | २६२४० | २१८१६ | ६४७५३० |
| फेब्रुवारी २०२० | १२६१४५ | ५७५६० | २४१६० | २०१२४ | ५९८०७० |
| मार्च २०२० | ६६०७५ | ३०६५० | १४६७५ | १००३२ | ३१८२८५ |
| **एकूण संख्या** | **१५७५८१५** | **७४५४३०** | **३०६४०४** | **२२३९०८** | **-** |
| **दर रुपये** | **२.००** | **३.००** | **३.००** | **५.००** | **-** |
| **एकूण रुपये** | **३१५१६३०** | **२२३६२९०** | **९१९२१२** | **१११९५४०** | **७४२६६७२** |

वरील प्रमाणे माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखेर या कालावधीत शांतिनिवास/भक्तनिवास दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना मोफत वाटप झालेल्या चहा, कॉफी,दुध बिस्किट यासाठी एकूण झालेल्या रुपये ७४२६६७२/- (अक्षरी रुपये-चौ-याहत्तर लाख सव्वीस हजार सहाशे बहात्तर) मात्र खर्चाची नोंद घेणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ(Ad-hov) समितीपुढे सविनय सादर

**निर्णय क्र.२७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० या कालावधीत शांतिनिवास/ भक्तनिवास दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना मोफत वाटप झालेल्या चहा, कॉफी,दुध बिस्किट यासाठी झालेल्या एकूण रक्कम रु.७४,२६,६७२/-मात्र खर्चाचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-कॅन्टीन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४२** **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणी वाटप काम करत असलेले २८ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे खर्चाचे मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

प्रस्तावीक–दि.०४/०३/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे साईभक्तांना पिण्याचे पाणी वाटपासाठी कार्यरत असलेले २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे खर्चाबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.१६७ अन्वये सविस्तर चर्चा होऊन सदर पाणीवाटप करत असलेले २८ कंत्राटी कर्मचा-यांचे खर्चाबाबतचा आभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले. त्यास अनुसरुन सविस्तर फेर प्रस्ताव खालील प्रमाणे -

अ) संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय श्री हावरे साहेब यांनी दि.११/१०/२०१६ रोजी मंदिर परिसर व दर्शनलाईन मध्ये राऊंड घेऊन पाहणी केली असता, दर्शनलाईन मध्ये साईभक्तांसाठी पिण्याचे पाणी वाटप व्यवस्था कायमस्वरुपी सुरु करणेबाबत आदेशीत केल्याने, प्रशासनाकडील तत्कालीन वरिष्ठांचे प्राप्त मौखिक सुचनेनुसार

इकडील विभागाकडून पाणी वाटपासाठी कंत्राटी कर्मचारी मिळणे बाबत दि.१४/१०/२०१६ व दि.२७/१०/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर केला असता त्यावरील प्राप्त निर्देशानुसार, सदर मंजुर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी कामगार विभागाकडे दि.२१/१०/२०१६ व दि.२७/१०/२०१६ रोजी सादर करणेत आला होता.
त्यास अनुसरुन कामगार विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२८८१/२०१६ दि.०९/११/२०१६ अन्वये त्यावेळचे संस्थान मधील ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांना संस्थान मध्ये इतर विभागात कार्यरत असलेले त्यावेळचे ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया व स्पिक अॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचे कडील उपलब्ध असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांमधून प्रतिदिनी १६ कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागास पुरविणे बाबत आदेशीत करण्यात आले होते.

त्यानुसार ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस कॅम्प शिर्डी यांनी प्रसादालय विभागात कार्यरत असलेले ठेकेदार स्पिक अॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचेकडील १६ कंत्राटी कर्मचारी, ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस कॅम्प शिर्डी यांचे मार्फत साईप्रसाद निवासस्थान विभागास पुरविले व सदर कर्मचा-यांची मासिक हजेरीची नोंद साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे ठेवून कर्मचा-यांचे दरमहा मासिक वेतनाचे बील मे.जय भवानी एंटरप्रायजेस कॅम्प शिर्डी यांनी आदा केलेले आहे. सदरचा खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाचे बजेट (कंत्राटी कर्मचारी खर्च) मधून आदा केलेला आहे.

दर्शनलाईनमध्ये साईभक्तांसाठी खालील ठिकाणी पाणीवाटप व्यवस्था आजतागायत सुरु आहे.

| अ.नं. | पॉईंट | कर्मचारी संख्या व डयुटी वेळ ०६/१४ | कर्मचारी संख्या व डयुटी वेळ १४/२२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | शांतीनिवास तळ मजला हॉल स्कॅनर जवळ दोन्ही बाजूने | ०२ | ०२ | ०४ |
| ०२ | शांतीनिवास तळमजला हॉल जनरल बाथरुम जवळ | ०१ | ०१ | ०२ |
| ०३ | भक्तनिवास तळमजला हॉल जनरल बाथरुम समोर | ०१ | ०१ | ०२ |
| ०४ | शांतीनिवास पहिला मजला दोन्ही बाजूच्या जनरल बाथरुम समोर | ०२ | ०२ | ०४ |
| ०५ | भक्तनिवास पहिला मजला जनरल बाथरुम समोर व दक्षिण बाजू गेट जवळ | ०२ | ०२ | ०४ |
| | एकूण कर्मचारी संख्या - | ०८ | ०८ | १६ |

ब) तदनंतर, मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या सुचनेनुसार मालमत्ता विभागाचे दि.२१/१०/२०१६ चे प्राप्त टिपणीत साईप्रसाद निवासस्थान विभागाने मंदिराचे गेट नं.१,२ व ४ या ठिकाणी संस्थान बांधकाम विभागामार्फत जागा निश्चित करुन तेथे मोफत चप्पल स्टॅंड सुरु करणे बाबत ठरल्याने, त्यासाठी आवश्यक कंत्राटी कर्मचा-यांची कामगार विभागाकडून नेमणूक करुन घेणे बाबत इकडील विभागास आदेशीत केले होते.

त्यानुसार इकडील विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-साप्रनि/२९४७/२०१६ दि.१०/११/२०१६ चे पत्राने चप्पल स्टॅंड करीता १२ कंत्राटी कर्मचारी मिळणे बाबत कामगार विभागास पत्राने कळविणेत आले होते.

कामगार विभागाने जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३०२४/२०१६ दि.१७/११/२०१६ अन्वये त्यावेळचे संस्थान मधील ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांना संस्थान मध्ये इतर विभागात कार्यरत असलेले त्यावेळचे ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया व स्पिक अॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचे कडील उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांमधून प्रतिदिनी १२ कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागास पुरविणे बाबत आदेशीत करण्यात आले होते.

त्यानुसार कामगार विभागाचे आदेशान्वये ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांनी प्रसादालय विभागात कार्यरत असलेले ठेकेदार स्पिक अॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचेकडील १२ कंत्राटी कर्मचारी, ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांचे मार्फत साईप्रसाद निवासस्थान विभागास चप्पल स्टॅंड व्यवस्थेकामी पुरविले व सदर कर्मचा-यांची मासिक हजेरीची नोंद साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे ठेवून

कर्मचा-यांचे दरमहा मासिक वेतनाचे बील मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांनी आदा केलेले आहे. सदरचा खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाचे बजेट (कंत्राटी कर्मचारी खर्च) मधून आदा केलेला आहे.

क) मालमत्ता विभागाकडील प्रस्तावावर दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.३५५ नुसार "पादत्राणे गृह, बॅग, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा सोसायटीस पुढील अटीवर चालविणेस देण्यात याव्या. पादत्राणे गृह व बॅग क्लोक रुम या सुविधा सोसायटीने विनामुल्य चालवाव्यात व मोबाईल / कॅमेरा यासाठी प्रति नग रु.०५/- मात्र आकारणेत यावा" असे ठरल्याने, गेट नं.०१ व १६ गुंठे येथे संस्थान मार्फत सुरु असलेले चप्पल स्टॅंड सोसायटीकडे वर्ग केले.

दरम्यानच्या काळात दि.२०/०८/२०१७ व दि.२९/०९/२०१७ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मंदिर परिसरात घेतलेल्या राऊंड मध्ये मंदिर परिसरात ठिक-ठिकाणी साईभक्तांकरीता पाणीवाटप व्यवस्था सुरु करणे बाबत सुचना दिल्याने, इकडील विभागाकडून दि.०२/०१/२०१८ रोजी प्रस्ताव सादर करुन, चप्पल स्टॅंड कडील १२ कंत्राटी कर्मचारी मंदिर परिसरात खालील ठिकाणी नव्याने सुरु करण्यात आलेल्या पाणीवाटप पॉईंटवर नेमणेकामी सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात आल्याने खालील प्रमाणे कार्यवाही सुरु करणेत आली.

| अ.नं. | पॉईंट | कर्मचारी संख्या व ड्युटी वेळ ०६/१४ | कर्मचारी संख्या व ड्युटी वेळ १४/२२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | व्ही.आय.पी.गेट नं.०२ बाहेरुन | ०१ | ०१ | ०२ |
| ०२ | अब्दुलबाबा समाधी जवळ | ०२ | ०२ | ०४ |
| ०३ | गेट नं.०४ समोर आतील बाजू | ०१ | ०१ | ०२ |
| ०४ | १६ गुंठे परिसर | ०१ | ०१ | ०२ |
| ०५ | जुने प्रसादालय बायोमॅट्रीक काऊंटर जवळ | ०१ | ०१ | ०२ |
| | एकूण कर्मचारी संख्या - | ०६ | ०६ | १२ |

वरील अ व क मधील प्रसादालय विभागाकडील एकूण २८ कंत्राटी कर्मचारी त्यावेळचे संस्थान मधील ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांचे मार्फत कामगार विभागाचे आदेशाने पुरविणेत येत होते.

कामगार विभागाकडील जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२५३२/२०१८ दि.२२/११/२०१८ चे आदेशान्वये उपरोक्त २८ कंत्राटी कर्मचारी दि.०१/१२/२०१८ पासून श्री साईप्रसादालय विभागाकडील कार्यरत असलेले ठेकेदार मे.स्पिक अ‍ॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचेकडे वर्ग करण्यात आलेत.

सदर कर्मचा-यांचा मासिक वेतन खर्च प्रसादालय विभागाचे बजेट (कंत्राटी कर्मचारी खर्च) मधून आदा केला जात होता. सदरची कार्यवाही दि.१४/०९/२०१९ पर्यंत व्यवस्थीत चालू होती. संबंधीत ठेकेदार यांनी इकडील विभागास भेट देवून दि.१४/०९/२०१९ रोजी मे. स्पिक अ‍ॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस मुंबई यांच्या कामकाजाची मुदत संपली असल्याने दि.१५/०९/२०१९ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणीवाटपासाठी कर्मचारी पुरवू शकणार नाही याची माहिती असावी असे समक्ष सांगीतले.

त्यास अनुसरुन मंदिर परिसरात साईभक्तांकरीता पिण्याचे पाण्याची व्यवस्था सुरु राहणेकरीता इकडील विभागाकडून दि.१७/०९/२०१९ रोजी खालील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता.

**१.** उपरोक्त ठिकाणी साईभक्तांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये याकरीता कामगार विभागामार्फत प्रतिदिनी २८ कंत्राटी कर्मचारी तातडीने इकडील विभागास पुरविणेस आदेश होणेस विनंती.

**२.** उपरोक्त ठिकाणी साईभक्तांची पिण्याची पाण्याची गैरसोय होऊ नये याकरीता कामगार विभागाकडून कर्मचारी मिळणेपर्यंत तूर्त प्रतिदिनी ४० साईसेवक मिळावेत.

**३.** प्रसादालय विभागाकडून पाणीवाटपासाठी पुरविणेत आलेल्या २८ कंत्राटी कर्मचारी पुर्ववत प्रसादालय विभागाकडील ठेकेदार यांच्याकडे वर्ग करणेस मान्यता घेणेत आली.

वरील प्रमाणे प्रस्तावास दि.१७/०९/२०१९ रोजी मान्यता मिळालेने, सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव कामगार विभागाकडे पाठविण्यात आला.

त्यास अनुसरुन कामगार विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/१७३३/२०१९ दि.३०/१०/२०१९ ने प्रसादालय विभागाकडील नवीन ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी अ‍ॅण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई यांना दि.१५/०९/२०१९ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागास पाणी वाटपासाठी २८ कंत्राटी कर्मचारी पुरविणेत

यावेत व त्यांची वेतन बीले मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई यांनी तयार करुन, प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान व प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय विभाग यांचे मार्फत लेखाशाखा विभागाकडे पुर्वीचेच प्रचलित पद्धतीने सादर करणे बाबत आदेशीत केले आहे.

सदर आदेशास अनुसरुन ठेकेदार यांनी पाणीवाटप कर्मचा-यांचे दि.१५/०९/२०१९ ते दि.३१/१०/२०१९ अखेर किमान वेतनदराप्रमाणे ॲडव्हांस वेतन आदा केले आहे.

सदर ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि, मुंबई यांनी कंत्राटी कर्मचा-यांचे प्रचलित पद्धतीने वेतन आदा करणेस असमर्थता दर्शविली असून त्यांनी संस्थान आवक.नं.१४६२६ दि.१८/१२/२०१९ चे पत्रात प्रसादालयाच्या दराप्रमाणे (अकुशल कामगारांना प्रत्येकी दरमहा रु.१२७५०/-) हा दर श्री साईप्रसादालय हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल ई-निवीदेतील BOQ-B व प्रसादालयाकडील कार्यादेशा नुसार कामगार खर्च (अकुशल कर्मचारी किमान वेतन, गणवेश, सानुग्रह अनुदान, ओळखपत्र, वर्कमॅन कॉम्पनसेशन व प्रा.फंडासह इत्यादि सर्व करासहीत) मंजूर दर आहे याप्रमाणे वेतन मिळणे बाबत पत्रात विनंती केली असून तसा लिखीत स्वरुपात कार्यादेश मिळणे बाबत मागणी केली आहे. त्यामुळे सदर कर्मचा-यांचे माहे नोव्हेंबर २०१९ ते मार्च २०२० अखेर एकूण ०५ माहिन्यांचे पगार अद्याप आदा करता आलेले नाही.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– वरील सर्व संदर्भांचा विचार करता सदर २८ कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन सध्या प्रसादालयाकडील ई-निवीदा कालावधी दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर एक वर्ष पर्यंत असल्याने, खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल असे मत आहे.

अ) सदर पाणीवाटपकडील २८ कंत्राटी कर्मचारी यांचा साईप्रसादालयाकडील दैनंदिन वाढपी कामासाठी लावण्यात येणा-या कामगारांमध्ये समावेश करण्यात येऊन (प्रसादालय ई-निवीदा अटी-शर्ती ७२ नुसार) प्रसादालयाकडून सदर कामासाठी प्रतिदिनी २८ कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे (प्रसादालय टेंडर कालावधी दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर एक वर्ष कालावधीसाठी) पाणीवाटपासाठी घेता येतील व त्याबाबचा कार्यादेश संबंधीत ठेकेदार यांना प्रसादालय विभागामार्फत देता येईल.

ब) सदर २८ पाणीवाटप कंत्राटी कर्मचा-यांचा नियमित श्री साई प्रसादालयाकडील दरवर्षी निघणा-या ई-टेंडर प्रक्रियेत प्रचलित पद्धतीने समावेश करणेस,

क) दि.०८/०१/२०२० चे प्रस्तावातील निर्देशास अनुसरुन मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय व प्रसादालयाकडील सन २०१९-२० चे निवीदेतील मंजुर दरानुसार सदर २८ कंत्राटी कर्मचा-यांसाठीचा मासिक वेतन खर्च (एका कर्मचा-याकरीता दरमहा रु.१२,७५०/-) प्रमाणे २८ पाणीवाटप कंत्राटी कर्मचा-यांसाठी दरमहा एकूण रु.३,५७,०००/- प्रमाणे निवीदा कालावधीसाठी (दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर) खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१. दि.१५/०९/२०१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर जी.एस.टी.सह एकूण खर्च रक्कम रु.२७,५२,२३२/- मात्र होणार असून सदर खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील कंत्राटी कर्मचारी सन २०१९-२० चे मंजुर अंदाजपत्रकातून करता येईल.

२. दि.०१/०४/२०२० ते दि.१४/०९/२०२० अखेर जी.एस.टी.सह एकूण खर्च रक्कम रु.२३,०२,८८८/- मात्र होणार असून सदर खर्च मान्यतेसाठी सन २०२०-२१ चे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील पाणीवाटप कंत्राटी कर्मचारी यांचे अंदाजपत्रकातून करता येईल.

वरील अ.नं. १ मधील रक्कम रु.२७,५२,२३२/- मात्र + अ.नं २ मधील रक्कम रु.२३,०२,८८८/- मात्र अशी एकूण रक्कम रु.५०,५५,१२०/- (अक्षरी–पन्नास लाख, पंच्चावन हजार, एकशे वीस मात्र) खर्चास,

तरी उपरोक्त अ, ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस व सदर खर्चाला मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.२७६** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-साई प्रसाद निवासस्थान)**

---

**विषय नं.४३** **६३५ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी नियुक्ती आदेश स्विकारलेल्या ५९८ कंत्राटी कर्मचाऱ्यांची मंजुरी संबधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांच्या मंजुर संख्येतून कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका –

अ-१) तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये, संस्थान प्रशासनाकडील दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर,

२००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला.

या प्रस्तावाचे अनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय पारित केलेला आहे.

अ-२) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "

अ-३) उपरोक्त विवेचनानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत-

तक्ता क्रमांक ०१

| अ.नं. | तपशील | संख्या | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| (अ) | दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांची संख्या | ६३५ | -- |
| ०१ | यादीत एक नांव दोन वेळेस आलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्री. रविंद्र भडांगे यांचे नांव यादीतील अ.नं.५० आणि अ.नं. ५४ वर ही आलेले आहे, त्यापैकी यादीतील अ. नं. ५० नुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला आहे. |
| ०२ | यादीतील ६० वर्षे वयोमान पूर्ण केलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्रीमती पंचफुला राठोड (यादीतील अ.नं.०२) वयोमान ६० वर्षे पूर्ण झाल्याने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला नाही. |
| ०३ | यादीतील मयत झालेले कंत्राटी कर्मचारी | ००२ | श्री. दिवेकर (यादीतील अ.नं.६०) व श्री. कसबे (यादीतील अ.नं.५६४) हे मयत असल्या कारणाने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत. |
| ०४ | यादीतील दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतरचे कंत्राटी कर्मचारी | ००८ | सदरचे कंत्राटी कर्मचारी हे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर हजर झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देणेत आलेले नाहीत. (यादीतील अ.नं. ५७२, ५७४, ५७६, ५७७, ६३२, ६३३, ६३४ व ६३५ ) |
| ०५ | यादीतील सतत गैरहजर | ००७ | कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे |

| | | | |
|---|---|---|---|
| | असणारे कर्मचारी | | आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत अलाहिदा कार्यवाही सुरु आहे. या २५ कंत्राटी कर्मचा-यांपैकीतसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांची नांवे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीत आहेत, परंतु सध्या कामावर हजर नाहीत अशा कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत (यादीतील अ.नं. ८९, १७२, २४०, ४९१, ५०४, ६०० व ६११) |
| ०६ | यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४) या कालावधीत कामावर नसणारे कर्मचारी | ०१५ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारे परंतु माहे डिसेंबर, २००० पुर्वी कामावर हजर असणारे कर्मचारी.<br>(यादीतील अ.नं.३, ४, ९, २७, ४८, ८२, ८४, १०५, ११४, ११६, १२२, १२९, १४९व १६९) |
| (ब) | एकूण (अ.नं.०१ ते ०६) | ०३४ | -- |
| (क) | पारित करणेत आलेले आदेश ((अ) –(ब)) | ६०१ | दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील ६०१ पात्र कर्मचा-यांना आदेश पारित करणेत आले. |
| (ड) | यादीत समाविष्ट आहेत परंतु नियुक्ती आदेश स्वीकारले नाही असे कर्मचारी | ००३ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्यायादीनुसार हजर दिवस व कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले होते परंतु काही कारणास्तव नियुक्ती आदेश स्वीकारले नाहीत असे कर्मचारी.<br>(यादीतील अ.नं.७६, ९० व ५३३ ) |
| (इ) | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले एकूण कंत्राटी कर्मचारी<br>एकूण (क-ड) | ५९८ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर कामावर असलेले) या कालावधीतील हजर दिवस आणि कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले असून, सदर कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. |

अ-४) उपरोक्त परिच्छेद अ-३ मधील, तक्ता क्रमांक ०१(इ) मध्ये नमुद केलेप्रमाणे, कंत्राटी कर्मचा-यांना पारित करणेत आलेल्या नियुक्ती आदेशातील कर्मचा-यांचा विभागाप्रमाणे व प्रकारानुसार (कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी) यानुसार थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

तक्ता क्रमांक ०२

| अ. नं. | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले कंत्राटी कर्मचारी | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| ०१ | ५९८ | ०८७ | ५११ | ५९८ | ५६३ | ०३५ | ५९८ |

तक्ता क्रमांक ०३

| अ.नं. | विभागाचे नांव | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| 1 | 2 | 3 | 4 | (3+4)=5 | 6 | 7 | (6+7)=8 |
| ०१ | सामान्य प्रशासन विभाग | ०१ | ०६ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| ०२ | जनसंपर्क विभाग | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| ०३ | लेखाशाखा | १० | ०२ | १२ | १२ | ०० | १२ |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०२ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | ०४ |
| ०५ | मंदिर विभाग | ०१ | २५ | २६ | २६ | ०० | २६ |
| ०६ | प्रकाशने विभाग | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ०७ | आरोग्य विभाग | ०२ | ९० | ९२ | ८५ | ०७ | ९२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | संरक्षण विभाग | ०२ | १४३ | १४५ | १३५ | १० | १४५ |
| ०९ | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| १० | बांधकाम विभाग | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| ११ | पाणीपुरवठा विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| १२ | बगीचा विभाग | ०० | ०३ | ०३ | ०२ | ०१ | ०३ |
| १३ | विद्युत विभाग | १४ | ०२ | १६ | १६ | ०० | १६ |
| १४ | मेकॅनिकल विभाग | ०३ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १५ | ध्वनिक्षेपण विभाग | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| १६ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १७ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | ०० | १४ | १४ | १४ | ०० | १४ |
| १८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | ०१ | १० | ११ | ११ | ०० | ११ |
| १९ | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | ०२ | ०१ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| २० | श्री साई आश्रम विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| २१ | श्री साई धर्मशाळा | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०० | ०२ |
| २२ | श्री साई प्रसादालय | ०२ | ७७ | ७९ | ७६ | ०३ | ७९ |
| २३ | कॅन्टिन विभाग | ०२ | ३६ | ३८ | ३८ | ०० | ३८ |
| २४ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०१ | ०७ | ०८ | ०८ | ०० | ०८ |
| २५ | भांडार विभाग | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २७ | वाहन विभाग | १३ | ०३ | १६ | १६ | ०० | १६ |
| २८ | मुंबई कार्यालय | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २९ | श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल | ०४ | ०३ | ०७ | ०२ | ०५ | ०७ |
| ३० | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ३१ | श्री साईनाथ रुग्णालय | ०६ | २३ | २९ | २४ | ०५ | २९ |
| ३२ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४ | ३७ | ४१ | ३८ | ०३ | ४१ |
| | **एकूण** | **८७** | **५११** | **५९८** | **५६३** | **३५** | **५९८** |

उपरोक्त परिच्छेद अ-४ मध्ये नमूद केलेप्रमाणे संबंधित विभागांना ५९८ कंत्राटी कर्मचारी विभागनिहाय कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमून देण्यात आलेले असून, सदरचे कंत्राटी कर्मचारी सध्या त्या-त्या विभागाकडे कार्यरत आहेत.

ब-१) कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत- विषयांकित प्रस्तावास अनुसरुन विवेचन असे की, सन २०१९-२० मध्ये कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबतकंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांना खालीलप्रमाणे कार्यादेश पारित करणेत आलेले आहेत –

तक्ता क्रमांक ०४

| अ.नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी | कार्यादेशात नमूद केलेली कंत्राटी कर्मचारी मंजूरी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे | जा.नं.एसएसएस/वशवशी - ७ए/ २३०४/ २०२०, दि.१३.०९.२०२० | दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० | ६६९ | २२३ | ८९२ |
| ०२ | मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे | जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/२३०५/ २०२०, दि.१३.०९.२०२० | दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० | ४०४ | ४८८ | ८९२ |
| | | | **एकूण -** | **१०७३** | **७११** | **१७८४** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेलेप्रमाणे दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर संबंधित कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांनी त्यांचेकडेस विभागून देणेत आलेल्या विभागांना कंत्राटी कर्मचारी पुरविलेले आहेत.

ब-२) उपरोक्त परिच्छेद अ मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, उपरोक्त कंत्राटी कर्मचारी ठेकेदारांकडे कार्यरत असणा-या कंत्राटी कर्मचा-यांपैकीच ५९८ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना संस्थानचे आस्थापनेवरील रिक्त असणारे कंत्राटी कर्मचारी पदांवर विभागनिहाय नेमून देणेत आलेले आहेत. त्यामुळे उपरोक्त कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांना पारित करणेत आलेल्या कार्यादेशातील कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांची मंजूर संख्येमध्ये कपात करावी लागणार आहे.

त्यास अनुसरुन, सोबत,संबंधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांचे मूळ कार्यादेशातील नमूद केलेल्या मंजूर कंत्राटी कर्मचारी संख्येतून कमी करावयाची कंत्राटी कर्मचारी संख्या दर्शविणारा सुधारित मंजुरीबाबतचा सविस्तर तक्ता " परिशिष्ट – अ" म्हणून सादर केला आहे.

सुधारित कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी मंजुरीबाबत " परिशिष्ट–अ" नुसार उपरोक्त परिच्छेद ब-१ मधील तक्ता क्रमांक ०४ मधील संबंधित कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांना लेखी पत्राव्दारे कळविता येईल, असे मत आहे.

क-१) कुशल/अकुशल सुरक्षारक्षक, माजी सैनिक सुरक्षारक्षक, बंदूकधारी सुरक्षारक्षक कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत -

सन २०१९-२० मध्ये कुशल/अकुशलसुरक्षा रक्षक, माजी सैनिक सुरक्षारक्षक, बंदूकधारी सुरक्षारक्षक पुरविणेबाबत सन २०१९ मध्ये निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती. या निविदेत संरक्षण विभागाचे मागणीनुसार ८१५कंत्राटी कुशल / अकुशल सुरक्षा रक्षक व इतर सुरक्षारक्षकपुरविणेबाबत नमूद केलेले होते.

तथापि, दरम्यानचे कालावधीत परिच्छेद अ मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, संरक्षण विभागात १४५ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना नियुक्ती देणेत आलेली आहे. या नियुक्त्यांचा विचार करुन, मा.तदर्थ समितीचे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७४ नुसार खाली नमूद केलेल्या कंत्राटी सुरक्षारक्षक कर्मचारी कंत्राटदारांना सुधारित प्रशासकीय मंजरीनुसार कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे –

तक्ता क्रमांक ०५

| दि.१०.०६.२०१८ ते दि.२९.०२.२०२० अखेर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कार्यादेशात नमुद केलेली मंजूर कंत्राटी सुरक्षाक्षक संख्या | | |
| | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई | जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५०/ २०१८, दि.०८.०६.२०१८ | ७४८ | ६७ | ८१५ |

| दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१अखेर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कार्यादेशात नमुद केलेली मंजूर कंत्राटी सुरक्षाक्षक संख्या | | |
| | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि. पुणे | जा.नं.एसएसएस/वशी७ए/४६५६ / २०२०, दि.२६.०२.२०२० | ३०३ | ५० | ३५३ |
| ०२ | मे.ईगल हंटर सोल्युशन लि. नवी दिल्ली | जा.नं.एसएसएस/वशी७ए/४६५७ / २०२०, दि.२६.०२.२०२० | ३२६ | १५ | ३४१ |

क-२) थोडक्यात, उपरोक्तपरिच्छेद क-१ मधील तक्ता क्रमांक ०५ मध्ये नमूद केलेप्रमाणे, संबंधित कंत्राटी सुरक्षारक्षक कर्मचारी पुरविणारे दोन ही कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांना सुधारित मंजूर संख्येनुसारम्हणजेच मूळ निविदेत नमुद केलेल्या केलेल्या ८१५ या मंजूर संख्येत कपात करुन / कमी करुन कार्यादेश पारित करणेत आलेले आहेत आणि सदर संबंधितांनी त्यानुसार कार्यादेश स्वीकारुन, दिनांक ०१ मार्च, २०२० पासून कामकाजास सुरुवात ही केलेली आहे.

ड) विषयांकितप्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ, ब व क मध्ये नमूद केलेल्या सविस्तर विवेचनानुसार खालीलप्रमाणे प्रस्तावित करणेत येत आहे -

०१) कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणारे ठेकेदारमे.बी.व्ही.जी.इंडिया, पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना सोबतचे, परिशिष्ट अ मध्ये तसेच खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे सुधारित कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी संख्येस मान्यता मिळालेनंतर सुधारित कार्यादेश पारित करणेस मान्यता असावी.

| अ.नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी | मंजूर करावयाची सुधारित कंत्राटी कर्मचारी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे | जा.नं.एसएसएस/वशी -७ए/२३०४/ २०२०, दि.१३.०९.२०२० | दि.०१/०३/२०२० ते दि.३०/०९/२०२० | ४१५ | १६९ | ५८४ |
| ०२ | मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे | जा.नं.एसएसएस/वशी -७ए/२३०५/ २०२०, दि.१३.०९.२०२० | दि.०१/०३/२०२० ते दि.३०/०९/२०२० | २९० | ३९१ | ६८१ |
| | | | **एकूण -** | **७०५** | **५६०** | **१२६५** |

०२) उपरोक्त परिच्छेद क-१ व क-२ मध्ये नमुद केलेप्रमाणे कुशल / अकुशल सुरक्षारक्षक, माजी सैनिक सुरक्षारक्षक व बंदूकधारी सुरक्षारक्षक पुरविणेकामी सुधारित मंजूर संख्येनुसार कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारमे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.पुणे आणि मे.ईगल हंटर सोल्युशन लि. नवी दिल्ली यांना पारित करणेत आलेल्या कार्यादेशांना मान्यता असावी.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे विचारार्थ / निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२७७** **आजचे सभेच्या अजेंडयावरील विषय नं.०१ ,०२,४३ व ६३ या विषयांवरील एकत्रित निर्णय क्र.२३५ सदर इतिवृत्ताचे शेवटी परिशिष्ट "अ" म्हणून जोडलेला आहे.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.४४** **ॲड राजेंद्र पांडूरंग फाटके यांची श्री साईबाबा संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नियुक्ती होणेबाबतचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा यांचे दि.१४/२/२०२० रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असुन त्यात त्यांनी ''ॲड.राजेंद्र पांडूरंग फाटके हे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये सन १९९० पासुन वकिली व्यवसाय करत आहेत. त्यांनी मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी ता. राहाता जि.अहमदनगर यांचे वतीने पॅनल ॲडव्होकेट म्हणुन नियुक्ती होणेकरीता दिलेला अर्ज सोबत जोडत आहे. कृपया, ॲड. राजेंद्र फाटके यांची श्री साईबाबा संस्थानचे वतीने ॲडव्होकेट म्हणुन नियुक्ती होणेकरीता नियमानुसार कार्यवाही करावी. ही विनंती.'' असे नमुद करण्यात आलेले आहे. तथापी त्यांचे पत्रासोबत सदरचा विनंती अर्ज जोडलेला आढळुन आलेला नव्हता सदरचे पत्राबाबत इकडील विभागामार्फत दि.१२/०३/२०२० रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदयांनी ''अर्जदारांचा अर्ज मागवावा'' असे निर्देश दिले होते. त्यानुसार राजेंद्र पी. फाटके, ॲडव्होकेट उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचा दि.२०/०३/२०२० रोजीचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाला असुन त्यात त्यांनी '' With reference to above mentioned subject, I have to inform you that I am practicing in the Hon'ble High Court Judicature at Bombay Bench at Aurangabad since last about 30 years. I have conducted all types of Civil, Criminal, Service, Labour as well as the Arbitration matters before the Hon'ble High Court. Apart from above, I have also worked as Assistant Government Pleader/ Additional Public Prosecutor for the period from 1998 to 2005 and the Additional Government Pleader/ Additional Public Prosecutor for the period from 2009 to 2015, In the office of the Government Pleader/ Public Prosecutor, High Court Judicature at Bombay Bench at Aurangabad. Also, I have also worked as a Central Government Counsel/Standing Counsel of Union of India for the period from 2006 to 2014. I have adequate experience of conducting all types of matters before the Hon'ble High Court. For your ready reference I

am annexing herewith my Bio Data. I, therefore request you to appoint me on your Panel of Advocates and I may be appointed as Panel Advocate for conducting the matters before the Hon'ble High Court of Bombay Bench at Aurangabad for and on behalf of ShriSaibabaSansthan Trust, Shirdi." असे नमुद केले आहे. तसेच सदरचे अर्जासोबत बायोडाटा जोडलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी चे वतीने विविध मा.न्यायालयामध्ये दाव्यांचे कामकाज पहाणेकामी मा. व्यवस्थापन समिती मध्ये विषय सादर करुन समितीचे मान्यतेने सध्या पॅनलवर एकुण ३३ वकीलांची नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यापैकीश्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे ॲडव्होकेट पॅनलवर मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे कामकाज करणेकरीता खालिलप्रमाणे वकिलांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नाव |
|---|---|
| १ | ॲड. श्री.आर.एन. धोर्डे, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) |
| २ | ॲड. श्री.अनिल बजाज, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) |
| ३ | ॲड. श्री.विनायक होन, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) |
| ४ | ॲड. श्री.नितिन भवर, औरंगाबाद |
| ५ | ॲड. श्री.संजय आर. चौकीदार, औरंगाबाद |
| ६ | ॲड. श्री.राजेंद्र रघुवंशी, औरंगाबाद (सध्या औरंगाबाद येथे प्रॅक्टीस करत नाही.) |
| ७ | ॲड. श्री.बाबासाहेब वाघ, औरंगाबाद(यांची न्यायाधीश म्हणून नेमणूक झालेली आहे. ) |
| ८ | ॲड. श्री.संदिप एकनाथ गोंदकर, शिर्डी |

उपरोक्त पैकी अ.नं.१ ते ३ हे सिनियर कौन्सील असुन सध्या प्रामुख्याने अ.नं.४ ॲड.नितिन भवर यांचे मार्फतच बहुतेक कोर्ट केसचे कामकाज सुरु आहे तथापी ॲड नितीन भवर,औरंगाबाद यांचेवर क्रिमिनल केस दाखल झालेली असल्याने ते कोर्ट कामाकाजामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेत नसुन त्यांचे वतीने त्यांचे सहाय्यक वकील ॲड.अविनाश खेडकर हे कामकाज पाहात आहे. तसेच काही कोर्ट केसेसचे कामकाज ॲड चौकीदार यांचेमार्फत सुरु आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे पॅनलवर नव्याने ॲडव्होकेट नेमणे गरजेचे आहे.

ॲड.राजेंद्र फाटके यांची मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने कोर्ट केसचे कामकाज पाहणेकामी संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक करणेकरीता त्यांना मा. तदर्थ समितीचे बैठकीमध्ये मुलाखतीसाठी समक्ष बोलावले असून, ॲड. फाटके यांची मुलाखत घेवून संस्थानचे पॅनलवर नेमणूक करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कोर्ट कामकाजाकरीता नव्याने ॲडव्होकेट पॅनल नेमणूक करतेवेळी ॲड राजेंद्र फाटके यांना अर्ज करण्यास सांगण्यात यावे, व त्यांचा हा अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.४५** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामाचा आकस्मित पाहणी अहवाल.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम – २००४ मधिल तरतूद –

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिर प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडणेसाठी सोयी व सुविधा पुरविणे अशी तरतूद आहे.

प्रास्ताविक- मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दि.१३/१२/२०१८ रोजीच्या सभेतील --

विषय नं. ७ – शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रु.४२,५१५९९/- प्रमाणे प्रतिमहा अर्थसहाय्य मंजुरीचे शासन निर्णयाचे अवलोकन होणेबाबत.

निर्णय क्र.७३४–यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र. सासवि.-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि.०७ एप्रिल २०१८ मध्ये शासन शुध्दीपत्रक क्र. सासंवि-१०१८/१७९/

प्र.क्र.२० का.१६ दि.२२.११.२०१८, अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी, यांच्या कडुन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि.०१.१२.२०१७ पासून दरमाहा रु.४२५१५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच शिर्डी नगरपंचायतीस दि.०१.१२.२०१७ ते ३०.१०.२०१८ या ११ महिने कालावधीत रक्कम रु.३०.०० लक्ष प्रतिमाहा याप्रमाणे रक्कम रु.३,३.,००,०००/- वितरीत करण्यात आलेले आहे. शासनाचे दि.२२.११.२०१८ च्या शुध्दीप्रकानुसार दि.०१.१२.२०१७ ते दि.३०.१०.२०१८ या ११ महिने कालावधीतील फरकाची रक्कम रु.१,३७,५८९/- मात्र शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करणेत मान्यता देण्यात आहली. सदरची कार्यवाही दि.०१.०१.२०१९ नंतर करावी.

तथापी सदर अनुदानाचा विनियोग योग्य पध्दतीने होत आहे किवा नाही, नगरपंचायतीने काढलेल्या निविदेतील अटी शर्ती प्रमाणे व कामाच्या व्यक्तीप्रमाणे (Scope Of Work)कार्यवाही ठेकेदाराकडुन केली जाते किवा नाही, तसेच शहरात होणा-या स्वच्छतेबाबत नागरिकांचे अभिप्राय घेणेसाठी संस्थानच्या प्रशासकिय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचा-यांसह एक समिति करण्यात यावी. या समितीने सदर कामचे दरमहा परिक्षण करावे व त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रत्येक तिमाहीस व्यवस्थापन समितीचे सभेस सदर करावा.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, यांचेकडून शिर्डी नगरपंचायतीस, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छतेची कामे करण्यासाठी दरमहा रु.४२,५१,९९९/- इतके अनुदान देण्यात येत असते, स्वच्छता कामी शिर्डी नगरपंचायतीने नेमलेल्या ठेकेदारामार्फत होणारी साफसफाईची कामे करारनाम्यातील अटी शर्ती नुसार होतात किंवा कसे? या बाबत आकस्मित पाहणी करण्यासाठी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे.

सदर समिती शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या नगर मनमाड रोड, हॉटेल कला साई ते शांताई हॉटेल रोड, पालखी रोड, पिपंळवाडी रोड, दत्त नगर, माऊली नगर, एच.पी.गॅस रोड, हॉटेल सन ॲण्ड सॅन रोड, हॉटेल गणपती पॅलेस रोड, हॉटेल सेंट लॉर्न्स रोड, बाजार तळ व परिसर, संभाजीनगर, कालिकानगर, बिरेगाव रोड, सातभाई मळा रोड, पानमळा रोड, शिर्डी विमानतळ रोड, श्री रामनगर, पाण्याची टाकी कनकुरी रोड, प्रसादालयासमोरील रिंग रोड, लक्ष्मीनगर व लक्ष्मीनगर नाला इ. रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची आकस्मिक पहाणी करण्यात येऊन, पहाणी अहवाल व्यवस्थापनास सादर करण्यात येतो.

सदर पहाणी अहवालामध्ये खालील बाबींचा समावेश असतो.

| अ.न | कामाचे नाव | कामाचा तपशील | तपशील |
|---|---|---|---|
| १ | एकूण कर्मचारी | दैनंदिन स्वच्छता करण्यासाठी प्रत्यक्ष किती कर्मचारी उपलब्ध होते? | दैनंदिन स्वच्छतेसाठी प्रत्यक्ष १५६ कर्मचारी (हजेरी मसटर वरुन दिवस पाळी मध्ये १०६ व रात्र पाळी मध्ये ५०) काम करतात. |
| २ | एकूण घंटागाडी | कचरा गोळा करण्यासाठी किती घंटागाडी उपलब्ध होत्या? | कचरा गोळा करण्यासाठी १७ घंटागाडी उपलब्ध होत्या |
| ३ | एकूण ट्रॅक्टर | कचरा गोळा करण्यासाठी किती ट्रॅक्टर उपलब्ध होते? | कचरा गोळा करण्यासाठी एकुण प्रत्यक्ष ५ ट्रॅक्टर उपलब्ध होते. |
| ४ | जंतुनाशक औषध फवारणी मिनी ट्रॅक्टर व टॅंकर | संपूर्ण शहरात दररोज नामांकित कंपनीचे औषधे वापरुन यांत्रिक पद्धतीने जंतुनाशक फवारणी केली जाते काय? फवारणीबाबत शेडयुल तयार केले आहे काय? किती दिवसांनी परत फवारणी करण्यात आली, औषध फवारणीसाठी किती ट्रॅक्टर व कोणत्या प्रभागात किती तारखेला झाली. याची तपशीलवार माहिती घ्यावी व प्रत्यक्ष स्थानिक नागरिकांकडून याबाबत तपासणी करून फवारणी झाली आहे काय? फॉगींगसाठी कोणत्या कंपनीचे औषध वापरण्यात आले? मशीनची सद्यस्थिती काय आहे? | **होय**, दरमहा सर्व १७ वार्ड मध्ये मॅलेथिऑन किटकनाशक औषधाची फवारणी नियमितपणे केली जाते, औषध फवारणीबाबत संबधित प्रभागातील रहीवाश्यांकडून फवारणी झालेबाबत स्वतंत्र रजिस्टरवर स्वाक्षरी घेण्यात येते, मशिनची सद्यस्थिती चांगली असुन कार्यान्वीत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | रोड स्विपींग मशीन | कोणकोणत्या रस्त्यांचा समावेश केलेला आहे व त्याचा दैनंदिन वापर चालू आहे काय ? दरारोज किती रस्त्यांची स्वच्छता केली जाते. | **दिवसपाळी** मध्ये सन ॲन्ड सॅन्ड रोड, भाग्यलक्ष्मी रोड, रुई रोड, गणपति पॅलेस रोड, झेड.पी. शाळा रोड, नारायणबाबा आश्रम रोड, पिंपळवाडी रोड साईश हॉटेल ते एच.पी गॅस पर्यंत, सिटी मार्केट रोड, कालिका नगर रोड, संभाजी नगर रोड व **रात्रपाळी** मध्ये आरबीएल बॅंक ते झुलेलाल मंदिर, स्वराज हॉटेल ते अंबेडकर नगर, कनकुरी रोड नगरपलिका कॉर्नर ते श्रीराम नगर उर्दु शाळा, नांदुर्खी रोड, नगर मनमाड हायवे सिध्दांत हॉटेल ते साई आश्रम १ पर्यंत, साईआश्रम कॉर्नर ते किज हॉटेल, किज हॉटेल ते पाचशे रुम पाण्याची टाकी, एकुण २० रस्ते अंदाजे दररोज ५५ कि.मी. |
| ६ | पुरवठा व फवारणी | कोणत्या तारखेला कोणत्या प्रभागात झाली, पहाणी दरम्यान फवारणी चालू होती काय. नियमीत चालू आहे काय? | प्रभागवार औषध फवारणी नियमितपणे केली जाते.(सोबत छायांकित प्रत जोडलेले आहे.) |
| ७ | कार्बोलीक पावडर | दररोज किती बॅग कार्बोलिक पावडर वापरल्या, बॅग नं. पुरवठा धारकाचे बील. | दररोज ४ बॅग (२५ किलो प्रति बॅग X ४ बॅग = १०० किलो) वापर करण्यात येतो. |
| ८ | जेसीबी पुरवठा प्रती महिना | जेसीबी वापर कोणत्या कामासाठी दररोज वापरला जातो. दररोज आवश्यकता आहे काय? | जेसीबीचा वापर संकलित केलेला कचरा डंपरमध्ये भरणेकामी करण्यात येतो, या कामी जेसीबी आवश्यकतेप्रमाणे वापरले जात आहे. |
| ९ | डंपीग ग्राऊंड भाडे (मासिक) | नियमीत चालू आहे काय? | होय, दरमहा रु.१,५०,००००/- |
| १० | कचरा वाहतुक | कचरा वाहतुकीसाठी किती व कोणती साधने उपलब्ध आहेत. | बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे यांचेमार्फत खालीलप्रमाणे वाहने वापरण्यात येतात<br>(1) TATA ACE घंटागाडी – १७<br>(2) Tractor & Hydraulic Trolley- ५<br>(3)Truck Mounted Road Sweeper–१<br>(4) Dumper - २<br>(5) JCB – १<br>(6) Mini Tractor With STP Pump for Spraying - 1 |
| ११ | सुरक्षा स्वच्छता साहित्य | स्वच्छतेसाठी कोणकोणत्या उपाय योजना केलेल्या आहेत. कोणते साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे, साहित्याचा वापर होत आहे काय? | होय. स्वच्छतेसाठी फावडे, टिकाव, घमेले, चेंबर सफाईसाठी रॉड, सुरक्षेसाठी सेफ्टी बेल्ट, हेल्मेट, मास्क, गमबुट, हातमोजे इ. साहित्याचा वापर करण्यात येतो. |
| १२ | प्रत्येक कर्मचा-यास गणवेश | ठेकदाराकडून किती गणवेष नगरपंचायतीकडे देण्यात आले. त्याची नोंद, प्रत्यक्ष वापर याची खातरजमा. | ठेकदाराकडून सर्व १५६ कर्मचा-यांना गणवेष देण्यात आले असुन, दैनंदिन कामकाजात गणवेषांचा वापर करण्यात येतो. |
| १३ | बायोमेट्रीक हजेरी | दैनंदिन कर्मचारी हजेरी रजि. व बायोमेट्रीक हजेरी यांचे साधर्म्य आगमन निर्गमन याबाबत अहवाल. | बायोमेट्रिक पध्दतीने हजेरी नोंद घेण्यात येते. |
| १४ | स्वच्छतागृह सफाई | संस्थानमार्फत अनुदान देण्यात आलेल्या स्वच्छतागृहांची स्वच्छता नियमीत होते काय? याबाबतचा अहवाल. | होय. |
| १५ | नगरपंचायतीकडून मंदीरपरिसर, संस्थानच्या विविध इमारती, भक्तनिवास, प्रसादालय, शैक्षणीक संकुल लगत नगरपंचायत हद्दीतील भागाची स्वच्छता प्राधान्याने करत आहे काय? | | होय. |

| | | |
|---|---|---|
| १६ | नगरपंचायतीकडून मंदिरालगतचे पिंपळवाडी रस्ता,पालखीरस्ता, नगर मनमाड रस्ता, प्रसादालय रस्ता, साई कॉम्पलेक्स, मंदिरालगतचे १६ गुंठे (शताब्दी मंडप), विविध भक्तनिवासस्थाना समोरील रस्त्यावरील जागेवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही, अथवा तात्पुरत्या स्वरुपात व्यवसाय करु देणार नाही उपाययोजना कार्यान्वित आहे काय? याबाबत प्रत्यक्ष कार्यवाही चालू आहे किंवा कसे? याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा. | सदर बाबही शिर्डी नगरपंचायत याचेशी संबधीत आहे. |
| १७ | श्री साईबाबा संस्थान कडून देण्यात आलेला निधीचा विनीयोग केवळ शिर्डी शहराच्या दैनंदिन स्वच्छताविषयक कामकाजासाठी चालू आहे काय? तसेच परिसर स्वच्छताबाबत काही तक्रारी आहे काय? | होय. परिसर स्वच्छतेबाबत सध्या कोणत्याही तक्रारी नाही. |
| १८ | स्वच्छता विषयक कामाची प्रत्यक्ष पहाणी करतांना, नागरिकांशी संवाद साधतांना ज्या बाबी निदर्शनास येतील त्याबाबींचा स्वयंस्पष्ट अहवाल तयार करुन सादर करावा. | प्रत्यक्ष पाहणी करत असताना, स्थानिक ग्रामस्थ व प्रतिष्ठित नागरीक यांना स्वच्छतेबाबत अभिप्राय विचारला असता. स्वच्छता कामकाज चांगले असले बाबत समाधान व्यक्त केले. स्थानिक नागरीकांच्या स्वाक्षरी रजिस्टरची झेरॉक्स प्रत मासीक अहवाला सोबत जोडली जाते. |
| १९ | शहरातील दैनंदिन सर्व प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते, उपनगरे सफाई करून, रस्त्याच्या कडेची माती उचलून वाहतुक करतात काय?, | होय. |
| २० | निवासी व वाणिज्य मालमत्तांचे ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन डोअर टू डोअर ओला व सुका कचरा विकेंद्रीत पद्धतीने वर्गीकरण करून जमा करून त्याची प्रक्रियासाठी वाहतुक करतात काय? | होय, प्रत्येक प्रभागात १ घंटागाडी कचरा गोळा करणेकामी नेमुन दिलेली आहे. |
| २१ | सार्वजनिक ठिकाणी, धार्मिक स्थळे, अंत्यविधी ठिकाणे शैक्षणीक संकुल शहरातील दुकाने मार्केट, चिकन मार्केट, मटन व मासे मार्केटची व इतर अनुषांगिक ठिकाणी झाडलोट करणे व सदर ठिकाणचा कचरा विकेंद्रीत पद्धतीने वर्गीकरण करुन, जमा करतात काय? तसेच प्रक्रीयेच्या ठिकाणी वाहतुक करतात काय? | होय. |
| २२ | डंपीग ग्राऊंड येथे आवश्यकतेनुसार ओला व सुका कचरा वर्गीकरण करून डंप करतात काय? तसेच डंपीग ग्राऊंडचे किती भाडे देतात? | अ.क्र.९ प्रमाणे डंपीग ग्राऊंडचे दरमहा रु. १,५०,००००/- भाडे देण्यात येते. |
| २३ | शहरातील फुड वेस्ट स्वतंत्र पद्धतीने जमा करून प्रक्रियेचे ठिकाणी वाहतुक करण्यात येते का? | होय. |
| २४ | तुंबलेले गटार लाईन पुर्ववत करणे, चोकअप काढणे, पाऊस पाणी जाणेकरिता नाली काढणे ही कामे केली जातात काय?, | होय. |
| २५ | संपूर्ण शहरामध्ये वर्षातून किती वेळा नामांकित कंपनीचे औषधे वापरून यांत्रिक पद्धतीने जंतूनाशक फवारणी करण्यात आली? | दरमहा एक वेळेस व दर चार महिन्यातुन १ वेळा अतिरिक्त अशी वर्षातुन एकुण १५ वेळा जंतुनाशक औषध फवारणी करण्यात येते. |
| २६ | सार्वजनिक ठिकाणचा कचरा उचललेले ठिकाणी दररोज नामांकित कंपनीचे कार्बोलीक पावडर मारण्यात येते का? त्याचे फोटो. | होय. प्रत्यक्ष पाहणी केली. सोबत फोटो जोडलेला आहे. |
| २७ | नगर पंचायत मालकीचे सर्व शौचालय सिटस ३०/ मुतारी ६ सिटस साफ सफाई दिवसातून किती वेळा करण्यात येते? | दिवसातून दोन वेळा. |
| २८ | बेवारस मृतदेह/मृत जनावरे विल्हेवाट लावणे तसेच बेवारस आजारी व्यक्तीस औषधोपचार करिता दाखल करणे असे किती मृतदेह, जनावरे, आजारी व्यक्तीस मदत केली याबाबतची सखोल माहिती जसे जनावरांची विल्हेवाट कशी व कोठे लावली? | वेळोवळी विल्हेवाट लावल्याचे आढळून आले आहे. |
| २९ | गटार सफाई नंतर कचरा कुंडयावर टाकलेले मटेरियल वाहतुक करण्यात येत का? | होय. |
| ३० | संपूर्ण शिर्डी शहरामध्ये ट्रॅक्टरद्वारे / घंटागाडीद्वारे गोळा केलेला कचरा डंपर मध्ये भरून नगरपंचायत सुचविल त्या जागे पर्यंत वाहतुक करुन किंवा नगरपंचायतीस | होय. |

| | | |
|---|---|---|
| | पर्यायी जागा उपलब्ध नसलेस जागचे भाडेसह विल्हेवाट करुन, शिर्डी शहरामध्ये दैनंदिन जंतुनाशके फवारणी, घर ते घर धुर फवारणी पावडर फवारणी केली जाते काय? कच-यावर फवारणी केली जाते काय? दैनंदिन सर्व साफसफाई विषयक सर्व कामे केली जातात काय? | |
| ३१ | बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे यांचेमार्फत खालीलप्रमाणे वाहने वापरण्यात येतात काय ?<br>TATA ACE घंटागाडी (घंटा बसविणे बंधनकारक) - १७<br>Tractor and Hydraulic Trolley – ५<br>Truck Mounted Road Sweeper – १<br>Dumper – २<br>JCB – १<br>Mini Tractor With STP Pump For Spraying – १<br>उपरोक्त पैकी साधनांना कशा पद्धतीने काम देण्यात आलेले आहे याबाबत साधनांच्या नंबरसह सविस्तर माहिती? | होय. |
| ३२ | सर्व वाहन चालकांकडे वाहन परवाना आहे काय? | आहेत. |
| ३३ | सर्व कामगार व इतर मनुष्यबळास किमान वेतन कायद्यानुसार वेतन व नियमानुसार देय सामाजीक सुरक्षतेबाबतचे इतर लाभ दिले जातात काय? किमान वेतन दिलेबाबत बॅकेचे स्टेटमेंट अथवा कर्मचा-यांचे पासबुक झेरॉक्स तपासली जाते काय? इतर सामाजिक सुरक्षेबाबतचे लाभ कर्मचा-यांना मिळतात काय? | होय. |
| ३४ | सर्व कर्मचा-यांचे प्रतिमहा BIOMETRIC पद्धतीने हजेरीचे दप्तर ठेवले आहे काय? | होय. |
| ३५ | किमान कर्मचा-यांपेक्षा कमी कर्मचारी कामावर असल्यास त्या प्रमाणात ठेकेदारास रक्कम कमी देण्यात आली आहे काय? | होय. |
| ३६ | प्रत्येक महीन्याचे ईपीएफ चा भरणा केला जातो काय? | होय. |
| ३७ | सर्व कर्मचा-यांना ड्रेस कोड, ओळखपत्र, हॅडग्लोज, मास्क, गमबुट साहित्य देण्यात आले आहे काय? | होय. |
| ३८ | नगरपंचायत मालकीचे लक्ष्मीनगर, छत्रपती शिवाजी कॉम्प्लेक्स व नगरपंचायत कार्यालय येथील टॉयलेट / मुतारी किती वेळा साफ केल्या जातात? | दिवसातुन दोन वेळा. |
| ३९ | डास प्रतिबंधासाठी वर्षातून किती वेळा, किती दिवसांनी फवारणी केली जाते? | दरमहा एक वेळेस व दर चार महिन्यातुन १ वेळा अतिरिक्त अशी वर्षातुन एकुण १५ वेळा जंतुनाशक औषध फवारणी करण्यात येते. |
| ४० | नगरपंचायत हद्दीतील नगर मनमाड रोडवरील डिव्हायडरमधील लावलेल्या झाडांना पाणी व कटींग वेळेत केली जात आहे काय? | होय, झाडांना आवश्यकते प्रमाणे पाणी देण्यात येते व आवयकते प्रमाणे झाडांची कटींग करण्यात येत आहे. |
| ४१ | शिर्डी शहरातील किती मोकाट जनावरांना पकडून सोडून देण्यात आले आहे? | तक्रारीनुसार कार्यवाही करण्यात येत असते. |
| ४२ | शहरातील वेस्ट फुट जमा करण्यासाठी स्वतंत्र वाहन व कर्मचारी यांची नेमणुक केली आहे काय? जमा केलेले फुड वेस्टवर काय प्रक्रिया केली जाते? | होय, ओला सुका कचरा वर्गीकरण करुन खत निर्मिती प्रकल्पाला पाठविण्यात येते. |
| ४३ | डंपींग ग्राऊंडसाठी किंवा कचरा प्रक्रियेसाठी जागा नगरपंचायतीने उपलब्ध करून दिली आहे काय? | होय. |
| ४४ | शहरातील नगर मनमाड रोड, गावठाण मनोजकुमार पथ व पिंपळवाडी रोड किती वेळा साफ करण्यात येतो? | शहरातील नगर मनमाड रोड, गावठाण मनोजकुमार पथ व पिंपळवाडी रोड दिवसातुन दोन वेळा साफ करण्यात येतात. |
| ४५ | काम करत असतांना कर्मचा-यास अद्यापपावेतो काही अपघात झाला आहे काय? झाला असल्यास सबंधीत कर्मचा-यास किती नुकसान भरपाई देण्यात आली आहे? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४६ | अद्यापपावेतो ठेकेदाराने केलेल्या कामाचा अभिप्राय कसा आहे? | समाधानकारक. |
| ४७ | शिर्डी शहरात विशेष स्वच्छता मोहिम किती वेळा राबविण्यात आली आहे? | नगरपालिकेच्या सुचनेनुसार वेळोवेळी विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात येते. |
| ४८ | स्वच्छतेसाठीचे साहित्य नगरपंचायतीकडून पुरविले जाते काय? | नाही. |
| ४९ | ओला व सुका कचरा जमा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे काय? | होय. |
| ५० | सर्व घंटागाडयांना घंटा बसविणे व घंटागाडयांची कचरा गोळा करण्यासाठी दररोजची वेळ निश्चित आहे काय? | होय, सकाळी सात ते तीन व दुपारी पाच ते रात्री एक |
| ५१ | सर्व घंटागाडया चार चाकी व GPS सह कार्यान्वित आहेत काय? | होय. |
| ५२ | घंटागाडयांचा ROUTE MAP तयार केलेला आहे काय? नागरी वस्तीत निश्चित वेळेत कचरा गोळा केला जातो काय? घंटागाडी किती फे-या मारतात? | होय, घंटागाडी दिवस पाळीत दोन ते तीन वेळा व रात्र पाळीत तीन ते चार फे-या करण्यात येतात. |
| ५३ | सर्व वाहनांची यादी क्रमांक, विमा, वाहनांवरील सर्व कर भरलेबाबत, वाहन चालकाकडे वाहन परवाना याबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे काय? | होय. |
| ५४ | ठेकेदाराकडील कर्मचा-यांनी संप पुकारल्यास पर्यायी काय व्यवस्था करण्यात आली आहे? | आवश्यकतेनुसार पर्यायी कर्मचारी उपलब्ध करुन देण्याचे कबुल केलेले आहे. |
| ५५ | नगरपंचायतीकडील वाहने ठेकेदाराकडे वर्ग केले आहे काय? असल्यास किती वाहने? ठेकेदार किती भाडे देतो? | नगरपालिकेने एकुण ४ वाहने ठेकेदाराकडे वर्ग केलेले असुन, दरमहा प्रत्येकी रु.१५,०००/- इतके भाडे नगरपालिकेस आदा करण्यात येते. |
| ५६ | शहरातील सर्व व्यवसायिक व वाणिज्य मालमत्ताधारकांचा संपूर्ण कचरा दररोज विलगीकरण करून जमा केला जातो काय? | होय. |
| ५७ | जमा झालेल्या कच-यांची नोंद ठेवली जाते काय? | होय. |
| ५८ | करारनाम्या व्यतिरीक्त नगरपंचायतीने ठेकेदारावर नवीन अटी घातल्या अथवा शिथील केल्या आहेत काय? | नाही. |
| ५९ | संस्थानकडून दरमहा अनुदान देणेबाबत समितीचे सर्वसाधारण अभिप्राय काय? | तरी मा. व्यवस्थापन समिती चे सभेच्या दि.१३/१२/२०१८ रोजीच्या निर्णय क्र. ७३४ व दि.२२/११/२०१८ रोजीरच्या शासन निर्णय, व श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांच्यामधील प्रस्तुत प्रकरणे करण्यात आलेले कराराच्या अटी / शर्ती अधिन राहुन अनुदान रक्कम आदा करण्यात यावी. |
| ६० | Municipal solid waste, sweeping, collection and transportation. | होय. |
| ६१ | Municipal solid waste, processing and disposal of solid waste. | होय. |
| ६२ | Open defecation Free / Toilet | नाही. |
| ६३ | Capacity building and e – Learning | लागु नाही. |
| ६४ | Provision of public & community toilet seats | एकुण ६५ सार्वजनिक शौचकुप आहेत. |
| ६५ | Information, education and communication and behaviour change. | नागरिकांमध्ये आरोग्य व परिसर स्वच्छतेविषयक जागरुकता विविध मार्गाने निर्माण करण्यात येत आहे. घंटागाडी कर्मचारी नागरिक व रहिवाश्यांना ओला व सुका कचरा वेगळा करणेबाबत प्रात्यकक्षिक करुन |

| | | |
|---|---|---|
| | | दाखतात. तसेच स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत स्वच्छतेबाबतचे महत्व नागरिकांच्या मनावर बिंबविण्यासाठी नगर पंचायत हद्दित फ्लेक्स पोस्टर्स् व बॅनर्स् लावण्यात आलेले आहेत. |

तसेच, पाहणी अहवाला सोबत नगरपंचायत ठेकेदार कंपनी कडुन प्राप्त झालेले कर्मचा-यांचे बायोमेट्रीक पंचींग हजेरी रिपोर्ट, कर्मचा-यांचा पी. एफ. भरणा केलेले चलनांच्या प्रती, शिर्डी नगरपंचायत हद्दीत किटकनाशाक कार्बोलिक (जंतुनाशक) पावडर, औषधांची फावारणी व धुरु (Fogging) फावारणी केल्या बाबतचे रहिवाशांचे अभिप्राय, स्वच्छता कामांसाठी लागणा-या कार्बोलिक (जंतुनाशक) पावडर साहित्याच्या खरेदीच्या बीलांच्या प्रती, त्याच प्रमाणे घंटागाडी व्दारे ओला व सुका कचरा नियमितपणे घेवुन जाण्यात येत असलेबाबत नागरीकांच्या अभिप्राय नोंदवहीच्या झेरॉक्स प्रति अहवाला सोबत जोडण्यात येत असतात.

सदर पाहणी अहवाल नियमितपणे माहे, जुलै २०१९, पर्यंत लेखा शाखा–अनुदान विभागास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेले आहेत.

सदरच्या विषयाची नोंद घेण्यासाठी मा. तदर्थ समितीपुढे सादर.

**निर्णय क्र.२७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामाचा आकस्मित पाहणी अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.४६** **किडणीस्टोन शिबीरांचे आयोजन व त्याकामी लागणाऱ्या अनुषंगीक खर्चास एकुण रक्कम रु.५,००,०००/- मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कर्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र. –

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १०/०१/२०१० रोजी विषय नं ३३ निर्णय क्र. ३३

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ३०/११/२०१६ रोजी विषय नं ३७ निर्णय क्र. ८८०

प्रस्ताविक– संदर्भ क्र ०१ अन्वये मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १०/०१/२०१० रोजी विषय नं ३३ निर्णय क्र. ३३ नुसार श्री साईनाथ रुग्णालयात दर तीन महिन्यातुन एकदा किडणी स्टोन शिबीराचे आयोजन करणेस व त्याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास रक्कम रु. २,५०,०००/- मान्यता मिळालेली आहे. यापुर्वी डॉ. केतन शुक्ला, अहमदाबाद यांचे योगदानातुन श्री साईनाथ रुग्णलयात वेळोवेळी सदर शिबीराचे आयोजन करणेत आलेले आहे. प्रत्येक शिबीरात अंदाजे ५० रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया व उपचार करणेत येतात.

संदर्भ क्र. ०२ अन्वये मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ३०/११/२०१६ रोजी विषय नं ३७ निर्णय क्र. ८८० अन्वये किडणीस्टोन शिबीरातील रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याकारणाणे व त्यासाठी आवश्यक त्या मेडीकल औषधांचे किंमतीत देखील वाढ झाल्याकारणाणे येणा-या खर्चात रक्कम रु. ५,००,०००/- मात्र पर्यंत वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

या शिबीरात (PercutanecousNephrolithotomy) (P.C.N.L) मोठे स्टोन असलेल्या रुग्णांवर स्कोपीने शस्त्रक्रिया मोफत करणेत येतात. तसेच छोटया १ ते २ से.मी आकाराच्या स्टोनवर (Sound Waves) Lithotripsy च्यासहाय्याने उपचार केले जातात. यासाठी डॉ. केतन शुक्ला हे रुग्णांना त्यांच्या रुग्णालयात प्रत्येक Lithotripsy साठी रु. १०,०००/- इतका दर आकार करतात. परंतु संस्थानकडुन बेसीक खर्च म्हणुन रु. २,५००/- प्रति रुग्ण याप्रकारे खर्च आकाराला जात आहे व त्याप्रमाणे (Lithotripsy) चे उपचारावरील होणारा एकुण खर्च ग्लोबल किडणीस्टोण फाऊंडेशन, अहमदाबाद यांना अदा करावा लागेल.

अशा प्रकारचे उपचारासाठी रुग्णांना खाजगी रुग्णालयात ३० ते ४० हजार रुपये प्रत्येकी सर्व खर्च येतो. त्यामुळे सदर खर्च गरीब रुग्णांना पेलवणारा नसल्याने ते उपचारापासुन वंचित राहतात. अशा रुग्णांवर श्री साईनाथ रुग्णालयात या शिबीरात मोफत उपचार केले जातात.

सदरहु शिबीर श्री साईनाथ रुग्णालयात दि. ११ ते १२ एप्रिल २०२० या तारखेस घेण्याचा मानस आहे. सदर शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच येणारे तज्ञ डॉक्टर्स व त्यांची टीम यांच्या राहण्याची, जेवणाची, दर्शन, आरतीचीव इतर

अनुषंगीक गोष्टींची व्यवस्था शिबीराच्या एक दिवस आगोदर व एक दिवस नंतर असे दि. १० ते १३ एप्रिल २०२० अखेर कालावधीत करण्याची आवश्यकता आहे.

| अ.नं | विभाग | विभागांमार्फत करावयाचे कामाचा तपशिल | येणा-या खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | कॅंटीन विभाग | १) दोन दिवसांकरीता अंदाजे १०० रुग्णांना दैनंदिन रुग्णालयातील रुग्णांप्रमाणे दोन वेळेच्या चहाची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२) दोन दिवसांकरीता डॉ. केतन शुक्ला व १५ सहकारी व इतररुग्णालय स्टाफ असे एकुण ५० व्यक्तींकरीता आवश्यक त्यावेळी चहा, कॉफी, बिस्कीट, मिनीरल वॉटरची मोफत व्यवस्था करण्यात यावी. | ५,०००/- |
| ०२ | श्री साई प्रसादालय | १) दोन दिवसांकरीता अंदाजे १०० रुग्णांना दैनंदिन रुग्णालयातील रुग्णांप्रमाणे दोन वेळेची जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२) दोन दिवसांकरीता डॉ. केतन शुक्ला व १५ सहकारी व इतर रुग्णालय स्टाफ असे एकुण १०० व्यक्तींकरीता विनामुल्य नाष्टा पुरविण्यात यावी<br>३) चार दिवसांकरीता डॉक्टर्स, तंत्रज्ञ, व इतरांची दोन वेळेची जेवणाची व्यवस्था व्हि.आय.पी कक्षामध्ये मोफत करण्यात यावी. | १५,०००/- |
| ०३ | साईप्रसाद निवासस्थान | चार दिवसांकरीता अहमदाबाद येथुन आलेल्या डॉ. केतन शुक्ला व इतर सहकारी डॉक्टर यांचे करीता ०३ व्हि.आय.पी ए.सी रुमची मोफत व्यवस्था साईनिवास अतिथीगृहात करण्यात यावी. (दि. १० ते १३ एप्रिल २०२०) | १०,०००/- |
| ०४ | व्दारावती भक्तनिवास | चार दिवसांकरीता किडणीस्टोन शिबीराकामी येणा-या अंदाजे १०-१५ सहकारी टेक्नीशियन यांचेकरीता ०४ व्हि.आय.पी ए.सी. रुमची मोफत व्यवस्था करण्यात यावी. (दि. १० ते १३ एप्रिल २०२०) | १०,०००/- |
| ०५ | जनसंपर्क विभाग | १) शिबीरासाठी आलेल्या मान्यवरांची दर्शन, आरतीची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२) शिबीर संपन्न झालेनंतर आपले विभगाकडुन सविस्तर बातमी प्रसिध्द करणे यावी. | ५,०००/- |
| ०६ | विद्युत विभाग | किडणीस्टोन शिबीराकामी आवश्यकतेनुसार योग्य ठिकाणी मागणी प्रमाणे विद्युत जोडणी व सामुग्रीची व्यवस्था करण्यात यावी लागेल. | - |
| ०७ | वाहन विभाग | १) डॉ. केतन शुक्ला व त्यांचे सहकारी यांच्या करीता शिबीर कालावधीत जेवणासाठी, रुमवर आणणे व सोडविणेकामी वातानुकुलीत गाडीची मोफत व्यवस्था करण्यात यावी.<br>२) डॉ. केतन शुक्ला यांना मुंबई, पुणे, औरंगाबाद व शिरडी विमानतळ तसेच आवश्यकतेनुसार रेल्वे स्टेशन येथुन आणण्यासाठी व परत सोडण्यासाठी वाताणुकुलीत गाडीची मोफत व्यवस्था करण्यात यावी. | २०,०००/- |
| ०८ | संरक्षण विभाग | १) शिबीरात आलेल्या मान्यवर डॉक्टर्स तंत्रज्ञ यांना दर्शन आरतीची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२) दोन शिफ्टमध्ये दोन अतिरिक्त सुरक्षारक्षक शिबीर काळात पुरविण्यात यावेत. | - |
| ०९ | वित्त विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीराकामी आलेल्या खर्चाची बिले संबंधीतांना वेळेत अदा करणेत यावे. | - |
| १० | मेडीकलस्टोअर, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीराकामी लागणारे मेडीसिन व साहीत्य शिबीरपुर्व तातडीने खरेदी करुन पुरविण्यात यावे. | ३,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | कामगार विभाग | शिबीरकाळात प्रत्येक शिफ्टकामी सकाळ, दुपार, रात्री अतिरिक्त ०३ सुरक्षारक्षक तसेच ०३ वॉर्डबाय, ०३ आया, ०३ परिचारीका, ०३ परिचारक, ०३ ओ.टी.आसिस्टंट दि. ११ ते १२ एप्रिल २०२० रोजी श्री साईनाथ रुग्णालयात पुरविण्यात यावेत. | २०,०००/- |
| १२ | मंदीर विभाग | १) शिबीर उद्घाटन कार्यक्रमाकरीता श्रींचे पुजा करणेकामी पुजारी (सर्व पुजाच्या साहीत्य सह) विभागाच्या मागणीनुसार व्यवस्था करणेत यावी.<br>२) ०३ नग श्रींची मुर्ती मोफत पुरविण्यात याव्यात. | ५,०००/- |
| १३ | प्रकाशने विभाग | तंत्रज्ञ तथा मान्यवर यांच्याकरीता मोफत श्रींचे ३ डी फोटो फ्रेम (१० नग), मराठी, हिंदी व इंग्रजी साईच्चरित्र (प्रत्येक भाषेतील ०५ नग) पुरविणेत यावेत. | १०,०००/- |
| १४ | श्री साईनाथ रुग्णालय | डॉ. केतन शुक्ला व त्यांचे इतर सहकारी एकुण १० लोकांसाठी दोन्ही वेळेच्या जेवणाची व्यवस्था बाहेरील हॉटेलमध्ये करणेकामी तसेच फ्लेक्स बोर्ड, रांगोळी, हॉटेल बिल, पिण्याचे पाण्याचे जारबिल, पॅनल वरील भुलतज्ञ डॉक्टर्स यांचे शिबीराकामी मानधन बिले इत्यादी वित्त विभागामार्फत अदा करणे बाबत पुर्तता करणे. | १,००,०००/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | **५,००,०००/-** |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– संदर्भ क्र ०२ अन्वये मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ३०/११/२०१६ रोजी विषय नं ३७ निर्णय क्र. ८८० शिबीराकामी औषधे व इतर आवश्यक खर्चासाठी रु. ५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर शिबीरासाठी दर वेळेस किमान ५० रुग्णांची प्रतिक्षा यादी असते.

तरी सदर शिबीर घेण्यासाठी संदर्भ क्र. ०३ अन्वये डॉ. राम नाईक, जनरल सर्जन, श्री साईनाथ रुग्णालय व डॉ. केतन शुक्ला यांचेतील फोनवरील चर्चेनुसार सदर शिबीर ११ ते १२ एप्रिल २०२० अखेर घेण्यात येणार आहे.

डॉ. केतन शुक्ला यांच्याकडुन सदर शिबीरात केल्या जाणा-या Lithotripsy उपचाराचे प्रत्येक रुग्णासाठी रु.२,५००/- याप्रमाणे होणारे बील ग्लोबल किडणी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांना अदा करणेस व शिबीराकामी श्री साईबाबा संस्थान पॅनलवरील भुलतज्ञ डॉक्टर्स यांना शिबीर काळात बोलविण्यास व त्यांचे ठरवुन दिलेले मानधन वित्त विभागामार्फत अदा करता येईल.

श्री साईनाथ रुग्णालयाच्या सन २०१९ – २०२० च्या वार्षिक अंदाज पत्राकामध्ये शिबीर खर्चाकरीता रु.१० लाख मंजुरी घेणेत आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ०२ अन्वये शिबीरकामी आवश्यक मेडीसीन व इतर अनुषंगीक प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष येणा-या खर्चास रु. ५ लाखाची मान्यता देखील मिळालेली आहे. सदरचे शिबीर हे वर्षातुन दोन ते तीन वेळा अयोजित केले जाते.

सन २०१९–२० मध्ये या पुर्वी दि. २३ ते २६ मे २०१९ या तारखेस सदरचे शिबीर आयोजित केले होते. यामध्ये एकुण ४९ रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केलेल्या असुन सदर शिबीराकरीता ४,६०,६२८/- इतका खर्च झालेला असुन रक्कम रु. ५,३९,३१८/- अंदाजपत्रकीय तरतुदीमधुन शिल्लक आहे. सदर शिबीराकरीता येणा-या रक्कम रु. ५,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संपुर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने किडणीस्टोन शिबीरांचे आयोजीत करण्यात येऊ नये. तसेच भविष्यात ज्यावेळी या शिबीराचे आयोजन करावयाचे असेल त्यावेळी नवीन प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४७** **सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली आर्थिक वर्ष ०१.०४.२०२० पासून लागु करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानने,गरीब गरजु रुग्णांना रुग्ण उपचार घेत अलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी २४/०७/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१. अन्वये वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली तयार केलेली होती.मा.व्यवस्थापन समिती सभा, **दि.०२/०५/२०१८**

रोजीच्या सभेत, विषय नं.३७, वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीतील आजारांचे यादीत फेर बदल करणेबाबत विषय सादर करणेत आला होता. निर्णय क्र.३२३ “ यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत प्रस्तावात नमुद केले प्रमाणे १) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,२) रक्तासंबंधी आजार, (उदा.हिमोफेलिया इ.) ३) जी.बी.एस ( Gullian Barre Syndrome), ४) कॉक्लीअर इंम्प्लांट, ५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, या आजारांचा समावेश करणेत यावा. तसेच सध्या देण्यात येत असलेल्या रु.२५,०००/- मात्र वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रकमेत वाढ करुन अनुदानाची रक्कम रु. ५०,०००/- मात्र करण्यात यावी. तसेच याबाबत सुधारित नियमावली तयार करुन ती मान्यतेसाठी सभेसमोर सादर करावी”, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समिती सभा, दि.०२/०५/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार, सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली तयार करुन दि.०६/०९/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आली होती. त्यावर निर्णय क्र.५५६. यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आहे.

१) ज्या आजारांसाठी वारंवार उपचार करावे लागतात उदा.कॅन्सर इ.अशा आजारांसाठी दरवर्षी अनुदान देण्यात यावे या दुरुस्तीसह वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या सुधारित नियमावलीस मान्यता देण्यात आली.

२) वैद्यकीय आर्थिक अनुदानाची सुधारित नियमावली शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेत यावी.

३) शासन मान्यतेनंतर सुधारित नियमावली लागु करणेत यावी.

शासनाची मान्यता मिळेपर्यंत पुर्वीच्या प्रचलित पध्दतीने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणे सुरु ठेवावे.

जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/२६४९/२०१८,दि.०३/१०/२०१८. रोजीच्या पत्रान्वये सुधारित नियमावली शासन मान्यतेसाठी पाठविणेत आली होती. महाराष्ट्र शासन क्रमांक-सासंवि-१०१८/१६१४/ प्र.क्र.२०९/ का-१६, विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई- ४०००३२. दि.०१/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये शासन सुधारित नियमावलीस खालील प्रमाणे मान्यता मिळालेली आहे.

१) वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया / उपचारासाठी देण्यात येईल.

   १) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,
   २) रक्तासंबंधी आजार,
   ३) जी.बी.एस (Gullian Barre Sundrome),
   ४) कॉक्लीअर इंम्प्लांट,
   ५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

२) पिवळे रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये पंच्याऐंन्शी हजार (८५,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी व केशरी रेशन कार्डधारक रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख साठ हजार (१,६०,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल.

   अ) रुग्णाचा/पालकाचा व्यवसाय/शेती वा नोकरी/व्यापार असेल तर रुग्णाने वा/आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.
   आ) रुग्ण वा / आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पन्नाचे प्रमाण पत्र द्यावे.
   ब) रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल तर केवळ त्याच्या वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान देण्यात येईल.

**३)** अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा महानगरपालिका रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल.परंतु अशा रुग्णालयाची नोंद संस्थानच्या अनुदान यादीत असणे आवश्यक.

४) संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येणार नाही.

५)	अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे सही, पदवी, रजिस्टेशन नंबर सह रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे

६)	औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे २५% अगर रुपये ५०,०००/- पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये १५,०००/- अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही.

७)	अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने आर.टी.जी.एस. द्वारे पाठविण्यात येईल.

८)	रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही.

९)	रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण असल्यास कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही.

१०)	अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालयातुन रुग्णास डिसचार्ज देणेपुर्वी अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्तता करुन अर्ज सादर करावा.

११)	प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारांसाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येते. परंतु ज्या आजारांसाठी वारंवार उपचार करावे लागतात उदा.कॅन्सर इ.अशा आजारांसाठी दरवर्षी अनुदान देण्यात येईल.

१२)	अनुदान मागणी अर्जासोबत पेशंटचे नाव असलेल्या रेशनकार्डची व पेशंटच्या आधारकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे.

१३)	केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या जिवनदायी/महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना,तत्सम योजने अंतर्गत लाभ घेणा-या रुग्णांना संस्थानमार्फत अनुदान देण्यात येणार नाही.

१४)	अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्व कागदपत्राची स्व:साक्षकिंत (Self Attested) केलेल्या प्रमाणित प्रति लिपी असाव्यात.

१५)	अनुदान प्राप्त होणा-या रुग्णालयांनी पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा त्याच रुग्णासाठी वापर करावा, रुग्ण डिसचार्ज झाला असल्यास सदरच्या रुग्णाला दिलेल्या रकमेची स्टॅम्प रिसीट व उपयोगिता प्रमाणपत्राची माहिती तात्काळ संस्थानात सादर करावी. दिलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रकमेचा उपयोग त्या रुग्णासाठी न झाल्यास ती रक्कम संस्थानच्या खाती त्वरीत जमा करणे आवश्यक आहे.

१६)	श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याच्या नियमावलीत रुग्णालयाचा समावेश, करावयाचा झाल्यास रुग्णालयाने खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

अ)	मा. धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.

ब)	ट्रस्ट नियमावली. (Trust Byelaws)

क)	आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट.

ड)	रुग्णालयात कोणकोणत्या आजारावरील शस्त्रक्रिया / उपचार केले जातात याबाबतची माहिती. (दरपत्रकासह)

ई)	रुग्णालय हे धर्मादाय असलेबाबतचे हमी पत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.)

फ)	रुग्णालयास शासनाचे महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे ? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.

ज)	रुग्णालय हे धर्मादाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतलेले आहे, याबाबतचा खुलासा.

तसेच रुग्णालयाबाबतची इतर अनुषंगीक माहिती सादर करणे. ही सर्व कागदपत्रे श्री साईबाबा संस्थानच्या अनुदान विभाग व वित्त विभाग अथवा लेखाशाखा अथवा ऑडिटर यांचे कडुन तपासणी केल्यानंतर, व्यवस्थापन समितीच्या मान्येतेने रुग्णालय पॅनलवर घेणेत येईल.

सदर नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणेत यावे.

प्रस्ताव–शासन निर्णयानुसार सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली अनुदान विभागाच्या सॉफ्टवेअरमध्ये आय टी विभागामार्फत बदल करुण सुधारीत नियमावली आर्थिक वर्ष ०१ एप्रिल २०२० पासुन लागु करणेस मान्यता असावी.

तरी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबत सविस्तर माहितीसह प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, तत्पुर्वी सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबतचे रेकॉर्ड सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४८** **साईभक्त श्री.जी.बी.दमाणी, मुंबई यांचेकडून श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन आर्थोपेडीक थिएटरसाठी इक्वीपमेंटस देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद-कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्रं.- मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६,विषय नं.४६ व निर्णय क्र.८८९, मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ विषय नं.३८ व निर्णय क्रं.३८,मा.व्यवस्थापन समिती दि.०८/१२/२०१७ विषय नं.१०५१

प्रास्ताविक- श्री साईनाथ रुग्णालयात तिस-या मजल्याचे बांधकाम सुरु करणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/११/२०१६ विषय नं.४६ निर्णय क्रं.८८९ व दि.२५/०२/२०१७ विषय नं.३८ व निर्णय क्रं.३८ तसेच दि.०८/१२/२०१७ विषय नं.१०५१ (९) नुसार मान्यता मिळालेली आहे. त्याअनुषंगाने ३०० बेडच्या हॉस्पीटल इमारतीचे बांधकाम सुरु झालेले असुन,त्यामध्ये ICU, वॉर्ड व ओपीडीच्या रुममध्ये आवश्यकतेनुसार वाढ अथवा बदल प्रस्तावित आहेत.

त्याअनुषंगाने नव्याने निर्माण होणारे Orthopedic Operation Theatre हे मोडयुलर व सर्व इक्विपमेंटनी युक्त असे बनविणेचा मानस आहे. श्री साईनाथ रुग्णालयाची पाहणी करणेकामी साईभक्त श्री.गोविंददास दमाणी,मुंबई यांनी भेट दिली असता सदर Orthopedic Operation Theatre करिता लागणारा सेट अप (मशिनरी,फर्निचर व मोडयूलर सेट अप) डोनेशन स्वरुपात देणेची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती.तशा आशयाचे पत्र त्यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि.१९/१०/२०१९ व दि.०९/११/२०१९ रोजी दिलेले आहे.

श्री.जी.बी.दमाणी यांनी सदर बाबतीत संस्थानसोबत करारनामा करणेची इच्छा व्यक्त केली होती.परंतु श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अशा कोणत्याही देणगी दाखल वस्तुंबाबत कोणत्याही प्रकारचा करारनामा करु शकत नाही.

तसेच करारनामा न करता जर श्री.जी.बी.दमाणी देणगी दाखल इक्वीपमेंटस देण्यास तयार असतील तर ती स्वीकारता येतील असे देखील फोनव्दारे कळविणेत आले होते.

परंतु श्री.जी.बी.दमाणी यांनी असे कळविले की एक विशेष बाब म्हणून सोबत जोडलेल्या पत्रामध्ये दिलेप्रमाणे अटी व शर्ती संस्थानला मान्य असलेबाबत स्वाक्षरी करुन उलटतपासणी पाठविणेत यावे. सोबत या पत्रामध्ये श्री.जी.बी.दमाणी यांनी खालील बाबींचा उल्लेख केलेला आहे.

१) श्री.जी.बी.दमाणी हे श्री साईनाथ रुग्णालयाच्या आर्थोपेडीक ओटी साठी लागणारे modular set up व इक्वीपमेंटस देणगी म्हणुन देणार आहेत.त्याकरिता विविध कंपन्यांना आवश्यकतेनुसार पुरवठा आदेश देणे,वाटाघाटी करणे व बिल अदा करणे इ.गोष्टी ते स्वत: करणार आहेत.

२) देणगी म्हणुन मिळालेले इक्वीपमेंटसचा वापर संस्थानने कळविलेल्या श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गरजू व गरीब रुग्णांकरीता केला जाईल तसेच श्री.जी.बी.दमाणी यांचे परवानगी शिवाय इक्वीपमेंटस इतर ठिकाणी किंवा दुस-या व्यक्तीला हस्तांतरीत करता येणार नाही.

३) श्री.जी.बी.दमाणी हे संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात ज्या ठिकाणी देणगी दाखल प्राप्त झालेले विविध मेडीकल इक्वीपमेंटस बसविण्यात आले त्याठिकाणी प्रत्यक्ष भेट देवुन पाहणी करण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.याकरिता संस्थानने श्री.जी.बी.दमाणी यांना प्राप्त इक्वीपमेंटस तपासणी करण्याकरिता आवश्यक त्यावेळी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) श्री.जी.बी.दमाणी यांनी देणगी दाखल दिलेल्या इक्वीपमेंटसचा वापर व दुरुस्ती इत्यादिबाबत संस्थानकडुन स्पष्टीकरण मागु शकते.

५) श्री.जी.बी.दमाणी यांनी देणगी दाखल दिलेल्या इक्वीपमेंटसवर कोणत्याही प्रकारची वारंटी व त्यानंतरची दुरुस्ती व देखभालीकरिता आवश्यक असणारी सेवा याबाबतीत जबाबदारी घेणार नाहीत.त्याकरिता संस्थानने आवश्यकतेनुसार वारंटी सेवा तसेच AMC किंवा CMC कालावधीतील सेवा संबंधीत पुरवठाधारकाकडुन परस्पर करुन घेण्यात यावे.

६) श्री.जी.बी.दमाणी यांनी देणगी दाखल दिलेल्या इक्वीपमेंटसचा वापर करताना झालेले नुकसान किंवा संस्थानचे एखादया व्यक्तीला किंवा मालमत्तेला झालेल्या नुकसानीस श्री.जी.बी.दमाणी यांना जबाबदार धरता येणार नाही.किंवा त्याबाबतीत नुकसान भरपाईची देखील मागणी करता येणार नाही.

७) श्री.जी.बी.दमाणी यांनी देणगी दाखल दिलेल्या इक्वीपमेंटसवर त्यांचे आई व वडील पुज्य सुरजाबाई बद्रीदासजी दमाणी व पुज्य बद्रीदासजी गोकुळचंदजी दमाणी यांचे नांव लावण्यात यावे.

८) श्री.जी.बी.दमाणी यांचेकडुन अंतिमत: संस्थान रुग्णालयास प्राप्त झालेल्या देणगीबाबत अंतिम अहवाल तसेच प्राप्त झाल्याची पावती संस्थान श्री.जी.बी.दमाणी यांना देईल.

९) उपरोक्त देणगीबाबत कोणत्याही प्रकारचा क्लेम,विवाद अथवा कार्यवाही निर्माण झाल्यास ती मुंबई न्यायालयाच्या अखत्यारीत करण्यात यावी. तरी उपरोक्त अटी व शर्ती संस्थानला मान्य असलेबाबत स्वाक्षरी करुन श्री.जी.बी.दमाणी यांना पत्र देण्यात यावे अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय–यापूर्वी देखील रुग्णालयाकरिता आवश्यक उपकरणे महिंद्रा फाऊंडेशन यांचेकडुन अशाच प्रकारच्या अटी व शर्ती मान्य करुन देणगी दाखल स्वीकारले आहेत.त्याच धर्तीवर श्री.जी.बी.दमाणी यांचेकडुन Ortho OT करिता लागणारे Equipment स्वीकारता येतील,असे मत आहे.

सदर ईमेलमध्ये व सोबत दिलेल्या पत्रामधील अटी व शर्तीचा विचार करता, मसुदयातील अटी व शर्ती संस्थानला जाचक नाहीत तथापि श्री.जी.बी.दमाणी यांनी देणगी स्वरुपात दिलेली उपकरणे यांच्यावर श्री.जी.बी.दमाणी यांचा कोणताही मालकी हक्क राहणार नाही.ही सर्व उपकरणे श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे मालकीची राहतील अशा स्वरुपाची अट मसुदयामध्ये समाविष्ठ करुन सदर मसुदा मान्य असल्यास वैद्यकीय अधिक्षिका यांचे स्वाक्षरीने श्री.जी.बी.दमाणी यांना पत्राव्दारे व ईमेल व्दारे कळविता येईल,असे मत आहे.

प्रस्ताव- श्री.जी.बी.दमाणी,मुंबई यांनी पाठविलेल्या मसुदयातील अटी व शर्ती बाबत निर्णय होणेबाबत,तसेच मसुदयातील नियम व अटी मान्य असल्यास वैद्यकीय अधिक्षिका यांचे स्वाक्षरीने श्री.जी.बी.दमाणी,मुंबई यांना पत्राव्दारे व ई मेलव्दारे कळविणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.जी.बी.दमाणी, मुंबई यांनी पत्राव्दारे कळविलेल्या अटी शर्तीस अधिन राहुन त्यांचेकडून श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन आर्थोपेडीक थिएटरसाठी लागणारे Modular set up व इक्वीपमेंटस देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४९** **श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागाकरीता Air Compressor व Vaccume Compressor with tank खरेदीकामी रु.४३,७६,४५६/-चे खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- दिनांक ०४.१२.२०१९ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतनिर्णय क्र.५६९अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागांकरीता आवश्यक असणारे Consumable Material, Equipment, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Air Condition खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरलेले आहे.

प्रास्ताविक:-श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकारीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Epoxy Flooring, etc. ची मागणी वेळोवेळी खरेदी विभागाकडे पाठविण्यात येत असते. परंतु दि.०२/०३/२०१९ रोजीच्या परीपत्रकान्वये सर्व वार्ड/विभागांना पुढील एक वर्षाकरीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, etc.

ची मागणी दि.१५/०३/२०१९ अखेर खरेदीविभागाकडे पाठविण्यात यावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू काही विभागाची मागणी प्राप्त न झालेमुळे वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षिका यांचे आदेशान्वये पुन्हा दि.२०/०५/२०१९ रोजीचे स्मरणपत्रान्वये दि.०५/०६/२०१९ अखेर मागणी पत्रक पाठविणे बाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकलविभागाने मागणीपत्रकान्वये Air Compressor व Vaccume Compressor with tank ची मागणी केलेली आहे.

Boyles Anaesthesia Machine, Ventilator इ. या सारख्या मशिनला आवश्यकत्या दाबाने Air चा पुरवठा करण्यासाठी Air Compressor उपयोग होतो तर चालू शस्त्रक्रियेमध्ये येणारे अनावश्यक रक्त Vaccume च्या सहाय्याने जार मार्फत बाहेर काढण्याकरीता Vaccume Compressor with tank चा वापर करतात. सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागात असलेले Air Compressor वVaccume Compressor with tankहे सन २००० मध्ये खरेदी केलेले असल्याने फार जूने झालेले असून ते वेळोवेळी नादुरुस्त होते तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या वाढल्यामुळे त्यांनी Air Compressor वVaccume Compressor with tank ची मागणी केलेली आहे. सदर Air Compressor वVaccume Compressor with tank खरेदीकामी येणा-या अंदाजे खर्चाचा करीता बायोमेडीकल विभागाकडून 1 वर्षाचा वॉरंटी कालावधी व त्यानंतर पुढील ५ वर्षाकरीता LAMC चे दराचे कोटेशन प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार सदर पुरवठाधारकांचे प्राप्त झा ालेले कोटेशनचे दरानुसार अंदाजे किंमत घेण्यात येऊन सदर प्रस्ताव एकत्रितरित्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. त्यानूसार दि.०४/१२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय नं. ९० निर्णय क्र.५६९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले. त्यानूसार श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकलविभागाने मागणी केलेले Air Compressor वVaccume Compressor with tank खरेदीकामी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| **Sr. No** | **Description** | **Qty** | **Unique Endo., Pune** | **Eagle Medical, Delhi** | **Total Amt in Rs.** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Air Compressor | 2 | | 734260.00 | 1468520.00 |
| 2 | Vaccume Compressor with tank | 2 | 1453968.00 | | 2907936.00 |
| | | | | **Total Amt in Rs.** | **4376456.00** |

त्यानुसार सदर Air Compressor व Vaccume Compressor with tank खरेदीकामी पूर्णांकित रु.४३,७६,४५६/- (अक्षरी रक्कम रु.त्रेचाळीस लाख शहात्तर हजार चारशे छपन्न मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागाने Air Compressor व Vaccume Compressor with tank ची मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**२)** शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस–२०१४/प्र.क्र.८२/भाग–३/उद्योग–४, दि.१ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.–नियम पुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकारीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Epoxy Flooring, etc. खरेदीकामी एकत्रितरित्या प्रस्ताव

मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. त्यानूसार दि.०४/१२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय नं. ९० निर्णय क्र.५६९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले. त्यानूसार श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागाने मागणीपत्रकान्वये Air Compressor वVaccume Compressor with tank ची मागणी केली आहे. Boyles Anaesthesia Machine, Ventilator इ. या सारख्या मशिनला आवश्यकत्या दाबाने Air चा पुरवठा करण्यासाठी Air Compressor उपयोग होतो तर चालू शस्त्रक्रियेमध्ये येणारे अनावश्यक रक्त Vaccume च्या सहाय्याने जार मार्फत बाहेर काढण्याकरीता Vaccume Compressor with tank चा वापर करतात. सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागात असलेले Air Compressor व Vaccume Compressor with tank हे सन २००० मध्ये खरेदी केलेले असल्याने फार जूने झालेले असून ते वेळोवेळी नादुरुस्त होते तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या वाढल्यामुळे त्यांनी Air Compressor व Vaccume Compressor with tank ची मागणी केलेली आहे. सदर Air Compressor व Vaccume Compressor with tank ची अंदाजे किंमत ३ लाखापेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकलविभागाने मागणी केलेले Air Compressor व Vaccume Compressor with tank ची अंदाजे किंमत ३ लाखपेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४३,७६,४५६/- (अक्षरी रक्कम रु. त्रेचाळीस लाख शहात्तर हजार चारशे छपन्न मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर ठेवण्यास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.२८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागाकरीता Air Compressor व Vaccume Compressor with tank खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४३,७६,४५६/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५०** **नविन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता Biphasic Defibrillator खरेदीकामी रु.८,९७,९९४/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-नविन प्रस्ताव.

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी सध्या फोर्स मोटर्स कंपनीच्या ट्रॅव्हलर प्रकारच्या दोन कार्डीयाक रुग्णवाहीका वापरात आहेत. व आणखी दोन नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेची कामीची कार्यवाही वाहन विभागामार्फत चालू आहे. त्यानूसार सदर कार्डीयाक रुग्णवाहिके करीता दोन नग Biphasic Defibrillator ची Casulty विभागाने मागणी केलेली आहे. सदर दोन नग Biphasic Defibrillator खरेदीकामी येणा-या अंदाजे खर्चाचा करीता बायोमेडीकल विभागाकडून 1 वर्षाचा वॉरंटी कालावधी व त्यानंतर पुढील ५ वर्षाकरीता LAMC चे दरानुसार बायोमेडीकल विभागाकडून दोन पुरवठाधारकाचे कोटेशन प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार सदर पुरवठाधारकांचे प्राप्त झालेले कोटेशनचे दरानुसार अंदाजे किंमत घेण्यात येऊन सदर Biphasic Defibrillator खरेदीकामी अंदाजे खर्चाचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No | Description | Qty | Micromics instruments, Nashik (Philips) | PSM Biomed, (Nihon Kohden) | Total Amt in Rs. | Avg Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Biphasic Defibrillator | 2 | 445493.50 | 452500.00 | 897994.00 | 448997.00 | 897994.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | | | **897994.00** |

त्यानुसार सदर ०२ नग Biphasic Defibrillator खरेदीकामी पूर्णांकित रु.८,९७,९९४/- (अक्षरी रक्कम रु. आठ लाख सत्यान्नव हजार नऊशे चौ-यान्नव मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील Casulty विभागाने Biphasic Defibrillator ची मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.– नियम पुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी सध्या फोर्स मोटर्स कंपनीच्या ट्रॅव्हलर प्रकारच्या दोन कार्डीयाक रुग्णवाहीका वापरात आहेत. व आणखी दोन नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेची कामीची कार्यवाही वाहन विभागामार्फत चालू आहे. त्यानूसार सदर कार्डीयाक रुग्णवाहिके करीता दोन नग Biphasic Defibrillator ची Casulty विभागाने मागणी केलेली आहे. सदर Biphasic Defibrillator ची अंदाजे किंमत ३ लाखापेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदी करावी लागणार आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील Casulty विभागाने मागणी केलेले दोन नग Biphasic Defibrillator ची अंदाजे किंमत ३ लाखपेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई- निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,९७,९९४/- (अक्षरी रक्कम रु. आठ लाख सत्यान्नव हजार नऊशे चौ-यान्नव मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता दोन नग Biphasic Defibrillator खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८,९७,९९४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५१ नविन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता Transport Ventilator खरेदीकामी रु.१९,४७,०९७/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-नविन प्रस्ताव.

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी सध्या फोर्स मोटर्स कंपनीच्या ट्रॅव्हलर प्रकारच्या दोन कार्डीयाक रुग्णवाहीका वापरात आहेत, व आणखी दोन नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेकामीची कार्यवाही वाहन विभागामार्फत चालू आहे. त्यानूसार सदर कार्डीयाक रुग्णवाहिके करीता दोन नग Transport Ventilatorची Casulty विभागाने मागणी केलेली आहे.सदर दोन नगTransport Ventilatorखरेदीकामी येणा-या अंदाजे खर्चाचा करीता बायोमेडीकल विभागाकडून 1 वर्षाचा वॉरंटी कालावधी व त्यानंतर पुढील ५ वर्षाकरीता LAMC चे दरानुसार दोन पुरवठाधारकाचे कोटेशन प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार सदर पुरवठाधारकांचे प्राप्त झालेले कोटेशनचे दरानुसार अंदाजे किंमत घेण्यात येऊन सदर Transport Ventilator खरेदीकामी अंदाजे खर्चाचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No | Description | Qty | Global Medical, Nashik (Drager) | Micromics instruments, Nashik (Philips) | Total Amt in Rs. | Avg Rate per in Rs. | Total Amt. in Rs. (for 2 Nos.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Transport Ventilator | 2 | 993828.5 | 953268.5 | 1947097.00 | 973548.50 | 1947097.00 |
| | | | | | | **Total Amt. in Rs.** | **1947097.00** |

त्यानुसार सदर०२ नग Transport Ventilator खरेदीकामी पूर्णांकित रु.१९,४७,०९७/- (अक्षरी रक्कम रु. एकोणवीस लाख सत्तेचाळीस हजार सत्यान्नव मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील Casulty विभागाने Transport Ventilatorची मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी सध्या फोर्स मोटर्स कंपनीच्या ट्रॅव्हलर प्रकारच्या दोन कार्डीयाक रुग्णवाहीका वापरात आहेत. व आणखी दोन नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेची कामीची कार्यवाही वाहन विभागामार्फत चालू आहे. त्यानूसार सदर कार्डीयाक रुग्णवाहिके करीता दोन नग Transport Ventilatorची Casulty विभागाने मागणी केलेली आहे.सदर Transport Ventilatorची अंदाजे किंमत ३ लाखापेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदी करावी लागणार आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील Casulty विभागाने मागणी केलेले दोन नग Transport Ventilator ची अंदाजे किंमत ३ लाखपेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१९,४७,०९७/- (अक्षरी रक्कम रु. एकोणवीस लाख सत्तेचाळीस हजार सत्यान्नव मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता दोन नग Transport Ventilator खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१९,४७,०९७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५२** **M/s Johnson & Johnson (ethicon) कंपनीचे Suture Material, Hemostats, Physio Mesh & Strap, Knotless Suture, Cautery Pad & Pencil तसेच Trocors, NTLC Stapler & SR Cartridge, Cutter खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये ब-याच प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात व त्यासाठी लागणारे मटेरिअल हे वेळोवेळी विहीत पध्दतीने ई-निविदा व कोटेशन मागवून प्राप्त पुरवठाधारकाच्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करून त्यानुसार प्राप्त निम्नतम पुरवठाधारकाकडून खरेदी करून देणेत येते. परंतु त्यातील काही Monopoly Items असतात की ज्यांना एकच पुरवठाधारकाचे दर प्राप्त होतात शासकीय खरेदी नियमावली लागू झाल्यापासून सदर मटेरिअलकामी एकच निविदा/कोटेशन प्राप्त होत असल्याने मागील ३ वर्षापासून सदर मटेरिअल खरेदी करणे फारच अवघड झाल्याने खरेदी नियमातील नियम एकल स्त्रोत पध्दतीने खरेदी करणेची

मुभा खरेदी विभागाला देण्यात आलेली आहे. त्यानुसार ऑपरेशनच्या वेळेस व त्यानंतर लागणा-या मटेरिअलसाठी वेगवेगळया डॉक्टरांकडून मागणी करणेत येत आहे. त्यासाठी त्या त्या पुरवठाधारकांकडून दर घेणेत आलेले आहे. Cardiac Surgery विभागाकडून खालील Monopoly Suture ची मागणी करणेत आलेली आहे, सदर मटेरिअल सद्यस्थितीत संपल्याने त्यांचा खरेदी आदेश संपल्याने ते नव्याने खरेदी करावे लागणार आहे. त्याची तपशीलवार माहीती खालीलप्रमाणे :-

**1) Ever point Sutures & ZipFix Sternum Closure Bands:-**

| S.N | Product Code | Product Specification | Price Incl. GST | Box of | MRP | Purchase Amt. in Rs.last 5 years |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Prolene 7-0, Everpoint (Tungsten Rhenium) EP8704SLH | 3/8 Circle, 9.3mm, BV 175-8, CC point, Everpoint, Double Needle, 60cms | 31738.56 | 36 Foils | 57708 | 5013543.29 |
| 2 | Prolene 7-0, Everpoint (Tungsten Rhenium) EP8735H | 3/8 Circle, 8mm,TP, BV 175-6, Everpoint, Double Needle, 60cms | 32814.42 | 36 Foils | 69156 | 1066698.00 |
The Payment of Gratuity Act is permitting the employer to forteit the gratuity in case of certain proved misconducts such as riotous behavior act of violence, offence involving moral turptitude, causing damade or loss to the payment of employer.

In case in hand of Dr. Amol Bahvant Sardar, RMO is based on unauthorized absentisum therefore this misconduct cannot be ground for forfeiting the amount of gratuity payable to him.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–ॲड.अशोक पाटील, अहमदनगर यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार डॉ. अमोल भगवंत सरदार हे उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे डॉ. सरदार यांना नियमाप्रमाणे देय असणारी उपदानाची रक्कम अदा करता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.अमोल भगवंत सरदार यांना नियमाप्रमाणे देय असणारी उपदानाची रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५५** **कामकाजाची वेळ आठवडयातुन ४० तास व आळीपाळीने एक दिवसाची रात्रपाळी, दुसरा व चौथा शनिवार सुट्टी व इतर भत्ते सुरु करणेबाबत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील स्थायी पध्दतीने कार्यरत परिचारीकांचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) (सर्वसाधारण सेवा अटी) विनियम, २०१३ प्रकरण ४ सुट्टया-

१) समितीने वेळोवेळी संस्थानाच्या कर्मचा-यांसाठी घोषित केलेल्या सुट्टया त्यांच्यासाठी अनुज्ञेय असतील.

२) कार्यकारी अधिका-यांच्या लेखी आदेशानुसार घोषित केलेल्या सुट्टया संस्थानाचे कर्मचारी प्राप्त करू शकतात.

३) सुट्टया कोणत्याही प्रकारच्या रजेच्या मागे किंवा पुढे जोडल्या जाऊ शकतात.

साप्ताहिक सुट्टया- कार्यकारी अधिका-यांच्या आदेशानुसार विनिर्दिष्ट केलेली आठवड्यातील कोणतीही एक सुट्टी साप्ताहिक सुट्टी म्हणुन संस्थानाच्या प्रत्येक कर्मचा-यासाठी अनुज्ञेय असेल.

भरपाई सुट्टी-

१) गट क आणि ड मधील संस्थानाच्या ज्या कर्मचा-याला त्याच्या नजीकच्या वरिष्ठ प्राधिका-यांनी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी किंवा इतर कोणत्याही सुट्टीच्या दिवशी कर्तव्यावर उपस्थित रहाण्याचे निर्देश दिले असतील अशा कर्मचा-याला समितीने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या अटिंच्या अधिन राहुन अशा प्रकारे गमावलेल्या साप्ताहिक सुट्टी किंवा सुट्टयांच्या संख्येएवढ्या भरपाई सुट्टया घेण्यात अनुमती दिली जाईल..

२) एका वेळेस तिन दिवसापेक्षा जास्त भरपाई रजा साचवता येणार नाही.

३) परिस्थीतीची निकड त्याचप्रमाणे संस्थानाच्या कर्मचा-याची सोय लक्षात घेऊन नजीकच्या वरिष्ठ प्राधिकाराच्या इच्छेनुसार भरपाई सुट्टया घेण्यास अनुमती घेता येईल.

४) ज्या दिवशी भरपाई सुट्टी नियत झाली असेल त्या दिवसापासून दोन महिन्याच्या कालावधीत भरपाई सुट्टी घेता येईल.

५) भरपाई सुट्टी नियमीत रजेच्या किंवा सुट्टयांच्या मागे किंवा पुढे जोडली जाऊ शकते.

प्रस्तावना- श्री साईबाबा हॉस्पिटल हॉस्पिटलमधील परिचारीकांचे दि.०३/०९/२०१९, दि.१०/०९/२०१९ व दि.०४/०१/२०२० रोजीचे अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाले असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

“ सर्व साईबाबा हॉस्पिटलमधील परिचारीका कारणे विनंतीपूर्वक अर्ज करतो की, आम्हाला Night duty नंतर Night Off व Day Off (आठवडा सुट्टी) मिळावी. सर्व शासकीय व निमशासकीय रूग्णालयामध्ये ४० तास / आठवडा अशा प्रकारचे Duty schedule आहे. परंतु सध्या आम्हाला फक्त Night Off हाच आठवड्याचा ऑफ दिला जातो. Night Off नंतर आम्हाला लगेचच दुस-या दिवशी Day duty ला हजर रहावे लागते. त्यामुळे अम्हाला पुरेशी विश्रांती मिळत नाही. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या आस्थापनेवरील श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ हॉस्पिटल आम्ही सर्व परिचारीका मेहेरबान साहेबांना नम्र पूर्वक विनंती करतो की आपल्या सर्व परिचारीकांना महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनीक आरोग्य विभागातील परिचारीकांप्रमाणे कामकाजाची वेळ ४० तास, व आळीपाळीने एक दिवसाची रात्रपाळी, दुसरा व चौथा शनिवार सुट्टी, व इतर भत्ते सुरू करावेत, ही विनंती."

उपरोक्त परिचारीका यांनी त्यांचे अर्जासोबत महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, परिपत्रक क्र ओडीओ १६८८. सीआर१६३/८८/आस्थापना मंत्रालय दि. ०९/१२/१९९१ सोबत जोडले असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"संदर्भाधीन परिपत्रान्वये आरोग्य सेवा संचालनालय व त्यांचा अधिपत्याखालील सर्व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाजाच्या वेळा निश्चित करताना अत्यावश्यक सेवेतील संस्थामध्ये काम करणा-या कोणत्याही संवर्गातील अधिकारी / कर्मचा-यांना महिन्याचा दुस-या व चौथ्या शनिवारी सुट्टी राहणार नाही. अत्यावश्यक सेवेतील संस्था महिन्याचा सर्व शनिवार अर्धा दिवस सकाळी ९.४५ ते १.३० पर्यंत चालू राहतील असे आदेश देण्यात आले होते. त्याचबरोबर रूग्णालयाची सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने रूग्णाची गैरसोय होऊ नये म्हणुन रूग्णसेवा २४ तास चालू राहील असेही आदेश देण्यात आले होते. याबाबत काही संस्था प्रमुखांनी शासनाच्या असे निर्दर्शनास आणले की, ज्यांच्या सेवा अत्यावश्यक आहेत असे कर्मचारी आळीपाळीने २४ तास कामावर असतात. त्यामुळे ज्या संवर्गातील कर्मचा-यांना वरील आदेशाप्रमाणे काम करणे रूग्णसेवेच्या दृष्टीने सोईचे होणार नाही.

वरील बाबीचा विचार करता शासन परीपत्रक क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.ओडीओ-१६८८/आस्थापना/दि.२.५.९१ मध्ये अंशता बदल करून शासन आता असे आदेश देत आहे की, अत्यावश्यक सेवा असलेले कर्मचारी सुध्दा रूग्णलयाच्या कामाची निकड लक्षात घेता त्यांना सुट्टी देण्यास हरकत नसल्यास

महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी पूर्ण दिवसाच्या सूट्टीस मात्र असतील मात्र ते जर त्या दिवशी कामावर असतील तर त्या दिवसाची पर्यायी सूट्टी त्यांना आळीपाळीने कामाची निकड लक्षात घेऊन देण्यात यावी.

या आदेशाप्रमाणे अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांना सुट्टीच्या लाभ देताना त्यांची भोजनाची अर्ध्या तासाची सुट्टी सोडून आठवड्यामध्ये किमान ४० तास काम करणे आवश्यक आहे हे लक्षात घेण्यात यावे. सदर परिपत्रक सामान्य प्रशासन सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे."

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील परिचारीकांनी एक दिवसाची रात्रपाळी, ४० तासांचे आठवडा कामकाज, दुसरा व चौथा शनिवार सुट्टी, इतर भत्ते मिळणेसाठी यापुर्वीही दि. १४/०९/२०१७ रोजी अर्ज केला होता. संस्थानच्या व Hospital / रूग्णालयातील इतर कर्मचा-यांच्या सेवाशर्ती सारख्याच आहेत. रूग्णालयातील कर्मचा-यांसाठी वेगळे सेवा नियम नाहीत. त्यामुळे परिचारीकांनी, आळीपाळीने एक दिवसाची रात्रपाळी, ४० तासांचे आठवडा कामकाज, दुसरा व चौथा शनिवार सुट्टी व इतर भत्ते मिळणेकामी केलेल्या अर्जातील मागण्या सेवा नियमास अनुसरून नाहीत. शासनाचे सर्वच्या सर्व शासन निर्णय व सेवा नियम संस्थान कर्मचा-यास जशाच्या तसे लागु नाहीत.

उपरोक्त अर्जदार परिचारीका यांनी त्यांचे अर्जासोबत आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य) दि.१०/०४/२०११ रोजीचे परिपत्रक जोडले असुन त्यामध्ये, "परिचारीकांचे कामासंबंधीचे आठवड्यातील तास ४० असावेत, अशा शासनपत्र दि. १५.१२.१९७९ रोजीच्या सूचना आहेत. तसेच मा महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी देखील दि. २०.०२.१९९६ रोजीच्या पत्रान्वये याबाबत सर्व संबंधितांना निर्देश दिले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी". असे नमुद आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयासाठी आकृतीबंध २००९ साली मंजुर झालेला असुन त्यामध्ये परिचारीकांची मंजुर संख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | रूग्णालय | मंजुर पदे | | काल्पनिक पदे (११ महिनेसाठी) | एकुण | भरलेली पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | | | स्थायी | अस्थायी (११ महिने) | काल्पनिक पदे(११ महिनेसाठी) | आऊटसोर्सिंग/बाह्य यंत्रणेद्वारे | एकुण |
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** | **०८** | **०९** | **१०** | **११** |
| १ | साईबाबा | १६० | ४० | ०० | २०० | १०१ | ०८ | ०० | ८४ | १९३ |
| २ | साईनाथ | १०२ | २५ | २५ | १५२ | ५२ | ०२ | २५ | ५८ | १३७ |
| **एकूण** | | **२६२** | **६५** | **२५** | **३५२** | **१५३** | **१०** | **२५** | **१४२** | **३३०** |

आकृतीबंध मंजूर झाला तेव्हा सन २००९ साली साईबाबा हॉस्पिटलमध्ये २०० व श्री साईनाथ रूग्णालयात २०० खाटा होत्या. सध्या साईबाबा हॉस्पिटलमध्ये २५० व साईनाथ रूग्णालयात ३०० खाटा आहेत. दोन्ही रूग्णालयात रूग्णसंख्या, खाटांची संख्या वाढल्याने कामाचा व्याप वाढलेला आहे. तथापी, परिचारीकांची संख्या मात्र सन २००९ चे आकृतीबंधानुसारच आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१९ निर्णय क्र १६५ नुसार, सुधारित आकृतीबंध व इतर अनुषंगिक आस्थापना विषयक कामासाठी ०४ सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचा कार्यगट स्थापन करणेत आला असुन संबंधितांना दि. १९/०८/२०१९ रोजी नियुक्ती आदेश देणेत आलेले आहेत. सदर सुधारित आकृतीबंधामध्ये रूग्णसंख्या व बेडसंख्या, ओटी संख्या यानुसार परिचारीकांची वाढीव संख्या प्रस्तावीत केलेली असुन त्यास मा व्यवस्थापन समिती तसेच शासनाचे मान्यतेसाठी आणखी वेळ लागण्याची शक्यता आहे.

विभागाचे स्पष्ट अभिप्राय- सन २००९ साली साईबाबा हॉस्पिटलसाठी २०० व श्री साईनाथ रूग्णालयासाठी २०० खाटांसाठी आकृतीबंध मंजूर झाला असुन सध्या साईबाबा हॉस्पिटलमध्ये २५० व साईनाथ रूग्णालयात ३०० खाटा आहेत. दोन्ही रूग्णालयात रूग्णसंख्या, ओटी संख्या, खाटांची संख्या वाढल्याने कामाचा व्याप वाढलेला आहे. तथापी, परिचारीकांची संख्या मात्र सन २००९ चे आकृतीबंधानुसारच आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, परिपत्रक दि.०९/१२/१९९१ नुसार महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी पूर्ण दिवसाची सुट्टी तसेच आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य) दि. १०/०४/२०११ रोजीचे परिपत्रकनुसार आठवड्यातील ४० तास काम करावयाचे झाल्यास रूग्णालयातील परिचारक/परिचारीकांची संख्या अपुरी पडेल व रूग्णांना उत्कृष्ट सेवा देणे कठीण होईल, असे नम्र मत आहे.

तरी, श्री साईबाबा हॉस्पिटल हॉस्पिटलमधील परिचारीकांचे Night duty नंतर Night Off व Day Off (आठवडा सुट्टी) तसेच ४० तास / आठवडा अशा प्रकारचे Duty schedule मागणी बाबतचे दि.०३/०९/२०१९, दि. १०/०९/२०१९ व दि. ०४/०१/२०२० रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२८९ सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५६ श्रीमती सोनल नागपुरे, सोशल वर्कर यांचा सोशल वर्कर या पदाची वेतनश्रेणी निश्चिती करणेबाबत अर्ज.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयाकींत अर्जान्वये, श्रीमती सोनल भिमराज नागपुरे, सोशल वर्कर यांनी श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये २६ ऑगष्ट २०१०पासून कार्यरत असून आज पावेतो मला मिळणारा ग्रेड पे. ४२००- इतका मिळत आहे. परंतु सोशल वर्कर या पदाचे ग्रेड पे ४३००/- असून. त्यानुसार सोशल वर्कर यांना ग्रेड पे मंजुर करुन सातव्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करावी अशी विनंती केलेली आहे.

याबाबतची वस्तुस्थितीती खालील प्रमाणे-

श्री साईबाबा हॉस्पिटल सुरु करणे पुर्वी आकृतीबंधास महाराष्ट्र शासनाचे मंजुरीचे अधिन राहुन आवश्यकते विविध पदे फिक्स पे (Adhoc fix pay) वर भरण्यात आलेली होती सदर पदामध्ये श्रीमती शोभा गेणु गाडेकर यांची समाज सेवक पदावर रु.८००० महिना फिक्स वेतनावर करण्यात आलेली आहे.

श्रीमती गाडेकर यांना मंजुर आकृतीबंधानुसार आकृतीबंधातील मंजुर वेतनश्रेणी रु.५०००-१५०-८००० दि.०४/१२/२००७ पासुन लागु करण्यात आलेली आहे.

दि.१३/०६/२००७ रोजी,विधी व न्याय विभाग यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलचा आकृतीबंध मंजुर करण्यात आला सदर आकृतीबंधामध्ये समाजसेवक या संवर्गाचे तीन पदे (वेतनश्रेणी रु.५०००-१५०-८०००) तसेच दि.०७/०८/२००९ चे सुधारीत आकृतीबंधात श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी ०३ व श्री साईनाथ रुग्णालयासाठी ०१ पदे मंजुर करण्यात आलेले आहे. त्याबाबतची वस्तुस्थितीती खालील प्रमाणे.

| अ.नं. | हॉस्पिटलचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा हॉस्पिटल | ०३ | ०३ | ० |
| २ | श्री सारईनाथ रुग्णालय | ०१ | ० | ०१ |

दि.२५/०६/२००९ रोजीचे आदेशाने, संस्थान कर्मचा-याना दि, ०१/०१/२०१६ पासुन सहावा वेतन आयोग लागु करण्यात आला. त्यानुसार समाज सेवक पदासाठी सुधारीत वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० लागु करण्यात आलेली आहे.

दि.०९/०७/२०१९ रोजीचे आदेशाने, संस्थान कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यात आला. त्यानुसार समाज सेवक या पदाला सुधारीत वेतन मॅट्रीक–S-14-(38600-122800) लागु करण्यात आलेला आहेत.

तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६२ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी मंजुर आकृतीबंधातील ०२ रिक्त पदावर श्रीमती जयश्री ससे व सोनल नागपुरे यांची समाजसेवक या पदी (९३३- ३४८०० ग्रेड पे - ४२००) वर नेमणुक करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानचे आस्थापने वरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इ. बाबात छाणनी करुन नियुक्तीचे व पदोन्नतीचे पारुपविनियम (सेवा प्रवेश नियम) शासनास दि. २६/०६/२०१४ रोजी मान्यते करीता पाठविण्यात आले होते. तथापी त्यास मान्यता मिळालेली नाही. सदर सेवा प्रवेश नियमामध्ये सोशल वर्कर पदाचा वेतन बॅन्ड रु. ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन रु. ४२०० दर्शविण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६२ नुसार अनुक्रमे, श्रीमती जयश्री साहेबराव ससे, व श्रीमती सोनल भिमराज नागपुरे यांची सोशल वर्कर यापदावर वेतन बॅन्ड रु. ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन रु. ४२०० मध्ये नेमणुक करण्यात आली.व दि. ०५/०७/२०१२ च्या आदेशान्वये त्यांना संस्थान सेवेत कायम करण्यात आले.

श्री साईबाबा संस्थानचे विनियम (सेवा प्रवेश नियम) शासनास मान्यते करीता पाठविण्यात आले होते. तथापी त्यास मान्यता मिळालेली नाही. सदर सेवा प्रवेश नियमामध्ये सोशल वर्कर पदाचा वेतन बॅन्ड रु. ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन रु. ४२०० दर्शविण्यात आलेला आहे.

दि.०९/०७/२०१९ रोजीचे आदेशाने श्री साईबाबा संस्थान कर्मचा-यांना सातवा वेतन आयोगलागु करण्यात आलेला आहे. त्यानुसार श्रीमती शोभा गेणु गाडेकर सोशल वर्कर, यांना विद्यमान वेतन बॅन्ड रु. ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन रु.४३०० सातव्या वेतन आयोगा मध्ये सुधारीत वेतन मॅट्रीक –S-14-(38600-122800) मध्ये वेतन निश्चिती करुन त्यानुसार वेतन देण्यात येत आहे. आणि श्रीमती सोनल भिमराज नागपुरे व जयश्री साहेबराव ससे सोशल वर्कर, यांना विद्यमान वेतन बॅन्ड रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४२०० सातव्या वेतन आयोगामध्ये सुधारीत वेतन मॅट्रीक S-13-(35400- 112400) मध्ये वेतन देण्यात येत आहे.

विभागाचा अभिप्रायः- महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ मधील सार्वजनीक आरोग्य विभागामध्ये सोशल वर्कर या पदाच्या वेतनश्रेणी रु. ५०००- ८००० ला सहावा वेतन आयोगामध्ये सुधारीत वेतन बॅन्ड रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३०० आहे. सोशल वर्कर पदावर काम करणा-या कर्मचा-याच्या वेतनश्रेणीतील तफावरत दुर करणेसाठी श्रीमती नागपुरे व ससे समकक्ष पदावरील श्रीमती शोभा गाडेकर यांचे प्रमाणे त्यांचे नियुक्तीचे दिनांकापासुन ६ वेतन आयोगानुसार वेतन बॅन्ड रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३०० लागु करावा लागेल. त्यानुसार वेतननिश्चिती करुन फरक अदा करावा लागेल. साधारणतः फरकाची प्रत्येकी रक्कम रु.३,३०,०००/- पर्यंत होईल.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव निर्णयास्तव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सोशल वर्कर पदावर काम करणाऱ्या श्रीमती सोनल भिमराज नागपुरे व जयश्री साहेबराव ससे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ मधील सार्वजनीक आरोग्य विभागामध्ये सोशल वर्कर या पदाच्या वेतनश्रेणीनुसार त्यांचे नियुक्तीचे दिनांकापासुन ६व्या वेतन आयोगानुसार वेतन बॅन्ड रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३०० लागु करण्यास व त्यानुसार वेतननिश्चिती करुन फरकाची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता ECG Machine खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.११.२०१८ निर्णय क्र.७०९ अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता ०८ नग ECG Machine खरेदीकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.१५,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती व अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. ऑनलाईन निविदा विक्रीची मुदत दि.१०/०६/२०१९ ते दि.०१/०७/२०१९अशी ठेवण्यात आलेली होती. सदर जाहिरातीबाबत India Mart, Justdial इ. वेबसाईटवर देखील Enquiry टाकण्यात आलेली होती, तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पुरवठा धारकांना ई-मेल व फोनद्वारे देखिल कळविले होते. सदर निविदेस अनूसरुन ०५ ई निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

सदरहू ०५ ई निविदा दि.०३/०७/२०१९ रोजी उघडण्यात येऊन त्याचा तांत्रिक तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो बायोमेडीकल विभागाकडे तपासणीकरीता दिला असता त्यांनी M/s. Shree Enterprises, Pune यांनीच फक्त आपण मागविलेले प्रमाणे Certificates दिलेले असले बाबत कळविले असून उर्वरीत सर्व ई निविदाधारकांनी Certificates दिलेले नसल्याचे सि. बायोमेडीकल इंजिनिअर यांनी कळविले आहे त्यामुळे M/s. Shree Enterprises, Pune यांचीच निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र असून उर्वरीत ई निविदा अपात्र आहेत. त्यामुळे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता ०८ नग ECG Machine खरेदीकामी दुस-यांदा फेर ई-निविदा मागवाव्या लागणार आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात संस्थानचे प्रसिध्दी विभागामार्फत वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर सदरची जाहिरात देता यईल. तसेच सदरच्या

जाहिरातीबाबत आपणाकडे उपलब्ध असलेले निविदाधारक तसेच इंटरनेट वरुन माहिती घेऊन अजून काही कंपन्यांना ई-मेल पाठवुन देखील निविदेबाबत कळविता येईल.

त्यानुसार दि.१६/०७/२०१९ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये उपरोक्त प्रमाणे ECG Machine खरेदीकामी ई निविदा मागविण्यास तसेच उपरोक्त निविदेचा मसुदा सादर केला आहे, त्यावर स्वाक्षरी होणेस व उपरोक्तप्रमाणे जाहिरात ही पुणे,नाशिक,अहमदनगर,औरंगाबाद या शहारातील मराठी वर्तामनपत्रात तसेच दिल्ली, मुंबई, बैगलोर व चेन्नई या शहरातील इंग्रजी वर्तमान पत्रात शासकिय दराने प्रसिध्द करणेस व संस्थानचे संकेत स्थळावर देणेस तसेच नामांकित कंपन्याना जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ई- मेल करणेस मान्यता मिळालेली होती.त्यानूसार दि.२३/०९/२०१९ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात येऊन दि.२५/०९/२०१९ रोजी प्री. बीड मिटींग ठेवण्यात आलेली होती. परंतू विधानसभेच्या निवडणूकीची आदर्श आचार संहिता लागू असल्यामुळे सदर प्री. बीड मिटींग स्थगित ठेवण्यात येऊन निविदा विक्री देखील स्थगित ठेवण्यात आलेली होती.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली असून दि.१६/१२/२०१९ ते १५/०१/२०२० या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी पुरेश्या निविदा प्राप्त झालेल्या नसल्यामुळे तसेच ब-याच निविदाधारकांनी दुरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केल्यामुळे तसेच सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदरई-निविदेस शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.०१ डिसेंबर २०१६– प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ अन्वये दि.१६/०१/२०२० रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दि.२२/०१/२०२० पर्यंत पहिल्यांदा, दि.२२/०१/२०२० रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दि.३०/०१/२०२० पर्यंत दुस-यांदा, तर दि.३१/०१/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.०६/०२/२०२० पर्यंत तिस-यांदा मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार प्राप्त ऑनलाईन ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S.N. | Name of Tender | Tender ID_No. | No.of Received Tender |
|---|---|---|---|
| 1 | Tender B - ECG Machine For Shri Saibaba & Sainath Hospital, Shirdi | 2019_SAI_502432_1 | 7 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकुण ०७ तांत्रिक ई-निविदा दि.२०/०२/२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आला असून तो बायोमेडीकल विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला असून प्राप्त झालेले एकुण सातही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असलेबाबत त्यांनी कळविलेले आहे, परंतू Keps Pharma, Mumbai यांनी Authorisation चे पत्र Cardiobeat नावाने दिलेले असून Certification हे Bionet नावाने दिलेले आहेत्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात येऊन तांत्रिक दृष्टया पात्र असलेल्या०६ निविदाधारकांच्या कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.२०/०३/२०२० रोजीचे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्याअसून त्यातील दरांचा थोडक्यात तपशिल पुढीलप्रमाणे–

१ तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल –

| Sr. No | Description of Work / Item(s) | No. of Qty | Gunjan Surgical and Scientific Co. | | M/s Vidhi Sales | | RAJNEEL DISTRIBUTOR | | Orange Instruments and Engineering | | BTL INDIA PRIVATE LIMITED | | KALAGAR EQUIPMENT | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | 12 CHANNEL ECG MACHINE WITH 1 YEAR WARRANTY FOR SHRI SAIBABA & SHRI SAINATH HOSPITAL SHIRDI | 8 | 100800.00 | 806400.00 | **58800.00** | **470400.00** | 50030.00 | 400240.00 | 74000.00 | 592000.00 | 248326.40 | 1986611.20 | 100800.00 | 806400.00 |
| 2.00 | List of Accessories - | | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2.01 | Power Chord | 8 | 0.00 | 0.00 | **0.00** | **0.00** | 1200.00 | 9600.00 | 230.00 | 1840.00 | 236.00 | 1888.00 | 590.00 | 4720.00 |
| 2.02 | 10 Lead ECG Cable with Clamp set & electrodes | 8 | 0.00 | 0.00 | **0.00** | **0.00** | 2500.00 | 20000.00 | 5500.00 | 44000.00 | 16520.00 | 132160.00 | 7080.00 | 56640.00 |
| 2.03 | Paper Roll | 8 | 0.00 | 0.00 | **0.00** | **0.00** | 375.00 | 3000.00 | 300.00 | 2400.00 | 1416.00 | 11328.00 | 236.00 | 1888.00 |
| 2.04 | ECG Jelly Bottle | 8 | 0.00 | 0.00 | **0.00** | **0.00** | 25.00 | 200.00 | 40.00 | 320.00 | 944.00 | 7552.00 | 168.00 | 1344.00 |
| | **Total Amt. in Rs. (Machine + Accessories)** | | | 806400.00 | | **470400.00** | | 433040.00 | | 640560.00 | | 2139539.20 | | 870992.00 |
| 3.00 | LAMC Cost- LAMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | | | | | | | | | | |
| 3.01 | LAMC Cost For 2th Year | 8 | 3600.00 | 28800.00 | **1176.00** | **9408.00** | 2501.50 | 20012.00 | 7500.00 | 60000.00 | 5233.00 | 41864.00 | 7670.00 | 61360.00 |
| 3.02 | LAMC Cost For 3th Year | 8 | 3600.00 | 28800.00 | **1176.00** | **9408.00** | 2501.50 | 20012.00 | 7500.00 | 60000.00 | 5756.00 | 46048.00 | 8054.00 | 64432.00 |
| 3.03 | LAMC Cost For 4th Year | 8 | 3600.00 | 28800.00 | **1176.00** | **9408.00** | 2501.50 | 20012.00 | 7500.00 | 60000.00 | 6331.00 | 50648.00 | 8457.00 | 67656.00 |
| 3.04 | LAMC Cost For 5th Year | 8 | 3600.00 | 28800.00 | **1764.00** | **14112.00** | 2501.50 | 20012.00 | 7500.00 | 60000.00 | 6965.00 | 55720.00 | 8880.00 | 71040.00 |
| 3.05 | LAMC Cost For 6th Year | 8 | 3600.00 | 28800.00 | **1764.00** | **14112.00** | 2501.50 | 20012.00 | 7500.00 | 60000.00 | 7661.00 | 61288.00 | 9324.00 | 74592.00 |
| | **Total Amt. of LAMC for Five years in Rs** | | | 144000.00 | | **56448.00** | | 100060.00 | | 300000.00 | | 255568.00 | | 339080.00 |
| | **Total Amt.in Rs. (Machine + Accessories + LAMC)** | | | 950400.00 | | **526848.00** | | 533100.00 | | 940560.00 | | 2395107.20 | | 1210072.00 |

2) निम्नत्तम निविदाधारकांचा तपशिल -

| S.N. | Name of Supplier | Name of Item(s) | No. of Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. | LAMC Amt.in Rs. | Final Total Amt. in Rs. (Machine + Accessories + LAMC) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s Vidhi Sales, Dhule | 12 CHANNEL ECG MACHINE WITH 1 YEAR WARRANTY FOR SHRI SAIBABA & SHRI SAINATH HOSPITAL, SHIRDI | 8 | 58800.00 | 470400.00 | 56448.00 | 526848.00 |
| | | | **Total Amt.in Rs.** | | | | **526848.00** |

निविदा टक्केवारी कमी / अधिक : - ६५.१०९४% कमी

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करताM/s Vidhi Sales, Dhule यांचे ECG Machine व Accessories करीता प्रती नग दर प्रती नग रु.५८८००/- हे निम्नतम दर प्राप्त झालेले आहे, त्यानुसार ८ नग ECG Machine खरेदीकरीता एकूण रक्कम रु.४७०४००/- तसेच LAMC करीता वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील ०५ वर्षासाठी८ नगांकरीता एकुण रक्कमरु.५६४४८/- अशी एकुण एकत्रित रक्कम रु.५२६८४८/- इतकी देऊ केलेली आहे. त्यामुळे सदर पुरवठाधारकास मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर समक्ष बोलावुन चर्चा/वाटाघाटी करुन निविदेत दिलेले दर कमी करुन त्यांना पुरवठा आदेश देता येईल, असे मत आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता ०८ नग ECG Machine व Accessories खरेदीकामी M/s Vidhi Sales, Dhule यांचे बरोबर ८ नग ECG Machine ची रक्कम रु.४७०४००/- तसेच LAMC करीता वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील ०५ वर्षाकरिता एकूण रक्कमरु.५६४४८/- अशी एकूण रु.५२६८४८/-या रक्कमेवर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता ०८ नग ECG Machine व Accessories खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s Vidhi Sales, Dhule यांना दरांबाबत चर्चा/वाटाघाटी करणेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५८** **श्री साईनाथ रुग्णालयातील I.C.C.U. या विभागाकरीता ०१ नग Defibrillator Machine खरेदी करणेकामी चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयातील ICCU या विभागाकरीता ०१ नग Defibrillator Machine खरेदीकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.९,०८,२४४/- (अक्षरी रू.नऊ लाख

आठ हजार दोनशे चव्वेचाळीस मात्र) चे खर्चास दि.२६/०२/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.१३७ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि. २२/०५/२०१९ रोजीचे मंजुर टिप्पणीअन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती व अधिकृत विक्रेते/पुरवठाधारक यांना ई-मेलव्दारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. ऑनलाईन ई-निविदा विक्रीची मुदत दि. १४/०६/२०१९ ते दि. ०१/०७/२०१९ पर्यंत ठेवण्यात आलेली होती. त्यास अनुसरून ०३ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त झालेल्या ०३ ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा दि.०३/०७/२०१९ रोजीच्या मा. खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या होत्या. उघडण्यात आलेल्या निविदेचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन बायोमेडीकल विभागाकडून तपासून घेण्यात आलेला आहे. प्राप्त ०३ निविदाधारकांपैकी एकच निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र आहे. उर्वरीत ०२ निविदाधारकांचे FDA/UL Certificate नसल्यामुळे ते तांत्रिकदृष्टया अपात्र ठरविण्यात यावे असा बायोमेडीकल विभागाने शेरा दिलेला आहे. त्यामुळे श्री साईनाथ रूग्णालयातील ICCU याविभागाकरीता ०१ नग Defibrillator Machine खरेदीकामी दि.११/११/२०१९ रोजीचे मंजुर टिप्पणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली असून दि.१६/१२/२०१९ ते १५/०१/२०२० या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी पुरेश्या निविदा प्राप्त झालेल्या नसल्यामुळे तसेच ब-याच निविदाधारकांनी दुरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केल्यामुळे तसेच सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदर ई-निविदेस शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.०१ डिसेंबर २०१६– प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील– निविदा कालावधीस मुदतवाढ अन्वये दि.१६/०१/२०२० रोजीचे मंजूर टिप्पणीन्वयेपहिल्यांदा दि.२२/०१/२०२० पर्यंतत्यानंतर दि.२२/०१/२०२० रोजीचे मंजूर टिप्पणीन्वयेदुस-यांदा दि.३०/०१/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती त्यानंतर दि.३१/०१/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा दि.०६/०२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार प्राप्त ऑनलाईन ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S.N. | Name of Tender | Tender ID_No. | No.of Received Tender |
|---|---|---|---|
| 1 | Tender C- Defibrillator Machine For Shri Sainath Hospital, Shirdi | 2019_SAI_502430_1 | 2 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकुण ०२ तांत्रिक ई-निविदा दि.२०/०२/२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आला असून तो बायोमेडीकल विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला असून प्राप्त झालेले एकुण दोन्ही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असलेबाबत त्यांनी कळविलेले आहे.

तसेच प्राप्त दोन्ही निविदाधारकांपैकी M/s. KEPS Pharma, Mumbai यांनी Zoll कंपनीचे मशिनकरीता Technical Specification दिलेले असून त्यांचे भारतातील Importer Hospimax हे आहेत, त्यानुसार Hospimax यांनी KEPS Pharma, Mumbai यांना Authorised Distributors म्हणून नेमलेले आहे, त्यामुळे M/s. KEPS Pharma, Mumbaiयांची निविदा विचारात घेण्यात आलेली आहे. उपरोक्त खरेदीकामी तांत्रिक दृष्टया पात्र असलेल्या ०२ निविदाधारकांच्या कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.२०/०३/२०२० मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

1) तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल –

| Sr. No. | Description of Instruments | No.of Qty. | Keps Pharma, Mumbai | | M/s. Vidhi Sales, Dhule | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | DEFIBRILATOR MACHINE WITH 5 YEARS WARRANTY & WITH CONSUMABLES AS PER SPECIFICATIONS FOR I.C.C.U. OF SHRI SAINATH HOSPITAL | 1 | Rate | Total Amount | Rate | Total Amount |
| | | | 800800.00 | 800800.00 | 226198.00 | 226198.00 |
| | **Consumable** | | | | | |
| | ECG Cable (3 lead cable) | 1 | 14039.00 | 14039.00 | 0.00 | 0.00 |
| | Power Chord | 1 | 4130.00 | 4130.00 | 0.00 | 0.00 |
| | Paper Roll | 5 | 413.00 | 2065.00 | 0.00 | 0.00 |
| | Adult/Pediatric padels (Reusable padels with contact indicator) | 1 | 86240.00 | 86240.00 | 0.00 | 0.00 |
| | AED/pacing extension cable | 1 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| | Test load | 1 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| | Smart Battery | 1 | 41300.00 | 41300.00 | 0.00 | 0.00 |
| | LAMC(Labour Annual Maintenance Contract) cost should be including Taxes. | | | | | |
| | LAMC Cost for 6th Year | 1 | 84370.00 | 84370.00 | 4525.00 | 4525.00 |
| | LAMC Cost for 7th Year | 1 | 105462.00 | 105462.00 | 4525.00 | 4525.00 |
| | LAMC Cost for 8th Year | 1 | 131828.12 | 131828.12 | 4525.00 | 4525.00 |
| | LAMC Cost for 9th Year | 1 | 164785.00 | 164785.00 | 6785.00 | 6785.00 |
| | LAMC Cost for 10th Year | 1 | 205981.00 | 205981.00 | 6785.00 | 6785.00 |
| | **Total Amt.** | | | **1641000.12** | | **253343.00** |

2) निम्नत्तम निविदाधारकांचा तपशिल -

| S. N. | Name of Supplier | Name of Item(s) | No. of Qty | Rate per in Rs. | LAMC Amt.in Rs. | Final Total Amt. in Rs. (Machine + Consumables + LAMC) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Vidhi Sales, Dhule | DEFIBRILATOR MACHINE WITH 5 YEARS WARRANTY & WITH CONSUMABLES AS PER SPECIFICATIONS FOR I.C.C.U. OF SHRI SAINATH HOSPITAL | 01 | 226198.00 | 27145.00 | **253343.00** |
| | | Total Amt. in Rs. | | | | **253343.00** |

वरील तुलनात्मक तक्ता बघता M/s. Vidhi Sales, Dhule यांचे ०१ नगDefibrillator Machine खरेदीकामी निम्नत्तम दर रक्कम रू. २२६१९८/- व ५ वर्षाची Warranty संपल्यानंतर LAMC चे ५ वर्षाचे दर रक्कम रू.२७१४५/- इतके दिलेले असून एकुण (Defibrillator Machine 5 years Warranty+ LAMC) रक्कम रू.२५३३४३/- इतके येत आहे. सदर रक्कम ही मान्यता घेतलेल्या रक्कमेपेक्षा फारच कमी आली आहे.

तसेच सदर मशीनचे Technical Specification हे आपल्या मागणीप्रमाणे असल्याबाबत बायोमेडीकल विभागाने कळविले आहे. सदर मशीन खरेदी केल्यास संस्थानचा आर्थिक फायदाच होणार आहे.

त्यानुसार श्री साईनाथ रूग्णालयातील ICCU या विभागाकरीता ०१ नग Defibrillator Machine खरेदीकामी M/s.Vidhi Sales, Dhule यांनी दिलेल्या रक्कमेत अजून सुट मिळणेकामी पुरवठाधारकांना मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर बोलविण्यात यावे असे मत आहे.

तरी M/s.Vidhi Sales, Dhule यांचे बरोबर चर्चा वाटाघाटी करुन त्यांना पुरवठा आदेश देण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील I.C.C.U. या विभागाकरीता ०१ नग Defibrillator Machine खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s Vidhi Sales, Dhule यांचेशी दरांबाबत चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५९** **श्री साईनाथ रक्तपेढीकरीता Refrigerated Blood bag Centrifuge Machine खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२०.११.२०१८ निर्णय क्र.७१० अन्वये, श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता ०१ नग Refrigerated Blood Bag Centrifuge Machine खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१४,८६,८८५/- मात्रचे खर्चास तसेच जुने ०१ नग Refrigerated Blood Bag Centrifuge Machine Buyback करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन तसेच संस्थानचे संकेत स्थळावर खरेदीकामीची जाहिरात व निविदा प्रसिध्द करण्यात आली होती व अधिकृत विक्रेते/पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. ऑनलाईन निविदा विक्रीची मुदत दि.१०/०६/२०१९ ते दि.०१/०७/२०१९ अशी ठेवण्यात आलेली होती. सदर जाहिरातीबाबत India Mart, Justdial इ. वेबसाईटवर देखील Enquiry टाकण्यात आलेली होती, तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पुरवठाधारकांना ई-मेल व फोनद्वारे देखिल कळविले होते.

त्यानुसार सदरहू खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेली होती, त्यामुळे शासन निर्णयानुसार एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे व खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.०२/०७/२०१९ रोजीचे टिप्पणीन्वये एक आठवड्याची म्हणजे दि.०८/०७/२०१९ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतू सदरचे मुदतीत देखील दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.०९/०७/२०१९ रोजीचे टिप्पणीन्वये एक आठवड्याची म्हणजे दि.१५/०७/२०१९ पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरी देखील सदरचे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे शासन निर्णय क्र.४.४.३.१ निविदा कालावधीस मुदतवाढ – निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीनपेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, संबंधीत खरेदी अधिका-याने प्रथम एक आठवड्याची मुदतवाढ द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा एक आठवड्याची मुदतवाढ द्यावी, त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये. यानुसार प्राप्त ०२ ई-निविदा दि.२०/०७/२०१९ रोजी खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आल्या होत्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | J K Sales And Services, Aurangabad |
| 2 | VIjaykumar Enterprises, |

उपरोक्त प्राप्त दोनही ई-निविदांपैकी J K Sales And Services, Aurangabad यांचेच Technical Document Download झालेले असून VIjaykumar Enterprises, यांनी ई-निविदेसोबत Upload केलेले Technical Document हे Blank दिसत असल्यामुळे CCTV विभागास विचारले असता त्यांनी याबाबत पुन्हा VIjaykumar Enterprises, यांचे Online भरलेली Technical Document चेक केले असता त्यांनी भरलेले Technical Document ची साईज फक्त 560KB इतकी असल्याचे दिसून आले तसे त्यांनी दि.३१/०८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच सदर पुरवठाधारकाने Tender Form मध्ये

दिलेल्या दूरध्वनी नंबरवर संपर्क करण्याचाप्रयत्न केला असता तो संपर्क क्षेत्राच्या बाहेर आहे व Google वर VIjaykumar Enterprises, Hariyana शोधले असता या नावाची कंपनी दिसून येत नाही. त्यामुळे खरेदीकामी कमीत कमी २ किंवा ०३ ई-निविदांची आवश्यकताअसल्यामुळे श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता ०१ नग Refrigerated Blood Bag Centrifuge Machine खरेदीकामी दि.०९/०८/२०१९ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली असून दि.१६/१२/२०१९ ते १५/०१/२०२० या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी पुरेश्या निविदा प्राप्त झालेल्या नसल्यामुळे तसेच ब-याच निविदाधारकांनी दुरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केल्यामुळे तसेच सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदरई-निविदेस शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.०१ डिसेंबर २०१६– प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ अन्वये दि.१६/०१/२०२० रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दि.२२/०१/२०२० पर्यंत पहिल्यांदा, दि.२२/०१/२०२० रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दि.३०/०१/२०२० पर्यंत दुस-यांदा, तर दि.३१/०१/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.०६/०२/२०२० पर्यंत तिस-यांदा मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार प्राप्त ऑनलाईन ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S.N. | Name of Tender | Tender ID_No. | No.of Received Tender |
|---|---|---|---|
| 1 | Tender A - Refrigerated Blood Bag Centrifuge Machine Against Buyback of old Centrifuge Machine For Shri Sainath Blood Bank, Shirdi | 2019_SAI_502434_1 | 3 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकुण ०३ तांत्रिक ई-निविदा दि.२०/०२/२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आला असून तो बायोमेडीकल विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला असून प्राप्त झालेले एकुण तीनही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असलेबाबत त्यांनी कळविलेले आहे.

तसेच प्राप्त तीन निविदाधारकांपैकी M/s. Pravara Life Care Services, Loni यांनी ऑनलाईन upload केलेले Tender Acceptance, Information About Tenderer व Authorisation ची PDF File Currupt झाल्यामुळे त्यांचेकडून ई-मेल व्दारे सदरहू कागदपत्रे मागविण्यात आलेले असून ते विचारात घेण्यात आलेले असून उपरोक्त खरेदीकामी तांत्रिक दृष्टया पात्र असलेल्या ०३ निविदाधारकांच्या कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.२०/०३/२०२० रोजीचे मा. खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्याअसून त्यातील दरांचा थोडक्यात तपशिल पुढीलप्रमाणे –

1) तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल –

| Sr. No | Description of Work / Item(s) | No. of Qty. | J K SALES AND SERVICES | | PRAVARA LIFE CARE SERVICES | | KREW INSTRUMENTS PRIVATE LIMITED | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | REFRIGERATED BLOOD BAG CENTRIFUGE MACHINE AGAINST BUYBACK OF OLD CENTRIFUGE MACHINE WITH 5 YEAR WARRANTY FOR SHRI SAINATH BLOOD BANK, SHIRDI | 1 | 1751501.00 | 1751501.00 | 1200000.00 | 1200000.00 | 1274400.00 | 1274400.00 |
| 2.00 | CONSUMABLE ITEMS | | | | | | | |
| 2.01 | PLASTIC BUCKET - (MEDIUM SIZE) | 1 | 16000.00 | 16000.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 2.02 | PLASTIC BUCKET - (BIG SIZE) | 1 | 16000.00 | 16000.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 2.03 | PLASTIC CUP FOR BUFFY COAT | 1 | 16000.00 | 16000.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 2.04 | RUBBER WEIGHT | 1 | 500.00 | 500.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 2.05 | PLASTIC WEIGHT | 1 | 500.00 | 500.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Total Amt. in Rs. (Machine + Consumables) | | | 1800501.00 | | 1200000.00 | | 1274400.00 |
| 3.00 | LAMC Cost- LAMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | | | | |
| 3.01 | LAMC Cost For 6th Year | 1 | 125080.00 | 125080.00 | 50000.00 | 50000.00 | 23600.00 | 23600.00 |
| 3.02 | LAMC Cost For 7th Year | 1 | 135700.00 | 135700.00 | 50000.00 | 50000.00 | 27140.00 | 27140.00 |
| 3.03 | LAMC Cost For 8th Year | 1 | 147500.00 | 147500.00 | 50000.00 | 50000.00 | 30680.00 | 30680.00 |
| 3.04 | LAMC Cost For 9th Year | 1 | 161660.00 | 161660.00 | 50000.00 | 50000.00 | 34220.00 | 34220.00 |
| 3.05 | LAMC Cost For 10th Year | 1 | 178186.00 | 178186.00 | 50000.00 | 50000.00 | 37760.00 | 37760.00 |
| | Total Amt. of LAMC for Five years in Rs | | | 748126.00 | | 250000.00 | | 153400.00 |
| 4.00 | Buyback | | | | | | | |
| 4.01 | Buyback value of old Refrigerated Centrifuge Machine | 1 | 100000.00 | 100000.00 | 75000.00 | 75000.00 | 40000.00 | 40000.00 |
| | | | | | | | | |
| | Total Amt.in Rs. (Machine + Consumables + LAMC - Buyback Value) | | | 2448627.00 | | **1375000.00** | | 1387800.00 |

2) निम्नतम निविदाधारकांचा तपशिल -

| S.N. | Name of Supplier | Name of Item(s) | No. of Qty. | Rate per in Rs. | LAMC Amt.in Rs. | Buyback Value | Final Total Amt. in Rs. (Machine + Consumables + LAM C -Buyback Value) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Pravara Life Care Services, Loni | REFRIGERATED BLOOD BAG CENTRIFUGE MACHINE AGAINST BUYBACK OF OLD CENTRIFUGE MACHINE WITH 5 YEAR WARRANTY | 01 | 1200000.00 | 250000.00 | 75000.00 | 1375000.00 |
| | | | | | | Total Amt.in Rs. | 1375000.00 |

निविदा टक्केवारी कमी / अधिक : -8.1371% कमी

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करता M/s.Pravara Life Care Services, Loni यांचे Refrigerated Blood Bag Centrifuge Machineकरीता दर प्रती नग रु.१२,००,०००/- हे निम्नतम दर प्राप्त झालेले आहे, तसेच LAMC करीता वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील ०५ वर्षाकरिता एकूण रक्कम रु.२,५०,०००/- इतकी देऊकेलेली आहे. तसेच जुन्या मशिनची बायबॅक किंमत रु.७५,०००/- इतकी देऊ केलेली आहे. त्यामुळे सदर पुरवठाधारकास मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर समक्ष बोलावुन चर्चा/वाटाघाटी करुन निविदेत दिलेले दर कमी करुन त्यांना पुरवठा आदेश देता येईल,असे मत आहे.

त्यानुसार श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता ०१ नग Refrigerated Blood Bag Centrifuge Machine खरेदीकामी M/s.Pravara Life Care Services, Loni यांचेबरोबर मशिनची रक्कम रु.१२,००,०००/- व वॉरंटीचा कालावधी संपल्यानंतर LAMC ची रक्कम रु.२,५०,०००/- अशी एकुण रु.१४,५०,०००/- व जुन्या मशिनची बायबॅक किंमत रु.७५,०००/- वजा होणारी एकुण रु.१३,७५,०००/- या रक्कमेवर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता ०१ नग Refrigerated Blood Bag Centrifuge Machine खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s.Pravara Life Care Services, Loni यांचेशी दरांबाबत चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६०** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८८,३७,१११/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/

वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे फेब्रुवारी २०२०मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १५,३४५व १,०५८ आयपीडी रुग्णांपैकी ३,६१६ओपीडी व ५७९ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.८२,९३,५११/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३५८रुग्णाना रक्कम रु.५,४३,६००/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १७२ | ११,६५,३६२/- | - | ११,६५,३६२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३११ | २२,०९,१५०/- | ८,५४,३७५/- | १३,५४,७७५/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८ | ५४,४२३/- | ७,०००/- | ४७,४२३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ८०१ | ५०,४१,४८०/- | ३१,४०,७१६/- | १९,००,७६४/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २८४ | १,१३,६१,०६२/- | ९४,६८,७५०/- | १८,९२,३१२/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २६०९ | १९,३२,८७५/- | - | १९,३२,८७५/- |
| | **एकुण** | **४,१९५** | **२,१७,६४,३५२/-** | **१,३४,७०,८४१/-** | **८२,९३,५११/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४० | ५१,०००/- | - | ५१,०००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ३० | ४१,०००/- | - | ४१,०००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २३ | २,६००/- | - | २,६००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ११६ | २,५५,२००/- | - | २,५५,२००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ९ | ७,८००/- | - | ७,८००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ३ | ६,६००/- | - | ६,६००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १३५ | १,७७,०००/- | - | १,७७,०००/- |
| | **एकुण** | ३५८ | ५,४३,६००/- | - | ५,४३,६००/- |
| | **एकुण अ+ब** | **४,५५३/-** | **२,२३,०७,९५२/-** | **१,३४,७०,८४१/-** | **८८,३७,१११/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी २०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८८,३७,१११/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८८,३७,१११/-मात्रचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.६१** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.७१,७२,०७१/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे मार्च२०२० मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १०,३५७व ७३० आयपीडी रुग्णांपैकी २,२४०ओपीडी व ४७२आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.६६,७३,१२१/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३०९ रुग्णाना रक्कम रु.४,९८,९५०/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १०८ | १०,३३,५७२/- | - | १०,३३,५७२/- |
| **२** | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २५० | २३,९५,०७७/- | ९,४३,४४६/- | १४,५१,६३१/- |
| **३** | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८ | ९०,८२२/- | ६,३०५/- | ८४,५१७/- |
| **४** | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन | ५७२ | ३४,८८,१०६/- | २२,२४,७८८/- | १२,६३,३१८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | आरोग्ययोजना इ. | | | | |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २२५ | १,१५,५३,८९३/- | ९८,१६,२५०/- | १७,३७,६४३/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | १५४९ | ११,०२,४४०/- | - | ११,०२,४४०/- |
| | **एकुण** | **२,७१२** | **१,९६,६३,९१०/-** | **१,२९,९०,७८९/-** | **६६,७३,१२१/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३९ | ४६,६००/- | - | ४६,६००/- |
| २ | हिमोफिलीया | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १४ | १६,४००/- | - | १६,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २७ | ३,१००/- | - | ३,१००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १११ | २,७३,२५०/- | - | २,७३,२५०/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ४ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ३ | ४,८००/- | - | ४,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १०९ | १,४८,२००/- | - | १,४८,२००/- |
| | **एकुण** | ३०९ | ४,९८,९५०/- | - | ४,९८,९५०/- |
| | **एकुण अ+ब** | **३,०२१** | **२,०१,६२,८६०/-** | **१,२९,९०,७८९/-** | **७१,७२,०७१/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च २०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.७१,७२,०७१/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.७१,७२,०७१/-मात्रचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.६२** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करुन घेणेकामी मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०४ मार्च २०१९ रोजीचे मा.स्थानिक उपसमितीचे सभेतील निर्णय क्र.०३ अन्वये, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य/ सामुग्रीसहचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांचे निम्नतम वार्षिक दर रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र स्विकारणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६ फेब्रुवारी २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६९ अन्वये त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झाला होता.

तथापि मा.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक १० मार्च २०१९ रोजी लोकसभा २०१९ आणि त्याचबरोबर आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओडिशा व सिक्कीम या राज्यांच्या विधानसभा निवडणूकींचा कार्यक्रम जाहिर करण्यात आला होता. तसेच मा.प्रधान सचिव,भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी निवडणूकीचे कालावधीत कटाक्षाने पालन करावयाचे आदर्श आचार संहितेबाबत मार्गदर्शक तत्वे-तथा-निर्देश दिलेले होते. तसेच मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०१९

साठी आर्दश आचार संहिता लागू झाल्यानंतर करावयाची कार्यवाही याबाबत मार्गदर्शक सुचनांचे पालन करणेबाबत निर्देशीत केलेले होते. त्यामुळे दरम्यानच्या काळात मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांना मंजुर दरात मुदतवाढ देऊन कामकाज करुन घेतले होते.

निवडणूक आचारसंहिता संपुष्टात येताच मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/पीआरओ/६६३/२०१९,दि.२९मे २०१९ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य / सामुग्रीसहचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी दि.०१ जून २०१९ ते दि.३१ मे २०२० या १ वर्ष कालावधीचा कार्यादेश देण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांचेकडून सुरळीत कामकाज सुरू असून दि.३१ मे २०२० रोजी त्यांची सदर कामाची मुदत संपुष्टात येणारअसल्याने सन २०२०-२१ ह्या वर्षासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेकामीचा विषय मा. तदर्थ समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर केलेला आहे. सदर निर्णयास मा.उच्च न्यायालयाची परवाणगी घ्यावी लागणार असुन सध्या कोरोनाच्या पार्श्वभुमीवर लॉक डाऊन सुरू असल्याने याकामी वाढीव कालावधी लागण्याची शक्यता गृहीत धरून सध्या कार्यरत असलेल्या मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात मुदतवाढ देऊन कामकाज करुन घ्यावे लागणार आहे.

सद्यस्थिती– मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दोन्ही रुग्णालयांसाठी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छताकामी कामाचे स्वरुपानुसार लागणारे मनुष्यबळ, मशिनरी/ साहीत्य तसेच उपकरणे व केमिकल या साहित्यासह प्रती महिना रक्कम रु.१९,३३,३८२/- (अक्षरी एकोनावीस लाख तेहेत्तीस हजार तीनशे ब्याऐंशी रुपये मात्र)प्रमाणे (वार्षीक रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र) कामाचा दि.०१ जून २०१९ ते दि.३१ मे २०२० या १ वर्ष कालावधीचा ठेका देण्यात आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१ मे २०२० रोजी संपुष्टात येत आहे.

विभागाचा अभिप्राय–मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दोन्ही रुग्णालयांसाठी यांत्रिकीकरणासहहाऊसकिपींग/स्वच्छताकामी कामाचे स्वरुपानुसारलागणारे मनुष्यबळ, मशिनरी/ साहीत्य तसेच उपकरणे व केमिकल या साहित्यासह प्रती महिना रक्कम रु.१९,३३,३८२/- (अक्षरी एकोनावीस लाख तेहेत्तीस हजार तीनशे ब्याऐंशी रुपये मात्र)प्रमाणे वार्षिक रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन १ वर्ष कालावधीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांची दि.३१ मे २०२० रोजी सदर कामाची मुदत संपुष्टात येणार असल्याने सन २०२०-२१ ह्या वर्षासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेकामीचा विषय दि.२७ मार्च २०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर केलेला होता. सदर सभेतील विषय नं.५० वनिर्णय क्रं.२२९ नुसार यावरसविस्तर

चर्चा होऊन सन २०२०-२१ या वर्षाकरीता संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल वश्री साईनाथ रुग्णालयामध्येयांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अदांजे रक्कम रु.२,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्चन्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले. सदर निर्णयाची दि.२४ एप्रिल २०२० रोजी कामापुरती नक्कल सभाकामकाज विभागाकडून प्राप्त होताच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता मिळविणेकामी संस्थानचे विधी विभागाकडे त्वरीत जमा केलेली आहे. सध्या कोरोनाच्या पार्श्वभुमीवर लॉक डाऊन सुरू असल्याने सदर परवाणगी मिळणेस काही कालावधी लागणार असल्याची माहिती विधी विभागाने दिली आहे. तसेच सदर परवाणगी मिळाल्यानंतर तातडीने ई-निविदा प्रक्रिया राबविली तरी ई-निविदा प्रक्रियेसाठी लागणारा आवश्यक कालावधीचा विचार करावा लागणार आहे. त्यानंतर तांत्रिक व कर्मशियल बिड खरेदी समिती / तदर्थ समिती समोर उघडून होणा-या निर्णयान्वये पुढील कालावधीसाठी कार्यादेश द्यावा लागणार आहे. या सर्व प्रक्रियेकामी किमान दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागणारअसून सध्या कार्यारत असलेल्या ठेकेदाराची मुदत दि.३१ मे २०२० रोजी संपणार आहे.

त्यामुळे ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात मुदतवाढ देऊन कामकाज करुन घ्यावे लागणार आहे, असे नम्र मत आहे.

मागणी– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेकामीची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत किमान दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागणार असल्याने सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होई पावेतो मंजुर दरात मुदतवाढ देऊन कामकाज करुन घेणेबाबत सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे सभेपुढेनिर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम करणारे सध्याचे ठेकेदार मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६३** **करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत... माहे एप्रिल-२०२० चे मासिक वेतन आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ)विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) उपरोक्त विषयांस अनुसरुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०१ एप्रिल, २०२० रोजी सादर करणेत आलेल्या टिपणीवरील निर्देशानुसार, मा. तदर्थ समितीचे मान्यतेस्तव चक्रीय पध्दतीने दिनांक ०७ एप्रिल, २०२० रोजी सादर करणेत आलेल्या सविस्तर प्रस्तावावरील निर्णयानुसारआणि सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ११ एप्रिल, २०२० रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांना माहे मार्च, २०२० चे वेतन आदा करणेत आलेले आहे.

(अ-२) उपरोक्त निर्णयानुसार व आदेशानुसार, खाली नमूद केलेल्या संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना माहे मार्च, २०२० चे वेतन आदा करणेत आलेले आहे –

०१. कायम कर्मचारी तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी
०२. संस्थान कंत्राटी कर्मचारी
०३. कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी
०४. बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी (उक्ते पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदारामार्फत कार्यरत विशेषतः निवासस्थाने, प्रसादालय, रुग्णालये आदि विभाग )
०५. निश्चित मानधनावर/निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कार्यरत कर्मचारी (विशेषतःरुग्णालये विभाग)

(अ-३) कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस)या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपाययोजनेनुसार मा. भारत सरकार व मा. महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १४ एप्रिल, २०२० अखेर संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्र राज्यात संपूर्ण LOCKDOWN घोषित करणेत आलेला होता. तथापि, संदर्भ क्रमांक ११ व १२ नुसार, अनुक्रमे भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचेमार्फत सदर लॉकडाऊनची मुदत (कालावधी) ही दिनांक ०३ मे, २०२० अखेर पूर्वीच्या अटी-शर्तीवर वाढविणेत आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे मा. केंद्र व राज्य शासन यांनी आदेशित केलेल्या आदेशानुसार, आजअखेर LOCKDOWNची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

(अ-४) सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०१ एप्रिल, २०२० व दिनांक ०७ एप्रिल, २०२० रोजीचे प्रस्ताव-वजा-टिपणींमध्ये नमुद केलेनुसार, कोव्हीड १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. शासनाने निर्देशित केलेल्या उपाययोजनेनुसार, दिनांक २३ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कार्यालयातील/कार्यस्थळावरील उपस्थितीवर टप्प्या-टप्प्याने निर्बंध आणणेत आलेले असून, त्याची अंमलबजावणी ही माहे एप्रिल, २०२० मध्येही सलग व कायम ठेवणेत आलेली आहे.

(अ-५) तसेच आता, मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक २२ एप्रिल, २०२० रोजीचे शासन परिपत्रकानुसार, माहे एप्रिल, २०२० चे वेतन नियमित पध्दतीने एकाच टप्प्यात प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच या परिपत्रकात, सर्व अनुदानीत संस्थान, विद्यापीठे, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक

स्वराज्य संस्था यांनी देखील माहे एप्रिल, २०२० चे वेतन त्यांचे प्रचलित पध्दतीने अदा करण्यास शासनाची हरकत नाही,असे नमूद करणेत आलेले आहे.

याबाबत विवेचन असे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही स्वयं अर्थसहाय्यित विश्वस्तव्यवस्था असून, केंद्र अथवा राज्य शासनाकडून सदर विश्वस्तव्यवस्थेस कर्मचा-यांचे वेतनासाठी / कर्मचा-यांना द्यावयाचे आर्थिक लाभासाठी कुठल्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य / अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांचे माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेबाबत कुठलीही आर्थिक अडचण नाही.

(अ-६) मा. तदर्थ समितीचे मान्यतेस्तव चक्रीय पध्दतीने सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा. तदर्थ समितीने दिनांक ०७ एप्रिल, २०२० रोजी घेतलेल्या निर्णयातखालीलप्रमाणे नमूद आहे –

" ..उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले सविस्तर विवेचनानुसार, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या साथरोगाचाप्रादुर्भाव रोखणेकामी करणेत आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेंतर्गत,वरील प्रस्तावातील ' परिच्छेद ब' मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२० व एप्रिल, २०२० चे वेतन अदायगीसाठी प्रस्तावातील ' परिच्छेद ड ' मध्ये अ.नं. ०१ ते ०९ मध्ये नमुद केलेली प्रस्तावित कार्यवाही करणेस आणि त्याची अंमलबजावणी करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली. "

तसेच, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०१ एपिल, २०२० रोजीचे टिपणीनुसार व मा. तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागामार्फत पारित करणेत आलेल्या दिनांक ११ एपिल, २०२० रोजीचे आदेशातखालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. ..०९. माहे एप्रिल,२०२० चे वेतनाबाबत (माहे मे, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाबाबत), उपरोक्त परिस्थितीत काही बदल झाल्यास, त्याप्रमाणे परिस्थितीनुरुप अलाहिदा आदेश पारित करणेत येईल."

(अ-७) आता, उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेनुसार,कोव्हीड १९ या साथी रोगाच्या प्रादुर्भावात काही बदल न झाल्याने, किंबहुना त्यामध्ये अधिकच वाढ झाल्याने,मा.केंद्र व राज्य शासनाकडूनदिनांक २३ मार्च, २०२०पासून लागू करणेत आलेल्या LOCKDOWN च्या कालावधीत दिनांक ०३ मे,२०२०पर्यन्त सलग वाढ करणेत आल्याने, संस्थान व्यवस्थापनामार्फतही दिनांक २३ मार्च, २०२० पासून सुरु असणारे दैनंदिन कार्यालयीन कामकाजात तसेच कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत कुठलाही बदल करणेत आलेला नाही.

तसेच आता, मा. केंद्र व राज्य शासनाकडून दिनांक ०३ मे, २०२० रोजी संपुष्टात येणा-या LOCKDOWN चे कालावधीत दिनांक १८ मे, २०२० पर्यन्त काही अटी-शर्तीसह / काही सवलतींसह सलग वाढ करणेत आलेली आहे.

या बाबींस अनुसरुन, परिच्छेद अ-२ मध्ये नमूद केलेल्या संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना विहित पध्दतीने माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक २३ एप्रिल, २०२० रोजी टिपणी सादर करणेत आलेली होती.त्यावर मा. वरिष्ठ अधिकारी यांनी कंत्राटी कर्मचारी यांना आदा करावयाचे ४० टक्के वाढीव वेतनाबाबत तसेच रुग्णालय विभागाकडील वैद्यकिय अधिकारी व इतर यांना आदा करावयाचे प्रोत्साहन भत्ता (IncentiveAllowance) बाबत निर्णय घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत यावा, असे निर्देश दिलेले आहेत.

विभागनिहाय प्रस्ताव -

(ब) सामान्य प्रशासन विभाग - संस्थान आस्थापनेवरील कायम / प्रतिनियुक्ती / संस्थान कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत - मा. राज्य शासन यांनी दिनांक २२ मार्च, २०२० रोजीचे मध्यरात्रीनंतर राज्यात / शहरात / गावांमध्ये संचारबंदी लागू केल्यामुळे संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कर्मचा-यांना दिनांक २४ मार्च, २०२० रोजीचे आदेशाने कामावर येण्यास प्रतिबंध करणेत आलेला होता तसेच काही विभागात टप्प्या-टप्प्याने / चक्रीय पध्दतीने कमीत कमी कर्मचारी कामावर बोलविणेत यावेत म्हणून आदेशित करणेत आलेले होते. त्यास अनुसरुन, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ११ एप्रिल, २०२० रोजीचे आदेशाने विहित केलेल्या पध्दतीने संस्थान आस्थापनेवरील कायम/संस्थान कंत्राटी कर्मचारी कामावर/कर्तव्यावर हजर आहेत, असे गृहित धरुन त्यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेस मान्यता असावी.

(क) कामगार विभाग- संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत- संस्थान आस्थापनेवरील सर्व विभागांकडे कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कुशल/अकुशल, सुरक्षारक्षक, पारिचारिका, शिक्षक, निश्चित मानधन तत्वावरील निवासी वैद्यकीय अधिकारी, पारिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी इत्यादी कर्मचारी म्हणून कंत्राटदारामार्फत कार्यरत आहेत.

सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ मध्ये खाली नमूद केलेप्रमाणे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांना कार्यादेश देणेत आलेले आहेत –

| अ. नं. | तपशील | कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार संस्थेचे नांव | मंजूरी संख्या (पूर्वीची) / सुधारित | सध्या कार्यरत असणारे अंदाजे कंत्राटी कर्मचारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी | बी. व्ही. इंडिया लि., पुणे | (८९२) / ५८४ | ५८३ | सन २०१९-२०२० करीता आदेश |
| ०२ | कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी | मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट, पुणे | (८९३) / ६८१ | ६८० | सन २०१९-२०२० करीता आदेश |
| ०३ | कुशल / अकुशल सुरक्षारक्षक | मॉडर्न वीर रेस सिक्युरिटी फोर्स, पुणे | -- /३५३ | ३७७ | सन २०२०-२०२१ करीता आदेश |
| ०४ | कुशल / अकुशल सुरक्षा रक्षक | ईगल हंटर सोल्युशन्स लि., पुणे | -- / ३४१ | ३२५ | सन २०२०-२०२१ करीता आदेश |
| | | **एकूण -** | **(१७८५) / १९५९** | **१९६५** | |

(टिप – उपरोक्त तक्त्यातील रकाना क्रमांक ०४ मधील मंजूरी संख्येत (पूर्वीची) म्हणजे माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेतलेल्या ५९८ कायम स्वरुपी कंत्राटी कर्मचारी नियुक्ती होणेपूर्वीची मंजूर संख्या अभिप्रेत आहे.)

संस्थान आस्थापनेवर सध्या कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत / ठेकेदारामार्फत कार्यरत असणारे कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांना आदा करावयाचे वेतनाबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १४१नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे -

“.. ..सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतन दरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासून कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहे व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रति दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधित कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचा-यांचा रु. १० लाख पर्यन्तचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना फक्त किमान वेतन देणे बंधनकारकआहे. महागाई निर्देशांकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते, ती कर्मचा-यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चीत करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करुन किमान वेतन निश्चीत केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे ४०% वेतनवाढ भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजूर करणेत आली. ”

तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, दिनांक ०१ एप्रिल, २०१७ पासून विहित पध्दतीने काही अटी-शर्तीसह कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेले कुशल, अकुशल, सुरक्षारक्षक आदि कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतनकायद्यानुसार देय्य असणारे किमान वेतन + ४०% वाढीव वेतन आदा करणेत येत आहे.

तथापि आता, याबाबत विवेचन असे की, सध्या श्री साईंचे समाधी मंदिरासह इतर मंदिरे हे भक्तांचे दर्शनांकरीता पूर्णपणे बंद करणेत आलेले आहेत. तसेच देशभरात सुरु असणारे LOCKDOWN मुळे देश-विदेशातून येणारे भक्त ही शिर्डी येथे येणे बंद झालेले आहे. त्यामुळे संस्थानला देणगी रुपाने/देणगी माध्यमातून मिळणारे आर्थिक उत्पन्न पूर्णपणे ठप्प / बंद झालेले आहे. दिनांक २२ मार्च, २०२० पासून समाधी मंदिर, भक्तनिवास्थाने, प्रसादालय, लाडू प्रसाद, कॅन्टीन हे विभाग ही पूर्णपणे बंद असल्याने, या मार्गाने मिळणारे आर्थिक उत्पन्न ही बंद आहे.

संस्थान आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेचे विभागवगळतां इतर विभागांच्या सेवा अंशतः किंवा पूर्णपणे बंद करणेत आलेल्या आहेत. विशेषतः आरोग्य, सुरक्षा, अग्नीशमन, प्रसादालय, विद्युत, रुग्णालये, विद्युत, पाणीपुरवठा आदि विभागांच्या सेवा त्यांचे आस्थापनेवर असणारे कर्मचा-यांना मर्यादित संख्येत चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलावून सुरु ठेवणेत आलेल्या आहेत. या कर्मचा-यांमध्ये प्रामुख्यांने कायम / संस्थान कायम कंत्राटी कर्मचा-यांचा समावेश आहेत. वर नमुद केलेल्या विभागातील काही कंत्राटी कर्मचा-यांना कामाचे स्वरुपानुसार आवश्यकतेनुसार व गरजेनुसार मर्यादित संख्येत कामावर बोलविणेत येत असून, त्यांचेकडून काम करुन घेणेत येत आहे. उपरोक्त विभाग वगळतां बहुतांशी विभागाकडील कंत्राटी कर्मचारी यांना कामाचे आवश्यकतेनुसारच कामावर बोलविणेत येत आहे.

उपरोक्त बाबीचा विचार करतां, तूर्त कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत / ठेकेदारामार्फत कार्यरत असणारे कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी, कंत्राटी सुरक्षा रक्षक व इतर यांना वर नमुद केलेप्रमाणे तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने मंजूर केलेले ४०% वाढीव वेतन तूर्त आदा न करतां, किमान वेतन कायद्यानुसार आणि किमान वेतन दरानुसार देय्य होणारे वेतन आदा करता येईल.

तसेच शिर्डी येथील परिस्थिती पूर्वपदावर आलेनंतर आणि संस्थान आस्थापनेवरील सर्व विभाग हे पूर्ण क्षमतेने पूर्ववत सुरु झालेनंतर, संस्थानाचे सर्व मार्गांनी मिळणारे आर्थिक उत्पन्न हे नियमितपणे सुरु झालेनंतर, पुनःश्च सुरु करणेबाबत मा. तदर्थ समितीचे पुढे प्रस्तावावर सादर करुन यथोचित निर्णय घेता येईल.

कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत सध्या कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेकामी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिता येईल -

०१. कंत्राटी कर्मचारी यांची माहे जानेवारीते मार्च, २०२० अखेर आठवडा सुटीसह हजेरी दिवसाची गणना करुनव त्याची येणारी सरासरी म्हणजेच (माहे जानेवारी + फेब्रुवारी + मार्च, २०२० मधील हजर दिवस) भागिले ०३ = माहे एप्रिल, २०२० मधील सरासरी हजर दिवस) ही माहे एप्रिल, २०२० ची हजेरी गृहित धरुन किमान वेतन दरानुसार माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करता येईल.

०२. ज्या कंत्राटी कर्मचा-यांना प्रत्यक्ष कामावर बोलावून सुध्दा ते कामावर हजर राहिले नसतील तर, त्यांना माहे एप्रिल, २०२० मधील प्रत्यक्ष कामावर हजर दिवसाप्रमाणे वेतन आदा करता येईल.

०३. जे कंत्राटी कर्मचारी त्या-त्या विभागाकडील कामाचे आवश्यकतेनुसार माहे एप्रिल, २०२० मध्ये कामावर हजर असतीलआणि त्यांची माहे एप्रिल, २०२० मधील सरासरी हजेरी ही कमी येत असेल तर, त्यांना प्रत्यक्ष हजर दिवसाप्रमाणे वेतन आदा करता येईल.

उपरोक्त बाबींनुसार, कंत्राटी कर्मचारी यांना वेतन आदा करणेसाठी खाली नमूद केलेप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांना त्यांचेपुढे दर्शविलेप्रमाणे माहे एप्रिल, २०२० चे वेतनाची अंदाजित एकूण रक्कम आदा करावी लागेल -

| अ. नं. | तपशील | कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार संस्थेचे नांव | माहे एप्रिल, २०२० अंदाजे सरासरी हजर/ मनुष्यबळ दिवस | एकूण देय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी | बी. व्ही. इंडिया लि., पुणे | १४,८५१ | ७६,७१,८१०/- |
| ०२ | कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी | मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट, पुणे | १९,३३२ | १,०६,६९,३७३/- |
| ०३ | कुशल / अकुशल सुरक्षारक्षक | मॉडर्न वीर रेस सिक्युरिटी फोर्स, पुणे | १०,४१० | ५३,६१,०७२/- |
| ०४ | कुशल / अकुशल सुरक्षा रक्षक | ईगल हंटर सोल्युशन्स लि., पुणे | ०९,३८१ | ४७,३८,६१२/- |
| | | एकूण - | ५३,९७४ | २,८४,४०,८६७/- |

(टिप – उपरोक्त तक्त्यातील रकाना क्रमांक ०५ मध्ये नमूद केलेल्या एकूण देय्य रक्कमेत भविष्य निर्वाह निधी + सेवा दर + जीएसटी या रक्कमेचा समावेश आहे. )

उपरोक्तप्रमाणे संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेस मान्यता असावी.

(ड) निवासस्थाने विभाग- हाऊसकिपिंग व स्वच्छता विषयक कामांसाठी नेमणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्था (Outsource Contractor) यांना ठेक्याची रक्कम आदा करणेबाबत-

०१. तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार, संस्थान आस्थापनेवरील खाली नमुद केलेल्या निवासस्थाने विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिंपिंग व स्वच्छता आदि दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करणेकामी विहित अटी-शर्तीनुसार, बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थांच्या नियुक्त्या करणेत आलेल्या आहेत –

| अ. नं | विभागाचे नाव | सध्या नियुक्त केलेली बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्था | GST वगळून दर महा रक्कम रु. | १८% GST सह दर महा रक्कम रु. | GST वगळून वर्षाला रक्कम रु. | एकूण वार्षिक GST सह खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईआश्रम भक्तनिवास | बी.व्ही.जी. इंडियालि., पुणे | ६९,४६,०००/- | ८१,९६,२८०/- | ८,३३,५२,०००/- | ९,८३,५५,३६०/- |
| ०२ | साईधर्मशाळा भक्तनिवास | बी.व्ही.जी. इंडियालि., पुणे | २८,०१,०००/- | ३३,०५,१८०/- | ३,३६,१२,०००/- | ३,९६,६२,१६०/- |
| ०३ | व्दारावतीभक्तनिवास | स्पिकएनस्पॅनस व्हिंसेस, मुंबई | ९,९९,७३०/- | ११,७९,६८१/- | १,१९,९६,७६०/- | १,४१,५६,१७२/- |

उपरोक्त बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थांना देणेत आलेल्या कार्यादेशात असे नमूद करणेत आलेले आहे की,

“ .. .. कोणत्याही कारणास्तव संपुर्ण इमारतीचा वापर ३० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सलगरित्या बंद राहिल्यास कंत्राटदाराच्या देय्यकातून त्याप्रमाणात देय रक्कम कमी करण्यात येईल.”

कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सध्या संस्थान व्यवस्थापन संचलित, सर्व भक्तनिवासस्थाने (श्री साई निवास अतिथीगृह, साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई आश्रम भक्तनिवासस्थान, श्री साई धर्मशाळा आदी ) दिनांक १७ मार्च, २०२० रोजी पासून भक्तांचे तात्पुरते निवासासाठी उपलब्ध करुन देणेचे पूर्णतः बंद करणेत आलेले आहे.

दरम्यानचे कालावधीत, म्हणजेच दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर उपरोक्त तीन ही विभागाकडील निवासस्थान इमारतींची साफ-सफाई व इतर देखभाल-दुरुस्तीची कामे संबंधित बाह्यस्त्रोत संस्थेकडून करुन घेण्यात आली आहेत, त्यानुसार या बाह्यस्त्रोत संस्थांना (OutsourceContractor)यांना माहेमार्च, २०२०ची देयके विहित पध्दतीने आदा करणेत आलेली आहेत. त्यानंतर दिनांक २१ मार्च, २०२० चे प्रशासकीय स्तरावरील मान्यतेनुसार उपरोक्त तीन ही निवासस्थान विभागाकडील बाह्यस्त्रोत संस्थांना, दिनांक ०१ एप्रिल, २०२० पासून हाऊसकिपींगवस्वच्छतेचीकामेतात्पुरतेस्वरुपातपुढील आदेश होईपावेतो बंद ठेवणेबाबत लेखी पत्राव्दारे कळविणेत आलेले आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडील जावक क्रमांक जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४१/२०२०, दिनांक ११ एप्रिल, २०२० अन्वये पारित करणेत आलेल्या आदेशातील प्रस्तावनेत, मा.उद्योग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.३१/०३/२०२० रोजीचे शासन निर्णयाबाबत खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे -

“.... सर्व खाजगी आस्थापना, कारखाने, कंपन्या, दुकाने (अत्यावश्यक सेवा आस्थापना वगळून) इत्यादी आस्थापनांचे सर्व कामगार (कंत्राटी, बाह्य स्त्रोताव्दारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले कर्मचारी व कामगार, तात्पुरत्या कालावधीसाठीचे कर्मचारी व कामगार, रोजंदारीवरील कामगार) ज्यांना करोना व्हायरस COVID-19 च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे घरी/स्थानबध्द राहावे लागत आहे, अशा सर्व कामगार/कर्मचारी हे कर्तव्यावर असल्याचे समजण्यात यावे व त्यांना संपुर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात यावेत. ”

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्रातील सर्व निमशासकिय, औद्योगीक, वाणिज्यिक, व्यापारी व दुकाने आस्थापनांना लागू करणेत आलेला आहे.

या शासन निर्णयातील तरतुदीमुळे, उपरोक्त तक्तयात नमुद केलेल्या निवासस्थाने विभागाकडील बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थांना माहे एप्रिल, २०२० चे कामाचे/ठेक्याचे देयक आदा करावे लागणार आहे.

याबाबत निवासस्थाने विभागाचे स्पष्टमत- साई आश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्त निवास या तीनही विभागाकडील आऊटसोर्स ठेकेदारांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार, संबंधित बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थांनी, निवासस्थानांचा वापर माहे एप्रिल, २०२० मध्ये बंद असल्याने, हाऊसकिपिंग व स्वच्छतासाठी लागणारे पुरक साहित्याचा जसे केमिकल्स, मशिनरी व इतर साहित्य इत्यादीचा वापर केलेला नाही, त्यामुळे संबंधित संस्थेस केमिकल्स, मशिनरी व इतर साहित्याचे चार्जेस देय्य होत नाहीत. तसेच उपरोक्त निवासस्थाने साईभक्तांना निवासासाठी देणेत येत नसल्याने, संस्थानाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.

तथापि, वर नमुद केलेला शासन निर्णय व संस्थान प्रशासनाकडील आदेशातील बाबींनुसार, संबंधित बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थेकडे गेल्या ०३ महिन्यातील (म्हणजेच माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च, २०२०) सलग कामावर उपस्थित असणा-या बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांची उपस्थितीची सरासरी विचारात घेऊन, त्यानुसार किमान वेतन दरानुसार संबंधित बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना वेतन आदा करणेकामी संबंधित बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थेस खालीलप्रमाणे माहे एप्रिल, २०२० चे देय्यक आदा करता येईल –

| विभागाचे नाव | बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थेचे नांव | संबंधित कंत्राटदाराचे हजेर पटा-वरील एकूण कर्मचारी संख्या | माहे जाने.२०२० ते मार्च २०२० तीन महिन्यातील एकूण सरासरी कर्मचारी हजरदिवस | किमान वेतन दर (अकुशल) | एकूण वेतन रक्कम रु. | भविष्य निर्वाह निधी १३% (PF) | वस्तू सेवा कर १८% (GST) | एकूण देय रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | बी.व्ही.जी. इं.लि., पुणे | ५५२ | ११,०१३ | ३६८.५४ | ४०,५८,७३१.०२ | ५,२७,६३५.०३ | ८,२५,५४५.८८ | ५४,११,९१२/- |
| साईधर्म शाळा | बी.व्ही.जी.इं. लि.,पुणे | २११ | ३,९७१ | ३६८.५४ | १४,६३,४७२.३४ | १,९०,२५१.४० | २,९७,६७०.२७ | १९,५१,३९४/- |
| व्दारावती भक्तनिवास | स्पिकएनस्पॅन सर्व्हिसेस, मुंबई | १०३ | १,८८२ | ३६८.५४ | ६,९३,५९२. २८ | ९०,१६६.९९ | १,४१,०७६.६६ | ९,२४,८३६/- |
| एकूण वेतन देय रक्कम रु. | | | | | ६२,१५,७९५.६४ | ८,०८,०५३.४२ | १२,६४,२९२.८१ | ८२,८८,१४२/- |

तरी उपरोक्त तक्त्यातील विवरणानुसार आणि नमुद केलेप्रमाणे, (०१) श्री साई आश्रम भक्तनिवास, (०२) श्री साई धर्मशाळा भक्तनिवास आणि (०३) व्दारावती भक्तनिवास यांचेकडेस हाऊसकिपिंग व स्वच्छता विषयक कामांसाठी कार्यरत असलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थांना, त्यांचे संस्थेमार्फत संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेसाठी येणारे खर्चास म्हणजेच अंदाजित एकूण रक्कम रुपये ८२,८८,१४२/- (अक्षरीरु. ब्याऐंशी लाख अठ्याऐंशी हजार एकशे बेचाळीस मात्र) आदा करणेस मान्यताअसावी.

(इ) लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग – बुंदी लाडू, बुंदी प्रसाद व बर्फी प्रसाद तयार करणेकामी नियुक्त करणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थेस (Outsource Contractor) यांना ठेक्याची रक्कम आदा करणेबाबत ..

संस्थान आस्थापनेवरील लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत श्री साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावयाचे मोतीचूर बुंदी लाडू, सुट्टा बुंदी प्रसाद तसेच बर्फी प्रसाद तयार करणेचे कामासाठी, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने उक्त्या पध्दतीने (मजुरीने) सन २०१९-२०२० या वर्षाकरीता म्हणजेच दिनांक १६/०८/२०१९ ते १५/०८/२०२० या कालावधीकरीता शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांना कार्यादेश देणेत आलेला आहे. त्याचा तपशील –

| अ. नं. | तपशील | दर (वस्तू सेवा कर वगळून) |
|---|---|---|
| १ | गावरान तुपातील मोतीचूर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे व हाताने पॅकींग करणे. (५० ग्रॅम वजनाचा ०१ लाडु याप्रमाणे) | रुपये २६६/- (प्रति १००० लाडू नगास ) |
| २ | गावरान तुपातील सुटी बुंदी प्रसाद तयार करुन व हाताने पॅकिंग करणे. (५० ग्रॅम वजनाचे ०१ पाकीट) | रु. २८४/- (१००० बुंदी पाकीटासह) |
| ३ | बर्फी प्रसाद तयार करणे (०१ क्विंटल साखरेसाठी) | रु.१५६/- (प्रती क्विंटलसाठी) |

कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक  उपाययोजना म्हणून सध्या संस्थान व्यवस्थापन मार्फत दिनांक १७ मार्च, २०२० (दुपारी ३ वाजेपासुन) मुलभूत सेवा-सुविधा अंशतः तर काही ठिकाणी पूर्णतः बंद करणेत आलेल्या आहेत. श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साई मंदिर दर्शनासाठी पूर्णतः बंद असल्याने उपरोक्त नमूद केलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थेकडून तयार करुन घेणेत येणारे बुंदी लाडू / सुटी बुंदी  / बर्फी प्रसादाचे कामकाज पुर्णतः बंद आहे.

श्री शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी या बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थेकडे उपरोक्त नमूद बुंदी प्रसाद बनविणेचे ठेका पध्दतीचे कामासाठी आवश्यकतेनुसार १०८ बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी कामास आहेत. या सर्व बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना मा. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीचे शासन निर्णयानुसार माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करावे लागणार आहे.

याकरीता संबंधित बाह्यस्त्रोत कंत्राटदार संस्थेकडे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांची माहे जानेवारी, फेब्रुवारीव मार्च, २०२० मधील हजर दिवसांची सरासरी ग्राह्य धरुन त्यांना किमान वेतन दराप्रमाणे वेतन आदा करणेसाठी संबंधित कंत्राटदारास खालीलप्रमाणे रक्कम आदा करावी लागणार आहे –

| **तपशिल** | **सरासरी हजर दिवस** | **किमान वेतन दर** | **एकुण वेतन** | **PF 13%** | **एकुण (४+५)** | **GST 18%** | **एकुण देय्य रक्कम (६+७)** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कुशल कर्मचारी | २७९ | ४३०.५४ | १,२०,१२०.६६ | १५,६१५.६८ | १,३५,७३६.३४ | २४,४३२.५४ | **१,६०,१६८.८८** |
| अकुशल कर्मचारी | १३९८ | ३६८.५४ | ५,१५,२१८.९२ | ६६,९७८.४५ | ५,८२,१९७.३७ | १,०४,७९५.५३ | **६,८६,९९२.९०** |
| **एकुण** | **१६७७** | **-----** | **६,३५,३३९.५८** | **८२,५९४.१३** | **७,१७,९३३.७१** | **१,२९,२२८.०७** | **८,४७,१६१.७८** |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे नेमणुक केलेले बाह्यस्त्रोत कंत्राटी कंत्राटदार शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांना त्यांचेकडील बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना माहे एप्रिल,  २०२० चे वेतन आदा करणेसाठी येणा-या अंदाजित एकुण पूर्णांकित रक्कम रुपये ८,४७,१६२/- (अक्षरी रुपये आठ लाख सत्तेचाळीस हजार एकशे बासष्ट मात्र) आदा करणेस मान्यता असावी.

(फ) श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल –वैद्यकिय अधिकारी यांना माहे एप्रिल, २०२० चा प्रोत्साहन भत्ताआदा करणेबाबत.

(फ-१) श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता (इंन्सेन्टीव्ह) लागू करणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/७/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता.

सदर निर्णयात “ .. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता लागू करणेसाठी प्रस्तावित केलेल्या नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेस मान्यता देण्यात आली. परंतु तत्पूर्वी उपरोक्त प्रस्तावास विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेत यावी.”असे ठरले होते व त्यानुसार प्रोत्साहन भत्ता देणेबाबत नियमावलीस मान्यता देण्यात आली.

आता, उपरोक्त दोनही निर्णयास अनुसरुन मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभागास दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी प्रोत्साहन भत्ता लागू करणेबाबतची मान्यता मिळणेचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. याबाबत महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ०७ जून, २०१८ अन्वये, श्री साईबाबा

संस्थानच्या रुग्णालयातील डॉक्टरांना मूळ वेतन + ग्रेड पे यांचे एकूण येणारे रक्कमेवर २०० टक्के मासिक वेतना व्यतिरिक्त प्रोत्साहन भत्ता मंजूर करणेत आला आहे.

मा. शासन निर्णयावर रुग्णालये विभागाकडील वित्त विभागामार्फत आदेश पारित करणेत येऊन, मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/०८/२०१८ विषय नं. २० निर्णय क्रमांक ५२५ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांवर (मूळ किंवा प्रभारी / अतिरिक्त) असलेल्या डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन दि. ०१ जुलै, २०१८ पासून लागू करणेत आलेला आहे.

माहे एप्रिल-२०२० मध्ये प्रत्यक्ष ज्या वैद्यकिय अधिकारी यांनी दैनंदिन रुग्णांची तपासणी/उपचार/ शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. त्या रुग्ण संख्येची पडताळणी करुन, त्यांना विहित नियमावलीचे अटी शर्तीस अधिन राहून प्रोत्साहन भत्ता (Incentive Allowance) आदा करता येईल. तसेच जे वैद्यकिय अधिकारी सदर कालावधीत रुग्णालयात कामाचे ठिकाणी कामावर हजर आहेत. परंतु त्यांनी प्रत्यक्षात रुग्ण तपासणी/उपचार/ शस्त्रक्रिया केल्या नसल्यास त्यांना संबंधित दिवसांचा प्रोत्साहन भत्ता लागू होणार नाही. तसेच जे विभाग पूर्णपणे वरील कालावधीत बंद होते त्यांना त्या दिवसांचा प्रोत्साहन भत्ता देय्य होणार नाही. तसेच जे वैद्यकिय अधिकारी सदर कालावधीत हजर आहेत परंतु एक ही रुग्णाची तपासणी / शस्त्रक्रिया / उपचार केला नसल्यास त्यांना प्रोत्साहन भत्ता देय्य होणार नाही. तसेच आठवडा सुट्टीचे दिवशी वैद्यकिय अधिका-यांनी काम केले नसलेमुळे आठवडा सुट्टीचा प्रोत्साहन भत्ता देय्य होणार नाही.

माहे एप्रिल– २०२० चे रुग्णांचा तपशील खालीलप्रमाणे -

| **अ.नं.** | **ओपीडी रुग्ण** | **आयपीडी रुग्ण** | **शस्त्रक्रिया** | **एकुण रुग्ण** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ७३३६ | १९० | ०७ | ७५३३ |

त्यानुसार ज्या वैद्यकिय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता लागू आहे, त्यांचा माहे एप्रिल– २०२० चा देय्य होणारा तपशील खालीलप्रमाणे -

| **अ. नं.** | **वैद्यकीय अधिकारी नांव** | **बेसिक + ग्रेड पे** | **एकूण २००% प्रो. भत्ता** | **ओपीडी** | **शस्त्रक्रिया** | **एकूण दिवस** | **देय्य होणारा अंदाजे प्रोत्साहन भत्ता** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. मैथिली यशोधन पितांबरे | ३०२८०+६६०० | ७३७६० | **२६** | - | **२६** | **६३९२५** |
| ०२ | डॉ. अरुण मदनराव केसरकर | ३६६९०+६६०० | ८६५८० | २६ | - | २६ | **७५०३६** |
| ०३ | डॉ. एन. राम प्रसन्ना नाईक | ३७९९०+६६०० | ८९१८० | १३ | - | १३ | **३८६४५** |
| ०४ | डॉ. दादासो. लुमा कांबळे | २६५२०+६६०० | ६६२४० | २६ | - | २६ | **५७४०८** |
| ०५ | डॉ. रचना सुनिल साबळे | २४६१०+६६०० | ६४४२० | १३ | - | १३ | **२७०४९** |
| ०६ | डॉ. मनिषा उमेशचंद्र अग्रवाल | २२८१०+६६०० | ५८८२० | ०० | ०० | ०० | **००** |
| ०७ | डॉ. मधुरा निहार जोशी | २११९०+६६०० | ५५४२० | २६ | - | २६ | **४८०३१** |
| ०८ | डॉ. बाणेश छगनराव गायकवाड | २२८५०+५४०० | ५६५०० | १४ | - | १४ | **२६३६९** |
| ०९ | डॉ. निर्मला स्वाधीन गाडेकर | १७५५०+५४०० | ४५९०० | ०५ | १ | ०६ | **९१८०** |
| १० | डॉ. अजित यशवंत पाटील | २०३००+६६०० | ५३८०० | ११ | - | ११ | **१९७२७** |
| ११ | डॉ. आत्माराम लक्ष्मण धुळगंड | १६८८०+५४०० | ४४५६० | ०५ | - | ०५ | **७४२७** |
| १२ | डॉ. अनघा गहिनीनाथ विखे | १६८८०+५४०० | ४४५६० | ०३ | - | ०३ | **४४५६** |
| १३ | डॉ. राहुल दत्तात्रय डोंगरे | १५६००+५४०० | ४२००० | २६ | - | २६ | **३६४००** |
| १४ | डॉ. शोभना तुकाराम कोल्हे | १८७५०+६६०० | ५०७०० | १० | - | १० | **१६९००** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | डॉ. प्राजक्ता मुरलीधर खर्चे | १८७५०+६६०० | ५०७०० | ०० | ०० | ०० | **००** |
| १६ | डॉ. अमित दिपक नाईकवाडे | १८७५०+६६०० | ५०७०० | ११ | - | ११ | **१८५९०** |
| १७ | डॉ. विशाल धनाजी पटेल | १८७५०+६६०० | ५०७०० | ११ | - | ११ | **१८५९०** |
| १८ | डॉ. उज्वला भाऊसाहेब काळे | १५६००+५४०० | ४२००० | २५ | - | २५ | **३५०००** |
| १९ | डॉ. गिरीश शशिकांत शेळके | १८७५०+६६०० | ५०७०० | १२ | - | १२ | **२०२८०** |
| २० | डॉ. गजानन हुकूम पाटील | १८७५०+६६०० | ५०७०० | १२ | १ | १३ | **२१९७०** |
| २१ | डॉ. प्रियंका विलास गायकवाड | १८७५०+६६०० | ५०७०० | ०६ | - | ०६ | **१०१४०** |
| २२ | डॉ. प्रियंका प्रकाश दहिफळे | १५६००+५४०० | ४२००० | ०३ | - | ०३ | **४२००** |
| २३ | डॉ. प्रिती हिरालाल जोशी | १८७५०+६६०० | ५०७०० | ०४ | - | ०४ | **६७६०** |
| **(अक्षरी रक्कम रुपये – पाच लाख सहासष्ट हजार त्र्याऐंशी मात्र )** | | | | | | | **५,६६,०८३** |

सध्या कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला असल्यामुळे मा. केंद्र शासनाने व राज्य शासनाने दि. १८ मे, २०२० संपूर्ण देश व राज्यांमध्ये अत्यावश्यक सेवा वगळून लॉकडाऊन करणेत आलेले आहेत. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांना **तसेच** प्रशासकीय पदाला उपरोक्त परिच्छेद फ-१ मध्ये नमूद केलेप्रमाणे माहे एप्रिल-२०२० चा प्रोत्साहन भत्ता तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडील प्रशासकीय पदावर (मूळ किंवा प्रभारी / अतिरिक्त) असलेले डॉक्टर पूर्णवेळ कामावर हजर आहेत.

मागील माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च – २०२० चा अदा करणेत आलेला प्रोत्साहन भत्ता तपशील -

| **अ.नं.** | **माहे** | **एकुण रक्कम** |
|---|---|---|
| ०१ | जानेवारी- २०२० | ११,५५,५०७/- |
| ०२ | फेब्रुवारी- २०२० | १२,०२,४१०/- |
| ०३ | मार्च- २०२० | १२,२१,९३७/- |

उपरोक्त माहे जानेवारी ते मार्च यातीन महिन्यात प्रोत्साहन भत्ता अदा केलेल्या रक्कमेच्या तुलनेत माहे एप्रिल- २०२० ची प्रोत्साहन भत्त्याची रक्कम सरासरी ५० टक्के होत आहे. तरी त्यांना माहे एप्रिल – २०२० प्रोत्साहन भत्त्याची रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

(फ-२) श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी मध्ये कार्यरत असणारे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, परफ्युजिनिस्ट आणि कॅथलॅब टेक्निशियन, यांना तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने दि. ०८ मार्च, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १९६ अन्वये रुग्णांकडून आकारणेत येणा-या वैद्यकीय बिलाचे रक्कमेतच प्रोत्साहन भत्ता (Incentive Allowance) रक्कम समाविष्ट करणेत आलेली आहे. रुग्णांचे वैद्यकिय बिलातून आकारणी करणेत आलेली प्रोत्साहन भत्त्याची रक्कम संबंधित तज्ञ वैद्यकिय अधिकारी व इतर यांना संगणकीय कार्यप्रणालीव्दारे येणारे रक्कमेची गणना करुन / हिशोब करुन आदा करणेत येतो. म्हणजेच श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डीकडे कार्यरत असणारे तज्ञ वैद्यकीय अधिकारी व इतर यांना आदा करणेत येणारा प्रोत्साहन भत्ता हा प्रति रुग्णानुसार व प्रति केलेल्या तपासणी / उपचार / शस्त्रक्रिया यानुसारच आदा करणेत येतो. त्यामुळे या संबंधित वैद्यकीय अधिकारी व इतर यांना प्रोत्साहन भत्ता नेहमीचे विहीत पध्दतीने आदा करणेस मान्यता असावी.

तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल कडील प्रशासकीय पदावर (मूळ किंवा प्रभारी / अतिरिक्त) पूर्णवेळ कामावर हजर असलेने डॉ. प्रीतम वडगांवे, प्र. वैद्यकीय प्रशासक यांना आठवडा सुट्टी वगळतां, नियमाप्रमाणे माहे एप्रिल-२०२० प्रोत्साहन भत्ता आदा करणेस मान्यता असावी.

माहे एप्रिल-२०२० चे रुग्ण संख्येचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | ओपीडी रुग्ण | आयपीडी रुग्ण | शस्त्रक्रिया | एकुण रुग्ण |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३८८३ | ३१७ | १३४ | ४३३४ |

(ग) श्री साई प्रसादालय विभाग-उक्ते काम दिलेल्या बाह्यस्त्रोत (Outsource Contrator) कंत्राटदाराकडील कर्मचा-यांचे वेतनाबाबत.

सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ११ एप्रिल, २०२० रोजीचे आदेशातील अ.नं. ८ मध्ये असे नमूद करणेत आलेले आहे की, ' .. .. ज्या विभागाकडे बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कर्मचारी / निश्चित मानधनावर / निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कर्मचारी कार्यरत आहेत, त्या विभागांनी / अशा विभागांनी उपरोक्त ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या अभिप्रायांशी सुसंगत व सुस्पष्ट अभिप्राय देऊन, अशी वेतनबिले स्वतंत्रिरत्या कार्यालयीन टिपणीसह मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेस्तव सादर करावीत.'

उपरोक्त आदेशानुसार, प्रसादालय विभागाकडील उक्ते स्वरुपात काम करणा-या बाह्यस्त्रोत कंत्राटदारांकडील कर्मचा-यांना वेतन देण्यातअडचणी येत आहेत. कारण इकडील विभागातील कामे दैनंदिन उक्ते रुपातील असून, संबंधीत ठेकेदारांनी दैनदिन आवश्यक कर्मचा-यांच्या व्यतिरीक्त हजेरी मस्टरला मोठया प्रमाणात कर्मचारी घेतलेले आहेत. याबाबत दैनंदिन आवश्यक कर्मचारी व हजेरी मस्टरला असलेले कर्मचारी यांचा पुढीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता आपले अवलोकनार्थ सादर करीत आहोत :

| **ठेकेदाराचे नांव** | **कामाचा तपशील** | **दैनंदिन आवश्यक कर्मचारी संख्या** | **हजेरी मस्टरला असलेले कर्मचारी** |
|---|---|---|---|
| मे. फोकस फॅसिलीटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई | श्री साई प्रसादालयात हाऊस किपींग, स्वच्छता, पेस्ट कंट्रोल करणे. | १४२ | २१६ |
| | श्री साई प्रसादालयात अतिरीक्त १०० वाढपी कर्मचारी पुरविणे. | १०० | १६१ |

उपरोक्तप्रमाणे हजेरी मस्टरला असलेल्या कर्मचा-यांचे संख्येऐवजी सदरहु ठेकेदाराकडील दैनंदिन कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या संख्येनुसार कोव्हीड-१९ लॉकडाऊन कालावधीतील वेतन अदा करण्यात यावे असे मत आहे. मात्र सदरहु वेतनाची रक्कम काढतांना मागील तीन महिन्याच्या म्हणजेच जानेवारी, २०२० ते मार्च २०२० या काळात हजर असलेल्या कर्मचा-यांच्या संख्येच्या सरासरीनुसार देण्यात यावे असे नम्र मत आहे. यासाठी खालील तक्त्याचे अवलोकन होणे गरजेचे आहे :

(ग-१)मे. फोकस फॅसिलीटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई

| कामाचा प्रकार | कर्मचा-यांची महिन्यात लावलेली एकूण संख्या | | | एकूण | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|---|
| | जानेवारी २०२० | फेब्रुवारी २०२० | मार्च २०२० (अंदाजे) | | |
| स्वच्छता, पेस्ट कंट्रोल | | | | | |
| कुशल | ३१० | २८८ | ३१० | ९०८ | ३०३ |
| अकुशल | ३९५५ | ३७३१ | ३८६४ | ११५५० | ३८५० |
| वाढपी | ३१०० | २९०० | ३१०० | ९१०० | ३०३३ |

उपरोक्त तक्त्यातील सरासरीनुसार निविदेत नमूद केलेप्रमाणे दररोज लावण्यात येणारे बाह्यस्त्रोत कामगार प्रशासन शाखेच्या आदेशाने बंद करण्यात आले होते, अशा कामगारांचे माहे मार्च २०२० ची कोवीड-१९ ची बीले संबंधीत ठेकेदारास अदा करणे बाकी आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| दिनांक | कुशल हाऊस किंपीग | अकुशल हाऊस किंपींग | वाढपी |
|---|---|---|---|
| २२ ते ३१/०३/२०२० (१० दिवस) | १२ x ९ = १०८ | १३० x १०=१३००-१५९ (अदा केलेले)=११४१ | १०० x १० = १००० |
| किमान वेतन दर : | ४३०.५४ | ३६८.५४ | ३६८.५४ |
| एकूण शिल्लक देय्य वेतन : | ४६,४९८/- | ४,२०,५०४/- | ३,६८,५४०/- |

वरीलप्रमाणे मार्च २०२० महिन्यात अदा केलेल्या बीलातील कोव्हीड-१९ कालावधीतील दि. २२ ते ३१ या प्रलंबीत कालावधीतील बीलाची रक्कम संबंधीत ठेकेदारास देणे आहे. सदर रकमेचे वाटप केल्यानंतर नेहमीचे पध्दतीने आवश्यक ती कागदपत्रे पुढील बीलासमवेत संबंधीत ठेकेदार संस्थानकडे सादर करतील. तसेच याप्रमाणेच माहे एप्रिल व त्यापुढील प्रशासनाचा आदेश होईपावेतो वेळोवेळी संबंधीत ठेकेदाराला येणारी रक्कम अदा करावी लागेल.

(ग-२)दि यशोधरा महिला सह. औदयोगिक उत्पादक संस्था, नाशिक

उपरोक्त ठेकेदार यांना कामाचे स्वरुपानुसार उक्त्या स्वरुपाची कामे देण्यात आलेली आहे. त्यात अन्न पाकीटे बनविणेकामी पुरी तयार करणे, भाजी तयार करणे, स्वीट तयार करणे, अन्नपाकीटांचे तयार करुन त्याची पॅकींग करणे प्रती पॅकेट रुपये १.९७ या दरानुसार कामाचे टेंडर देण्यात आलेले आहे. याकामी सदर ठेकेदार सरासरी ४० कामगार कामावर घेत असतो.

त्याचप्रमाणे चपाती मशीनवर चपाती तयार करणे याकामी चपाती मशीनवर कामगार लावणे याचे टेंडर त्यांना प्रती क्विंटल रुपये २७८ प्रमाणे देण्यात आलेले आहे. सध्या सदरहु ठेकेदार खालीलप्रमाणे कामगार कामावर लावत आहेत :

| ठेकेदाराचे नांव | कामाचा तपशील | दैनंदिन आवश्यक कर्मचारी संख्या | हजेरी मस्टरला असलेले कर्मचारी |
|---|---|---|---|
| दि. यशोधरा महिला सह. औदयोगिक उत्पादक संस्था, नाशिक | अन्नपाकिटे बनविणे | ४० | ७१ |
| | चपाती मशीनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणे. | १६ | २१ |

उपरोक्तप्रमाणे अन्न पाकीटे बनविणे व चपाती मशीनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणे ही कामे सध्या लॉकडाऊनमुळे बंद आहेत. संदर्भीय आदेशान्वये ती अदा करतांना माहे जानेवारी२०२०ते मार्च २०२० या तीन महिन्यात अदा केलेल्या कामगारांचे बीलाचे सरासरीनुसार साधारणत: धोरण अवलंबण्यात यावे, असे मत आहे. या तुलनात्मक तक्यात अन्नपाकीटांसाठी सरासरी ४० व चपाती मशीनवर चपाती बनविणेकामी सरासरी १६ कामगारांचा वापर करण्यात येतो. या कर्मचा-यांना जीएसटीसह लॉकडाऊन कालावधीत किमान वेतन दरानुसार रक्कम अदा केल्यास संस्थानचा आर्थिक फायदा होईल व मालकाला कुठल्याही प्रकारची नफ्याची रक्कम जाणार नाही, असे नम्र मत आहे. तसेच उपरोक्त ठेकेदारांकडील कामगारांची माहे जानेवारी २०२० ते मार्च २०२० अखेर एकूण कामगारांची सरासरी संख्या खालीलप्रमाणे आहे :

| कामाचा प्रकार | कर्मचा-यांची महिन्यात लावलेली एकूण संख्या | | | एकूण | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|---|
| | जानेवारी २०२० | फेब्रुवारी २०२० | मार्च २०२० (अंदाजे) | | |
| अन्नपाकीटे बनविणे | १३१४ | ११०९ | १२४० | ३६६३ | १२२१ |
| चपाती मशीनवर चपाती बनविणे | ३७६ | ३६६ | ३७२ | १११४ | ३७१ |

उपरोक्त **(ग-१)**व **(ग-२)**चा विचार करता लॉकडाऊन कालावधीत कोरोना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुभाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना या शिर्षाखाली बाहयस्त्रोत (Out Source) कर्मचा-यांना वेतन अदा करणेकरीता संदर्भीय आदेशाचे अनुषंगाने व वरील बाबींचा विचार कराता पुढीलप्रमाणे वेतन अदायगीची प्रक्रिया राबविण्यात यावी, असे मत आहे :

कोव्हीड-१९ कालावधीत श्री साई प्रसादालयात हाऊस किपींग, स्वच्छता, पेस्ट कंट्रोलकामी काढण्यात आलेली कर्मचारी संख्या तसेच अनन्पाकीटे बनविणे, चपाती मशीनवर मुनष्यबळाव्दारे चपाती तयार करणेकामी सरासरीनुसार येणारा कर्मचारी तक्ता खालीलप्रमाणे असून, त्यांना देय्य होणारी रक्कम पुढीलप्रमाणे आहे :

प्रस्तावात नमूद **(ग-१)** मे. फोकस फॅसिलीटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई व **(ग-२)**दियशोधरा महिला सह. औदयोगिक उत्पादक संस्था, नाशिकयांना सरासरीनुसार खालीलप्रमाणे रक्कम देय्य होत आहे :

| ठेकेदाराचे नाव | कामाचा प्रकार | कर्मचारी सरासरी दिवस | किमान वेतन दर | एकूण रक्कम | प्रॉ. फंड १३% | जीएसटी १८% | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| माहे मार्च कोव्हीड बील फोकस फॅसिलीटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई | कुशल<br>अकुशल<br>वाढपी | १०८<br>११४१<br>१००० | ४३०.५४<br>३६८.५४<br>३६८.५४ | ४६,४९८/-<br>४,२०,५०४/-<br>३,६८,५४०/- | माहे मार्च २०२० नियमित बीलात देण्यात आले आहे. | ८,३७०/-<br>७५,६९१/-<br>६६,३३७/- | ५४,८६८/-<br>४,९६,१९५/-<br>४,३४,८७७/- |
| दि. २२ ते ३१ मार्च कालावधीतील एकूण रक्कम : | | | | | | | ९,८५,९४०/- |
| फोकस फॅसिलीटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई | कुशल<br>अकुशल<br>वाढपी | ३०३<br>३८५०<br>३०३३ | ४३०.५४<br>३६८.५४<br>३६८.५४ | १,३०,४५४/-<br>१४,१८,८७९/-<br>११,१७,७८२/- | १६,९५९/-<br>१,८४,४५४/-<br>१,४५,३१२/- | २३,४८२/-<br>२,५५,३९८/-<br>२,०१,२०१/- | १,७०,८९५/-<br>१८,५८,७३१/-<br>१४,६४,२९५/- |
| एकूण (अ) | | | | | | | **३४,९३,९२१/-** |
| यशोधरा महिला सह. औदयोगिक उत्पादक संस्था, नाशिक | अन्नपाकीटे<br>मशीनचपाती | १२२१<br>३७१ | ३६८.५४<br>३६८.५४ | ४,४९,९८७/-<br>१,३६,७२८/- | ५८,४९८/-<br>१७,७७५/- | ८०,९९८/-<br>२४,६११/- | ५,८९,४८३/-<br>१,७९,११४/- |
| एकूण (ब) | | | | | | | **७,६८,५९७/-** |
| एकूण (९,८५,९४०/- + ३४,९३,९२१/- + ७,६८,५९७/-)पी.एफ., जीएसटीसह: | | | | | | | **५२,४८,४५८/-** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता, **(ग-१)** फोकस फॅसिलीटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना त्यांचे श्री साईप्रसादालयात हाऊस किंपींगव स्वच्छता विषयक कामे दैनंदिन १०० वाढपी या कामांसाठी बाहयस्त्रोत कंत्राटदार यांना कामगारांसाठी प्रलंबित अंदाजित माहे मार्च २०२० (दि. २२ ते ३१) ची बीलाची अंदाजित रक्कम रुपये ९,८५,९४०/- तसेच माहे एप्रिल २०२० चे अंदाजित वेतन रुपये ३४,९३,९२१/- अशी एकूण अंदाजित रक्कम रुपये ४४,७९,८६१/- इतकी देय्य होते.

तसेच **(ग-२)** दि यशोधरा महिला सह. औदयोगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना अन्नपाकीटे तयार करणे, चपाती मशीनवर चपाती तयार करणे याकामी माहे एप्रिल २०२० चे एकत्रित वेतन रुपये ७,६८,५९७/- अशी देय्य होते.

वरील दोनही ठेकेदारांची एकत्रित रक्कम रुपये ५२,४८,४५८/- ( अक्षरी रुपये बावन्न लाखअठ्ठेचाळीस हजारचारशे अठ्ठावन्न मात्र) संबंधीतांना अदा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त कंत्राटदाराच्या निविदा ह्या उक्त्या स्वरुपात असल्या तरीही कोव्हीड-१९ मुळे वेतन आदा करतांना फक्त किमान वेतन दरानुसार रक्कम अदा होईल याची काळजी घेण्यात आलेली असून, त्यांचे एकूण उक्त्या रकमेपेक्षा त्यांना देय्य करण्यात येणारी रक्कम ही कमी स्वरुपाची आहे, असे नम्र मत आहे.

तरी सदर मंजूर ठेकेदारांना मानवतेच्या दृष्टीकोनातून कोव्हीड-१९ अंतर्गत फक्त कर्मचा-यांच्या वेतनापोटी अंदाजित एकूण रक्कम रुपये ५२,४८,४५८/- ( अक्षरी रुपये बावन्न लाखअठ्ठेचाळीस हजारचारशे अठ्ठावन्न मात्र)आदा करणेस मान्यता असावी.

**(च)** सध्या विषयांकित कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव वाढता असून, मा. केंद्र व राज्य शासनाने दिनांक १८ मे, २०२० पावेतो संपूर्ण देशात / राज्यात LOCKDOWN ची परिस्थिती जैसे थे

ठेवलेली आहे. त्यामुळे उपरोक्त परिच्छेद (अ) मधील पूर्वपीठीकेस अनुसरुन, परिच्छेद (ब) ते परिच्छेद (ग) मध्ये नमूद केलेप्रमाणे, संस्थान व्यवस्थापनाकडे/आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना, संबंधित विभागांनी प्रस्तावित केलेप्रमाणे, वेतन / पगार / मानधन / प्रोत्साहन भत्ता आदि आदा करणेकामी सदरचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ / निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९७** **आजचे सभेच्या अजेंडयावरील विषय नं.०१ ,०२, ४३ व ६३ या विषयांवरील एकत्रित निर्णय क्र.२३५ सदर इतिवृत्ताचे शेवटी परिशिष्ट "अ" म्हणून जोडलेला आहे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **दि.२७.०३.२०२० रोजी What's App व्दारे व्हिडीओ कॉन्फरन्सींगने झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र. २९८** **दिनांक २७.०३.२०२० रोजी What's App व्दारे व्हिडीओ कॉन्फरन्सींगने झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेला विषय वाचून कायम करणे.**
**कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत संस्थानमार्फत साईभक्तांना उपलब्ध सुविधा बंद करणेत आल्याने साईभक्तांनी ऑनलाईन पध्दतीने आरक्षीत केलेल्या सुविधेचे फेर नियोजन अथवा त्यांची याकामी संस्थानखाती जमा रक्कम त्यांना परत करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव** अधिनियम २००४ मधील तरतूद :- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्राथनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :- ०१. दि.०८.०१.२०१४ निर्णय क्र.४९.
०२. दि.०६.०६.२०१९ निर्णय क्र.२२१

प्रास्तविक:- श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध असलेल्या सुविधांचे आरक्षण साईभक्तांना इंटरनेटव्दारे करता यावे, याकरीता साईटेक प्रकल्पांतर्गत "ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) हे संकेतस्थळ विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेले आहे. सदर संकेतस्थळाव्दारे साईभक्तांना रुम, आरती/दर्शनपास, श्री साई सत्यनारायण/अभिषेक पुजा कुपन इ. चे पुढील २ ते ६० दिवसापर्यंतचे आरक्षण उपलब्धतेनुसार करता येते. तसेच IRCTC यांचे पोर्टलदवारे रेल्वे तिकीट आरक्षीत करणारे साईभक्तांना सदर सुविधांचे पुढील २ ते १२० दिवसापर्यंतचे आरक्षण उपलब्धतेनुसार करता येते.

संदर्भ क्र.०१ चे आदेशान्वये, जागतिक स्तरावर उद्भवलेल्या कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत संस्थान व्यवस्थापन संचलित श्री साई समाधी मंदिराबरोबरच इतर सर्व मंदिरे दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत दर्शनाकरीता बंद करणेत आलेले आहेत. संस्थान व्यवस्थापन संचलित सर्व भक्तनिवासस्थानेही दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत निवासाकरीता बंद करणेत आले आहेत. तसेच संस्थान व्यवस्थापन संचलित अधिकृत संकेतस्थळाद्वारे करणेत येणारे ऑनलाईन दर्शन / आरती / निवास आदी सुविधांचे आगाऊ आरक्षण (Online Booking) बंद करणेत यावेत. त्याप्रमाणे संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर याबाबत माहिती प्रसिद्धी करणेची कार्यवाही करणेत यावी, असेही सदर आदेशामध्ये नमुद करणेत आलेले आहे. आदेशीत केलेप्रमाणे संकेतस्थळाद्वारे करणेत येणारे ऑनलाईन दर्शन / आरती, निवास व श्री साईसत्यनारायण/अभिषेक ई. आदी सुविधांचे आगाऊ आरक्षण (Online Booking) बंद करणेत आलेले आहे.

परंतू सदरचे कालावधीमध्ये अनेक साईभक्तांनी ऑनलाईन पद्धतीने आरती / दर्शनपास, श्री साई सत्यनारायण / अभिषेक पुजा तसेच संस्थानचे निवासस्थानातील रुमचे आगाऊ बुकींग केलेले आहे. सदरच्या सुविधा संस्थानमार्फत बंद करणेत आल्याने आगाऊ बुकींग केलेल्या साईभक्तांकडून त्यांचे बुकींग रद्द होऊन रक्कम परत मिळणेबाबत ई-मेल, दुरध्वनी, व्हॉट्सॲप मेसेज तसेच पत्राद्वारे मागणी होत आहे. काही साईभक्त

स्वत:हून बुकींग रद्द करुन रकमेची मागणी करत आहेत. तर काही साईभक्त त्यांना सदरची सुविधा भविष्यामध्ये ते शिर्डीमध्ये आल्यानंतर उपलब्ध होणेबाबत मागणी करत आहेत. सदर मागणी करणा-या साईभक्तांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

दि.१८.०३.२०२० ते दि.१४.०४.२०२० या कालावधीमध्ये विविध सुविधांचे ऑनलाईन पद्धतीने झालेल्या बुकींगबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.

| **Sr.No.** | **Service** | **Status** | **No. of Tran.** | **Amount** | **Total** |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Accommodation | Success | 15,124 | 80,45,836 | |
| | | Cancelled | 2,043 | 11,03,736 | |
| | | | | **Total** | **91,49,572** |
| 02 | Aarti/Darshan | Success | 7,251 | 78,79,000 | |
| | | Cancelled | 883 | 9,46,200 | |
| | | | | **Total** | **88,25,200** |
| 03 | Pooja | Success | 1,052 | 1,05,765 | |
| | | Cancelled | 108 | 10,850 | |
| | | | | **Total** | **1,16,615** |
| | | | | **Grand Total** | **1,80,91,387** |

तसेच दि.१५.०४.२०२० पासून पुढील कालावधीसाठी विविध सुविधांचे ऑनलाईन पद्धतीने झालेल्या बुकींगबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.

| **Sr.No.** | **Service** | **Status** | **No. of Transactions** | **Amount** |
|---|---|---|---|---|
| 01 | Accommodation | Success | 10,575 | 70,65,894 |
| 02 | Aarti/Darshan | Success | 2,926 | 42,50,800 |
| 03 | Pooja | Success | 354 | 35,533 |
| **Total :** | | | | **1,13,52,227** |

साईभक्तांनी काही कारणास्तव ऑनलाईन केलेले आरक्षण रद्द केल्यास त्यांना द्यावयाच्या परताव्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.४९ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले आहेत. “बरेचसे साईभक्त ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीमधून आरक्षीत केलेल्या रुम अथवा दर्शन/आरती पास काही कारणास्तव मुदतीच्या शेवटच्या क्षणी रद्द करतात, त्यामुळे ब-याच साईभक्तांना गरज असतानाही सदर सेवेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे दि.०१ फेब्रु., २०१४ पासून साईभक्तांनी रद्द केलेल्या उपरोक्त सेवांची रक्कम १०० % कपात करणेत यावी.”

उपरोक्त निर्देशान्वये “ऑनलाईन सर्व्हिसेस” (online.sai.org.in) हे संकेतस्थळावरुन आरक्षीत केलेली कोणतीही सुविधा साईभक्ताने रद्द केल्यास सदर सुविधेसाठीची त्यांची संस्थानखाती ऑनलाईन जमा झालेली रक्कम त्यांना परत करणेत येत नाही.

ओरीसा येथील साईभक्त श्री नविन कुमार परीदा व रंजीता समंतरॉय हे शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणार असल्याने त्यांनी संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे संस्थानचे निवासस्थानांमध्ये रुम आरक्षीत केलेल्या होत्या. परंतू ओरीसा येथे आलेल्या फनी या चक्रीवादळासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळे त्यांना शिर्डी येथे येणे शक्य होणार नसल्याने त्यांचेमार्फत आरक्षीत केलेल्या रुमचे आरक्षण रद्द करणेत येऊन याकामी त्यांचे खात्यामधून संस्थानखाती ऑनलाईन जमा झालेली रक्कम त्यांना परत मिळणेबाबत त्यांनी ई-मेलद्वारे विनंती केलेली होती.

उपरोक्त नमुद साईभक्तांनी केलेल्या मागणीबाबत निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती नि.क्रं. २२१ अन्वये “फक्त अपरिहार्य प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने “ऑनलाईन सर्व्हिसेस” (online.sai.org.in) ह्या संकेतस्थळावरून संस्थानचे निवासस्थानामध्ये रुम आरक्षीत केलेल्या साईभक्तांचे रुम आरक्षण रद्द करुन सदरची रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणेस मान्यता देण्यात आली.”

दि.१८.०३.२०२० पासूनचे कालावधीकरीता विविध सुविधांचे ऑनलाईनद्वारे आगाऊ बुकींग केलेल्या साईभक्तांकडून वारंवार त्यांचे बुकींग रद्द होऊन रक्कम परत मिळणेबाबत होत असलेल्या मागणीबाबत मा.मुख्यकार्यकारी अधिकारी महोदय यांनी दि.२८.०३.२०२० रोजी संबंधीतांचे उपस्थितीमध्ये आढावा बैठक घेतली. सदर बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी व प्र.आयटी विभागप्रमुख हे उपस्थित होते. सदरचे बैठकीमध्ये बुकींग केलेल्या साईभक्तांकडून त्यांचे बुकींग रद्द होऊन त्यांची याकामीची रक्कम परत मिळणेकामीचे मागणीमध्ये वाढ होत असल्याने सदरचे साईभक्तांना पुढीलप्रमाणे पर्याय मा.तदर्थ समितीचे मान्यतेने उपलब्ध करुन देता येतील, असे ठरले.

१. दि.१८.०३.२०२० ते दि.१४.०४.२०२० या कालावधीमध्ये विविध सुविधांचे बुकींग केलेल्या साईभक्तांना सदरच्या सुविधा मंदिर दर्शनाकरीता सुरू झालेनंतर पुढील चार महिन्यामध्ये (गुरूपौर्णिमेचा कालावधी वगळून) उपलब्ध करुन देता येतील.

२. उपरोक्त पर्याय मान्य नसलेल्या साईभक्तांना त्यांची याकामीची संस्थानखती जमा झालेली रक्कम त्यांना ऑनलाईन पद्धतीने परत करता येईल.

उपरोक्त पर्यायाबाबत साईभक्तांना पुढील मसुद्याप्रमाणे ई-मेलद्वारे त्यांचे नोंदणीकृत ई-मेल आयडीवर कळविता येईल तसेच सदरची माहिती संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करता येईल.

In the view of lockdown of all states in India to stop COVID-19 virus outbreak, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi has decided to compensate the Devotees who reserved the services between 18-Mar-20 and 14-Apr-20 through online.sai.org.in with the following options.

**Option 1: Reschedule.**

Devotee have option to reschedule the booked service within 4 months (expect 4-July-2020 to 7-July-2020) from the commencement of Darshan and services of SSST, Shirdi.

Devotees willing to reschedule their booked service have to mail their transactions details and scheduled date minimum 4 days before scheduled date on following e-mail id.

**Mail Id :-**

To – saibaba@sai.org.in,

CC - sai.publicity@sai.org.in, temple@sai.org.in, saiashram@sai.org.in, dwarawati@sai.org.in, newbhaktniwas@sai.org.in, saidharmashala@sai.org.in

**Option 2: Cancellation and Refund.**

Devotees who are not willing to reschedule their booked service and wants refund of amount should mail their transaction details stating that he wants to cancel the transaction & refund of money on following e-mail id.

**Mail Id :-**

To – saibaba@sai.org.in,

CC - sai.publicity@sai.org.in, temple@sai.org.in, saiashram@sai.org.in, dwarawati@sai.org.in, newbhaktniwas@sai.org.in, saidharmashala@sai.org.in

This facility is available for Darshan, Aarti, Satyanarayana Pooja, Abhishek Pooja & Accommodation services.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दि.१८.०३.२०२० ते दि.१४.०४.२०२० या कालावधीदरम्यान विविध सुविधांचे बुकींग केलेल्या साईभक्तांना तसेच दि.१५.०४.२०२० पासुन पुढे परिस्थिती अशीच राहिल्यास सदर साईभक्तांना त्यांनी बुकींग केलेल्या सुविधा भविष्यात उपलब्ध करुन देणेस अथवा त्यांची याकामीची रक्कम त्यांना परत करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रिय पदधतीने सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत दि.१७.०३.२०२० पासून दर्शन व इतर सुविधा पुढील आदेश होईपर्यंत संस्थानमार्फत साईभक्तांसाठी बंद करणेत आलेल्या आहेत. विविध सुविधांचे सदर कालावधीमध्ये ऑनलाईन

बुकींग केलेल्या अनेक साईभक्तांकडून बुकींग रद्द होऊन रक्कम परत मिळणेबाबत वारंवार मागणी होत आहे. सबब, याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेस-

अ. दि.१८.०३.२०२० ते दि.१४.०४.२०२० या कालावधीदरम्यान विविध सुविधांचे ऑनलाईन बुकींग केलेल्या साईभक्तांना सदरच्या सुविधा मंदिर दर्शनाकरीता पुर्ववत सुरु झालेनंतर पुढील चार महिन्यात (गुरुपौर्णिमेचा कालावधी वगळून) उपलब्ध करुन देणेस

आ. संबंधीत साईभक्त यास सहमत नसल्यास त्यांची याकामीची रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणेस.

इ. दि.१५.०४.२०२० पासुन पुढे परिस्थिती अशीच राहिल्यास संबंधीत साईभक्तांबाबतही "अ" व "आ" प्रमाणे कार्यवाही करणेस,

"अ", "आ" व "इ" मध्ये नमुद केलेप्रमाणेची कार्यवाही प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे करणेसाठी सदरचा प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.

छाननी करुन अनुमान :- आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत दि.१७.०३.२०२० पासून दर्शन व इतर सुविधा पुढील आदेश होईपर्यंत संस्थानमार्फत साईभक्तांसाठी बंद करणेत आलेल्या आहेत. विविध सुविधांचे सदर कालावधीमध्ये ऑनलाईन बुकींग केलेल्या अनेक साईभक्तांकडून बुकींग रद्द होऊन रक्कम परत मिळणेबाबत वारंवार मागणी होत आहे. सबब, याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेस-

अ. दि.१८.०३.२०२० ते दि.१४.०४.२०२० या कालावधीदरम्यान विविध सुविधांचे ऑनलाईन बुकींग केलेल्या साईभक्तांना सदरच्या सुविधा मंदिर दर्शनाकरीता पुर्ववत सुरु झालेनंतर पुढील चार महिन्यात (गुरुपौर्णिमेचा कालावधी वगळून) उपलब्ध करुन देणेस

आ. संबंधीत साईभक्त यास सहमत नसल्यास त्यांची याकामीची रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणेस.

इ. दि.१५.०४.२०२० पासुन पुढे परिस्थिती अशीच राहिल्यास संबंधीत साईभक्तांबाबतही "अ" व "आ" प्रमाणे कार्यवाही करणेस,

"अ", "आ" व "इ" मध्ये नमुद केलेप्रमाणेची कार्यवाही प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे करणेसाठी सदरचा प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.२९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत संस्थानमार्फत साईभक्तांना उपलब्ध सुविधा (रुम बुकींग, आरती, दर्शनपास व सत्यनारायण/अभिषेक पुजा) बंद करणेत आल्याने साईभक्तांनी ऑनलाईन पध्दतीने आरक्षीत केलेल्या सुविधेचे फेर नियोजन अथवा त्यांची याकामी संस्थानखाती जमा रक्कम त्यांना परत करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेत त्याचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **दर्शन/आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव** अधिनियम २००४ मधील तरतूद - महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकार" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक- श्रींच्या दर्शनासाठी येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्ती तसेच मान्यवरांच्या शिफारशीनुसार येणा-या व्यक्तींना जनसंपर्क विभागामार्फत देण्यात येणा-या व्ही.आय.पी.

पासेससाठी शुल्क आकारणेबाबत संदर्भ क्रमांक १ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७२ अन्वये गुरुवार, शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला आहे. संदर्भ क्रमांक २ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३०९ अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेसची अंमलबजावणी प्रत्यक्षात दिनांक १३.०३.२०१० पासून सुरु करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ३ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३५८ (२५) अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेस सुविधेतुन गुरुवारचा दिवस वगळण्यात आलेला आहे. तसेच साईटेक प्रकल्पांतर्गत दिनांक १४ जुलै २०११ पासून ऑनलाईन दर्शन/आरती सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये सर्व आरत्या करिता शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला असून संदर्भ क्रमांक ५ अन्वये दिनांक ०१.०४.२०१५ पासून जनसंपर्क विभागामार्फत व्ही.आय.पी. व्यक्तींकरीता देण्यात येणारे दर्शन पास प्रायोगिक तत्वावर आठवडयातील सातही दिवस शनिवार, रविवारच्या धर्तीवर सध्याच्या प्रचलित पध्दतीने देणगी शुल्क आकारणेत येऊन वितरीत करणेबाबत निर्णय झालेला आहे. संदर्भ क्रमांक ६ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक १२१ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेस घेणारांची संख्या कमी होऊन, दर्शन रांगेमधून येणा-या साईभक्तांना लवकरात लवकर दर्शन मिळावे, याकरीता ऑनलाईन व जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेसचे दि.०१ मार्च-२०१६ पासून खालीलप्रमाणे शुल्क आकारणेत यावे, असे ठरले. संदर्भ क्रमांक ७ अन्वये मा. तदर्थ समितीचे दिनांक०४.०३.२०२० चे सभेतील निर्णस क्र. १६८ अन्वये दर्शन/आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करणेबाबतचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.

| दर्शन / आरती | आकारावयाचे शुल्क |
|---|---|
| दर्शन | रु.२००/- |
| काकड आरती | रु.६००/- |
| माध्यान्ह आरती | रु.४००/- |
| धूपारती | रु.४००/- |
| शेजारती | रु.४००/- |

प्रस्ताविक – मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक १२१ चे निर्णयानुसार दर्शन पाससाठी प्रतिव्यक्ती २००/- रुपये, काकड आरतीसाठी प्रतिव्यक्ती ६००/- रुपये तसेच माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी प्रतिव्यक्ती ४००/- रुपये प्रमाणे शुल्क आकारण्यात येते. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) मार्फत व्ही.आय.पी. दर्शन/आरतीचे पासेस करीता शुल्क आकारणे ही सुविधा सुरु केल्यामुळे, जगाच्या व देशाच्या काणाकोप-यातील साईभक्तांना या सुविधेमुळे वेळेचे नियोजन करणेही सोपे झाले आहे. तसेच या सुविधेमुळे व्ही.आय.पी. दर्शन पासेसाठी श्री साईभ्क्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, त्यामुळे संस्थानला मोठ्या प्रमाणत देणगी शुल्क प्राप्त होत आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार जनसंपर्क विभागामार्फत दर्शन/आरतीचे पासेस वितरीत करण्यात येतात. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णयानुसार दिनांक ०१.०३.२०१६ पासून आरती पासेससाठी सध्याचे शुल्क व सुधारीत शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे.

१) जनसंपर्क विभाग-

| सुविधा | साईभक्तांची संख्या | सध्याचे शुल्क | रक्कम | सुधारीत शुल्क | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| व्ही.आय.पी.दर्शन | १६,३०,४७८ | २००/- | ३२,६०,९५,६००/- | ३००/- | ४८,९१,४३,४००/- |
| माध्यान्ह,धुप व शेजारती | १,५५,५७५ | ४००/- | ६,२२,३०,०००/- | ८००/- | १२,४४,६०,०००/- |
| काकड आरती | ६०,३७८ | ६००/- | ३,६२,२६,८००/- | १०००/- | ६,०३,७८,०००/- |
| एकूण- | १८,४६,४३१ | | ४२,४५,५२,४००/- | | ६७,३९,८१,४००/- |

२) ऑनलाईन दर्शन / आरती-

| सुविधा | साईभक्तांची संख्या | सध्याचे शुल्क | रक्कम | सुधारीत शुल्क | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ऑनलाईन दर्शन | ६,१७,२९६ | २००/- | १२,३४,५९,२००/- | ३००/- | १८,५१,८८,८००/- |
| माध्यान्ह, धुप व शेजारती | १,५९,०८५ | ४००/- | ६,३६,३४,०००/- | ८००/- | १२,७२,६८,०००/- |
| काकड आरती | ५२,५२७ | ६००/- | ३,१५,१६,२००/- | १०००/- | ५,२५,२७,०००/- |
| एकूण- | ८,२८,९०८ | | २१,८६,०९,४००/- | | ३६,४९,८३,८००/- |

दिनांक ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या आर्थिक वर्षात सध्याचे शुल्कानुसार जनसंपर्क विभागामार्फत व ऑन लाईन सुविधेव्दारे दर्शन/आरती पासेसचे एकत्रीत वितरणातून संस्थानला ६४,३१,६१,८००/- रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे. तसेच प्रस्तावित वाढीव शुल्क आकारल्यास जनसंपर्क विभागामार्फत व ऑन लाईन सुविधेव्दारे दर्शन/आरती पासेसचे एकत्रीत तुलनात्मक रक्कम रुपये १०३,८९,६५,२००/- इतके उत्पन्न प्राप्त होईल. म्हणजेच मागिल आर्थिक वर्षातील साईभक्तांची संख्या विचारात घेता सुधारीत शुल्कानुसार रक्कम रुपये ३९,५८,०३,४००/- इतके वाढीव वार्षिक उत्पन्न संस्थानला प्राप्त होऊ शकते असे मत आहे.

तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व्दारे शिर्डी येथे येणा-या साईभक्तांकरीता विविध सोयी-सुविधा पुरविण्याकरीता विविध प्रकल्पांची कामे चालू आहेत. श्री साईप्रसादालयात दररोज मोफत अन्नदान केले जात असुन याकामी सुमारे ३५ ते ४० कोटी रुपये इतका वार्षिक खर्च केला जातो. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात मोफत औषधांसह वैद्यकीय उपचार केले जात असुन गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय अनुदान दिले जाते. याकामी व रुग्णालयातील कर्मचा-यांच्या वेतनासह सुमारे ९० ते १०० कोटी रुपये इतका वार्षिक खर्च संस्थानच्या वतीने केला जातो. या कामांकरीता दर्शन/ आरतीच्या वाढीव शुल्काचा वापर करता येईल.

मागणी–श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेसचे शुल्कात वाढ करणेबाबत.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत – जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या दर्शन पासेसाठी रुपये २००/- ऐवजी रुपये ३००/- प्रति व्यक्ती व सर्व आरत्यांच्या पासेसचे शुल्कात दुप्पट वाढ म्हणजे काकड आरतीसाठी रुपये ६००/- ऐवजी रुपये १,०००/- प्रति व्यक्ती, माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी रुपये ४००/- ऐवजी रुपये ८००/- प्रति व्यक्ती प्रमाणे शुल्क आकारल्यास मागील वर्षाच्या प्राप्त झालेल्या पासेसच्या देणगी शुल्काच्या तुलनेत अंदाजे ४० ते ४५ कोटी रुपयांची वाढ होईल. या प्राप्त होणा-या वाढीव देणगी रक्कमेचा संस्थानच्या विविध विकास प्रकल्पांसाठी, श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांचे मोफत उपचारांसाठी व श्री साईप्रसादालयात दररोज मोफत अन्नदानासाठी उपयोग होवुन ह्या सुविधा मोठया प्रमाणात साईभक्तांना पुरवता येतील. तसेच या प्राप्त होणा-या वाढीव देणगी रक्कमेमुळे भविष्यात यासारख्या अनेक उपक्रम व योजना साईभक्तांकरीता राबविता येतील, असे मत आहे.

तसेच कोरोना व्हायरसच्या संकटामुळे देशावर व राज्यावर आर्थिक संकट आलेले असुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) वरही मोठ्या प्रमाणात आर्थिक परिणाम होणार आहे. संस्थानवर आलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन पासेसाठी रुपये २००/- ऐवजी रुपये ३००/- प्रति व्यक्ती व सर्व आरत्यांच्या पासेसचे शुल्कात दुप्पट वाढ म्हणजे काकड आरतीसाठी रुपये ६००/- ऐवजी रुपये १,०००/- प्रति व्यक्ती, माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी रुपये ४००/- ऐवजी रुपये ८००/- प्रति व्यक्ती प्रमाणे शुल्क वाढ करणेस तसेच सदरची शुल्कवाढ ऑनलाईन दर्शन/आरती पासेससाठी करणेबाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सविस्तर चर्चा होऊन निर्णय हाणेस विनंती.

**निर्णय क्र.३००** **सदर प्रस्तावावर आजचे सभेतील उपरोक्त विषय नं.२३, निर्णय क्र.२५७ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग/संरक्षण विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०२०-२०२१ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये (दि.31/01/2020 पर्यंत) एकुण रु. 662086136/- इतक्या रकमेचे 1220 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी, उपकरणे, तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुनसन 2006 पासून नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2019-20 यावर्षाकरीता 267 नग मशिन्सचे संबंधीत 24 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभाली करीता एकुण रु. 10808481/-इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

तसेच, श्री साईनाथ रूग्णालयात (दि.31/01/2020 पर्यंत) एकुण रु.47002103/- इतक्या रकमेचे 1000 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी, उपकरणे खरेदी करणेत आले असुन (सन 1999 पासून) नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2019-20 यावर्षाकरीता 81नग मशिन्सचे संबंधीत 21 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभाली करीता एकुण रु.2825040/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचे सन 2020-21 (दि 01/04/2020 तेदि 31/03/2021) याएक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने LAMC/CAMC करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअर पार्टस हे Monopoly याप्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे LAMC/CAMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्स करीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअरपार्टस व कन्झ्युमेबल्स बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

मागणी: सन 2020-21 यावर्षाकरीता श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सोबतच्या तक्त्यामध्ये ( परीशिष्ट ‘अ’ ) दिलेल्या 252 नग मशिन्सचे संबंधीत 23 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्याकरीता अंदाजे रू.10792326/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच श्री साईनाथ रूग्णालयाचे सोबतच्या तक्त्यामध्ये ( परीशिष्ट ‘ब’ ) दिलेल्या एकुण 96 नग मशिन्सचे संबंधीत 21 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्याकरीता अंदाजे रू. 2801534/- इतका खर्च अपेक्षित आहे.

काही कंपन्यांनी मागील वर्षीप्रमाणेच दर दिलेले असुन काही कंपन्यांनी दरामध्ये वाढ केली आहे. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता असलेल्या मशिन्सच्या संख्येत मागील वर्षापेक्षाबदल झालेला असुन काही जुन्या मशिन्स ज्यांचा वापरायोग्य कालावधी संपला आहे. त्या वजा करणेत आल्या आहेत. परंतु नवीन काही मशिन्स ज्यांचा वॉरंटी कालावधी संपला आहे. अशा मशिन्सच्या संख्येत वाढ झालेली आहे. त्यामुळे अंदाजे खर्चाचे रकमेत देखील त्याप्रमाणे बदल दिसुन येत आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल.

वार्षिक सर्व्हीस कॉट्रॅक्टबाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र.33 निर्णय क्र.386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. "दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सदर दुरूस्ती करीता रु.3 लाखापेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा.व्यवस्थापनसमिती सभेची मान्यता घेणेची आवश्यकता आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत: कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे सन 2020-21 ( दि 01/04/2020 तेदि 31/03/2021)

याएकवर्षाच्याकालावधीकरीतानुतनीकरण करणे आवश्यक आहे.तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने LAMC/CAMC करणे आवश्यक आहे.

सर्व कंपन्यांकडुन श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण 252 नग मशीन्स आणि श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 96 नग मशिन्सचे LAMC/CAMC करीता दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल करीता 21 नग मशिन्सचे AMC करणेकीता 05 कंपन्यांनी मागील वर्षी इतकेच दर दिलेले असुन 231 नग मशिन्सचे AMC करणेकरीता 18 कंपन्यांनी मागीलवर्षी पेक्षा 5 % व त्यापेक्षा कमी दरवाढ दिलेली आहे. तसेच श्री साईनाथ रूग्णालया करीता 18 नग मशिन्सचे AMC करणेकीता 06 कंपन्यांनी मागील वर्षी इतकेच दर दिलेले असुन 144 नग मशिन्सचे AMC करणेकरीता 11 कंपन्यांनी मागीलवर्षी पेक्षा 5 % व यापेक्षा कमी दरवाढ दिलेली आहे. तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील 01 नग मशिनकरीता 01कंपनीने 5 % पेक्षा जास्त दरवाढ दिलेली आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअरपार्टस हे Monopoly याप्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे LAMC/CAMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्स करीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हीस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअरपार्टस बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण 252 नग मशीन्सचे संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांनुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता येणा-या एकुण रू. 1,07,92,326/- आणि श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 96 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांनुसार श्री साईनाथ रूग्णालयाकरीता येणा-या एकुण रू. 28,01,534/- इतक्या रकमेच्या येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यताअसावी.

**निर्णय क्र.३०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण 252 नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टकामी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या एकुण रक्कम रू.1,07,92,326/- तसेच श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 96 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या एकुण रक्कम रू. 28,01,534/- मात्रचे दरांबाबत संबधीत कंपन्यांशी चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देण्याचे अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **श्री साईबाबा महाविद्यालयातील सन २०२०-२०२१ करीता कला, वाणिज्य, विज्ञान शाखा तृतीय वर्ष व संगणक शास्त्र शाखा व्दितीय वर्षाकरीता सहाय्यक प्राध्यापक (CHB) यांची फेर नेमणूक होणेबाबत.**

**प्रस्ताव** अधिनियमः- अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –

०१. मा.व्य.समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२५७
०२. मा.व्य.समितीचे दि.३०.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.४५०
०३. मा.व्य.समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१)
०४. मा.व्य.समितीचे दि.०४.०७.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.३१३
०५. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२४३

प्रस्ताविकः- श्री साईबाबा सस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक–मान्यता–२०१८/(३०/१८)/माशि-४, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मिळाले तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. उपरोक्त संदर्भ क्र.०४ चे आदेशान्वये श्री

साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून, सदर महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाजसाठी ०२ लिपीक टंकलेखक व ०२ मदतनीस कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णयानुसार वरिष्ठ महाविद्यालयाकरिता शासन स्तरावरुन स्वतंत्र आकृतीबंध निश्चित न करता सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील प्रतिवर्षी संच मान्यतेनुसार आकृतीबंध कायम ठेवणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/ आस्था/७३/२०१८ दि.०५ एप्रिल, २०१८ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबत व त्यासाठी आवश्यक आकृतीबंधाबाबत मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८/६५६/प्र.क्र.५६/का.१६ दि.१२ जुलै, २०१८ अन्वये प्रथम वर्ष प्रवेश क्षमता १२० ग्राह्य धरुन मान्यता दिलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**शिक्षक पदे (तक्ता क्र.०१)**

| **अ.क्र.** | **विद्याशाखा** | **विषय** | **कार्यभार** | **अनुज्ञेय पदे** | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **पुर्णवेळ** | **तासिका तत्वावर** |
| ०१. | **कला** | इंग्रजी | ०४ + ०४ | ०० | ०१ |
| ०२. | | भूगोल | ०४ | ०० | ०१ |
| ०३. | | हिंदी | ०४ | ०० | ०१ |
| ०४. | | इतिहास | ०४ | ०० | ०१ |
| ०५. | | मराठी | ०४ | ०० | ०१ |
| ०६. | | राज्यशास्त्र | ०४ | ०० | ०१ |
| ०७. | | मानसशास्त्र | ०४ | ०० | ०१ |
| ०८. | | अर्थशास्त्र | ०४+०४ | ०० | ०१ |
| ०९. | | तत्वज्ञान | ०० | ०० | ०१ |
| १०. | | समाजशास्त्र | ०४ | ०० | ०१ |
| ११. | **वाणिज्य** | वाणिज्य | २० | ०१ | ०० |
| १२. | **विज्ञान** | वनस्पतीशास्त्र | २६ | ०१ | ०० |
| १३. | | रसायनशास्त्र | ३८ | ०२ | ०० |
| १४. | | इलेक्ट्रॉनिक्स | २२ | ०१ | ०० |
| १५. | | गणित | ०९ | ०० | ०१ |
| १६. | | पदार्थविज्ञान | ३८ | ०२ | ०० |
| १७. | | प्राणिशास्त्र | ३८ | ०२ | ०० |
| १८. | | सुक्ष्मजिवशास्त्र | ३८ | ०२ | ०० |
| १९. | | प्राचार्य | ०६ | ०१ | ०० |
| २०. | | ग्रंथपाल | ०० | ०१ | ०० |
| २१. | | शा.शि.संचालक | ०० | ०१ | ०० |
| | | **एकुण** | **२८३** | **१४** | **११** |

**शिक्षकेतर पदे**

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **अनुज्ञेय पदे** |
|---|---|---|
| ०१. | मुख्य लिपीक | ०१ |
| ०२. | वरिष्ठ लिपीक | ०१ |
| ०३. | कनिष्ठ लिपीक | ०१ |
| ०४. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०२ |
| ०५. | प्रयोगशाळा परिचर | ०२ |
| ०६. | ग्रंथालय परिचर | ०१ |

| | | |
|---|---|---|
| ०७. | शिपाई | ०३ |
| | **एकुण** | **११** |

त्यानुसार श्री साईबाबा महाविद्यालयासाठी आवश्यक सहाय्यक प्राध्यापकांची पुर्णवेळ तासिका तत्वावर नेमणूक करणेकामी संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत तज्ञ समितीची नेमणूक करुन दि.०७ ऑगस्ट, २०१८ रोजी मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. सदर मुलाखतीद्वारे निवड केलेल्या उमेदवारांना प्रति माह रु.१५,०००/- मात्र मानधनावर दि.२०.०८.२०१८ रोजी दि.३१.०५.२०१९ अखेर नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१) नुसार श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३१/१९)/मशि-४, दि.१५ जून, २०१९ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये प्रस्तावित विशेषस्तर विषय तसेच बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) व बीसीए (विज्ञान) हे प्रस्तावित नवीन अभ्यासक्रमास कायम विनाअनुदानीत तत्त्वावर सुरु करणेस मान्यता दिलेली आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३४/१९)/मशि-४, दि.१५ जून, २०१९ अन्वये कला व वाणिज्य शाखेच्या प्रथम वर्षासाठी प्रत्येकी एक अतिरिक्त तुकडी कायम विनाअनुदानीत तत्वावर सुरु करणेस मान्यता दिलेली आहे.

श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करिता नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग व विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी कार्यभारानुसार अनुज्ञेय होणारे पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस, तसेच आवश्यक प्राध्यापकांची सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित पद्धतीने भरतीप्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. सदर विषयाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१३ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करिता नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग व विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी कार्यभारानुसार अनुज्ञेय होणा-या पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यक प्राध्यापकांची भरती ही सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहिरात देऊन विहित पद्धतीने करण्यात यावी. भरती प्रक्रियेकामी आवश्यकतेनुसार विषय तज्ञांना आमंत्रित करण्यास व याकामी येणा-या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत दि.१७.०७.२०१९ रोजी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्राध्यापक भरतीकामी दि.२५.०७.२०१९ रोजी Walk in Interview ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीनुसार दि.२५.०७.२०१९ रोजी उपस्थित पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येऊन, त्यांचे निवड तक्ते बनविण्यात येऊन निवड करण्यात आलेल्या प्राध्यापकांना दि.३१.०५.२०२० अखेर एकत्रित मानधनावर नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सद्यस्थितीमध्ये महाविद्यालयाकडे खालीलपमाणे प्राध्यापक कार्यरत आहेत.

**(तक्ता क्र.०२)**

| अ.क्र. | नेमणूक करण्यात आलेल्या सहा.प्राध्यापकांचे नांव | विषय | एकत्रित मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.शिवाजी गोरक्षनाथ ढोकणे | राज्यशास्त्र | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०२. | श्रीमती योगिता अरुण कोपटे | वाणिज्य | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०३. | श्री.अमोल झुंबर कचरे | भूगोल | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०४. | श्री.गणेश रामचंद्र भांड | भौतिकशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०५. | श्रीमती सोनाली रामचंद्र हरदास | हिंदी | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०६. | श्री.किशोर रामदास शेळके | इंग्रजी | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर **दि.२५.११.२०१९ राजीनामा** |
| ०७. | श्रीमती शितल अरविंद धरम | इतिहास | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ०८. | श्रीमती स्वप्नाली रमेश खांडरे | अर्थशास्त्र | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९. | श्रीमती सुनिता सकाहरी वडितके | मराठी | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| १०. | श्री.दिपक बाबासाहेब पटारे | वनस्पतीशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| ११. | श्री.संतोष भिमराज औताडे | वाणिज्य | रु.२०,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| १२. | श्री.गणेश भानुदास मगर | गणित | रु.२१,०००/- | दि.०३.०८.२०१९ रोजी हजर |
| १३. | श्री.विकास सुर्यभान भांड | प्राणीशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०६.०८.२०१९ रोजी हजर |
| १४. | श्री.नितिन रावसाहेब पावसे | रसायानशास्त्र | रु.२१,०००/- | दि.०७.०८.२०१९ रोजी हजर |
| १५. | श्री.प्रशांत ज्ञानेश्वर हासे | गणित | रु.२१,०००/- | दि.०८.०८.२०१९ रोजी हजर |
| १६. | श्री.नानासाहेब त्रिंबक गुंजाळ | वनस्पतीशास्त्र | रु.२१,०००/- | दि.२०.०८.२०१९ रोजी हजर |
| १७. | श्री.प्रदीप सोमनाथ शेलार | रसायनशास्त्र | रु.२१,०००/- | दि.२६.०८.२०१९ रोजी हजर |
| १८. | श्री.सुनिल रामनाथ पठारे | इलेक्ट्रॉनिक्स | रु.२१,०००/- | दि.०७.०९.२०१९ रोजी हजर |
| १९. | श्री.नानासाहेब भानुदास सदाफळ | संगणकशास्त्र | रु.२२,०००/- | दि.१३.०९.२०१९ रोजी हजर |
| २०. | श्री.सुनिल गंगाधर गायकवाड | इंग्रजी | रु.२०,०००/- | दि.२६.११.२०१९ रोजी हजर |

सहा.प्राध्यापक भरतीमध्ये प्राणीशास्त्र विषयाच्या ०३ पदांची जाहिरात देण्यात आलेली होती मात्र मुलाखतीस एकच उमेदवार हजर असल्याने त्यांची निवड करण्यात आलेली होती, तसेच भौतिकशास्त्र विषयाच्या ०३ पदांची जाहिरात देण्यात आलेली होती, मुलाखतीस ०२ उमेदवार हजर असल्याने त्यांची निवड करण्यात आलेली होती, मात्र एकच उमदेवार हजर झाले असून, दुसरे उमेदवार हजर झालेले नाही. त्यामुळे प्राणीशास्त्र व भौतिकशास्त्र या विषयांकरिता व्हिजीटींग पद्धतीने प्राध्यापकांना आमंत्रित करुन, अभ्यासक्रम पुर्ण करुन घेण्यात आलेले आहे. तसेच इंग्रजी विषयाच्या प्राध्यपकाने त्यांच्या वैयक्तिक कारणाने राजीनामा दिल्याने त्यांचा राजीनामा दि.२५.११.२०१९ रोजी मंजुर करण्यात येऊन, मुलाखती प्रक्रियेमध्ये प्रतिक्षायादीवर असलेल्या प्रथम उमेदवारास सामान्य प्रशासन विभागामार्फत नेमणूक आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार ते दि.२६.११.२०१९ रोजी कामावर हजर झालेले आहेत. उपरोक्त अ.क्र.१ ते १० चे सहा.प्राध्यापक यांची सन २०१८-१९ व सन २०१९-२० या दोन्ही शैक्षणिक वर्षात मुलाखतीद्वारे निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी अ.क्र.०६ यांनी राजीनामा दिलेला आहे. तर अ.क्र.११ ते २० चे सहा.प्राध्यापक यांची सन २०१९-२० या वर्षात मुलाखतीद्वारे निवड करण्यात आलेली आहे. तसेच कनिष्ठ महविद्यालयाकडील ग्रंथपाल यांचेकडे श्री साईबाबा महाविद्यालयाच्या ग्रंथपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे तर श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील क्रिडा शिक्षक यांचेकडे शारिरीक शिक्षण संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा महाविद्यालयाकडे मंजुर आकृतीबंधानुसार सन २०१९-२० मध्ये असलेले सद्यस्थिती खालीलप्रमाणे

**(तक्ता क्र.०३)**

| **अ.क्र.** | **विषय** | **आकृतीबधामध्ये मंजुर पदे** | | **सध्या कार्यरत प्राध्यापक पदसंख्या** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **तासिका तत्व** | **पुर्णवेळ** | **तासिका तत्व** | **पुर्णवेळ** |
| ०१. | इंग्रजी | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०२. | मराठी | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०३. | हिंदी | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०४. | भूगोल | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०५. | राज्यशास्त्र | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०६. | इतिहास | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०७. | अर्थशास्त्र | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०८. | मानसशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० |
| ०९. | तत्वज्ञान | ०१ | ०० | ०० | ०० |
| १०. | समाजशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० |
| ११. | वाणिज्य | ०० | ०१ | ०२ | ०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | पदार्थ विज्ञान/भौतिकशास्त्र | ०० | ०२ | ०१ | ०० |
| १३. | रसायनशास्त्र | ०० | ०२ | ०२ | ०० |
| १४. | वनस्पतीशास्त्र | ०० | ०१ | ०२ | ०० |
| १५. | प्राणीशास्त्र | ०० | ०२ | ०१ | ०० |
| १६. | सुक्षमजीवशास्त्र | ०० | ०२ | ०० | ०० |
| १७. | गणित (B.Sc. Computer Science) सह | ०१ | ०० | ०२ | ०० |
| १८. | Electronics | ०० | ०१ | ०१ | ०० |
| १९. | Computer Science | ०० | ०० | ०१ | ०० |
| २०. | प्राचार्य | ०० | ०१ | ०० | ०० |
| २१. | ग्रंथपाल | ०० | ०१ | ०० | ०० |
| २२. | शा.शि.संचालक | ०० | ०१ | ०० | ०० |
| | **एकुण** | **११** | **१४** | **१९** | **००** |

**शिक्षकेतर पदे**

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **आकृतीबंधामध्ये मंजुर पदे** | **सध्या कार्यरत पदसंख्या** | |
|---|---|---|---|---|
| | | | कायम | कंत्राटी |
| ०१. | मुख्य लिपीक | ०१ | ०० | ०० |
| ०२. | वरिष्ठ लिपीक | ०१ | ०० | ०० |
| ०३. | कनिष्ठ लिपीक | ०१ | ०२ | ०१ |
| ०४. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०२ | ०० | ०० |
| ०५. | प्रयोगशाळा परिचर | ०२ | ०० | ०० |
| ०६. | ग्रंथालय परिचर | ०१ | ०० | ०० |
| ०७. | शिपाई | ०३ | ०२ | ०० |
| | **एकुण** | **११** | **०४** | **०१** |

तरी उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे श्री साईबाबा महाविद्यालयाचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रथम व द्वितीय वर्षाकरिता तसेच नवीन अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाकरिता आवश्यक शिक्षक व शिक्षकेतर पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजुर करणेकामी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी इकडील कार्यालयामार्फत दि.०२.०७.२०१९ व दि.०१.०८.२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला असता, सामान्य प्रशासन विभागामार्फत आकृतीबंध व बिंदूनामावलीचे कामकाजाकरिता समितीची नेमणूक करण्यात आलेली असल्यामुळे आवश्यक आकृतीबंधाची माहिती सदर समितीस द्यावी, जेणेकरुन पुर्ण संस्थानचा आकृतीबंध एकत्रित मान्यतेस पाठविण्यात येणार आहे, असे मौखिक निर्देश वरिष्ठांनी दिलेले होते, त्यानुसार सदर समितीस सर्व माहिती व आवश्यक आकृतीबंधाबाबतची माहिती दि.२५.११.२०१९ रोजी तसेच वेळोवेळी मागणी केल्याप्रमाणे कागदपत्रे देण्यात आलेली आहेत.

तसेच श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रथम व द्वितीय वर्ष (कला, वाणिज्य व विज्ञान शाखा) तसेच प्रथम वर्ष संगणकशास्त्र शाखेच्या एकूण कार्यभारानुसार पदसंख्या निश्चित करणेकामी मा.उपसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडे इकडील जा.क्र.एसएसएस/साईबाबा महाविद्यालय/१४६/२०१९ दि.०७.१२.२०१९ तसेच जा.क्र.१७७/२०२० दि.१६.०१.२०२० अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मात्र त्यांचेकडून आजपर्यंत पदनिश्चितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील जा.क्र.CA/Eleg.-Non Eleg/New CSSPDIF-A.Y.2020-21 दि.२०.०३.२०२० अन्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी नवीन अभ्यास पाठयक्रम/विषय/विशेषस्तर विषय/नैसर्गिक वाढ/ अतिरिक्त तुकडी/जलदगती तुकडीची नियमितीकरण/प्रवेश क्षमता वाढ / विद्याशाखा इ.साठी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे वर्ग, विशेषस्तर विषय, तसेच संगणकशास्त्र शाखेचे प्रथम व द्वितीय वर्षाचे अध्यापन याकरिता आवश्यक पदभरती करणे गरजेचे आहे.

त्याकरिता प्रथम वर्षाकरिता पुर्णक्षमतेने विद्यार्थीसंख्या व द्वितीय, तृतीय वर्षासाठी सद्यस्थितीतील विद्यार्थीसंख्या गृहीत धरल्यास खालीलप्रमाणे विषयनिहाय पदभार/कार्यभार व आवश्यक पदसंख्या निश्चित होत आहे.

**(तक्ता क्र.०४)**

| अ.क्र. | विद्याशाखा | विषय | कार्यभार | अनुज्ञेय पदे | | सध्या कार्यरत पदे | नव्याने आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्णवेळ | तासिका तत्व | | |
| ०१. | **कला** | इंग्रजी | २४ | ०१ | १ | ०१ | - |
| ०२. | | भूगोल | ३२ | ०१ | १ | ०१ | - |
| ०३. | | हिंदी | ३२ | ०१ | १ | ०१ | - |
| ०४. | | इतिहास | २८ | ०१ | १ | ०१ | - |
| ०५. | | मराठी | ३६ | ०१ | १ | ०१ | - |
| ०६. | | राज्यशास्त्र | २८ | ०१ | १ | ०१ | - |
| ०८. | | अर्थशास्त्र | ३२ | ०१ | १ | ०१ | - |
| ११. | **वाणिज्य** | वाणिज्य | ६८ | ०३ | १ | ०२ | ०१ |
| १२. | **विज्ञान** | वनस्पतीशास्त्र | ९८ | ०५ | - | ०२ | ०३ |
| १३. | | रसायनशास्त्र | ११४ | ०५ | - | ०२ | ०३ |
| १४. | | गणित | ५८ | ०३ | - | ०२ | ०१ |
| १५. | | पदार्थविज्ञान | ८६ | ०४ | - | ०१ | ०३ |
| १६. | | प्राणिशास्त्र | ९४ | ०५ | - | ०१ | ०४ |
| १८. | **संगणकशास्त्र** | इलेक्ट्रॉनिक्स | ३६ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| १९ | | संगणकशास्त्र | ३६ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| २०. | | प्राचार्य | - | ०१ | - | ०० | - |
| २१. | | ग्रंथपाल | - | ०१ | - | ०० | ०१ |
| २२. | | शा.शि.संचालक | - | ०१ | - | ०० | ०१ |
| | | **एकुण** | | | | **१९** | **१९** |

आपले महाविद्यालयाकडे सध्या कार्यरत असलेल्या १९ प्राध्यापकांची मुदत दि.३१ मे, २०२० अखेर आहे. सदर प्राध्यापकांची कामकाज उत्कृष्ठ (Grade - A) आहे. तसेच त्यांनी मागील वर्षीच्या अटी व शर्तीनुसार फेर नेमणूक मिळणेबाबत अर्ज केलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये सदर प्राध्यापकांना सन २०१८-१९ चे एकुण मानधनामध्ये प्रत्येकी रु.५,०००/- मात्र वाढ दिलेली होती. सध्याची वाढती महागाई व इतर कर्मचारी यांना मिळालेल्या सातव्या वेतन आयोगाचा विचार करता सदर प्राध्यापकांनाही सन २०१९-२० मध्ये असलेल्या मानधनामध्ये मागीलवर्षीप्रमाणेच रक्कम रु.५,०००/- किंवा योग्य ती वेतनवाढ देऊन पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार सन २०२०-२१ मध्ये फेर नेमणूक करता येईल.

मागणी – सध्या देशभरात कोरोना विषाणूमूळे उदभवलेली परिस्थिती व त्यासाठी केंद्र व राज्य सरकार करत असलेले उपाययोजना विचारात घेता, सन २०२०-२१ करिता पुन्हा सर्व विषयांसाठी प्राध्यापक भरतीकामी मुलाखती घेणे, गर्दी करणे, तसेच वेळेचा व श्रमाचा अपव्य करणेपेक्षा सध्या कार्यरत असलेल्या १९ सहाय्यक प्राध्यापक (CHB) (तक्ता क्र.०२ मध्ये नमुद केलेले २० पैकी अ.क्र.०६ वगळता इतर १९ सहा.प्राध्यापक) यांना पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार, पुर्वीच्याच मानधनावर अथवा रक्कम रु.५,०००/- किंवा योग्य ती मानधनवाढ करुन सन २०२०-२१ करिता १५ दिवसांचा ब्रेक देऊन दि.१५.०६.२०२० ते दि.३१.०५.२०२१ अखेर फेर नेमणुक करण्यास व त्याचे फेरनेमणुक आदेश सामान्य प्रशासन विभागामार्फत पारित करणेस मान्यता मिळणेस विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान – -

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– मागणी परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे सध्या कार्यरत असलेल्या १९ सहा.प्राध्यापक (CHB) यांची पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार, पुर्वीच्याच मानधनावर अथवा रक्कम रु.५,०००/- किंवा योग्य ती मानधनवाढ करुन सन २०२०-२१ करिता १५ दिवसांचा ब्रेक देऊन सन २०२०-२१ करिता दि.१५.०६.२०२० ते दि.३१.०५.२०२१ अखेर फेर नेमणुक करण्यास व त्याचे फेर नेमणुक आदेश सामान्य

प्रशासन विभागामार्फत पारित करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.३०२** **यावर सविस्तर चर्चा झाली, श्री साईबाबा महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान शाखा व संगणक शास्त्र शाखा यांचे सध्या कार्यरत असलेल्या १९ सहा.प्राध्यापक (CHB) यांची मुदत दि.३१ मे,२०२० रोजी संपत आहे. तरी त्यांना १५ दिवस ब्रेक देऊन सन २०२०-२०२१ करीता कला, वाणिज्य, विज्ञान शाखा तृतीय वर्ष व संगणक शास्त्र शाखा व्दितीय वर्षाकरीता उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या १९ सहा.प्राध्यापक (CHB) यांची पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार, पुर्वीच्याच मानधनावर दि.१५.०६.२०२० ते दि.३१.०५.२०२१ अखेर नेमणुक करण्यास व त्याचे नेमणुक आदेश सामान्य प्रशासन विभागामार्फत पारित करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय/ सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.२४५/१ पै.मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधुन पाणी घेणेकरीत जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सल्लागार म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करुन नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागांराकडून e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :- अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पूरविणे, तसेच पोट कलम १ (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:- दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.४५ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

“...यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/०१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता ९००mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी त्यांना आदा करावयाचे फी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.”

प्रस्तावना :-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ मध्येदेणगीदार साईभक्त यांचे देणगीतून पाणीपुरवठा विभागामार्फत नविन साठवण तलावाची निर्मिती करणेत आलेली आहे. सदरहू तलावाचे काम पूर्ण झाले असून गोदावरी उजवा तट कालव्यापासून पाईपलाईन टाकणेचे काम बाकी आहे. याबाबत पाणीपूरवठा विभागाने दि.०७/०१/२०१९ च्या आदेशान्वये इकडील विभागास खालील कामे पूर्ण करुन त्याबाबतचा लेखी अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

**अ)** साठवण तलावात पाणी घेणेकरीता ९०० एम.एमव्यासाची पाईप लाईन टाकणेबाबत इस्टीमेट तयार करुन कार्यवाही करणे (९०० एम.एम व्यासाची पाईप लाईन टाकणे, मीटर रुम बांधणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट तयार करणे व ठिकठिकाणी चेंबरचे बांधकाम करणे).

**ब)** नविन साठवण तलाव निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ ते जुना साठवण कनकुरी फिल्टर प्लॅन्टपर्यंत पाईपलाईन टाकणेकरीता नाली खोदाई करणे.

उपरोक्त कामे करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाहीचे टप्पे पूर्ण करणे आवश्यक आहे.

१. कॅनॉल, नविन साठवण तलाव, जुना साठवण तलाव यांचे लोकेशन, अलाईनमेंट व लेव्हल घेणेसाठी टोटल स्टेशन सर्व्हे करणे.

२. पाईपलाईन डिझाईन करणे, इनटेक वेल तयार करणे, मीटर रुमचे प्लॅन व डिझाईन करणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट डिझाईन करणे, मोजमापासह नकाशे तयार करणे इ.

३. वर नमूद कामांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रीक मान्यता घेणे व मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे.

४. ई-निविदा प्रक्रिया राबविणे.

वर नमूद कामे ही वैशिष्टपूर्ण (Specialized) स्वरुपाची असून त्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ बांधकाम विभागाकडे उपलब्ध नसल्याने संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता पाईपलाईन टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेकामाचा प्रस्ताव दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला असता, त्यावर खालीलप्रमाणे निर्णय क्र.४५समंत झाला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/०१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता ९००mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी त्यांना आदा करावयाचे फी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."

श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कोपरगांव व शिर्डी शहरासाठी निळवंडे धरणातून थेट पाईपलाईनव्दारे पाणीपुरवठा करणेचे प्रस्तावित संयुक्त पाणीपुरवठा योजना टप्पा क्र.०१ चे कामास सुरूवात झालेली आहे. सदर कामास संस्थानमार्फत प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची नियुक्ती करणेत आली आहे.

सदर योजनेचे टप्पा क्र.०१ चे काम The Indian Hume Pipe Co. Ltd., Ahmednagar या ठेकेदारास बहाल करणेत आले असून सदर काम सध्या प्रगतीत आहे. सदर कामाचे निविदेत पाईपलाईन टाकणे कामाचा समावेश आहे. सदर कामातील पाईपलाईन टाकणेचे कामात काही बचत होणार आहे किंवा कसे? तसेच जर बचत होणार असेल तर निविदेतील अटी व शर्तीनूसार सदर मौजे निमगाव को-हाळे, ता. राहाता येथिल गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणीघेणेकरीता या निविदेच्या माध्यमातून सदर नविन जलवाहीनी टाकता येईल का? याबाबत संस्थानला मार्गदर्शन मिळणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना संस्थानचे जा.नं.७१८/२०१९ दि.०१/०६/२०१९ अन्वये पत्र पाठविण्यात आले होते.

त्यानुसार कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी जा.क्रं./तांशा-३/१३१०/२०१९, दि.२१/०६/२०१९ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

१. निमगांव को-हाळे येथील गट क्र.२४५/१ मधील साठवण, तलाव भरणेकामी सध्या मंजूर (निळवंडे धरण उदभव) योजनेतून भरण्याची तरतूद नाही, तसेच या कामी लागणारे पाईपाचा समावेश मंजूर प्रकल्प आराखडयात धरण्यात आलेला नाही, त्यामुळे या निविदेमधून सदर पाईपलाईन टाकणे असंभव आहे.

२. तथापि, सदर साठवण तलाव भरावयाचा झाल्यास त्याची क्षमता, त्याची FSL,LSL या पातळया, आवश्यक आहेत, तसेच सदर ठिकाणी पाणी आणणेकामी गोदावरी उजवा कालव्यावर Canal Intake कोठे बांधण्यात येईल, त्यास पाटबंधारे विभागाची परवानगी कॅनालच्या FSI, LSL या पातळया ज्यावरुन कॅनाल ते साठवण तलाव या पाईपचे संकल्पन करणे सोयीस्कर होईल.

३. तसेच सदर कामाचा मंजूर प्रकल्प आराखडयात तसेच IHP कं. यांचे निविदेत समावेश नसल्याने त्यास प्रथम शिर्डी संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मंजुरी घ्यावी लागेल, तद्नंतर उपरोक्त कामांचे स्वंतत्र अंदाजपत्रके करुन त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी वरीलप्रमाणे कळविलेपैकी गोदावरी उजवा कालव्यावर गेट (Canal Intake / Head Regulator) बांधण्यासाठी जलसंपदा विभागाची परवानगी घेण्याची कार्यवाही संस्थानचे पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.त्यासाठी रु.१०,८६,५२४/- इतकी रक्कम कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे जमा करणेत आली असून सदर गेटचे बांधकाम जलसंपदा विभागामार्फत करण्यात येणार आहे.

तसेच गोदावरी उजवा कालवा ते साठवण तलावापर्यंत पाईपचे व्यासाबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग कोपरगांव यांचेकडील श्री. भांगरे, सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) यांचेसमवेत चर्चा केली असता त्यांनी यासाठी ७०० एम.एम व्यासाची पाईपलाईन पुरेशी असल्याचे सांगितले. तथापी अंतिम संकल्पनानंतर यामध्ये बदल होऊ शकतो, असे सांगितलेआहे.

दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील वर नमूद निर्णय क्र.४५ अन्वये,मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ मधील नविन साठवण तलावामध्येगोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना जा.क्र.२०७६/२०१९, दि.२९/०८/२०१९ अन्वये नियुक्ती पत्र देणेत आले आहे. तसेच म. जि. प्रा.

यांचेशी समक्ष शिर्डी येथिल बैठकांमध्ये तसेच दुरध्वनीवर वेळोवेळी पाठपुरावा करणेत आला आहे. परंतू त्यांचेकडून अद्याप सर्वेक्षण, डिझाईन, सविस्तर अंदाजपत्रक प्राप्त झालेले नाही.

तथापी मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांनी दि.१२/०९/२०१९ चे पत्रान्वये,वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा (निळवंडे धरण उद्भव) या योजनेचे प्रकल्पव्यवस्थापन सल्लागार शुल्कापोटी उर्वरीत रक्कम रू.६,२७,१५,४१३/- मात्र म.जि.प्रा. कडे त्वरीत भरणा करणेत यावी.सदर शुल्काची रक्कम भरल्यानंतरच वरील विषयांकीत कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार म्हणून काम करणेबाबत निर्णय घेण्यात येईल, असे कळविले आहे.

तसेच मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना संस्थानकडील दि.१९/१०/२०१९ चे पत्रान्वये, वरील विषयांकीत कामाचे सर्व्हेक्षण, डिझाईन, सविस्तर अंदाजपत्रक लवकरात लवकर सादर करावे, जेणेकरुन ई-निविदा राबविणेची कार्यवाही सुरु करता येईल. तसेच याकामाचा फी चा प्रस्ताव देखील या कार्यालयाकडे सादर करावा म्हणजे त्यास संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल, असे कळविणेत आले परंतू अद्याप कुठलीही कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचेकडून झालेली नाही. तसेच मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना संस्थानकडील दि.१०/१२/२०१९ चे पत्रान्वये, उक्त कामाबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.१७/१२/२०१९ राजी सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. तथापि सदर वेळी ते उपस्थित राहू शकले नाही.

तसेच वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा (निळवंडे धरण उद्भव) योजनेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षामध्ये मा. श्री. देवेंद्र लांडगे, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक व त्यांचे विभागातील इतर संबंधीत अधिकारी यांची बैठक दि.०५/०३/२०२० रोजी झाली आहे. त्यावेळी वरील विषयांकित प्रकल्पासाठी सर्वेक्षण, डिझाईन, सविस्तर अंदाजपत्रक व फीचा प्रस्ताव सादर करणेबाबत त्यांना विनंती करणेत आली. तथापि निळवंडे योजनेचे सल्लागार शुल्काची रक्कम मिळाल्यानंतरच याबाबत कार्यवाही करणेत येईल असे त्यांचेकडून उक्त बैठकीदरम्यान सांगण्यात आले आहे.

यावरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांना वरील विषयांकित प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यात स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकल्प लवकर होण्याचे दृष्टीने संस्थानमार्फत या क्षेत्रातील खाजगी तांत्रिक सल्लागाराची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे उचित होईल, असे मत आहे.

त्याकरीता मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावा मध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना सल्लागार म्हणून नियुक्तीसाठी देणेत आलेला नियुक्ती आदेश रद्द करून सदर कामासाठी सल्लागार नियुक्तीकरीता ई-आरएफपी प्रस्ताव मागविणेत यावेत असे मत आहे.

